
ॐ

गोमंतकीय देवालयें



—ना. भा. नायक

ॐ

गोमंतकीय देवालयें

★

लेखक
नारायण भास्कर नायक, साहित्यविशारद्
संपादक 'भारतमित्र'
रिवण, गोवा.

★

१९५९

मित्र छापखाना, मडगांव.

मूल्य ३।। रुपये

विषयानुक्रम—



श्रीशांतादुर्गा, कवळें.



श्रीमंगेश, मंगेशीं.



श्रीनवदुर्गा, बोरी.



श्रीरामनाथ, रामनाथीं.



श्रीदामोदर, जांबावली.



श्रीम्हाळसा, म्हार्दोळ.

गोमंतकीय देवालयें

देवालयांचा उगम

देवालय हा शब्द देवाची पूजा व प्रार्थना करण्याचें आलय अशा अर्थीच प्रचारांत आला. प्राचीन शिल्पसंहितांतील देवालय शास्त्राच्या विचार विभागांत देवाचें स्वरूप, देवाचा व जगाचा संबंध, मनुष्यांचें देवासंबंधींचें कर्तव्य याचा विचार ठीक केला असून आचार भागांत देवाच्या स्वरूपानुरूप त्याची मूर्ति करणें, सेवेचे मार्ग ठरविणें व आवश्यक कर्तव्यांबद्दलची व्यवस्था करणें यांचें विवरण केलें आहे.

देवाच्या स्वरूपाबद्दल सूक्ष्म विचार केला कीं त्याचें निर्गुणस्वरूप पहिल्यानें नजरेसमोर येणें साहजिक आहे. या निर्गुण स्वरूपाचें वर्णन उपनिषदांत चांगलें केलें आहे. पण या निर्गुण स्वरूपापर्यंत सर्वसाधारण भाविकांची वाणी पोंचत नाहीं; इतकेंच नव्हे तर तें स्वरूप सहजासहजीं मनांत आणणेंहि शक्य होत नाहीं. म्हणून असा हा निर्गुण परमात्मा भाविकांच्या उपासनेला शक्य होत नाहीं. फक्त योग्यतेच्याच मनुष्यांनां समाधी लावून या स्वरूपाचा अनुभव घेतां येतो. हेंच माणसाचें अंतिम साध्य. हें गांठलें कीं तो मुक्त झाला. आकाशतत्वाच्या अभ्यासानें हे ज्ञान होतें.

परमात्म्याचें दुसरें स्वरूप म्हणजे अव्यक्त स्वरूप होय. हें ग्राह्य असें धरलें, तरी याचेंहि मूल स्वरूप मनाला कळत नाहीं. या अव्यक्ताच्या उपासनेंतहि फार कष्ट आहेत असें गीतेंत सांगितलें आहे. याची उपासना प्राणायामादि योगमार्गानें ध्यानानें करतां येते. अशांकरतां प्राचीन देवालयांतून गुहा करण्याची चाल होती. याचें ज्ञान वायुतत्त्वाच्या अभ्यासानें होतें.

परमात्म्याचें तिसरें स्वरूप म्हणजे दिव्य स्वरूप होय. महाभारतांत दमयंती स्वयंवर आख्यानांत देवांचे दिव्य गुण असे सांगितले आहेत—"देवांनां सावली नसते. मल नसतो. घाम नसतो. ते निष्काम कर्म करतात. त्यांनां षड्रिपूंचीहि बाधा नसते इ." हें दिव्य स्वरूपाचें ज्ञान तेजतत्वाच्या अभ्यासानें होतें. या तत्वाचा प्रारंभ अग्नीपासून होतो. दिव्य परमात्म्याचें आराधन यज्ञानें कां करतात हें यावरून कळून येतें.

परमेश्वराचें चौथें सगुण स्वरूप होय. यांत अनंतत्व, सर्वज्ञत्व, सर्वशक्तिमत्व, दया व न्याय असे पंचगुण संभवतात. मोठमोठ्या प्राचीन व अर्वाचीन तत्त्वज्ञांनीं जगन्नियंत्या परमेशाच्या अंगीं हे पांच गुण असलेच पाहिजेत आणि म्हणूनच त्याला परमेश्वर म्हणतात असें आपलें मत सप्रमाण मांडलें आहे. या स्वरूपाचे गुण वाणीनें वर्णन करतां येतात. या स्वरूपाचीं स्तोत्रें गाणें हेंच याचें आराधन होय. यज्ञानंतरच्या कार्यक्रमांत हीच स्तुति असून अनेक मागण्या असतात. परमेश्वराचे हे पंचगुण जगांत जिकडे तिकडे निदर्शनास येतात. पंचमहाभूतांचे हे पांच गुण लक्षांत आणून त्यांतील एकेकाचें स्तवन करूं लागलें तरी वाणी थकून जाते, पण त्या गुणांची समाप्तीच होणार नाहीं. सृष्टीच्या व्यवहारांत जितकें खोल शिरावें तितकें अधिकाधिक त्यांत परमेश्वराचें अगाधत्व दिसून येतें व मन थक्क होऊन जातें.

या सगुण स्वरूपावरून गुणांचीं निदर्शक

चिन्हें तयार करून साकार मूर्ति घडविण्यांत आल्या आणि त्यांची ठेवण, रंग, वस्त्र, आयुधें उपचार इ. कल्पिले गेले.

या साकार परमात्म्याचें षोडशोपचारें पूजन करतां येतें व त्यांत मनाला वाटेल तितका वेळ गुंतवितां येतें. परमात्म्याचें हें साकार स्वरूप सर्वसाधारण भाविकाला आवडणारें असें आहे.

देवाचें सहावें स्वरूप म्हणजे व्यक्त स्वरूप होय. ही सर्व सृष्टि परमेश्वरमय आहे. देव अनंतस्वरूपी आहे. विष्णु, शंकर, दत्तात्रेय, गणपति अशा अनेक देवतांपैकीं आपल्या आवडीप्रमाणें वाटेल त्या देवाचें देवालय बांधावें त्याची पूजा, प्रार्थना, उपासना करावी, त्या पासून आनंद मिळवावा आणि त्याचा फायदा इतरांसहि द्यावा अशी मनुष्याची भावना या व्यक्त स्वरूपांत होते. म्हणून त्या निरनिराळ्या देवतांसाठीं निरनिराळ्या उत्सवांची योजना केलेली असते अशा रीतीनें परमेश्वराच्या या व्यक्त स्वरूपाची सेवा उत्सव रूपानें करण्यांत येते. पुराण, कीर्तन, भजन, इत्यादि त्यांत मग अनेक कार्यक्रम समावतात.

प्रपंचांत व व्यवहारांत दंग होऊन पडलेल्या लोकांचें लक्ष देवाकडे लागावें, त्यांत रमून जाऊन देवाचा साक्षात्कार मिळवावा म्हणून कथाकीर्तनें आहेत. यांत गाणें, गोष्टी, वाद्यें इत्यादि मनोरंजक प्रकार असून सामान्य माणसाचें मन आकर्षिलें जाईल अशी व्यवस्था असते. कथेसाठी देवळांत जावें, तेथील मूर्ति पहावी, देवाचे गुणानुवाद ऐकावे असें करतां करतां भजनावर यावयाचें. भजनावरून पुराणाकडे लक्ष वेधतें. तेथून स्तोत्रपाठ, नामजप यांवर यावयाचें. येथें मग गुणांची गोडी सुटते. नंतर ओंकार जप. येथें व्यक्तित्व नाहींसें होतें. आणि मग समाधिस्थितींत जावयाचें अशी ही पूर्वजांची योजना आहे. याच योजनेंतून देवालयांचा उगम झालेला आहे.

सर्वसाधारण माणसाला परमेश्वराचें अगाध सामर्थ्य, अतुल दया व निर्हेतुक प्रेम पाहून आपलीं सुखदुःखें देवळांत जाऊन त्याला सांगावीं व आपल्या आशा आकांक्षा त्याकडून पुऱ्या करून घ्याव्या अशी उत्कट इच्छा असते. त्यासाठीं तरी त्याला देव व देवळाची अत्यंत गरज भासते.

देवालयें कशीं असावींत या बद्दलच्या निवेदनांत सदर शिल्प संहितेंत लिहिलें आहे कीं, "गांवांत एकच देऊळ बांधणें झाल्यास तें गांवाच्या मध्यभागींच बांधावें. जास्त असल्यास पूर्वेस किंवा पश्चिमेस विष्णूचें, ईशान्येस शंकराचें, वायव्येस देवीचें, उत्तरेस कार्तिकस्वामीचें, नैऋत्येस गणपतीचें अशा रीतीनें निरनिराळी देवता निरनिराळ्या दिशेला असावी."

वेदकालीन देवालयें

वेदकालीं देवालयें नव्हतीं असें कांहींकांचें मत असलें, तरी त्यांत अर्थ दिसत नाहीं. 'देवतायतनानि कम्पन्ते, दैवतप्रतिमा हसन्ति, गायन्ति, नृत्यन्ति, स्फुटन्ति, खिद्यन्ति ..' (सामवेद–अद्‌भुत ब्राह्मण) या उताऱ्यावरून स्पष्ट होत आहे कीं, वेदकालीं देवालयें होतीं व त्यांत देवांच्या मूर्ति बसवलेल्या असत.

अनेक प्राचीन ग्रंथांतून देवालयांबद्दलची बरीच माहिती मिळते. ती फार उपयुक्त असून अवश्य समजून घेण्यासारखी आहे. घरगुती देवालयानें आत्मोन्नतीस मदत होते आणि सार्वजनिक देवालयानें आत्मोन्नति व समाजोन्नति

या दोन्हीं साधतात हें लक्षांत घेऊन आपल्या पूर्वजांनीं सार्वजनिक देवालयांचें बरेंच महत्व प्राचीन ग्रंथांतून वर्णन केलें आहे.

देवालयाची जागा कुठें, कशी व कोणती असावी, त्यांत मूर्ति कशी बसवावी, कोणती देवता कोणत्या दिशेला कशी स्थापन करावी, मूर्ति कशी घडवावी याबद्दल बरेच बारीक सारीक नियम प्राचीन ग्रंथांत आहेत. जागेबद्दलचा बृहत्संहितेंतील हा नियम पहा— "तत्तस्य भवति शुभदं । यस्य च यस्मिन्मनो रमते ॥" (बृहत्संहिता ५३–९५) ज्या जागीं ज्याचें मन रमतें, तें त्याचें शुभस्थान होय.' असा सदर उताऱ्याचा अर्थ आहे.

माती, दगड सोनें चांदी वगैरेपासून मूर्ति कशा तयार कराव्या याची माहिती प्राचीन ग्रंथांतून चांगली मिळते. शिवाय पाऱ्यापासून मूर्ति कशी करावी याचीहि माहिती नमूद आहे. पारा पातळ असल्यानें मूर्तीसाठीं तो घट्ट बनवण्यास त्यांत कोणत्या वनस्पतीचा रस घालावा याबद्दलची माहिती 'मातृकाभेदतन्त्रा' मध्यें दिली आहे.

सूर्य, वायु, अग्नि, असे मूळचे तीन देव वेदांत होते आणि त्यांनां जगच्चालक परमेश्वराचे अंश मानीत. या मूळच्या तीन देवांनंतर इतर देव अस्तित्वांत आले आणि ते सर्व मिळून मग तेहतीस देव झाले. असे हे तेहतीस देव वेदकालीं होते.

प्राचीन देवालयें

वेदकालानंतरच्या प्राचीन देवालयांची रचना पूर्वीपेक्षां जास्त सुंदर असून व्यवस्थाहि विशेष उपयुक्त होती. त्यांत समाजाला उन्नतिकारक अशा अनेक सुधारणा झाल्या.
सुमारास बौद्धधर्म प्रसारकांनीं
द्वारें बहुजन समाजास संघटि
देण्याचा उपक्रम सुरू केला
हिंदूंनीं आपल्या देवालयांनां
दिली. उत्तरेपासून दक्षिणेपर्यं
सर्व देवस्थानांतून त्यावेळीं
करून शिक्षणदानाचें कार्य ने
कोरीव लेखांवरून जी माहिती
दहाव्या शतकाच्या सुमारास
विद्यापीठें दक्षिण हिंदुस्थानांत
दिसून येतें.

राष्ट्रकूट राजघराण्यांतील
राज याचा प्रधान नारायण
विजापूर जिल्ह्यांतील सालो
प्रसिद्ध देवस्थानच्या विद्यालय
बांधून दिली असा उल्लेख मि
राहाण्यासाठीं तेथें सत्ताव
विद्यार्थ्यांच्या जेवणाखाण्याचा
विद्यालयास मिळालेल्या दोन
नीच्या उत्पन्नांतून चाले. दि
साठीं साठ एकर जमीन आ
दोनशें एकर जमीन वेतनाबद्द

तामील देशांतील एन्ना
स्थानांत अकराव्या शतकांत
विद्यालय होतें. या विद्
तीनशें एकर जमीन गा
मिळाली होती. यांत साडे
भोजनसह मोफत शिक्षण
कृष्णयजुर्वेद यांच्या अध्ययन
वेद ४०, शुक्लयजुर्वेद
बौधायन, गृह्यसुत्र व वेदां
१०, रूपावतारासाठीं ४०,
प्रभाकर मीमांसेसाठीं ३५

संख्या नियमीत केली होती. यांतील विद्यार्थ्यांस जेवणाखाणाशिवाय कपडालत्ता, औषधपाणी व सालीना अर्धा कळंजु म्हणजे सुमारें चवलीभार सोनें मिळे.

चिंगलपुटच्या निरुमुककुडुल गांवांतील व्यंकटेशाचें देवालय ही एक अकराव्या शतकांत अपूर्व संस्था होती असें कळून येतें. या देवालयास जोडून एक विद्यालय, एक छात्रालय व एक रुग्णालय अशा तीन लोकोपयोगी संस्था होत्या. तेथील तिरुवोरियुर येथें आणखी एक मोठें संस्कृत विद्यालय शिवमंदिरास जोडून होतें. भगवान् शंकरानें पाणिनीला जीं चौदा सूत्रें चौदा दिवसांत शिकविलीं तीं याच देवालयांत असा तेथील लोकांचा दृढ समज होता व त्याच्या स्मरणासाठींच त्यांनीं हें संस्कृत विद्यालय सुरू केलें. यांत ३० अध्यापक असून ४५० विद्यार्थ्यांनां भोजनसह मोफत शिक्षण मिळे.

मलकापुरम् येथील देवालयांतहि तेराव्या शतकांत विद्यालय, छात्रालय, रुग्णालय अशी व्यवस्था होती. दहाव्या शतकांत धारवाड जिल्ह्यांतील हेब्बाळ येथें भुजवेश्वर देवालय होतें. तेथेंहि विद्यार्थ्यांनां भोजन व शिक्षण मोफत मिळे. स. १०६४ त चितळदुर्ग जिल्ह्यांतील जटिंग-रामेश्वर येथील देवालयास देवालयाच्या व शिक्षणाच्या खर्चाकरतां एक गांव इनाम होतें.

विजापूर येथील देवालयांत मीमांसा विद्यालय सुरू असून त्याचा मुख्याध्यापक योगेश्वर पंडित हा विद्वान ब्राह्मण होता.

अशा रीतीनें दक्षिण हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व मोठ्या देवालयांचीं विद्यालयें होतीं, छात्रालयें होतीं व रुग्णालयेंहि होतीं याची माहिती ठिकठिकाणच्या प्राचीन देवालयांच्या भिंतीवरील कोरीव लेखांतून मिळते.

उत्तर हिंदुस्थानच्या देवस्थानांतूनहि अशीच व्यवस्था होती; तथापि तिकडील बहुतेक जुनीं देवालयें मुसलमानी स्वाऱ्यांमुळें उध्वस्त झाल्यानें, दक्षिण हिंदुस्थानांतील देवालयांच्या भिंतीवर जसे कोरीव लेख सांपडतात तसे कोरीव लेख उत्तरेंत सांपडणें अशक्य झालें आहे.

एकंदरींत हिंदूंच्या प्राचीन देवालयांचा इतिहास पाहिला म्हणजे दिसून येतें कीं, हीं आपलीं देवालयें चैनीचीं नसून त्यांच्या पाठीशीं आपल्या पूर्वजांचा फार उच्च हेतु होता. हीं प्राचीन देवालयें हिंदु संस्कृतीचीं केंद्रें होतीं. धार्मिक उत्सवांमुळें तेथें धर्मशिक्षणाचें प्रत्यक्ष ज्ञान मिळे; सार्वजनिक प्रार्थनेमुळें चित्तशुद्धि होई; उत्सवप्रसंगीं जमलेल्या मेळाव्यामुळें विचारांची देवाण घेवाण होऊन परस्परांत आपुलकी व प्रेम नांदे; छात्रालयांतून गरीबांची सोय होई आणि विद्यालयांतून विद्याप्राप्तीचा मोठा फायदा होई. अध्यात्मिक उन्नतीसाठीं व हिंदुसंस्कृतीच्या प्रगतीसाठीं ध्येयपूर्ण कथाकीर्तनें प्रत्येक देवालयांतून सुरू असत, आणि त्यांचा योग्य फायदा घेणारे अनेक श्रोते नियमीतपणें देवळांत येत.

प्राचीन राजे शंभर दोनशें विद्वान ब्राह्मणांचें एखादें गांव मुद्दाम वसवून त्या ब्राह्मणांनां स्वतःच्या खर्चानें देवालय बांधून देत आणि देवालयाच्या व विद्यालय इ. च्या खर्चासाठीं; तसेंच त्यांच्या निर्वाहासाठीं त्या भागांतील जमिनी त्यांनां इनाम देत. अशा गांवांनां 'अग्रहार गांवें' म्हणत. ते ब्राह्मण अध्यापनाचें व हिंदुसंस्कृतीच्या कल्याणाचें कार्य तत्परतेनें बजावीत असल्याचें पाहून राजे समाधान पावत वगैरे माहिती अनेक ताम्रपटांवरून दिसून येते.

शिव - विष्णु - मंदिरें

आर्यांच्या वेदकालीन निरनिराळ्या देवतांचा विष्णु व शिव यांत समावेश होऊन उपनिषत्काला-नंतर हरिहरांच्या ज्या उपासना ज्यास्त सुरू झाल्या त्यांना इतिहासकालापासून विशेष जोम आला. गणपति उपासकांनीं गणपतीचीं देवळें बांधलीं; शाक्तांनीं देवीमंदिरें बांधलीं; वैष्णवांनीं विष्णु देवतेचीं आणि शिवोपासकांनीं शिवाचीं देवालयें बांधून त्यांतून आपल्या आध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक वगैरे उन्नतीची व्यवस्था केली. तथापि सबंध भारतांतील एकंदर देवाल-यांत भिन्न भिन्न नांवांनीं का असेना विष्णु आणि शिव यांचीच देवालयें ज्यास्त आहेत याचें का-रण हरिहर भक्तीचें विशेष प्रेम होय.

मूळ निर्गुण निराकाराला अशा रीतीनें उपा-सकांनीं सगुण साकार केलें, ज्ञानाच्या भाषेंत जें सांगितलें जात होतें तेंच भक्तीच्या भाषेंत सांगि-तलें जाऊं लागलें. नामरूपातीताला नामरूप दे-ऊन लोक भजूं लागले; तथापि त्यांनीं मूळहि अजिबात सोडलें असें नाहीं. परमात्मा एक आहे व अनेकहि आहे, नामरूपातीत तसाच नामरूपांतहि आहे. ज्ञानानें वेद्य आहे आणि भक्तिभावानेंहि सेव्य आहे, तो हृदयांत आहे; तसाच बाहेरहि आहे. तो अमूर्त असला तरी भक्तिभावाला भुलून मूर्त होतो, तो जीवानें शुध्द भावानें अर्पण केलेले पूजोपचार घेतो, भक्तांचे योगक्षेम चालवितो, भक्तांनां संकटीं संभाळतो, त्यांनां सद्गति देतो. असा देव सर्वसाधारण लोकांनां सुसेव्य झाला म्हणून शैव वैष्णवादि उपासनापंथ भारतभर बळावले. ज्या वेळीं शिवोपासक शिवदैवत थोर आणि विष्णु उपासक विष्णु दैवत थोर असें म्हणूं लागले व त्याबद्दल त्यांच्यांत वाद तंटे भांडणेंहि होऊं लागलीं, अशा वेळीं विद्वान् महर्षींनीं वेदांतील शिव विष्णूची एकात्मता आणि सर्वच देवता मूळ परमात्म्याचींच रूपें कशीं आहेत हें उघड करून दाखविलें. ती माहिती फार महत्वाची आहे.

हरिहर ऐक्य

मैत्रायणीय उपनिषदांत ब्रह्मा, विष्णु, महेश हीं तीनहि एकाच मूळ परमात्म्याचीं रूपें आहेत असें लिहिलें आहे. तपस्वी, गौरवर्ण, जटाजूट, व्याघ्रांबर परिधान असें एक रूप आणि दुसरें शिवलिंग अशा दोन पध्दतीनें शिवाची उपासना करण्यांत येत असून लिंगपूजेचें महत्व अधिक लिहिलें आहे.

महाभारत सौप्तिक पर्व अध्याय १७ यांत लिंगपूजेबद्दलची बरीच महत्वाची माहिती आहे. लिंग हा शब्द लिंग्-जाणणें या धातूपासून झाला असून लिंग म्हणजे ज्ञात असें, आत्मज्ञान किंवा परमेश्वरी ज्ञान असें कूर्मपुराण अ. ११, लिंगपुराण अ. १९ व अग्निपुराण अ. ५३ यांत लिहिलें आहे. सदर तिन्हीं ग्रंथांत लिंग म्हणजे परब्रह्माचें मूर्त स्वरूप असून वेदी म्हणजे पिंडी. असें म्हटलें आहे. वेदींत मूलपीठ व ऊर्ध्वपीठ असे दोन भाग आहेत. मूलपीठ, ऊर्ध्वपीठ व पिंडी मिळून महालिंग होय. मूलपीठ ब्रह्मा किंवा रजोगुणचिन्ह, ऊर्ध्वपीठ विष्णु किंवा सत्वगुणचिन्ह व पिंडी शिव किंवा तमोगुणचिन्ह आणि सबंध महालिंग म्हणजे ब्रह्मा, विष्णु, महेशात्मक त्रिमूर्तिरूप परब्रह्म होय. महालिंग हें शिवाचें शरीर व लिंग हें मस्तक आहे. समाधिस्थीत योग्याचें शरीर महालिंगाच्या आकाराचें होत असतें, स्वयंभू लिंगें हीं महायोगाचीं शरीरें होत. शिवाचीं पंचमुखें हीं पंचज्ञानेंद्रियें. पार्वती म्हणजे शंकराच्या अंगभूत असलेली प्रकृति. शंकराच्या

गळ्यांतील रुंडमाळा, त्याची स्मशानांतील वस्ती व भस्मधारण हें वैराग्यद्योतक आहे. महालिंग हें सगुणब्रह्म आहे व म्हणून उपासनेला योग्य आहे.

विष्णु क्षीरसागराच्या म्हणजे शुध्दसत्वाच्या तीरावर अहंकार कालियाला खालीं दडपून अर्थात शेषाच्या शरीरावर शयन करतो. तिकडे पार्वती ती इकडे लक्ष्मी. शिव तोच विष्णु व विष्णु तोच शिव. दोघांनांहि जो भेदभावानें पाहील तो खरा भक्तच नव्हे असें महाभारतांतील नारायणीय आख्यानांत स्वतः नारायणानें सांगितलें आहे.

विष्णु सहस्रनामांत सर्वः शर्वः शिवः शंभुः अशीं शिववाचक नांवें असून रुद्राध्यायांत ४ थ्या अनुवाकांत 'नमो गिरिशायच नमो शिपिविष्टाय च' असें म्हटलें आहे. हें 'शिपिविष्ट' नांव विष्णूचें आहे.

महाभारतांत शिव व विष्णु ह्याच देवता मुख्य मानल्या असून त्यांत विष्णु सहस्रनामाप्रमाणेंच शिवसहस्रनामहि आहे. सदर ग्रंथांत 'शिवस्य हृदये विष्णुर्विष्णोश्च हृदये शिवः' असें नमूद असून विष्णु व शिव परब्रह्माचेंच स्वरूप आहे असें म्हटलें आहे.

बळीची प्रथा

बळीची प्रथा ही आर्यांची नव्हे. ती मूळच्या रानटी जमातींची आहे. रानटी लोक पूर्वकालीं आपल्या टोळींतील प्रमुख पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं जीवन कंठित असत. आपल्या त्या पुढाऱ्यालाच ते देव मानीत. पुढारी मृत्यु पावल्यावर त्याची हुशारी, सामर्थ्य इत्यादि गुण आपल्या अंगांत यावे म्हणून त्याच्या मृत शरीराचें मांस टोळींतील सर्व लोक खात आणि सांगाडा पुरून टाकीत. पुरल्या जागीं एक दगड उभा करीत आणि त्याच्या पुढें विविध जिन्नस ठेवीत. ते दगड देव होऊन त्यांनां पुढें म्हसोबा, दगडोबा, खंडोबा, वगैरे नांवें मिळालीं आणि त्या देवांनां रक्तमांसाचा नैवेद्य होऊं लागला. या नैवेद्यासाठीं मनुष्यवध होऊं लागला. एका जमातीनें दुसऱ्या जमातींतील माणसाला पकडून आणावें, त्याला स्नान घालावें, त्याच्या गळ्यांत रक्तरंगी फुलांच्या माळा घालाव्या आणि त्या दगड देवासमोर त्याला उभें करून त्याचें मस्तक धडावेगळें करावें. त्या रक्ताचा व मांसाचा देवास नैवेद्य दाखविल्यावर इतरांनीं तें मांस वांटून खावें अशी पध्दत सुरू झाली. (Human History)

पुढें माणसें पकडून बळी देण्याच्या या दुष्ट चालीमुळें जमातीं जमातींत भयंकर भांडणें, मारामाऱ्या व खून होऊं लागले. त्याला पर्याय म्हणून मग जनावरांनां बळी देण्याची सुरवात झाली. आरंभीं वाघाचें नांव पुढें आलें. पहिल्याच खेपेस वाघ माणसूंत पकडला; पण त्याला देवापुढें आणून बळी देण्याच्या खटपटींत असलेल्या आठदहा लोकांचा त्यानें तिथल्या तिथें फडशा पाडून रान धरलें, तेव्हांपासून त्या लोकांनीं बकऱ्यासारख्या दुर्बल जनावराला आणि कोंबड्यांनां कापण्याची चाल सुरू केली.

आर्यलोक भारतांत आले; त्यांनीं भारतांतील रानटी लोकांवर प्रभुत्व मिळविलें आणि आपलीं देवालयें स्थापन केलीं. त्यावेळीं मूळच्या जमातींशीं मिळतें घेण्यासाठीं आपल्या देवालयांच्या जवळपासच त्यांचीं देवळेंहि राहूं दिलीं, आणि त्यांच्या देवांनां आपल्या देवांची सरदारकी देऊन नातेंहि जोडलें. अशा रीतीनें देवानां जनावरांचा बळी देण्याचीही अनार्यांची प्रथा आर्यांच्या देवालयांनां बाधली गेली. कुठें रेडा,

कुठें बैल, तर कुठें बकरा कोंबडा असे बळी देण्याची ही दुष्ट चाल अजून कित्येक ठिकाणी चालूच आहे! देवाच्या नांवानें चाललेली ही प्राणीहत्त्या अत्यंत निंद्य आहे. सत्यांत सत्य, पवित्रांत पवित्र, तेजांत तेजस्वी व दयेंत दयासागर अशा परम मंगल परमात्म्याचें अस्तित्व ज्या देवस्थानांत टिकावें असें ज्यांना वाटतें त्यांनीं तेथें कदापीहि प्राणीहत्त्या घडूं देऊं नये असें अनेक धर्मपीठाधीशांचे, शास्त्री पंडितांचें, तत्त्ववेत्त्यांचें आणि धर्माधिकाऱ्यांचें स्पष्ट मत आहे. असें असलें तरी देवाच्या खऱ्या स्वरूपाचा, गुणांचा, जगांतील सर्व प्राणीमात्राशीं असलेल्या त्याच्या थोर संबंधाचा विचार करून ही प्राणीहत्त्या बंद करण्याचा प्रयत्न व्हावा तितक्या झपाट्यानें होत नाहीं हें आश्चर्य आहे!

गोमंतकीय प्राचीन देवालयें

आज गोमंतकांत अस्तित्वांत असलेलीं बहुतेक सर्व देवालयें आर्यांचींच असलीं; तरी कित्येक ठिकाणीं आरंभीं त्यांच्या जवळ असलेल्या अनार्यांच्या देवालयांचाहि मुख्य देवालयाभोंवतालच्या मंदिरांत समावेश झालेला आहे.

गोमंतकाच्या वसाहतीच्या सुरवातीस फार प्राचीन कालीं जे आर्य गोव्यांत आले त्यांनीं आपापलीं उपास्य दैवतें सोबत आणलीं आणि त्यांची स्थापना इकडे केली.

वसाहत स्थापनेच्या आरंभीं ज्यांना जो गांव मिळाला त्यांनीं तेथें आर्यांच्या ग्रामसंस्थेच्या मूळ नियमाप्रमाणें हवाशीर जागेंत घरें बांधणें; गांवाभोंवतीं गुरांसाठीं कुरणें राखणें; गांवच्या सीमेवर वड, पळस, पिंपळ, औदुंबरादि टिकाऊ झाडें लावणें; जरूरीच्या जागीं झरे, विहिरी बांधणें, धर्मशाळा, विद्यालयें यांची सोय करणें इ. आवश्यक कर्तव्यांबरोबरच गांवाच्या मध्यभागीं अगर इतर योग्य जागीं देवालय बांधण्याचेंहि आपलें प्रमुख कर्तव्य अगत्यानें पार पाडलें.

गोमंतकांतील त्या आरंभींच्या देवालयांची रचना सोयीप्रमाणें लहान मोठ्या स्वरूपाची असली; तरी नमुना सर्वसाधारण कमी अधिक प्रमाणानें एकच व तो भारतांतील इतर भागांतील प्राचीन देवालयांप्रमाणेंच असावा असें वाटतें. इस्लामी हल्ल्याच्या वेळीं एकदां व ख्रिस्तीकरणाच्या वेळीं दुसऱ्यान्दां मोडलीं जाऊन त्यांचें मूळ स्वरूप पार बदलून गेल्यानें त्याची स्पष्ट रूपरेखा आज कळत नाहीं.

श्रीरामनाथ देवस्थानच्या मालकीची सांगें महालच्या कुडीं गांवांत जी एक विस्तीर्ण शेती व नारळींची मोठी बाग आहे तिच्या उपयोगासाठीं देवस्थानतर्फे एक नमुनेदार धरण बांधण्यांत आलें आहे. या धरणाजवळ प्राचीन शिल्पकलेची एक छोटी इमारत असून तिला 'रामलक्ष्मणाचें देऊळ' असें म्हणतात. त्या देवळाचा नमुना भारतांतील प्राचीन देवालयांसारखाच आहे.

त्यावरून इकडच्या प्राचीन देवालयांच्या आकाराची व स्वरूपाची साधारणशी का होईना कल्पना करतां येते.

गोमंतकीय अर्वाचीन देवालयें

प्राचीन देवालयांची अर्वाचीन कालांत गोमंतकांत देखील बरीच सुधारणा होत गेली. मोडकळीस आल्यानें जीर्णोध्दार झालेल्या देवालयांची रचना पूर्वीपेक्षां निराळ्या स्वरूपाची झाली. अध्यात्मिक उन्नतीबरोबरच समाजाची धार्मिक व इतर उन्नति साधावी या दृष्टीनें

देवालयीन कारभार सुरू झाला. इतिहासकालांत मोडल्या गेलेल्या दिवाडी येथील सप्तनाथाच्या देवालयाच्या आवारांत एक संस्कृत विद्यालय असल्याचा जो इतिहासिक साधनांत उल्लेख मिळतो त्यावरून गोव्यांतील कांहीं संपन्न देवालयांत भारतीय इतर कित्येक देवालयांप्रमाणें विद्यालयांचीहि व्यवस्था असावी असें वाटतें.

विष्णुभक्त व शिवभक्त आपापलें उपास्यदैवत श्रेष्ठ असल्याबद्दलचे अनेक वाद व तंटे गोव्यांतहि चालवीतच असत. त्याचे परिणाम मात्र ठीक झालेले दिसत नाहींत. एखादें देवालय ईर्षेस पडून सुधारलें गेलें; तर कित्येक देवालयें त्यामुळें मागें पडलीं.

प्रत्येक देवालयांतून त्यावेळीं पुराण, कीर्तनाप्रमाणें कलावंतींचा नाच, गाणें इ. कार्यक्रम ठेवीत. पुढें पुढें तर याच कार्यक्रमाला विशेष ऊत आला. अगदीं अलीकडे देखील या कार्यक्रमाला बरेंच महत्व चढलें होतें; तथापि आजच्या नव्या जमान्यांत त्याचें महत्व झपाट्यानें उतरत जाऊन बहुतेक देवालयांतून त्यांच्या कार्यक्रमाला आतां फांटाच मिळाला आहे.

सदर देवालयांपैकीं तिसवाडींतील कांहीं देवालयांचें मुसलमानी हल्ल्यांत बरेंच नुकसान झालें. कांहीं जमीनदोस्तहि करण्यांत आलीं. ख्रिस्तीकरणाच्यावेळीं तर सगळ्यांचीच इतिश्री झाली.

सन १५४० सालीं ख्रिस्तीकरणाच्यावेळीं पाद्रि मिगेल व्हाज यानें तिसवाडींतील १६० वर देवळें मोडलीं. त्यांची यादी इ. सं. डॉ. पिसुर्लेकर यांनीं Tombo da Ilha de Gôa e das Terras de Salcete e Bardez या पोर्तुगीज पुस्तकांत व्यवस्थित दिली आहे.

सन १५६६ व १५६७ सालीं ख्रिस्तीकरण प्रसंगीं Diogo Rodrigues यानें साष्टींतील २४० वर देवळें मोडल्याची यादी सदर पोर्तुगीज पुस्तकांत दिली आहे.

सन १५६७ सालीं फ्रांसिस्कान पाद्रींनीं बार्देसवर ख्रिस्तीकरणाचा पहिला मोर्चा नेला. तथापि सन १५७३ त बार्देसच्या ख्रिस्तीकरणास विशेष जोम आला. त्यावेळीं त्यांनीं बार्देसमधील जीं देवळें मोडलीं त्यांची यादी सदर पोर्तुगीज पुस्तकांत डॉ. पिसुर्लेकर यांनीं दिली आहे. त्या यादीवरून १७५ वर बार्देसचीं देवळें मोडलीं आहेत असें दिसून येतें.

सदर प्रसंगीं जीं देवळें मोडलीं गेलीं त्यांतील देव घेऊन ते ते महाजन त्यापूर्वीच परागंदा झाले होते. त्यांतील बहुतेक सर्व देवांची पुनर्स्थापना आजच्या नवीन काबिजाद म्हणून ओळखण्यांत येणाऱ्या प्रदेशांत करण्यांत आली. तो प्रदेश त्यावेळीं विजापूरकराच्या ताब्यांत होता. त्यांची व इतर देवालयांचीहि माहिती पुढें निरनिराळ्या प्रकरणांतून येईलच.

श्रीरामनाथ देवालय

श्रीरामनाथाची मूळ स्थापना प्राचीन कालीं श्रीरामाकडून झाली असें पौराणिक माहितीवरून कळून येतें. सीतेच्या सोडवणुकीसाठीं लंकेवर चाल करून जाण्यास वानर सैन्यासह श्रीराम रामेश्वराजवळ आला. त्यांनां समुद्रपार होण्यास शंभर योजनें लांब सेतू बांधण्याची पहिली आवश्यकता भासली. हें कार्य व लंकेवरील हल्ला या योजना यशस्वी होण्यासाठीं ऋषिमुनींच्या सांगण्याप्रमाणें श्रीरामाला मोठ्या हवनासह शिवलिंगाची स्थापना करणें अवश्य होतें. त्याप्रमाणें कैलासांत जाऊन शिवलिंग घेऊन येण्यास त्यानें मारुतीला पाठविलें. लिंग घेऊन येण्यास मारुतीला उशीर झाला आणि सुमुहूर्ताचा पुण्यकाल टळूं नये म्हणून ऋषिमुनींच्या आग्रहावरून त्या मुहूर्तावर श्रीरामानें वाळूचें शिवलिंग बनवून त्याची स्थापना केली व त्या लिंगाचें पूजन केलें.

कांही वेळानें शिवलिंगासह मारुतीहि आला. घडलेलें दृश्य पाहून त्याला फार वाईट वाटलें. त्याचा हिरमुसलेला चेहरा पाहून श्रीराम म्हणाला—"सुमुहूर्त साध्य होण्यासाठीं जरी त्या लिंगाची स्थापना झालेली असली, तरी तूं आणलेलें लिंगहि आतां स्थापन करून त्याची पूजा करूं म्हणजे झालें." आणि त्याप्रमाणें श्रीरामानें जवळच त्या लिंगाची स्थापना करून पूजाविधि यथासांग पार पाडला. याच लिंगाला 'श्रीरामनाथ' किंवा 'रामनाथेश्वर' आणि पूर्वी स्थापन केलेल्या लिंगाला 'श्रीरामेश्वर' अशीं नांवें पडलीं रामेश्वर देवस्थानांत गेल्यावर श्रीरामनाथाची भेट प्रथम घ्यावी लागते. तेथील भक्तजन नमस्कार करतांनां अजून 'श्रीरामनाथ रामेश्वरा, दया कर' असें म्हणतात. (श्रीरामचरित्र — पं. त्रिवेदी.)

श्रीपरशुरामाच्या यज्ञाच्या वेळीं किंवा गोमंतक वसविण्याच्या वेळीं म्हणा जे दशगोत्री सारस्वत ब्राह्मण गोव्यांत आले, त्यांतील कौंडिण्य व वत्सगोत्री कांहीं ब्राह्मण गोमंतकांत येण्यास निघाल्यावर आपलें उपास्य दैवत जें श्रीरामनाथ, त्याच्या दर्शनासाठीं रामेश्वराच्या यात्रेस गेले. त्यांपैकीं एकाला श्रीरामनाथाचा साक्षात्कार झाला आणि त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं समुद्रस्नानाच्या वेळीं पाण्यांत मिळालेलें शिवलिंग घेऊन ती मंडळी गोमंतकांत येण्याच्या उद्देशानें रस्त्याला लागली.

वसाहतीसाठीं निरनिराळे गांव निरनिराळ्या लोकांच्या वांटणीस आले, त्यांत लोटली गांव सदरील कौंडिण्य व वत्सगोत्री ब्राह्मणांनां मिळाला. वसाहतीच्या नियमाप्रमाणें त्यांनीं तेथें ग्रामसंस्था स्थापन केली आणि सोयीस्कर अशा जागीं सुंदर देवालय बांधून त्यांत रामेश्वर येथून आणलेल्या श्रीरामनाथ लिंगाची आणि रिवण येथून आणलेल्या श्रीशांतादुर्गेची स्थापना केली. श्रीलक्ष्मीनारायण, श्रीरामनाथ, श्रीशांतादुर्गा, श्रीवेताळ व श्रीसिद्धनाथ या पंचायतनानंतर कांहीं कालानें श्रीकामाक्षी व श्रीकालभैरव या देवतांची स्थापना झाली. महाजनांपैकीं एक इसम तीर्थयात्रेस गेल्यावेळीं परत येतांनां काहूर येथून त्यानें कामाक्षीची मूर्ति आणली असें कोंकणाख्यानावरून कळून येतें.

लोटली ग्रामसंस्थेच्या मालकांचे आरंभापासून १९ गट (वांगड) होते आणि त्याचप्रमाणें श्रीरामनाथ देवालयाच्या महाजनांचेहि होते. कारण ग्रामसंस्थेचे मालक तेच देवालयाचे

महाजन होते. पुढें ख्रिस्तीकरणप्रसंगीं सारा जुना जमाना बदलून गेला!

प्राचीन कालीं लोटलींतील ज्या एका व्यवस्थित व सुंदर जागेंत श्रीरामनाथ पंचायतनांचीं देवालयें होतीं ती जागा त्ररगांव वाडींत असून तिला त्यावेळीं रामनाथ देवळाचें कुळागर असें म्हणत. श्री कामाक्षी व कालभैरव यांचीं देवळें वासें या वाडींत होतीं. या देवालयांच्या त्या प्राचीन जागांचा आज फार बदल झाला आहे.

सन १५६६ त साष्टींत ख्रिस्तीकरणाच्या कार्यास ऊत आला. रायतुरचा किल्लेदार कापितांव दियोगु रुद्रीगिस् ऊर्फ दियोगु दु फॉर्ति यानें लोटलीच्या गांवकऱ्यांना किल्ल्यांत हजर होण्याचा हुकूम केला; पण ख्रिस्तीकरणाच्या भयानें तो त्यांनीं पाळला नाहीं त्यामुळें चिडून त्यानें लोटलीचें प्रमुख (श्रीरामनाथ) देवालय जाळून टाकलें. (Oriente Conquistado).

गांवकऱ्यांनीं न्यायालयांत तक्रार केली; आणि कापितांव 'रुद्रीग यानें तें देवालय बांधून द्यावें' असा न्यायालयाचा निकाल झाला. तथापि कापितांव रुद्रीग यानें आर्चबिशप व जेजुईत मुख्याधिकारी यांतर्फे जोराची खटपट करून वरिष्ट न्यायालयांत तो निकाल बदलून घेतला आणि त्याला दों. आं. द नॉरोंज्य या व्हिसिरैच्या, साष्टींतील सर्व देवळें मोडून टाकण्याच्या खास फर्मानाची जोड मिळवून दिल्यानें कॅ. रुद्रीग यानें लगेच साष्टींतील आणखी २८० देवळें मोडून टाकलीं.

याच वेळीं पाद्रि फ्रांसिस्क रुद्रीग या जेजुइताच्या प्रयत्नानें, "मोडलेलीं देवळें पुनः बांधूं नयेत व भ्रष्ट मूर्तींची पुनः स्थापना करूं नये" असा व्हिसिरैकडून हुकूम सुटला. त्यावेळीं हिंदूंनां दुसरा उपाय न राहिल्यानें देवांच्या मूर्ति गाड्यांवर घालून त्यांसह त्यांनीं पैलतीर गांठलें. (Pondo em carros aqueles Idolos se passaram com eles à outra banda—Oriente Conquistado).

तें पैलतीर म्हणजे विजापूरकरांच्या सत्तेखालील फोंडें पंचमहाल होय.

श्रीरामनाथ व इतर देवांच्या मूर्ति गाड्यांवरून नदीतीरापर्यंत आणून पुढें होडींतून त्यांसह लोटलीकर महाजन दुर्भाटला आले आणि पुनः गाड्यांच्या सहाय्यानें त्या मूर्ति त्यांनीं बांदिवडें येथें आणल्या. बांदिवडें येथील गांवकऱ्यांकडून सध्याची जागा त्यांनीं 'स्थलकुटुंबण' या नांवानें कायमधाऱ्यानें घेतली आणि तेथें लहान लहान देवळें बांधून त्यांत देवतांची प्रतिष्ठापना केली.

सदर देवालयांची रचना त्यावेळीं अशी होतीः — मध्यभागीं श्रीलक्ष्मीनारायणमंदिर, उजव्या बाजूनें श्रीकामाक्षीचें देऊळ आणि डाव्या बाजूनें श्रीरामनाथ व श्रीशांतादुर्गा किंवा शांतेरी या दोन्हीं देवतांचें जोड देऊळ. श्रीवेताळ व श्रीकालभैरव यांचीं छोटीं देवळें उजवीकडे जरा पुढें होतीं. आजहि तीं त्याच जागीं आहेत.

हीं जुनीं देवळें जीर्ण स्थितीस येऊन देवालयांचा जीर्णोद्धार होणें आवश्यक वाटल्यानें तीं नवीन बांधण्याचा विचार झाला. आरंभीं श्रीरामनथासाठीं भव्य व तितकीच सुंदर अशी नवीन इमारत बांधली. इमारत पूर्ण झाल्यावर श्रीलक्ष्मीनारायण, श्रीरामनाथ, श्रीशांतेरी व श्रीकामाक्षी या चारहि देवतांची स्थापना या एकाच नूतन इमारतींत व्हावी असें ठरलें

आणि त्याप्रमाणें शके १८२६ च्या फाल्गुन शु. १० मी गुरुवारीं दि. १६ मार्च सन १९०५ रोजीं श्रीगोकर्ण–पर्तगाळी मठाधीश श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपादवडेर स्वामी महाराज यांच्या सान्निध्यांत मोठ्या समारंभानें सदर चारहि देवतांची प्रतिष्ठापना करण्यांत आली.

नवीन इमारतीच्या मधल्या मुख्य गर्भागारांत उच्चस्थानीं श्रीलक्ष्मीनारायण व गर्भागाराच्या मधोमध श्रीरामनाथ आणि उजवीकडील गर्भागारांत श्रीकामाक्षी व डाव्या बाजूच्या गर्भागारांत श्रीशांतादुर्गा ऊर्फ शांतेरी अशी नवीन व्यवस्था करण्यांत आली. त्याचप्रमाणें शांतेरीच्या गर्भागाराच्या बाहेर उजव्या बाजूनें श्रीसिद्धनाथाची मूर्ति स्थापन केली.

श्रीरामनाथ देवालयाच्या या नवीन इमारतीचें काम शिल्पकला, सौंदर्य, मजबुती व आकर्षकता अशा सर्वच दृष्टीनें चांगलें झालें आहे. आतां त्याला श्री. अ. वि. केणी यांच्या भव्य व मोहक सभामंडपाची जोड मिळाल्यानें तर सदर इमारतीच्या सौंदर्यांत विशेष भर पडली आहे. महाद्वारासमोरची बॅ. प. मसुरेकर यांनीं देवस्थानासाठीं बांधलेली नगारखान्याची इमारतहि नमुनेदार व फार सुंदर आहे. मध्यभागीं देवालय, तीन बाजूंनीं श्री. घोडकर, देवस्थान, श्री. जुंवारकर, श्री. मळये, यांच्या अग्रशाळा, पुढें उजवीकडे दोन छोटीं देवमंदिरें, डावीकडे व्यवस्थापक मंडळाचें कार्यालय, समोर फुलबाग व नगारखाना अशी ही रचना फार मनोहर आहे.

देवस्थानच्या शेतजमिनी व नारळीच्या बागा यांचें उत्पन्न चांगलें येत असून नित्य नैमित्तिक कृत्यें, देवालयाचे उत्सव, नोकरलोकांचा पगार अशा विविध खर्चाच्या बाजू आहेत. देवालयाच्या उत्सवांखेरीज इतरांचेहि अनेक छोटे मोठे उत्सव व इतर कृत्यें देवस्थानांत होत असतात.

रामनवमी, अक्षयतृतिया, वसंत पूजा, संप्रोक्षण, श्रावणमास पूजा, श्रावणी–महारुद्र, अनंतव्रत, नवरात्र–मकरोत्सव–दसरा, वनभोजनें–काला, माघ५मी, महाशिवरात्र, स्मारकोत्सव इ. अनेक प्रेक्षणीय उत्सव येथें होत असतात. त्या सर्वांत महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या स्वरूपांत साजरा होतो. हा उत्सव म्हणजे देवस्थानची जत्राच असते. या वेळीं महाजन व इतर लोकांचा मोठा समुदाय जमतो. माघ कृ. १२शी पासून सुरवात होऊन फाल्गुन शु.२ ये पर्यंत हा उत्सव चालतो. रोज पुराण, कीर्तन व निरनिराळ्या वाहनांतून मिरवणूक झाल्यावर देवास सज्जावर बसवतात आणि नंतर नाट्यप्रयोगाला सुरवात होते. हल्लीं महाशिवरात्रीच्या दिवसापासून द्वितियेपर्यंत नाटकें असतात. महाशिवरात्रीच्या उत्तररात्रीं पहांटे ४वाजतां श्रीरामनाथाची पालखी निघून तळीपर्यंत जाते आणि तेथें देवाला रथांत बसविण्यांत येतें. यानंतर ५वाजतां श्रीकामाक्षीची पालखी निघून ती रथाजवळ येते आणि तेथील दारूकाम वगैरे झाल्यावर पालखीसह रथाची मिरवणूक प्राकारांत येऊन थांबते. या पहांटेच्या मिरवणुकीची मजा और असते. नंतर देवळांतील देवकृत्यें व श्री. केणी यांच्या महारुद्राची समाप्ति होऊन त्यांच्या संतर्पणास आरंभ होतो. हा भोजनाचा कार्यक्रम दुपारीं दोन पासून रात्रीं आठपर्यंत चालतो. संध्याकाळीं ५ला पुनः रथाची मिरवणूक निघते आणि ती रात्रीं आठच्या सुमारास संपून देवळांत उत्सवाच्या आरत्या, प्रसादवांटणी इ. झाल्यावर या उत्सवाच्या नेहमींच्या कार्यक्रमास सुरवात होते.

प्रतिपदेदिवशीं दुपारीं श्री. भांडये यांचें संतर्पण, रात्रीं कै. दुर्गाबाई यांचा नौकाविहार उत्सव आणि द्वितियेदिवशीं दुपारीं श्री. वासुदेवराव बिच्चू यांचें संतर्पण व रात्री रौप्यशिबिका उत्सव होतो.

दररोज सकाळीं ५व १०॥ ला आणि संध्याकाळीं ५ला असा तीन खेपा एकेक तास चौघडा वाजत असतो. ६ला पंचवाद्यांची नौबत, सूर्योदयानंतर निर्माल्य विसर्जन व पुढें देवकृत्यांची सुरवात होते. ११॥ ला इशारत झाली म्हणजे अर्ध्या तासानें पूजा, नैवेद्य होऊन १२॥ पर्यंत महाआरत्या होतात. संध्याकाळीं ६ला चौघडावादन संपतांच धुंवाळ होऊन पंचवाद्यांची नौबत होते. रात्रीं ८ला इशारत झाल्यावर पुराण, कीर्तन इ. होऊन नैवेद्य व रात्रीच्या आरत्या होतात. प्रसादवांटणीनंतर ईशस्तवनपर गाणीं वगैरे होऊन कार्यक्रम संपतो. असा हा देवालयांतील नित्यक्रम आहे. प्रसादवितरणाच्यावेळीं चौकावर पाहुणा असल्यास त्याला प्रसाद आधीं देण्याची येथील पद्धत वैशिष्ट्यपूर्ण आहे.

चातुर्मासाखेरीज प्रत्येक १०मी ला रात्रीं ८॥ ला श्रीलक्ष्मीनारायणाची; नवरात्राखेरीज प्रत्येक ५मी ला श्रीशांतादुर्गेची, दर अमावास्येला श्रीकामाक्षीची आणि प्रत्येक सोमवारीं श्रीरामनाथाची अशा पालख्यांच्या मिरवणुकी असतात. देवळाची प्रदक्षणा घेतांना ८ पेणीं होतात.

येथें श्रीरामनाथ, श्रीशांतादुर्गा, श्रीकामाक्षी व श्रीवेताळ अशा चार देवतांना प्रसाद लावतात व ते करंबल-पत्राचे असतात.

या देवस्थानचे केणी, नायक, शेणै, पै असे वत्स व कौंडिण्य या दोनच गोत्रांचे गौड सारस्वत ब्राह्मण महाजन असून त्यांचा विस्तार भारतांत कारवारपासून कोचीनपर्यंत; आणि बेळगांव, शहापूर, पुणें, मुंबई व कोंकण वगैरे भागांत आहे. महाजनांचीं उपनामें अशीं आहेतः — अवदी, आचार्य, कवळेकर, कळंगुटकर, कापर्डी, कांदोळकर, कारे, कीर्तनी, कुंकळयेंकर, केणी, केणी खांडेकर, केणी रोबोल, कोसंबे, खरंगटे, खोटे, तळावलीकर, दलाल, नायक किंवा नाईक, नाईक बुर्ये, पापड, पै, पै आंगले, पै थोटे, पै बुडबुडे, पै भले, पै लोटलीकर, पै कोचीकर, फोंस, बरड, विर्जिनकर, बाळे, बिचे, भांगी, भांडये, मळये, मथा, मावजे, मावजेकर, मिर्ये, मुरकुंडी, मसुरेकर, राताबोली, लोटलीकर, शेटये, सडेकर, सरमळकर, शेणै, खोत, घोटिंग, घोडेकर, चित्ताल, जुंवारकर, बेणे, बोरकर, भट, भट मठकर, भट फोंडेकर, भट भूते, सांकव, सिलिमखान, सांबारे, सुकेरकर, शानभाग, जवळी, बाळीगे इ.

त्याचप्रमाणें लोटलीकर दैवज्ञ ब्राह्मण, नाईक, शेट्टी इ. श्रीरामनाथाचे उपासक असून रिवणकर, बखले, तोटेकर, करडे इ. द्रविड ब्राह्मण शांतेरीचे उपासक आहेत.

श्रीरामनाथ देवालय फोंडें तालुक्यांतील बांदिवडे या गांवांत असून तें स्थल 'रामनाथी' या नांवानें प्रसिद्ध आहे. फोंडें येथून रामनाथी १॥ मैल आहे.

गोमंतकांतील मोठ्या उत्पन्नांचीं जीं चारपांच देवालयें आहेत त्यांतच या देवालयाचाहि समावेश होतो.

श्रीनागेश देवालय

गोमंतक वसाहत प्रसंगीं जे आर्य इकडे आले त्यांनीं आपापलीं दैवतें आपापल्या वसाहतीच्या गांवांत स्थापिलीं. त्या बहुतेक देवालयांची स्थापना जुन्या काबिजादींतच झालेली होती आणि ख्रिस्तीकरणाच्या प्रसंगीं त्यांचें स्थलांतर नवीन काबिजादींत झालें. तथापि श्रीनागेश देवालयाची स्थापना मूळचीच बांदवडें गांवांत झालेली आहे. विजयनगरकालीं तर हें देवालय प्रसिद्ध असून त्याच गांवांत होतें हें तेथील शिलालेखावरून सिद्ध होत आहे.

कै. विष्णु रंगाजी शेळडेंकर यांनीं आपल्या देवालयांच्या इतिहासांत, आर्यांकडूनच बांदिवडें गांवांत प्राचीन कालीं श्रीनागेशाची स्थापना झाली असें लिहिलें आहे. तथापि या दैवताची स्थापना, आर्य गोमंतकांत येण्यापूर्वी येथें असलेल्या नागजातीच्या लोकांकडूनहि झाली असणें असंभवनीय नाहीं. त्या देवालयाजवळील तीन नागाची शिला, नागझरी हें जवळच्या एका बागेचें नांव, देव नागनाथ किंवा नागेश इ. वरून तसें अनुमान करतां येतें. कसेंहि असलें तरी ही देवता बरीच प्राचीन यांत संशय नाहीं.

श्रीनागेश हें महादेवाचें दैवत असून लिंग सुंदर आहे. मंदिर पश्चिमाभिमुख व लहानसेंच पण टुमदार असून आंतील रचना मोहक आहे. मुख्य गर्भागारांत श्रीनागेशाच्या लिंगाची स्थापना झालेली असून उजव्या बाजूनें श्रीलक्ष्मीनारायण व डावीकडे श्रीगणपति यांच्या मूर्ति आहेत. श्रीरवळनाथ, श्रीवेताळ, श्रीकालभैरव, पूर्वाचारी इ. आनुषंगिक देवालयें जवळपास निरनिराळीं आहेत. श्रीपूर्वाचारी याचेंच मंदिर जरा दूर खारवाड्यावर आहे.

श्रीनागेश देवालयाच्या चारहि बाजूंनीं अग्रशाळा असून प्राकाराच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण अशा तीन बाजूंनीं प्रशस्त दरवाजे आहेत. दक्षिणेकडील दरवाज्यावरील माडीवर नगारखाना असून त्याच बाजूनें श्रीमंत राजे सौंदेकरांचा राजवाडा आहे. पश्चिम दरवाज्याला लागूनच देवस्थानचा सुंदर तलाव आहे. तलावांतील पाणी स्वच्छ असून सौंदर्याच्या दृष्टीनें हा तलाव इतर देवालयांच्या तलावांपेक्षां वैशिष्ट्यपूर्ण आहे. गर्भागारांतील श्रीनागेशाच्या सुंदर मूर्तीचें मोहक प्रतिबिंब नंदादिपांसह तलावांतील पाण्यांत पाहतांनां प्रेक्षकांनां फार आल्हाद वाटतो.

मूळचें देवालय जीर्ण स्थितीस आल्यानें शके १७०२ साली या देवालयाचा जीर्णोद्धार झाला. मूळच्यापेक्षां आजची इमारत जास्त व्यवस्थित व सुंदर आहे.

श्रीनागेशाच्या उत्सवमूर्तीचा वेष सरदारी असून आसन घोडा व हातांत ढाल तरवार आहे. प्रत्येक सोमवारीं श्रीनागेशाचा पालखी उत्सव असून मिरवणुकीचीं पेणीं अकरा असतात. दशमीदिवशीं श्रीलक्ष्मीनारायणाचा शिबिकोत्सव असून त्याचीं पेणीं बारा आणि चतुर्थीदिवशीं श्रीगणपति-मिरवणुकीचीं पेणीं अकरा असतात.

पहांटेस पांचला चौघडा, सहाला नौबत, नंतर निर्माल्य विसर्जन व अभिषेक आवर्तनादि इतर दैनिक कृत्यें होऊन अकराला चौघडा व बाराला महाआरती होते. पुनः संध्याकाळीं पांचला चौघडा, सहाला नौबत नंतर पुराण, आरत्या इ. होऊन रात्रौ देवालयाचे दरवाजे बंद होतात.

रामनवमी, वसंत पूजा (चैत्र व॥ २ या व वैशाख १५ मा), श्रावणांतील प्रथम सोमवार (पूजा, संतर्पण इ.) नवरात्र, दसरा, नौकाविहार (कार्तिक शु १० मी ते १२ शी), रथोत्सव (कार्तिक व॥ १ दा), वनभोजन (कार्तिक शु॥ १४ शी व वद्य ३ या), शिबिका-उत्सव कार्तिक व॥ ४ थी) श्रीदत्तजयंति, महाशिवरात्र, काला, शिमगा इ अनेक उत्सव या देवस्थानांत होतात तथापि त्या सर्वांत चैत्र १५ मेचा जत्रोत्सव विशेष मजेचा असतो. या उत्सवांत ११ शी पासून १५ मेपर्यंत नित्य लालखीची मिरवणूक असते. व॥ प्रतिपदेच्या दिवशीं महाजन व इतर लोकांची बरीच गर्दी असते. जत्रोत्सवांत नाटकांचाहि सुंदर कार्यक्रम असतो याशिवाय खासगी खर्चानेंहि कांहीं उत्सव होत आहेत.

श्रीनागेशाला उकड्या तांदळांचे प्रसाद लावण्याची प्रथा असून ते तांदुळ पुरोहित स्वतः घरीं तयार करवून सोवळ्यांत ठेवतात. या चालीवरूनहि या देवालयाचें प्राचीनत्व सिद्ध होत असून त्याच्या मूळाशीं कांहीं तरी महत्वाचा इतिहास असावा असें दिसतें.

गौडसारस्वत वैष्णव आणि स्मार्त अशा दोन्हीं संप्रदायांचे वत्स, कौंडिण्य व भारद्वाज गोत्री ब्राह्मण या देवस्थानचे महाजन असून गोमंतकांत व बाहेरहि त्यांची बरीच वसती आहे. महाजनांचीं उपनांवें अशीं आहेतः— नायक किंवा नाईक, प्रभु, शेणै, कामत, नाईक प्रतापराव मुख्य सरदेसाई, नाईक प्रतापराव सरदेसाई, केरकर, प्रियोळकर. खोत, बोडके, गावणेकर, खवटे, धायमोडकर, भाटकर, वडिये, नमशीकर, पलंग, बांदोडकर, कुराडे, करंबली, साळगांवकर सावैकर, अस्नोडकर, पानवेलकर इ.

श्रीनागेश देवस्थानास बांदिवडें ग्रामसंस्थेंतून; तसेंच राजे सौंदेकर, प्रतापराव मुख्य सरदेसाई, कामत, पानवेलकर, भाटकर यांकडून ठराविक वार्षिक देणगी मिळत असून जमिनींचें व इतरहि चांगलें उत्पन्न आहे आणि तेवढाच खर्चहि ठरलेला आहे.

पश्चिमेकडील दरवाज्यांतून आंत येतांनां डाव्या बाजूला जी शिला दिसते तिजवरच नागेशींचा प्रसिद्ध शिलालेख आहे. या शिलालेखाची लिपी देवनागरी व भाषा मराठी असून तिथि पौष्य व॥ ३० शके १३३५ रविवार व ता.२४ डिसेंबर १४१३ अशी आहे. या शिलालखावरून कळून येतें कीं, बांदिवडें येथील राम नायक, नागण नायक, राम प्रभु, मंगेश प्रभु हे कांहीं मंडळीसह विजयनगर सम्राटाचे अधिकारी माइन् शेणै यांकडे जाऊन त्यांनीं नागेशींच्या कांहीं जमिनी या देवस्थानास मिळवून देण्याची विनंति केली. त्या वेळीं गोमंतकांत विजयनगरचे प्रतिहस्त नंजण गोसावी हे होते. सदर माइन् शेणै यांनीं 'वेदखंडिकेचें कुळागर,' 'नागझरी मळा शेत' व गोलती वाड्यावरील 'रुवो कुळागर' अशा जमिनी श्रीनागेश व श्रीमहालक्ष्मी या देवालयांनां देण्याची व्यवस्था केली.

सदर विजयनगरचे अधिकारी माइन् शेणै यांची माहिती कोंकणाख्यानाच्या ७ व्या अध्यायांत अशी दिली आहे - "मग कित्येक दिवसांनंतरी। माधवराव गेले या उपरी। वागळा उपनांवें कारभारी। कोंकणामाजारी पाठविला ॥ तो बांदोडकर देशमुखासि। जामात होय तेणें देवासि। वृत्ति वर्षापासून श्रीनागेशीं। शासनपटें यांत दिधलें ॥ त्या पासोनी श्रीनागेशी। आधीं मान पूजा वागळे यांसी। त्यानें देवासन्मुख देवळापाशीं। वृत्तांत शासनपटें यांत लिहिलें ॥

शके तेराशें पंसतिशी । विजयनामें संवत्सरासी । दत्त दिधलें त्या अर्थासी । पाषाणी शासनपटेंत पहावें ॥ ''

श्रीनागेश देवस्थान बांदिवडें गांवांत असून त्या स्थलाला ' नागेशी ' असें नामाभिधान प्राप्त झालें आहे. रामनाथीं येथून हें जवळ असून फर्मागुडीवरून कवळें येथें जाणाऱ्या रस्त्यावरच आहे.

श्रीमहालक्ष्मी देवालय

हें देवालय नागेशी येथून अगदीं जवळ असून उभय देवालयांचे पूर्वापार संबंधहि आहेत. श्रीनागेश दैवताप्रमाणेंच श्रीमहालक्ष्मी हेंहि दैवत प्राचीन व समकालीनच असावें असें दिसतें. श्रीमहालक्ष्मीची मूर्ति पाषाणी व चतुर्भूज असून तिच्या मस्तकावर लिंग, उजव्या वरच्या हातांत गदा व खालच्या हातांत महाळुंग आणि डाव्या वरच्या हातांत ढाल व खालच्या हातांत पानपात्र आहे. तसाच बाजूस सिंह आहे. हिचें स्वरूप कोल्हापूरच्या महालक्ष्मीशीं जुळतें आहे. सप्तशतींत ज्या महालक्ष्मीचें वर्णन आहे तिच्याशीं हिचें साम्य असल्यानें हि महामाया महिषासूरमर्दिनी आहे यांत शंका नाहीं.

प्राचीन कालीं महिषासूर नांवाचा बलाढ्य दैत्य उन्मत्त होऊन त्यानें देवांवर हल्ला केला. त्यांचें हें युद्ध अनेक वर्षे चाललें व अखेरीस त्यांत महिषासूर विजयी झाला. सर्व सत्ता त्याकडे जाऊन त्याचा धिंगाणा सुरू झाल्यावर सर्वत्र हाहाःकार उडाला. अशा प्रसंगीं सर्व देवांची सभा भरली आणि त्या वेळीं ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या मुखावाटे जें तेज निघालें त्याची सत्व-रज-तम-अशी त्रिगुणी दैदिप्यमान महाशक्ति प्रगट झाली आणि तिनें महिषासुराचा वध केला असें पुराणांत लिहिलेलें आहे. त्यावरून तीच ही महिषासूरमर्दिनी महालक्ष्मी असें दिसून येतें.

कै. शेळडेंकर आपल्या पुस्तकांत म्हणतात त्याप्रमाणें गोमंतक वसविण्याच्या वेळीं आर्यांनीं तिची प्रतिमा गौड देशांतील त्रिहोत्रपूर येथून गोव्यांत आणून साष्टीतील कोलवें येथें स्थापन केली हें बरोबर असलें तरी ख्रिस्तीकरणाच्या वेळीं तिचें स्थलांतर बांदिवडें येथें झालें अर्थात् ही महालक्ष्मी कोलवें येथील आहे, हें म्हणणें मात्र नागशींच्या शिलालेखावरून व इतर माहितीवरून संयुक्तिक दिसत नाहीं.

श्रीनागेश दैवताप्रमाणेंच श्री महालक्ष्मीहि बांदिवडे येथ विजयनगर साम्राज्यसत्तेच्या पूर्वकालापासून होती आणि ख्रिस्तीकरणप्रसंगीं कोलवेकरांनीं तेथील स्थापित पाषाणी मूर्ति उचलण्यास कांहीं अडचण आल्यानें आपल्या देवतेची उत्सवमूर्ति येथें आणून दोन्हीं देवालयांचें मीलन केलें असावें हें मात्र संयुक्तिक दिसतें.

कै. रा. अ. काकोडकर यांनी आपल्या 'श्रीमहालक्ष्मी महात्म्य' या पुस्तकांत समुद्र मंथनांतून निघालेली लक्ष्मी तीच ही महालक्ष्मी असें म्हटलें असलें, तरी ती लक्ष्मी व महालक्ष्मी या देवतांत फरक असून महालक्ष्मी ही कै. शेळडेंकर लिहितात त्याप्रमाणें महिषासूर मर्दिनीच आहे यांत संशय दिसत नाहीं.

श्रीमहालक्ष्मीचें प्राचीन देवालय लहानसेंच होतें. तें जीर्णावस्थेस आल्यानें प्रस्तुतचें सुंदर व विस्तीर्ण देवालय बांधण्यांत आलें.

आजच्या देवालयाची इमारत सुंदर असून चौक विस्तीर्ण आहे. मंदिर पश्चिमाभिमुख असून पुढें सभामंडप आहे. त्याच्या पुढें प्राकाराचें महाद्वार व वरच्या माडीवर नगारखाना आहे. देवालयाचा चौक व इतर भाग यांची नवीन

पद्धतीनें जी १९१३ त सुधारणा झाली ती मुंबईचे प्रसिद्ध पारशी गृहस्थ शापुरजी सोराबजी यांनीं वीसेक हजार रुपये खर्चून केली आहे. तसेंच नवीन सभामंडपाचें काम श्री. श्रीधर शेणवी भोबे काकुले यांनीं स्वखर्चानें केलें आहे.

या देवालयांतील मुख्य गर्भागारांत श्रीमहालक्ष्मीच्या पाषाणी मूर्तीची स्थापना करण्यांत आली असून त्याच गर्भागारांत तिच्या उजव्या बाजूनें श्रीनारायणाची मूर्ति आहे. श्रीरवळनाथ, श्रीबालेश्वर, नारायणपुरुष या परिवार दैवतांची, लहान लहान मंदिरें मुख्य देवालयाच्या आसपास आहेत.

श्रीमहालक्ष्मीस तुंब्यान्या फुलांचे प्रसाद लावतात. नित्याचा कार्यक्रम इतर देवालयांप्रमाणेंच येथेंहि आहे. दररोज ठरावीक वेळीं चौघडावादन, सकाळ संध्याकाळ नौबत, दररोजचीं देवकृत्यें, महाआरत्या इ. होतात. सर्व कार्यक्रमानंतर रात्रीं दरवाजे बंद करण्यांत येतात.

अष्टमी व चतुर्दशी दिवशीं रात्रौ श्रीमहालक्ष्मीचा पालखीचा उत्सव असतो. पालखीचीं पेणीं नऊ असतात.

रामनवरात्रोत्सव (चैत्र शु. १ दा ते ९ मी), हवन व संतर्पण, अक्षयतृतिया-वसंतपूजा, नवरात्र, दसरा, कोजागरी, लक्ष्मीपूजन, कार्तिक शु. १४ शी-वनभोजन, लालखीउत्सव-काला, मार्गशीर्ष शु. १४ शी-शिबिकोत्सव, महाशिवरात्र असे विविध उत्सव येथें होत असतात. त्यांत चैत्र शु. १ देपासून सुरू होणारा रामनवरात्र उत्सव नाटकें वगैरेमुळें विशेष मजेचा असतो. ८ मीस पालखी उत्सव, ९ मी दिवशीं श्रीरामजयंति, १० मीस रथोत्सव व ११ शीस संतर्पण असतें. नवरात्रांत मकरोत्सव व ८ मी दिवशीं शिबिकोत्सव असतो. ग्रामसंस्था, महाजन, व इतर भाविक यांकडूनहि निरनिराळीं कृत्यें होतात. श्रीबाव्लीबाई शापुरजी सोराबजी यांचा कोजागरी उत्सवहि सुंदर होतो.

कौशिक, अत्रि, भारद्वाज, कौत्स, गार्ग्य, वत्स, व कौंडिण्य अशा गोत्राचे वैष्णव व स्मार्त सांप्रदायी गौड सारस्वत ब्राह्मण या देवालयाचे महाजन आहेत. श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा, श्रीनागेश, श्रीदामोदर, श्रीगणपति या देवाळयांच्या कित्येक महाजनांचा श्रीमहालक्ष्मीकडे पालवी-देवता म्हणून संबंध आहे.

या देवालयाच्या सर्व महाजनांचीं उपनांवें अशीं आहेतः—नाईक, प्रतापराव मुख्य सरदसाई, प्रतापराव सरदेसाई, गावणेकर, नमशीकर, प्रभु सिंके, भांकणकर, पलंग, गांवकर, कापडी, केळेकर, कामत, कामत पानवेलकर, खंडेपारकर, साळगांवकर, केरकर, भोबे, वेलींगकर, सावैकर, सांखळकर, येळ्ळेकर, फोंसे भाटकर, अभ्रो, नाडगोळ, दांडे, बुयांव, बांदोडकर, बक्षी, शिवेश्वरकर, वर्दे, पाणंदीकर, हरपति, वैद्य, भांडारी, दोंदे, रेगे, सिंसाणो, बर्टो, डांगी, दणाईत, मुंग्रे, पाटगांवकर, लाड, कंटक, केंडारी, भिसे, तेलंग, धुमे, केंकरे, संजगिरी, राजाध्यक्ष, दळवी, पालेकर, वागळे, मायंकर, काबाडी इ.

जोशी, पये, कन्हाडे असे कांहीं ब्राह्मण व तळावलीकर वैश्य या देवीचे उपासक आहेत.

श्रीशांतादुर्गा देवालय

अतिप्राचीनकालीं श्रीविष्णु व श्रीमहादेव यांच्यांत चाललेल्या युद्धप्रसंगीं कोणी कोणास हार जाईनासा झाला आणि उभय बाजूंच्या महान् अस्त्रांमुळें प्रळयकाळाची भयानक स्थिति दिसूं लागल्यानें जगाच्या संरक्षणासाठीं ब्रह्मदेवाच्या प्रार्थनेनें आदिशक्ति जगदंबा युद्धभूमीवर मध्येंच प्रगट झाली. तिनें दोघांनांहि शांत करून युद्ध थांबविलें. तीच ही श्रीशांतादुर्गा अशी माहिती स्कंदपुराणांत मिळते.

"श्रीशान्ता विजयप्रदा विजयते दुर्गा हृदा तां भजे। क्रुद्धौ शान्तियुतौ कृतौ हरिहरौ कृत्वाऽधिहस्ते यया ॥ शान्तायैच नमो नमो नहि परं यस्या ममालंबनम् । शान्तायाः खलु किंकरोस्मि रमतां तत्पादयोर्मे मनः ॥१॥" असें विद्वद्वर्य महेश्वरभट सुखठणकर यांनीं आपल्या दुर्गास्तवनांत लिहिलें आहे. याच श्लोकाचें सुंदर मराठीकरण कविवर्य विष्णु रंगाजी शेळडेंकर यांनीं आपल्या देवालय-इतिहासाच्या पुस्तकांतील टीपेंत केलें आहे.

पुढें निरनिराळ्या अवतारांत याच आदिमायेला श्रीनारायणी, श्रीभवानी, श्रीमहिशासूरमर्दिनी, श्रीचामुंडा इ. नांवें प्राप्त झालीं आहेत.

श्रीशांतादुर्गा देवतेची मूल स्थापना गौडदेशांतील म्हणजे बंगालमधील त्रिहोत्रपूर ऊर्फ तिरहूत या स्थलीं आर्य लोकांकडूनच झाली. गोमंतकच्या वसाहतप्रसंगीं जे दशगोत्री ब्राह्मण इकडे आले, त्यांनीं आपापले कुलदेव सोबत आणले. अर्थात् कर्दलीपूर म्हणजे केळोशी हें गांव पुढें अग्रहार मिळालेल्या ब्राह्मणांनीं तिरहूत येथून आपल्या शांतादुर्गेची प्रतिमा आपणाबरोबरच इकडे आणून तिची केळोशी येथें भक्तिभावानें स्थापना केली. केळोशीची ही प्राचीन जागा आणि देवालयाची रचना कांहीं अशीं प्राचीन पद्धतीची होती. तत्कालीन मूळचें देवालय लहानसेंच पण सुंदर होतें.

सदर देवालय जीर्ण स्थितीस आल्यानें सोळाव्या शतकाच्या सुरवातीस तें अनू शेणवी यानें स्वखर्चानें बांधलें. हा अनू शेणवी श्रीशांतादुर्गेच्या महाजनापैकींच केळोशीकर असावा. जुनें गोवें येथें त्याचा त्या वेळीं मोठा व्यापार चाले व तत्कालीन श्रीमंत व्यापाऱ्यांत त्याची गणना होई. हें नवीन बांधलेलें देवालय स्थल व रचना या दोन्हीं दृष्टीनें जवळ जवळ हल्लीच्या कवळें येथील देवालयासारखेंच होतें.

सुप्रसिद्ध इ. सं. डॉ. पिसुर्लेकर यांनां स. १९५४ सालीं ब्राग येथील सफरींत ज्याचा शोध लागला तो गोमंतकीय ज्ञात आद्यकवि कृष्णदास शामा हा केळोशीकर सारस्वत ब्राह्मण असून केळोशीचाच रहिवासी होता आणि त्यानें सन १५२६ सालीं याच श्रीशांतादुर्गा-देवालयांत बसून 'कृष्णचरित्र कथा' हा ग्रंथ मराठींत लिहिण्यास सुरवात केली. हा संतकवि गोव्यांत सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत तर फार प्रसिद्ध व लोकप्रिय असल्याचें दिसतें. त्याच्या कित्येक मराठी कथांचें जेजुइतांसाठीं कोंकणींत रूपांतर करण्यांत आलें. हें रूपांतर करणारे बाटलेले ब्राह्मण असावे. (डॉ. पिसुर्लेकर-सोळाव्या शतकांतील कोंकणी गद्य - भा. मित्र, फेब्रु. १९५७).

साष्टींतील ख्रिस्तीकरणप्रसंगीं या देवळावरहि धाड आली व सन १५६६ सालीं तें जाळण्यांत आलें. Tombo da India de Gôa e das Terras de Salcete e Bardez या पुस्तकांत शेवटीं, मोडलेल्या देवालयांची इ. सं

डॉ. पिसुर्लेकर यांनीं जी यादी दिली आहे तींत 'सांतेर, नारायण, ईश्वर, ग्रामपुरुष, गणेश, भगवती अशों केळोशींतील देवतांचीं नावें आहेत. त्या यादींतील 'शांतेर' हीच शांतादुर्गा होय.

देवालय जाळण्याची तयारी पाहून श्रीशांतादुर्गेचे महाजन त्या मूर्तींसह ताबडतोब निसटले. नंतर उध्वस्त देवालयाची ती जागा सरकारजमा करून ता. २३ मे स. १५६७ रोजीं आंतोनियु फेऱ्हांव नांवाच्या एका ख्रिस्ती इसमास बहाल केली.

श्रीशांतादुर्गेचें केळोशी येथील देऊळ बांधणारा अनू शेणवीं हा ख्रिस्तीधर्माच्या विरुद्ध होता. त्यानें त्या प्रसंगीं पुष्कळ हिंदूंनां मदत केली आहे. बाटविलेल्यांचें शुद्धिकरण करण्याचाहि प्रयत्न केला आहे. "अनू शेणवीं हा ख्रिस्ती धर्माच्या विरुद्ध असल्यानें त्याला त्याबद्दल योग्य शिक्षा करण्याची जरूरी आहे" अशी सां. फ्रांसिस्कु शाव्हियेर यानें पाद्रि मिंगल व्हाज याच्या द्वारें पोर्तुगालच्या राजास विनंति केली होती. (फि. उ. के. गो. देवालयें – डॉ. पिसुर्लेकर. भा. मित्र व. १७, अंक १).

केळोशी यथ उध्वस्त केलेल्या मुख्य दवालयापुढें दीपस्तंभ व तलाव असून समोर शेत; आणि मागच्या बाजूनें नारायण व इतर देव यांचीं लहान लहान देवळें व नंतर डोंगरी होती.

केळोशीकर आपल्या देवतांसह साष्टींतून निघाले ते तडक कवळें येथें आले आणि सांप्रतच्या देवालयाच्या उजव्या बाजूस सुमारें १७५ कदमांच्या अंतरावर त्यांनीं त्या मूर्ति ठेवल्या. त्या नंतर प्रशस्त अशी जागा घेऊन तेथें लहानसें देऊळ बांधलें व स. १५६७ च्या सुमारास त्या मूर्तींची तेथें स्थापना केली.

श्रीशांतादुर्गा देवतेचें आजचें नूतन देवालय पूर्वाभिमुख, प्रशस्त व सुंदर असून त्याच्या उजव्या व डाव्या बाजूनें भव्य अग्रशाला आहेत. पश्चिमेच्या बाजूची श्रीमंत मंत्री यांची अग्रशाला जुनी झाल्यानें ती मोडून गेली. पुढच्या बाजूनें उंच सुंदर दीपस्तंभ व खालीं रमणीय तलाव इ. दृश्य प्रेक्षणीय आहे. छत्रपति सरकारचे मंत्री रा. नारो राम शेणवीं रेगे यांनीं आपल्या कुलस्वामिनीच्या या नूतन देवालयासाठीं बराच पैसा खर्च करून देवालयाचें काम पुरें केलें. देवालय बांधणीचा काल सन १७०८ ते १७३८ या दरम्यान असावा असें कै. शेळडेंकर आपल्या श्रीशांतादुर्गा संस्थानच्या इतिहासांत लिहितात. त्याच प्रमाणें नारो राम मंत्री यांनीं श्रीशांतादुर्गेची पूजा, नैवेद्य, नंदादीप इ. साठीं शाहू छत्रपति महाराज यांचे मुख्य प्रधान पहिले बाजीराव पेशवे यांकडून 'कवळें' हा गांव सन १७३९ त या देवस्थानास इनाम देवविला. त्यांकडून देवतेस इतरहि अनेक देणग्या भक्तिपुरस्सर मिळाल्या आहेत. एकंदरींत श्रीशांतादुर्गा संस्थानच्या वैभववाढीस मंत्र्यांचा फार मोठा हातभार लागल्यानें मंत्र्यांच्या वंशजांपैकीं कोणीहि संस्थानांत आल्यास त्यांचा तेथें मोठा सन्मान करण्यांत येतो.

कवळें इनामगांवची सनद— "श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान बाजीराव बल्लाळ प्रधान" या मजकुराचा डावीकडे वाटोळा शिक्का. "आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि रा. रा. बाजीराव पंडित प्रधान ता। मोकदमांनीं मौजे कवळें तपे अंतरूज मामले फोंडासु॥ आबैन मया अलफ (इ. स. १७३९) श्री देवी मु॥ मौजे मजकूर येथील पूजाउर्जा नेवेद्य नंदादीप उत्छाव चालविलिया श्रेयस्कर

जाणोन मौजे मजकूर श्री चे उर्जेस कुळबाब कुळकानू हालीपटी व पेस्तरपटी खेरीज हकदार व कदीम इनामदार करून नूतन इनाम दिला असे. तर तुम्हीं श्रीकडे रुजू होऊन मौजे मजकुरचा वसूल देण; नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रती लिहून घेऊन अस्सल पत्र भोगवटी यास श्री कडे परतोन देणें जाणिजे जमादिलावर. (लेखन सीमा).

श्री. **मंत्री यांचें पत्र** – "श्री शांतादेवी भक्तस्य नारो राम मंत्री" या मजकुराचा डावीकडे वाटोळा शिक्का. "द्र म॥ अनाम देशमुख व देशपांडे त॥ अंतरूज मामले फोंडा यांसी नारो राम मंत्री सुहूरसन आर्बैन मया व अलफ (इ. स. १७३९) श्रीदेवी मु॥ कवळें तप मजकूर येथील पूजा उर्जा नेवेद्य नंदादीप उत्साह चालवया बद्दल मौजे मजकूर कुळबाब कुळकानू खेरीज हकदार व इनामदार करून नूतन इनाम राजे श्री बाजीराव पंडित प्रधान यांणीं देऊन आलाहिदा सनदा सादर केल्या आहेत त्या प्र॥ मौजे मजकुरचा ऐवज श्री कडे बीकुसूर पावीत जाणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें इ. (ले. सी.)"

या देवस्थानच्या बाहेरील आकर्षक रचनेप्रमाणेंच देवालयाची आंतील व्यवस्थाहि डोळ्यांत भरण्यासारखीच आहे. प्रशस्त सुंदर चौक, व्यवस्थित गर्भागार, व श्रीशांताईची पवित्र मोहक मूर्ति पाहून फार समाधान वाटतें. मुख्य गर्भागारांत श्रीशांतादुर्गेची मूर्ति असून जवळच एक शिवलिंग आहे. उत्तर बाजूच्या मंदिरांत श्रीनारायणदेवाची मूर्ति असून त्याच्याजवळच श्रीगणपति हें दैवत आहे. जवळच्या पारिजात-पारावर श्रीभगवतीची मूर्ति, दीपस्तंभाजवळ श्रीक्षेत्रपाल आणि तळीच्या वरच्याबाजूनें ग्राम पुरुष अशीं आनुषंगिक दैवतें आहेत.

दररोज सकाळीं पांच व साडेदहाला व संध्याकाळीं पांचला चौघडा झडत असून संध्याकाळीं सहाला पंचवाद्यांची नौबत होत असते. सकाळीं निर्माल्य विसर्जनानंतर नित्यनैमित्तिक देवकृत्यांची सुरुवात होते. बाराला नैवेद्य व महाआरती होतात. रात्रीं साताला पुराण, आठाला कीर्तन व नऊ वाजतां आरती होतात. प्रत्येक पंचमीला श्रीशांतादुर्गेचा पालखी उत्सव असतो. ह्या मिरवणुकीची सुरवात रात्रीं साडेदहाला होते. वीस घटीपर्यंत मिळेल तीच पंचमी या उत्सवास ग्राह्य मानण्यांत येते.

श्रीरामनवरात्र - रामनवमी, वसंतपूजा (चैत्र व॥ ५ मी), अक्षयतृतिया, फुलविडेपंचमी (वैशाख शु॥ ५ मी), अनंतव्रत, नवरात्र, दसरा, कोजागरी, वनभोजन (कार्तिक व॥ २ या), नौकाविहार (कार्तिक व॥ ५ मी), लालखी (मार्गशिर्ष शु॥ ५ मी), वनभोजन (मार्ग. व॥ ५ मी), जत्रा (माघ शु. १ दा ते ७ मी), लालखी (माघ शु. १० मी), प्रतिष्ठा (फाल्गुन शु. १० मी), शिमगा (व॥ १ दा ते ६ ष्ठी) असे येथें निरनिराळे अनेक उत्सव होतात. त्या सर्वांत जत्रा महोत्सव विशेष गर्दीचा असतो. या उत्सवांत इतर कार्यक्रमाप्रमाणेंच नाट्यप्रयोगहि होतात. त्यामुळें सर्वसाधारण लोकांची गर्दी असते. जत्रेंतील रथोत्सवाला विशेष महत्व असल्यानें श्रीशांतादुर्गेचा प्रत्येक महाजन आपल्या कोणत्याहि अडचणी बाजूला टाकून अत्यंत भावनेनें रथोत्सवादिवशीं देवस्थानांत हजर होतो.

जत्रोत्सवाच्या प्रथमदिनीं छोट्या रथांतून मिरवणूक असते. चवथ्या दिवशी मोठें संतर्पण

आणि रात्रौ लालखीचा व नौकाविहार उत्सव होतो. पांचवा पंचमीचा दिवस हा महापर्वणीचा दिवस होय. षष्ठी दिवशीं पहांटेस महारथाची मोठी मिरवणूक निघते. ही रथाची मिरवणूक झाल्यावरच देवस्थानांत आलेला महाजन आपली घरीं जाण्याची तयारी करतो.

जत्रोत्सवांतील या महारथावर विवक्षित स्थळीं नारळ फोडण्याची पद्धत असून पूजेनंतर संस्थानचा नारळ फोडून झाल्यावर पहिल्यांदां नारळ फोडण्याचा मान श्रीकैवल्यपूरमठाधीशांचा आहे. दुसरा मान नाईक बुर्ये या गौड सारस्वत वैष्णव सांप्रदायी गृहस्थाचा आहे. त्यानंतर कुशस्थळीकर व मग इतर लोक नारळ फोडतात.

कौशिक, वत्स, भारद्वाज अशा गोत्रांचे या देवस्थानचे महाजन आहेत. रत्नागिरीकडील नाडकर्णी उपनांवाचे कौंडिण्यगोत्री गौ. सा. ब्राह्मणहि ही आपली कुलदेवी मानतात.

कौशिक गोत्री महाजनांचे महाले, हरपति, वैद्य, सुखठणकर, भांडारी, दोंदे, रामाणी, श्रीधर पै, शिंसाणी, रेगे, गायतोंडे व साखरदांडे असे बारा गट असून त्यांतील कित्येकांना महालक्ष्मी तर कांहींकांनां महालसा आणि कित्येकांस कामाक्षी पालवी देवता लागते.

महाले—महाले, म्हाले, शिरोडकर.

हरपति - पिसुर्लेकर.

वैद्य—वैद्य, हवालदार, स्थळेकर, कोपीकर.

सुखठणकर—सुखठणकर, सुंठणकर, घांटकर, कुवेलकर, कारापुरकर, सुर्लकर, कांसारकोडकर, निलगुंदकर, देवमनी इ.

भांडारी – भांडारकर, चिन्नरकर इ.

दोंदे—दोंदे, धोंदे.

रामाणी—रामाणी, रामायणी, देसाई इ.

रेगे – रेगे, मंत्री, बक्षी, कुलकर्णी, नाडकर्णी, असोळडेकर, कुडचडकर, तळवडकर, कोठंबकर, मळकर्णेकर, शिवेंकर, शेळडेकर, होडरकर, बाळ्ळीकर, सांवर्डेकर, साळावलीकर, सुर्लेकर, सांकोर्डेकर, खोलकर इ.

शिंसाणी – शिंसाणी, कुंडईकर.

गायतोंडे—गायतोंडे, हेदे, उसकैकर, कसबेकर, दाभोळकर, बरडे इ.

साखरदांडे—साखरदांडे, कुलकर्णी, नारिंगेकर इ.

वर्दे—वर्दे, वालावलीकर, बोरकर, भरणे, ज्याक, ज्याकी, सबनीस, आचमनी, खासनीस, बळनवल्लीकर, कोपळकर इ.

पाणंदीकर—पाणंदीकर, पैपाळंदीकर, गंगोळीकर, कल्याणकर इ.

कानबिंदे, सोहनी, मुंग्रे, वर्टी, डांगी, दणाईत, पाटगांवकर, नाईक, कर्णिक, पेडवे, टेंभे, पंडित, चुंबडे, कोठारी, गांवगोडकर, कलणकर, घांटे दस्तीकर, बाडी, तुडती, हेरेकर, चिंचखडकर, सांगडकर, हेमाडी, शिरूर, कोपिकर, गंगोळी इ.

सातान्याकडील कांहीं देशस्थ ब्राह्मण व गोव्यांतील व कर्नाटकांतील कांहीं ब्राह्मणेतर श्रीशांताईस भक्तिभावानें भजतात.

श्रीशांतादुर्गा देवस्थान हें धनिक संस्थानांपैकीं एक असून गोव्यांतील सर्व देवालयांत याचा दुसरा नंबर लागतो.

हें देवालय फोंड्याहून सव्वा मैलाच्या अंतरावर कवळें येथें आहे.

श्रीमंगेश देवालय

उत्तर बंगालमधील त्रिहोत्रपुरच्या मानगिरी पर्वतावर प्राचीनकालीं ब्रम्हदेवाकडून ज्या शिवलिंगाची स्थापना झाली त्याच लिंगास 'श्रीमांगिरीश' अशी संज्ञा मिळाली. गोमंतकच्या वसाहतीच्या वेळीं तिकडून आलेल्या वत्स व कौंडिण्य गोत्री कांहीं गौड सारस्वत ब्राम्हणांनीं आपल्या या कुलदैवताची प्रतिमा आपल्याबरोबर इकडे आणली व ती कुशस्थळी (कुठ्ठाळ) येथें स्थापन केली असा स्कंदपुराणांतर्गत सह्याद्रिखंडांत उल्लेख आहे.

सदरील ब्राम्हणांपैकीं 'देवशर्मा' याच्या गुराख्याला कुशस्थळींतील अघनाशिनी नदीतिरीं एका बाजूस एक तेजस्वी शिवलिंग दिसलें. त्यानें ती माहिती त्वरित आपल्या धन्याला सांगितली आणि रात्रीं स्वप्नांत त्याला जसें शिवलिंग दिसलें, हुबेहुब तसेंच या शिवलिंगाचें गुराख्याच्या तोंडून वर्णन ऐकून साक्षात्कार व दैवी सूचनेप्रमाणें त्या लिंगाचीहि त्या सारस्वत समूहानें थाटानें तेथें स्थापना केली. हें स्थान 'श्रीमांगिरीश देवस्थान' या नांवानें प्रसिद्धीस आलें; आणि कालांतरानें मांगिरीश–मांगीश–मंगेश असा त्यांत बदल झाला.

श्रीमांगिरीश दैवताच्या तत्कालीन साक्षात्कारासंबंधींच्या अनेक गोष्टी ऐकिवांत आहेत. कै. विष्णु रंगाजी शेळडेंकर यांच्या पुस्तकांत त्यांपैकीं कित्येकांचा उल्लेख आलेला आहे.

'मांगिरीशाष्टकम्' या पंडित महेश्वरभट्टजींच्या छोट्या संस्कृत पुस्तिकेंत श्रीमंगेशाची सुंदर स्तुति केली असून त्या स्तुतिस्तोत्रास विद्वद्वर्य डॉ. सदाशिव लक्ष्मण लाड यांनीं मराठी समश्लोकीची यथोचित जोड दिली आहे; त्यांतील एक श्लोक असा आहे —

"श्रीशंभो, हर, शंकरेश्वर विभो देवाधिदेव प्रभो। गौरीनाथ भवेड्य भोगित्रलय श्रीकंठशर्वाग्रभो॥ शूलिन् रुद्र शशांक शेखर गुरो कर्पूर गौरामर। ब्रह्माद्यास्तवर प्रसादपर मंगीशा मला उद्धर॥"

कुशस्थळी येथील पहिल्या प्रथम बांधलेल्या प्राचीन देवालयाची रचना अति जुन्या पद्धतीची असली; तरी त्याहि कालीं देवालयाच्या चारहि बाजूंनीं अग्रशाळा होत्या व देवालय प्रेक्षणीय असेंच होतें.

सन १५६० सालीं साष्टी भागांत जेजुईत लोकांकडून ख्रिस्तीकरणाच्या कार्यास जोरांत सुरवात झाली. त्यांतील पेद्रु मास्कारेंन्यस् या नांवाच्या इसमानें कुठ्ठाळ येथें जाऊन 'मखजीचें' देवालय मोडून त्या जागेवर एका क्रुसाची उभारणी केली. चार वर्षानंतर पाद्रि पेरु कुलास यानें कुठ्ठाळ येथें जाऊन आजारानें मृत्युपंथास लागलेल्या एका हिंदु इसमास सक्तीनें बाप्तिजमा देण्यासाठीं भेट दिली. त्यावेळीं तेथील हिंदु लोक त्यावर चवताळून आले व त्यांनीं त्याला तेथून घालवून दिलें. त्या लोकांनीं त्या प्रसंगीं त्या पाद्रीच्या एका पोर्तुगीज नोकराचा खून करून रागानें तेथें नवीनच बांधलेलें ख्रिस्ती चर्चहि जाळून टाकलें. त्या कृत्याचा सूड घेण्यासाठी फिरंगी लोकांनीं हिंदूंचीं कुठ्ठाळ येथील सर्व देवालयें मोडून टाकलीं. मंगनाथाचें देवालयहि मोडण्यांत आलें असा इतिहासांत उल्लेख आहे. मंगनाथ म्हणजेच मंगेश होय. या मंगशमंदिरावर पुढें सन १५६६ सालीं चर्च बांधण्यांत आलें. आतां त्या जागेवर कांहीं अव-

शेष दिसत नसले; तरी कांहीं अंतरावर एक लहानसा तलाव तेवढा दिसतो.

Tombo da Ilha de Goa e das Terras de Salcete e Bardez या पोर्तुगीज पुस्तकांत इ. सं. डॉ. पां. स. पिसुर्लेकर यांनीं उध्वस्त देवालयांची जी यादी दिली आहे त्या यादींत कॅप्टन दियोगु रुद्रीगिस यानें कुठ्ठाळी येथील पुढील देवळें मोडल्याचा उल्लेख आहे— "मंगनाथ (मंगेश), सांतेरी, वीर, कपिलेश्वर, नारायण, भगवती, गोपीनाथ, चंद्रनाथ."

त्या आणीबाणीच्या प्रसंगीं मूर्ति इ. होडींत घालून महाजनवर्गानें विजापुरकराच्या ताब्यांतील पैलतीर गांठलें आणि प्रियोळ गांवच्या आजच्या मंगेशींला नेऊन मूर्तींची पुनर्स्थापना केली व छोटें मंदिर बांधलें. ही पूर्वींची जागा आजच्या देवालयाच्या प्राकाराबाहेर दक्षिण बाजूनें असून तेथें आतां एक तुलसीवृंदावन आहे. याच वृंदावनाकडे तुलसीविवाहाच्या दिवशीं दरसाल श्रीमंगेशाची पालखी जात असते. यानंतर कांहीं कालानें मोठें देवालय बांधण्यांत आलें. पुढें तें जीर्ण स्थितीस आल्यानें त्या जागीं आजच्या सुंदर व भव्य देवालयाची उभारणी करण्यांत आली. हा नवीन जीर्णोद्धार होऊन आज अर्धशतकाचा काल लोटला; तथापि शिल्पकला, सौंदर्य, भव्यता इ. दृष्टीनें देवालयाचें वैशिष्ट्य अजून कायम आहे.

श्रीमंगेशाचें लिंग सुंदर असून आसनस्थ चेहरा अति शांत व दयार्द्र आहे. गर्भागारांत अग्रस्थानीं श्रीमंगेश, चौकावरील दरवाज्याच्या उजव्या बाजूस श्रीगणपति व दुसऱ्या बाजूस श्रीभगवती देवी आहे. चौकावरच श्रीनंदिकेश्वर व ग्रामपुरुष आहे. मागच्या बाजूनें श्रीमुळकेश्वर, त्याच्या उजवीकडे श्रीलक्ष्मीनारायण, श्रीसूर्यनारायण व श्रीगरुड व जवळच श्रीवीरभद्र, श्रीशांतादुर्गा किंवा सांतेर आहे. पूर्व बाजूनें श्रीकालभैरव, प्राकाराच्या बाजूस कौंडिण्यपुरुष, तळीच्या उजवीकडे श्रीशांतादुर्गा व समोर श्रीक्षेत्रपाल अशीं छोटीं मंदिरें आहेत.

देवालयाच्या आंतील सौंदर्यास अनुरुप अशीच त्याची बाह्य रचनाहि आकर्षक आहे. भोंवतालच्या अग्रशाळा, पुढील बाजूचा नगारखाना व तलाव, देवालयापासून मुख्य रस्त्यापर्यंतच्या दुतर्फा नारळीच्या रांगा व छाया प्रेक्षकांचें लक्ष सहज वेधून घेतात.

देवालयाजवळच प्रसिद्ध संतकवि नाईक स्वामी यांची समाधी आहे. यांचीं ईशस्तुतिपर पदें, अष्टकें, कविता प्रसिद्ध असून त्यांचीं श्रीमंगेशाचीं पदें चौकावर व झुलवे इ. पालखीच्या मिरवणुकींत म्हणण्यांत येतात.

इतिहासप्रसिद्ध गोमंतकीय राजकारणी व पेशवाईंतील कर्तबगार मुत्सद्दी रामचंद्र मल्हार सुखठणकर ऊर्फ रामचंद्रबाबा यांनीं श्रीमंगेश देवालयास; पेशवे सरकारतर्फे त्यांचे मांडलिक सौंदेकर राजे यांकडून इनामगांव व वार्षिक अडीचशें रुपयांची नक्त नेमणूक करून दिली. या इनामगांवासंबंधीं पेशवेसरकारांतून पोर्तुगीज सरकारला आलेला एक खलिता पुढीलप्रमाणें आहे —"राजा शाहू नरपति हर्षनिधान बाळाजी बाजीराव प्रधान" या मजकुराचा डावीकडे वाटोळा शिक्का.

"राजेश्री रामचंद्र मल्हार यांचे कुळदेवांचीं देवालयें अंत्रूज प्रांतीं आहेत. तेथील उर्जेस तेल, फुलें आणि द्रव्यें पाहिजेत त्यास खर्चाबद्दल रफायत पऱ्हां सदाशिव नाईक इमडी राजे सौंदें यांजकडून कवळें ग्राम श्रीशांतादुर्गा देवीस व मौजे प्रियोळ येथील श्रीम्हाळसा देवीस एक

वाडा व श्रीमंगेश देवास एक वाडा व नगदी महाल मजकुरीं अर्डीचशें रुपये इनामं संपादून घेऊन सनदी हासल केल्या आहेत. ल्हा प्र॥ आम्हीं तीं इनामें करार करून सरकारचीं पत्रें दिलीं आहेत. अशास गांव व वाडा मजकुरचो कमाविशी करून कमाविसदार जातील अशास इजलाल पन्हांसीं संकल्प कीं सदरहू गांव वाडे देवालयें व कमाविसदार यांस इजलाल पन्हांकडून कांहींच तसोसी होऊं नये. सौंदे संस्थानीं व इजलाल पन्हामधें विभक्तता पडली आहे तेव्हां इजलाल पन्हांकडील इसम यांस आज्ञा केली पाहिजे कीं सदरहू गांव वाडे देवालयें व कमाविसदार यांस कांहींच उपसर्ग करूं नये. सौंदे संस्थान याशीं पाहिजे तसें वर्तावें परंतु यांत दिकत असूं नये. श्रीसप्तकोटेश्वर क्षेत्र नारवें हें पुरातनपासून संरक्षिलें आहे. इजलाल पन्हां अगोदरचा विसरै यांनीं डिचोली महाल व किल्ला काबीज केला. ते समयीं गांव फरारी झाल्यामुळें देवालय खालीं आलें तेव्हां गांवांहून श्रीस्थळ काढिलें अशास गांव मजकूर श्रीक्षेत्रास पूर्वीच इनाम देऊन आम्हांकडून सरकारांत पत्र सादर झालेंच आहे. प्रस्तुत क्षेत्राची उर्जा चालणेच्या खर्चाबद्दल सदरहू गांवचें इनाम पत्र इजलाल पन्हांनीं रवाना केलें पाहिजे. रवाना छ॥ १८ माहे शाबान जादा काय लिहावें हे किताबत.''

श्रीमंगेश देवालयांत देवस्थानचे, अनेकांच्या कायमनिधीच्या व्याजानें होणारे व प्रसंगविशेषीं होणारे असे अनेक उत्सव नेहमीं चाललेले असतात. ठराविक उत्सव असे आहेतः—

श्रीराम नवमी (चैत्र शु. ९ मी), अक्षय तृतिया (वैशाख शु. ३ या), शयनी द्वादशी (आषाढ शु. १२ शी), कृष्णजयंति (श्रावण व. ८ मी), अनंतव्रत (भाद्रपद शु. १४ शी), नवरात्र, दसरा, कोजागरी (आश्विन १५ मा), गुरुद्वादशी, दिपावलि, काला (कार्तिक शु. १२ शी), वैकुंठ १४ शी (वनभोजन), वनभोजन (कार्तिक १५), काला व दहिंकाला (कार्तिक व. ७ मी व ८ मी), मार्गशीर्ष १५ मा (वनभोजन), महारुद्र (पौष्य), जत्रोत्सव (माघ शु. ७ मीपासून १५ मेपर्यंत). हा उत्सव सर्व उत्सवांत विशेष बहारीचा व विशेष गर्दीचा असतो. या पौर्णिमेदिवशीं होणाऱ्या महारथोत्सवास महाजनवर्गांतील प्रत्येक घराण्याचा एखादा इसम तरी आल्यावांचून राहात नाहीं. ७ मी दिवशीं विजयरथोत्सव, ८ मी दिवशीं हत्तिअंबारींतून मिरवणूक, ९ मी रौप्यशिबिका, १० मी महारुद्र संतर्पण व खांद्यावरील रथ, ११ शी रौप्यशिबिका, १२ शी नौकाविहार, १३ शी सुखासन, १४ शी छोटा रथ व १५ मा महारथ असा या जत्रोत्सवांत विविध कार्यक्रम असतो.

गोव्यांतील सर्व देवस्थानांत या देवस्थानचा नंबर पहिला असून दुसरा नंबर श्रीशांतादुर्गा संस्थानचा आणि तिसरा श्रीरामनाथ देवस्थानचा आहे.

सकाळीं ५ वाजतां चौघडावादन, नंतर नौबत, निर्माल्य विसर्जन अभिषेकादि देवकृत्यें, ११ ला पुनः चौघडा, १२ ला महाआरत्या; संध्याकाळीं ६ ला चौघडा नंतर नौबत, ७॥ ला पुराण, ८॥ ला कीर्तन व ९॥ ला रात्रीच्या आरत्या असा नित्यक्रम असतो.

या देवस्थानचे मूळ महाजन वत्स व कौंडिण्य गोत्री असून त्यांचे २४ गट आहेत. त्यांपैकीं कित्येक श्रीम्हाळसा (म्हाडदोळ) व कित्येक श्रीमहालक्ष्मी (बांदिवडें) यांनां उपदेवता मान-

तात. महाजनांचे गट व नांवें खालीलप्रमाणें आहेतः—

लाड—लाड, सत्यवंत लाड, दुभाषी इ.

कें डारी—केंडारी.

शिंगण दळवी—शिंगबाळ, आरस.

कंटक—कंटक, कंठक, टांकी, साळकर. उसगांवकर, काकोडकर इ.

ब्रम्हे—ब्रम्हे.

भिसे—भिसे, आठवणकर, बोंडसे, पाटकर.

नेत्रावळकर—नेत्रावळीकर.

तिनईकर-तिनैकर, तिनयकर.

तेलंग—तेलंग, तेलिंग, देवनळी इ.

कें करे—केंकरे, फडणीस, आंबे, लावणनीस, आगशीकर, अडवलपालकर, तोर्सेकर, प्रियोळकर, कवडे, गुंजीकर, खोत इ.

नाईक कोळंबे—नाईक करंडे.

धुमे—धुमे.

नाईक हिंगटे—देऊलकर.

नाईक संजगिरी—संजगिरी, केरकर, मोरजकर, हरमलकर, नाडकर्णी, देशपांडे, हल्याळकर इ.

भांडारी-भांडारी, भांडारे, पतावरकर इ.

सत्यवंत भांडारी—सत्यवंत भांडारी.

दळवी-दळवी.

राजाध्यक्ष—राजाध्यक्ष, मुळगांवकर, पावशे, देशपांडे, देशकुलकर्णी, उसपकर, म्येंकर, कर्णिक, धायमोडे, गडणीस, मणेरकर, नाडकर्णी, रांगणेकर, कालेलकर, गुडे, मंड्रूरकर, नगर्सेकर, सालेलकर, पिळगांवकर इ.

पालेकर—पालेकर, आंबिये, कोळंबुले, नेर्लीकर, बस्तोडकर इ.

कैसरे—कैसरे, कैसरी.

वागळे—वागळे, वाघ, वैष्णव, नाडकर्णी, माजाळकर, अडर्सेकर, आजगांवकर इ.

भेंडे—भेंडे, पागनीस इ.

नाईक माइणकर—भाटकी, म्हाइमे, सराफ.

काबाडी—काबाडी, नाडकर्णी, रेडकर इ.

चंदावरकर, नाळकूळ, कायसुवकर, कोळसकर, बिडीकर, चक्रमनी, तलगरे, सलगर, कारकोळ, पुणेकर, गोकर्ण, कल्याणपुरकर, कबाडकर-इसलूरकर, गळवडी या उपनांवांचेहि महाजन आहेत.

या देवालयांत प्रसादफुलें ग्रामपुरुषाच्या मूर्तीस लावतात. मुख्य उत्सव व सणाचे दिवस खेरीज करून नेहमी प्रसाद घेण्यांत येतात.

प्रत्येक सोमवारीं श्रीमंगेशाचा पालखी-उत्सव असल्यानें त्या दिवशीं भाविक महाजन मुद्दाम पालखीच्या मिरवणुकीस हजर राहातात.

श्रीमंगेश देवालय फोंडे-पणजी या मुख्य रस्त्याजवळच असून त्या रस्त्याला लागूनच असलेल्या मोठ्या दरवाज्यावर प्रवाशाला देवालयाच्या नांवाची ठळक अक्षरें दिसतात. त्या दरवाज्यांतून सरळ आंत गेलें म्हणजे लगेच समोर देवालयाच्या इमारती दिसूं लागतात.

गोमंतकीय

म्हाळसा नारायणी

समुद्रमंथनांतून काढलेल्या पारिजातक, लक्ष्मी, कौस्तुभ वगैरे रत्नांची वांटणी होऊन, विश्वकल्याणासाठीं हलाहलहि श्रीशंकरानें स्वीकारलें; पण शेवटीं राहिलेल्या सुरा व अमृत या दोन रत्नांसाठीं देवदैत्यांत मोठें भांडण सुरू झालें. तें मिटविण्यासाठीं श्रीविष्णूनें जें जगत्सुंदरीचें मोहिनी रूप घतलें तीच ही श्रीम्हाळसा नारायणी होय.

गोमंतकच्या वसाहतप्रसंगीं तिरहूत येथून इकडे आलेल्या कांही गौड सारस्वत ब्राम्हणांनीं हें आपलें उपास्यदैवत इकडे आणलें आणि सासष्टींतील 'वरुणापूर' या आपल्या वसाहतीच्या गांवीं त्याची स्थापना केली . या वरुणापुरालाच पुढें वेर्णें असें नांव मिळालें.

पुढें कांहीं कालानें मोठें देवालय बांधून त्यांत म्हाळसा नारायणीची नवीन मूर्ति बसविण्याचा विचार झाला. त्यावेळीं म्हाळशर्मा या कौशिक गोत्री भक्ताला स्वप्न झालें आणि स्वप्नांत अतिसुंदर स्त्रीरूपानें देवी प्रगट होऊन तिनें सांगितलें, "मंदिराच्या वरच्या बाजूला थोडें खोदा म्हणजे माझी पाषाणी मूर्ति सांपडेल. त्या नवीन मूर्तीची नवीन देवालयांत स्थापना होऊं दे.

इतरांनां ही स्वप्नांतील हकिगत सांगून म्हाळशर्म्यानें त्यांनां ती जागा दाखविली. लगेच तेथें खोदण्यांत आलें. आणि खरोखरच त्याच जागीं देवीची सुंदर मूर्ति सांपडली. सर्वांनीं भक्तिभावानें ती मूर्ति आणून नवीन मोठ्या देवळांत तिची स्थापना केली.

म्हाळशर्मा हा वेर्णेकरांचा जांवई, पण म्हाळसेचा महान् भक्त होता. त्याचें गोत्र कौशिक आणि गांव नागवें. हा पुढें वेर्णें येथेंच राहिला व वेर्णेकरांनीं त्याला आपल्या जमातींत घेऊन देवस्थानचा महाजन केला आणि त्याला ग्रामसंस्थेचा हक्कहि दिला.

म्हाळपुरुष म्हणून जी एक लिंगाकृति छोटी मूर्ति आज देवीसन्निध दिसते ती म्हाळशर्मा यांचीच असें सांगतात.

म्हाळशर्म्याची देवीवर अतिशयच भक्ति. तिला तो नाना प्रकारच्या पेहरावांनीं, विविध सुंदर वस्त्रांनीं, मोहक व सुगंधित पुष्पांनीं सजवीत असे; आणि त्याच पद्धतीला अनुसरून आजहि म्हाळसादेवीला बालिका, कुमारी, तरुणी, वृद्धा अशा अनेक पेहरावांनीं सजवितात. त्यामुळें 'म्हाळसेची कळा' अशी कोंकणींत एक म्हणच पडली आहे.

वेर्णें येथें ज्या जागीं श्रीम्हाळसादेवीचें देऊळ होतें त्या भागास पूर्वींहि 'म्हाडदोळ' असेंच नांव होतें. तेथील रचनाहि फारच सुंदर, अर्थात मोहक होती. प्राचीन देवळाच्या त्या उंचवट्यावरून इतस्ततः पाहिलें म्हणजे जें एक अपूर्व निसर्गदृश्य दिसे तें प्रेक्षकाला मोहून टाकी. पूर्वेकडे सह्यागिरी, पश्चिमेकडे दिसणारा महासागर, मध्यभागीं दृग्गोचर होणाऱ्या मनोहर बागा, सुंदर शेतें इ. दृश्यें कोणाला मोहित करणार नाहींत ?

जुन्या कालीं ज्या जागीं हें देऊळ होतें, तेथील तो डोंगरमाथा विस्तीर्ण व सपाट असून तेथील कांहीं अवशेषहि अजून दिसतात. देवालयाच्या तलावाची बांधणी अजून दिसत असून

त्यांतील पाणी पाहिलें म्हणजे इतक्या उंचावरील हा तलाव नेहमीं कसा तुडुंब भरलेला असतो याचें आश्चर्य वाटतें. या तलावाजवळच तेथें दुसरा एक उत्कृष्ट पाण्याचा सुंदर निर्झर आहे. त्याचें पाणी आरोग्यदृष्ट्याहि छान असल्याचें सांगतात.

पुढें सोळाव्या शतकांत ख्रिस्तीकरणप्रसंगीं वेर्णेचीं सारीं देवळें मोडण्यांत आलीं. 'तोंबु द ईल्य द गोअ इ दस् तेन्हस् द सालसेत इ बार्देज' या पोर्तुगीज पुस्तकांत इतिहास संशोधक डॉ. पां. स. पिसुर्लेकर यांनीं जी साष्टीची यादी दिली आहे त्या यादींत वेर्णेच्या देवांची अशी नामावली आहे:— म्हाळसा, सांतेर, नारायण, भगवती, वेर्णादेवी, ग्रामपुरुष, लंबेश्वर इ.

त्या आणीबाणीच्या प्रसंगीं श्रीम्हाळसा, श्रीसांतेर इ. देवता विजापूरकराच्या सत्तेंतील अंत्रूज महालांत नेण्यांत आल्या. वेर्णे येथें ज्या जागीं आज ख्रिस्ती प्रार्थना मंदिर (मोठें चर्च) आहे त्याच जागीं पूर्वी श्रीसांतेरीचें देऊळ होतें.

पोर्तुगीज इतिहास संशोधक प्रो. पाद्रि सिल्व्ह रेगु यानें 'दोकुमेंतासांव पर अ इस्तोरिअ दस् मिसोंइस् दु पाद्रोआदु पोर्तुगेज दु ओरियेंति' या ग्रंथाच्या दहाव्या भागांत साष्टींतील देवळें कशीं मोडलीं याबद्दलचा समकालीन पोर्तुगीज पत्रव्यवहार दिला आहे. त्यांत तत्कालीन म्हाडदोळ (वेर्णे) येथील म्हाळसादेवीसंबंधीं पुढील माहिती मिळते:—

सबंध साष्टींतील प्रमुख देऊळ म्हणजे म्हाळसादेवीचें. या देवालयास उत्कृष्ट प्रतीचें लांकूड वापरलेलें होतें. तत्कालिन पोर्तुगीज व्हिसिरै याला आपल्या तोफखान्याच्या इमारतीसाठीं चांगल्या लांकडाची गरज होती. कांहीं जेजुईत पाद्रींनीं व्हिसिरै यांनां कळविलें कीं, हिंदूंनीं वेर्णे येथील आपल्या देवळांनां उत्तम प्रकारचें लांकूड वापरलेलें आहे तें अवश्य मिळवावें. पाद्रींच्या या सूचनेचा उद्देश म्हणजे, त्या निमित्त्यानें हीं देवळें उध्वस्त व्हावीं.

पाद्रींच्या सूचनेवरून व्हिसिरैनें वेर्णे येथील प्रमुख ब्राम्हणांस पत्र लिहून त्या देवळांच्या लांकडाची त्यांकडे मागणी केली. रायतुरच्या किल्लेदारासहि त्याबद्दलचा हुकूम पाठविला.

ता. ७ मार्च १५६७ रोजीं रायतुरचा किल्लेदार कॅप्टन दियोगु म्हाडदोळला गेला. त्यापूर्वीच एक जेजुईत पाद्री कांहीं इसमांसह म्हाळसादेवीच्या देवळांत हजर झालाच होता. देवीच्या अंगावर पुजारी त्यावेळीं दागिने घालीत होते. ते सर्व दागिने पुजाऱ्यांकडून पाद्रींनीं आपणाकडे घेतले. त्यांपैकीं रुप्याचे सारे कॅप्टनकडे दिले. म्हाळसादेवीची मूर्ति फोडण्यांत आली. इतर मूर्ति नेण्यास पाद्रींनीं हरकत घेतली नाहीं.

देवालयाची तळी विस्तीर्ण होती. देवळाजवळ स्नान करण्यासाठीं एक सुंदर इमारत होती. जेजुईत पाद्री म्हणतो कीं—"इतकी सुंदर इमारत आपण पोर्तुगालला देखील पाहिली नाहीं." (Certo que nem em Portugal até guora vy outro tam formoso).

त्याच दिवशीं श्रीम्हाळसा देवालयाचें छप्पर उडविण्यांत आलें. देऊळ जमीनदोस्त केलें नाहीं. त्यामुळें तेथील प्रमुख ब्राम्हणांनीं देवळाची

इमारत एका पोर्तुगीज इसमाच्या नांवावर करण्याचें योजिलें. दुसरा व्हिसिरै आल्यावर देवालयाचा पुनरुद्धार करावा हाच त्याच्या मुळाशीं त्यांचा उद्देश होता. पण ती गोष्ट किल्लेदाराच्या लक्षांत येतांच त्यानें लगेच वेर्णे येथें जाऊन म्हाळसादेवीचें देऊळ जमीनदोस्त करून टाकलें. (फि. उ. के. सा. देवळें—ले. डॉ. पां. स. पिसुर्लेकर. भारतमित्र व. २६, अं. ६).

परिस्थितीनुरूप म्हाळसादि देवतांचें स्थलांतर प्रियोळ गांवच्या म्हाडदोळ येथें झालें. मूळ मूर्ति फोडल्यानें तेथें जातांच नवीन सुंदर मूर्ति तयार करून तिची नवीन मंदिरांत स्थापना केली.

पुढें कांहीं कालानें मोठें देवालय बांधण्यांत आलें. पेशवे कालांत पेशवाईंतील सुप्रसिद्ध मुत्सद्दी रामचंद्र मल्हार ऊर्फ रामचंद्र बाबा सुखठणकर यांनीं पेशवे सरकार तर्फे त्यांचे मांडलिक सौंदेकर राजे यांकडून म्हाडदोळवाडी म्हाळसादेवीस इनाम करून दिली. (इनामपत्राचा उतारा मागील प्रकरणांत दिलेला आहे.)

हळू हळू नवीन म्हाडदोळला म्हाळसादेवालयाची भरभराट होत गेली. म्हाडदोळ हें मध्यवर्ति ठिकाण असल्यानें पुढें पोर्तुगीजांच्या नवीन काबिजादीची मामलेदार कचेरीहि येथेंच झाली व त्यामुळेंहि येथें मोठी हालचाल सुरू झाली.

म्हाडदोळ स्थळ रमणीय व सुंदर असून वैशिष्ट्यपूर्ण आहे. मध्यभागीं श्रीम्हाळसादेवीचें ताम्रपट्टा असलेलें पूर्वाभिमुख सुंदर मंदिर, दक्षिणोत्तर अग्रशाळा, मधूनच परिवार देवमंदिरें, पूर्वदिशेस सभामंडप, दीपस्तंभ व गरुडस्तंभ, त्याच्या पुढें प्राकाराचें महाद्वार, वरती नगारखाना आणि पुढें मुख्य रस्त्यापर्यंत दुतर्फा दुकानें व निरनिराळ्या लोकांचीं घरें आहेत. देवळाच्या पश्चिम बाजूनें प्राकाराबाहेर देवालयाची स्वच्छ पाण्याची सुंदर तळी आहे.

श्रीम्हाळसा नारायणी ही वेर्णे गांव वसाहतीस आणलेल्या आर्यांची कुलदेवता असून श्रीशांतादुर्गा किंवा सांतेर ही त्यांची ग्रामदेवी आहे. आजच्या म्हाडदोळला श्रीसांतेरीचें मंदिर मुख्य देवालयाच्या उजव्या बाजूस असून हल्ली ती इमारत नवीन बांधलेली आहे.

श्रीम्हाळसा नारायणी व श्रीसांतेर यांच्या परिवार देवता प्राकारांत व बाहेरहि ठिकठिकाणीं आहेत. श्रीम्हाळपुरुष श्रीम्हाळसेच्या जवळ, श्रीगणपति प्रदक्षणेंत दरवाज्याच्या डाव्या बाजूस, श्रीसंकष्टी प्रदक्षणेंत उजवीकडे, सहस्रपाळ दक्षिण बाजूस, चतुःषष्टी योगिनी प्राकारांत उत्तर बाजूस, कालभैरव सभामंडपाच्या उत्तरेस, दाडक्षेत्रपाळ श्री काल भैरवाच्या पुढें, मल्हार प्राकाराबाहेर पश्चिमेकडे, श्रीलक्ष्मी नारायण श्रीशांतादुर्गा देवालयांत, श्रीगजानन तेथेंच चौकांत, श्रीभगवती श्रीशांतादुर्गा मंदिराजवळ, सोनाळभैरव भगवती मंदिरांत, शिवपुरुष प्राकाराबाहेर उत्तरेकडे व ग्रामपुरुष दक्षिण अग्रशाळेच्या पश्चिम भागांत आहे.

इतर प्रमुख देवालयांप्रमाणेंच येथील चौघडा, नौबत, पूजा, देवकृत्यें, आरत्या, पुराण, कीर्तन इ. कार्यक्रम असतो. दर रविवारीं श्रीम्हाळसादेवीचा शिबिकोत्सव असतो. दर पंचमीदिवशीं श्रीसांतेरीची पालखी असते.

श्रीम्हाळसानारायणीस प्रसाद लावणें

असल्यास तो पहांटेस श्रीच्या मंगल स्नानानंतर ४॥ ते ५॥ पर्यंतच्या एका तासाच्या अवधींतच लावला पाहिजे. हा प्रसाद तुळशीमंजिरींचा लावण्यांत घेतो. दाढास पटकुळीच्या फुलांचा व श्रीभगवतीस करंबलीच्या पानांचा प्रसाद लावतात.

या देवालयांत श्रीरामजन्मोत्सव, अक्षय तृतिया, वसंत पूजा, अनंतव्रत, नवरात्र, दसरा, वनभोजन, चंपाषष्टी, काला, माघ शु॥ ६ष्टी ते व॥ १०मी पर्यंत जत्रोत्सव इ. अनेक उत्सव होतात. त्या सर्वांत जत्रोत्सव विशेष बहारीचा असतो. जत्रोत्सवांत रथ, लालकी, महारथ, पालखी अशा मिरवणुका असून, नौकाविहार व शेवटच्या दिवशीं विजयरथाच्या मिरवणुकीचा नामी उत्सव असतो. या दिवशीं महाजनांची व इतर भाविकांची फार गर्दी असते. कांहीं वर्षांमागें ही जत्रा गोव्यांत विशेष प्रसिद्ध असून जत्रेंतील मिठाई, कपडा वगैरे विविध जिन्नसांचीं दुकानें फाल्गुन संपेपर्यंत तेथेंच राहात असत.

अत्रि, भारद्वाज, कौशिक, गार्ग्य व कौत्स या पांच गोत्रांचे गौड सारस्वत ब्राह्मण या देवालयाचे महाजन असून त्यांचीं उपनांवें अशीं आहेत :—

पै रायतुरकर, पै काणे, पै वैद्य, पै काकोडे, पै कुंचेलकर, पै वेर्णेकर, पै कीर, नेवरेकर, आचार्य, शेणवीं, मोपकर, जांबोटकर, कुडव, कामत, कोटणीस, नाडकर्णी, बुडकुले इ.

कौंडिण्य, वत्स व कौशिक अशा गोत्रांच्या श्रीरामनाथ (बांदिवडें) श्रीशांतादुर्गा (कवळें), व मंगेश (मंगेशीं) या देवांच्या कांहीं महाजनांनां श्रीम्हाळसा नारायणी पालवी देवता लागते.

या शिवाय धुपकर, बखले,जांभळे, भाटवडेकर, साधले, देसाई, काकिर्डे, काळे या उपनांवांचे ब्राह्मण व राऊत देसाई हे क्षत्रिय-मराठे इ. या देवस्थानचे उपासक आहेत.

हें श्रीम्हाळसा नारायणीचें देवालय फोंडें महालांत म्हाडदोळ येथें असून फोंडें-पणजी रस्त्याच्या अगदीं जवळ आहे. त्या रस्त्यावरून मोटरनें जातांनां देवालयाच्या प्राकाराचें महाद्वार सहज दिसतें.

उत्पन्नाच्या दृष्टीनें गोमंतकीय देवस्थानांत या देवालयाचा नंबर चौथा लागतो.

कांहीं वर्षांपूर्वी अखिल गोमंतकांत विशेष गाजणारी जत्रा म्हणजे म्हाडदोळची जत्रा अशी परिस्थिति होती. प्रचंड लोकसमुदाय, विविध वस्तूंचीं अनेक दुकानें, नाना प्रकारचे जुगारी खेळ यांमुळें सर्व प्रकारच्या लोकांचें येथें सहज आकर्षण होई. या जुगारी बेफाम हालचालीची माहिती कै. भिषग्वर्य रा. पां. वैद्य यांनीं आपल्या ‘ म्हाडदोळची जत्रा ’ या काव्यमय पुस्तकांत छान वर्णन केली आहे. आजचा जमाना निराळा असल्यानें आजची तेथील परिस्थितीहि अर्थात् निराळी आहे. म्हाडदोळलाच नव्हे, तर आज इकडील कोणत्याहि देवस्थानांत त्या कालाची जुगारी गडबड फार करून दिसायची नाहीं.

श्रीनवदुर्गा (मडकई)

नवदुर्गा ही श्रीमहिषासुरमर्दिनी आहे. प्राचीन कालीं ज्या ब्राह्मणांनीं वेर्णे गांवाची वसाहत केली, त्यांच्या पुढील पिढीपैकीं कांहीं जणांनीं तिसवाडी येथील 'गांवशी' हें गांव निवडून तेथें आपली नवीन वसाहत बनवली. तत्कालीन ग्रामसंस्थेच्या पद्धतीस अनुसरून त्यांनीं तेथें जें देवालय स्थापन केलें तें याच नवदुर्गेचें, अशा रीतीनें ही त्यांची इष्टदेवता गांवशीची ग्रामदेवता झाली.

ख्रिस्तीकरणप्रसंगीं गांवशी येथें जीं देवळें मोडण्यांत आलीं त्यांच्या नामावळींत नारायण, दुर्गादेवी, भावनाथ यांच्या देवळांचा उल्लेख मिळतो. त्यांतील नारायण हा श्री नारायणदेव म्हणून नवदुर्गेच्या आनुषंगिक दैवतांत समाविष्ट असून दुर्गादेवी हीच श्रीनवदुर्गा होय. ख्रिस्तीकरणाच्या वेळच्या धांवपळींत गांवशीकर आपल्या इष्टदैवतांसह महत्प्रयासानें मडकई येथें आले. ते मडकईंत पहिल्या प्रथम ज्या जागीं उतरले त्या 'पारंपाय' वाडींतील जागेस 'तळी-खोल' अशी संज्ञा आहे. देवालयाची जागा मुक्रर होईपर्यंत त्या देवता तेथेंच होत्या. नंतर देवालयासाठीं जागा ठरवून बांधकामासहि सुरवात झाली. दहाएकवर्षेपर्यंत देवालयाच्या इमारतीचें बांधकाम चालू होतें. त्या अवधींत देवीच्या मूर्तीची तात्पुरती स्थापना आजच्या देवळाच्या जवळच एका निराळ्या जागीं करण्यांत आली होती. बांधकाम पूर्ण होतांच देवतेची स्थापना त्या नवीन देवळांत करण्यांत आली.

श्रीनवदुर्गेचें देवालय एका उंचवट्याच्या पायथ्याशीं पश्चिमाभिमुख असून टुमदार व सुंदर आहे. चौक विस्तीर्ण व घुमट सुंदर आहे. समोर प्रशस्त सभामंडप आणि उजव्या व मागच्या बाजूला अग्रशाला आहेत. उत्तरेच्या बाजूनें जी एक खोली आहे, त्याच जागीं देवालय बांधण्यापूर्वी देवीची स्थापना झाली होती.

श्रीनवदुर्गेची पाषाणी सुंदर मूर्ति गर्भागारांत मुख्य जागीं असून तिची मान जरा कलती आहे. या मुख्य देवतेशिवाय श्रीमहादेव (गर्भागाराच्या दरवाज्याच्या उजव्या बाजूस भिंतीच्या कोनाड्यांत), श्रीगणपती (सदर दरवाज्याच्या डावीकडे), श्रीग्रामपुरुष (देवळाच्या डावीकडे प्राकारांतील छोट्या देवळींत), श्रीनायणदेव (वडाळ वाडींतील देवळांत), श्रीवेताळ (सदर वाडींत), रवळनाथ (सदर वाडींत देवळींत), ज्ञानेश्वर (झोंसो वाडींत), मल्लिकार्जुन (दुतळें वाडींत) अशीं आनुषंगिक दैवतें आहेत.

या देवालयास उत्पन्न चांगलें असून नित्य नैमित्तिक कृत्यें उत्सव इ. साठीं खर्चहि बराच होतो. प्रत्येक शुद्ध व वद्य नवमीस पालखी उत्सव होत असून रामनवमी, वसंतपूजा, अक्षयतृतिया, श्रावण सोमवार, श्रावणी-पौर्णिमा, नवरात्र, दसरा, काला, कार्तिकी-पौर्णिमा, जत्रोत्सव, शिमगा इ. उत्सव होत असतात. त्यांत नवरात्र, जत्रा व शिमगा हे विशेष महत्वाचे असतात. नवरात्रांत मकरोत्सव प्रेक्षणीय असतो, तर दसरा उत्सवांत तरंगांची मजा पहाण्यासारखी असते. शिमगा तर मजेचाच. फाल्गुन वद्य द्वादशीपासून अमावास्येपर्यंतच्या चार रात्रीं नाटकांचा कार्यक्रम असतो.

कार्तिक वद्य चतुर्थीपासून दशमीपर्यंत सात दिवस जत्रेचा कार्यक्रम असतो. संतर्पण, पुराण, कीर्तन, सुखासन, तिसऱ्या चवथ्या दिवशीं

नाटकें, पांचव्या दिवशीं नौकाविहार, सहाव्या दिवशीं उपहाराची अहमहमिका, पहांटेस रथोत्सव, सातव्या दिवशीं रथाची मिरवणूक, दिवजांचा कार्यक्रम इ. भरगच्च कार्यक्रमानें हा उत्सव सुंदर दिसतो.

या देवालयांत प्रसाद फुलें देवीच्या मुख्यासनाखालील प्रसाद पट्टयास लावतात. प्रसादपूजेंत अठरा स्थानें तुंब्याच्या फुलांचीं असून सहा करंबलीच्या पानांचीं असतात.

या देवस्थानचे मूळ महाजन मडकई ग्रामसंस्थेचे वर्गी कामत, नेवरेकर व भरणे हे असून त्यांचे आठ गट आहेत. १- कामत म्हालवाडकर व वडाळकर (अत्रि गोत्री), २- कामत गाणकर, व्होशेकर व दुतळेकर (भारद्वाज गोत्री), ३- कामत बुलो (अत्रि), ४- कामत धांकणकर (भारद्वाज गोत्री), ५- कामत पणजीकर (अत्रि), ६- कामत बेतीकर (भारद्वाज), ७- शेणवीं नेवरेकर (कौशिक गोत्री) व ८- शेणवीं भरणे (वत्स गोत्री).

याशिवाय तिंबले, खाडये, माड, अत्रि, भारद्वाज, पिंगल व वासिष्ठ या गोत्रांचे महाजन असून कांहीं दैवज्ञ ब्राह्मणहि उपासक आहेत.

म्हाडदोळ येथून मडकई जवळ असून तेथें मोटरसर्व्हिसहि आहे.

श्रीनवदुर्गा (कुंडई)

मडकई व कुंडई ही आरंभीं एकच ग्रामसंस्था होती. पुढें त्यांच्या वर्ग्यांत कांहीं तेढ उत्पन्न होऊन ती विकोपास गेल्यानें ही ग्रामसंस्था फुटून तींतून मडकई व कुंडई अशा दोन निरनिराळ्या ग्रामसंस्था अस्तित्वांत आल्या. याच वेळीं कुंडई ग्रामसंस्थेच्या वर्ग्यांनीं नवदुर्गेची नवी प्रतिमा करून कुंडई येथें स्थापन केली आणि अशा रीतीनें मडकई व कुंडई या दोन्हीं ठिकाणीं नवदुर्गेचीं दोन देवालयें झालीं. कुंडईचें मूळ देवालय लहानसेंच होतें. तें जीर्ण स्थितीस आल्यानें त्याचा जीर्णोद्धार कुंडई ग्रामसंस्थेकडून चाळीसएक वर्षांपूर्वीं झाला. या नवीन देवालयाची रचना टुमदार व सुंदर आहे.

या देवालयाचें उत्पन्न ठीक असून त्या मानानेंच खर्चहि आहे.

श्रीनवदुर्गेची मूर्ति मोहक असून चेहरा प्रसन्न आहे. मुख्य देवतेशिवाय श्रीमहादेव (देवालयाजवळच उंवचव्यावर), श्रीगणपति (देवळांत उजवीकडे), श्री आदि नारायण (जवळच्याच देवळांत) व श्री ग्रामपुरुष (आदिनारायणाजवळच) अशीं आनुषंगिक दैवतें आहेत.

मूळचीं कुंडईचीं पण या देवस्थानच्या आनुषंगिक दैवतांत समाविष्ट झालेलीं दैवतें पुढीलप्रमाणें आहेतः—

श्रीवेताळ — ही देवळी गुरवसाय वाडींत असून जवळ भावका (भाविका) देवी, राटाखुद्री व कानडी पुरुष आहे.

श्रीरवळनाथ— वरील देवळीपासून जरा अंतरावर हें स्थान आहे. रवळनाथाच्या उजवीकडे भूतनाथ, उत्तर बाजूस श्रीसांतेरी व जवळच लक्ष्मी आहे.

श्रीमल्लिकार्जून — हें देऊळ बाजारांत असून, जवळच क्षेत्रपाल आहे.

श्रीनारायण — हें देऊळहि सदर देवळाजवळच आहे.

सिंवी पुरुष — सदर देवळांजवळ देवळींत आहे.

दर शुद्ध व वद्य अशा दोन्हीं नवमीच्या रात्रीं श्रीनवदुर्गेचा पालखी उत्सव असतो.

चैत्र शुद्ध नवमी, स्मारकोत्सव (वैशाख शु. १० मी) नवरात्र, दसरा, काला, (श्रीनारायण देवळांत), जत्रा (मार्गशीर्ष शु. ९ मी ते १४शी), शिमगा असे या देवस्थानांत निरनिराळे उत्सव होत असतात. चैत्र शु. ९मी च्या उत्सवास १९१६पासून श्री. दुर्गाबाई बाळकृष्ण कुंडईकर यांनीं रामजन्मोत्सवाची जोड दिली आहे. त्याचप्रमाणें स्मारकोत्सवास वसंतपूजेचीहि त्यांकडून जोड मिळाली आहे. काल्याच्या दिवशीं कार्तिक वद्य एकादशीस श्रीनारायण देवळांत माशेलांतील श्रीदेवकीकृष्णाची उत्सवमूर्ति आणून तिचें पूजन झाल्यावर रात्रीं काला होतो. मार्गशीर्षांत जत्रा महोत्सव तर विशेष महत्वाचा असतो. या देवस्थानचे बहुतेक उत्सव देवस्थानच्या खर्चानें व कित्येक महाजनांकडूनहि होत असतात.

पूर्वकालीं जत्रा उत्सव कार्तिक वद्यांत होई व त्रयोदशीच्या पहांटेस रहाट फिरविण्याचा रोमांचकारी कार्यक्रम असे. साडेतेरा हात उंचीचा एक मोठा लांकडी खांब जमिनींत घट्ट पुरून त्यावर एक चक्राकार राहाट बसवीत. त्या राहाटाला, कमरेच्या चामडींत गळासारखे दोन आंकडे अडकलेल्या चार तरुणांनां बळकट दोरांच्या सहाय्यानें उपडे लोंबवीत आणि रहाट वेगानें फिरवून ठराविक फेऱ्यांनंतर त्यांना उतरून घेत.

पूर्वी एकदां राहाट फिरवितांनां चामडी तुटून एक तरुण जोरानें जमिनीवर आपटला व मेला. त्याचें स्मारक म्हणजेच गुरवसायर्चे 'राटाखुद्री' शिलाखंड होय असें सांगतात. आधुनिक दृष्टीनें ही प्रथा अव्यवहार्य व घातकहि असल्याचें लक्षांत आणून श्रीमंत शिवराम शेणवीं कुंडईकर व इतर सूज्ञ गांवकरी यांनीं ती थोड्याच वर्षांपूर्वी बंद पाडली.

गार्ग्य, कौंडिण्य व कौशिक अशा गोत्रांचे या देवस्थानचे महाजन असून त्यांचे सहा गट आहेत.

१— कामत आकसणकर (गार्ग्य गोत्री).
२ — शेणवीं मावजेकर (कौंडिण्य).
३ — कामत गरदेकर (गार्ग्य).
४ — कामत आंबोळकर (गार्ग्य).
५ — कामत दाभोळकर (गार्ग्य).
६ — सिंसाणी कुंडईकर (कौशिक).

हणजूण व म्हापशें येथील गार्ग्य गोत्री कामत या देवीचे महाजन असून गोव्याबाहेरहि कांहीं आहेत. या शिवाय कांहीं दैवज्ञ ब्राह्मण, वैश्य, गुरव इ. या देवीचे उपासक आहेत.

श्रीनवदुर्गा देवीचें हें देवालय फोंडें पणजी रस्त्यावरील कुंडईच्या बाजारापासून मैलाच्या अंतरावर आहे.

श्रीलक्ष्मी नारायण (कुंडई)

साष्टीमधील कोलवें गांव वसविलेल्या श्रीमहालक्ष्मीच्या मूळ महाजनांच्या पुढील संततीपैकीं कांहीं इसमांनीं तिसवाडीच्या आदोशी गांवची नवीन वसाहत बनवली. त्यावेळीं त्यांनीं तेथें नवीन ग्रामसंस्था व आपल्या कुलदेवी महालक्ष्मीचें नवीन देवालय स्थापन केलें. त्या ग्रामसंस्थेंत ब्राह्मणाचे तीन गट होते. पैकीं पहिला व तिसरा हे गट ख्रिस्तीकरणप्रसंगीं सबंध ख्रिस्ती झाले व दुसऱ्या गटाच्या 'भांडारी' या उपनांवाच्या महाजनांनीं आपल्या या कुलदेवीची प्रतिमा घेऊन येऊन कुंडई येथें तिची स्थापना केली. कांहीं कालानंतर निघालेल्या

फर्मानाचा फायदा घेऊन त्यांनीं आपला ग्राम-संस्थेचा हक्कहि परत मिळविला.

ख्रिस्तीकरणप्रसंगीं सन १५४० त पाद्रि मिगेल व्हाज यानें आजोशी येथील जीं देवळें मोडलीं त्यांचीं नांवें 'तोंबु द इल्य द गोअ इ दस् तेन्हस् द सालसेति इ बार्देझ' या पुस्तकांतील यादींत डॉ. पां. स. पिसुर्लेकर यांनीं अशीं दिलीं आहेत:— महालक्ष्मी, सप्तनाथ, रवळनाथ, नारायण, सटी, भूमिदेवता, वनदेवता, ग्रामपुरुष, ईश्वर.

सदर यादींतील महालक्ष्मी तीच श्रीलक्ष्मी होय. श्रीलक्ष्मीच्या पंचधातूच्या मूर्तीची नवीन स्थापना करतांनां श्रीनारायणाच्या मूर्तीचीहि जवळच स्थापना केल्यानें या देवालयास 'श्रीलक्ष्मी-नारायण देवालय' असें नांव पडलें आहे. प्रस्तुत देवालय श्रीनवदुर्गा देवालयाच्या अलीकडे रस्त्याच्या खालच्या बाजूनें आहे. जवळच्या दुसऱ्या देवालयांत श्रीरवळनाथाची मूर्ति स्थापन केली आहे.

'भांडारी' उपनांवाचे भारद्वाजगोत्री गौड सारस्वत ब्राह्मण या देवालयाचे महाजन असून त्यांची वसती गोमंतकांत कुंभारजुवें, बांदिवडें, कवळें, थोरलें गोवें व पणजी येथें आहे. गोव्याबाहेरहि कित्येक ठिकाणीं देवस्थानचे महाजन आहेत. किनरे उपनांवाचें एक मुंबईचें कौंडिण्यगोत्री घराणेंहि या देवतेस आपली कुलदेवता मानतें.

प्रत्येक अष्टमीस येथें पालखी उत्सव असतो. वसंतपूजा, सप्ताह, श्रावणशुक्रवार, अनंतव्रत, नवरात्र, दसरा वनभोजन, रथसप्तमी इ. निरनिराळे उत्सव येथें होतात. त्या सर्वांत रथसप्तमीचा उत्सव रथाची मिरवणूक इ. कार्यक्रमामुळें विशेष महत्वाचा असतो.

श्रीविठ्ठल (कुंडई)

दोनशें वर्षांपूर्वीं ही मूर्ति कामत नांवाच्या एका कुंडईच्या गांवकरी व पंढरीच्या वारकरी भक्तानें पंढरपुराहून इकडे आणली. मूर्ति लांकडी पण सुंदर आहे विठ्ठलमंदिर सदर कामत यांच्या वंशजांच्या घराच्या माडीवरच आहे. प्रत्येक एकादशीस या मंदिरांत भजनाचा कार्यक्रम असतो. दरसाल नागपंचमी दिवशीं मंदिरांत २४ तासांचा सप्ताह होत असून त्या दिवशीं तेथील वातावरण भजनानें दुमदुमून जातें. वैशाख शु॥ नवमी ते द्वादशी असे चार दिवस तेथें वसंतपूजेचा सुंदर उत्सव होत असून त्यावेळीं नाटकांचाहि प्रेक्षणीय कार्यक्रम होत असतो. एकादशीदिवशीं फराळाची व्यवस्था चांगली असते. सर्व खर्च कुंडईचे कामत यांच्यांतील वर्गणीनेंच होत असतो.

श्रीमहादेव (भोम)

श्रीमहादेवाचें हें देवालय लहानसेंच असून त्याच्याजवळ दुसरी एक वारूळ वाढलेली देवळी आहे, तें श्रीसांतेरीचें देऊळ असें सांगतात. देवळास उत्पन्न निराळें नाहीं; तथापि त्याचा आवश्यक खर्च तेथील ग्रामसंस्थेंतील वतनांतून होतो. येथें अवघेच उत्सव होतात. त्यांत दशावतारी काल्याचा उत्सव ठळक असतो व तो मार्गशीर्ष महिन्यांत होतो. या देवालयाचे महाजन शेणवीं आमोणकर हे गौड सारस्वत ब्राह्मण आहेत.

श्रीशांतादुर्गा (गोठण)

ही श्रीशांतादुर्गा देवी मूळची सासष्टींतील शंखावलि ऊर्फ सांखवाळ गांवची आहे. सह्याद्रि खंडांतील श्रीमंगेश महात्म्यांत शंखावलीचें सुंदर वर्णन आहे. ख्रिस्तीकरणप्रसंगीं दप्तरांत नमूद झालेल्या सांतेर, ईश्वर, ग्रामपुरुष, विजयादुर्गा, नारायण, भगवती, परमेद, नरसिंह या सांखवाळींतील आठ देवतांपैकीं पहिली सांतेर हीच श्रीशांतादुर्गा होय. तत्कालीन महाजनांनीं तिची प्रतिमा विजापुरकरांच्या अमलाखालील अंत्रूज महालांत आणून 'गोठण' येथें तिची स्थापना केली.

'गोठण' हें 'गोठाण' याचें अपभ्रष्ट रूप आहे. पूर्व कालीं ही गुरांची विश्रांतीची जागा होती व त्यावरूनच त्या जागेस 'गोठाण' हें नांव मिळालें. ज्या वेळीं तेथें प्रतिमा आणली त्यावेळीं गोठाणच्या भोंवतालची जागा तर फारच अव्यवस्थित अशी होती; पण प्रयासानें तिला व्यवस्थित आकार देऊन आपलें कार्य त्यांनीं करून घेतलें.

प्रस्तुत देवालय फोंडें-पणजी या मुख्य रस्त्यापासून पाऊण मैलाच्या अंतरावर असून म्हाडदोळपासून वेलिंगला गेलेला रस्ता सरळ या देवळाकडे गेलेला आहे. देवालय लहानसेंच पण सुंदर आहे.

गर्भागारांत श्रीशांतादुर्गा दैवत वारूळरूपी असून पुढें देवीची पंचधातूंची महिषासूरमर्दिनीस्वरूपी अभिषेक मूर्ति व त्याखालीं प्रसाद मूर्ति आहे. हीच प्रसादमूर्ति प्राचीन कालीं सांखवाळीहून आणण्यांत आली होती.

मुख्य देवतेशिवाय या देवालयाच्या पांच आनुषंगिक देवता आहेत. श्रीआद्यशिवींपुरुष (उत्तरेकडे छोट्या देवळांत), श्रीरामपुरुष (पुढच्या बाजूनें छोट्या देवळांत), श्रीग्रामपुरुष (उत्तरेकडे छोट्या देवळांत), श्रीदाड (त्याच देवळांत पश्चिमेकडे), श्रीनारायण (सप्रे यांच्या कुळागरांत), अशीं त्यांचीं नांवें आहेत.

देवालयाच्या दक्षिणोत्तर अग्रशाला असून मागच्या बाजूनें एक विहीर व प्राकाराबाहेर उत्तरेकडे छोटी तळी आहे.

येथील मूळचें देवालय अगदीं साधें व छोटें होतें. तें जीर्णावस्थेस पोंचल्यानें त्या जागीं आजचें नवीन देवालय बांधण्यांत आलें. या जीर्णोध्दाराचा शक १८२१ असून संवत्सर 'विरोधी' आहे.

प्रत्येक पंचमीस येथें पालखीउत्सव असून आठ पेणी असतात.

नागपंचमी, शारदानवरात्र, दसरा, वैकुंठ चतुर्दशी (वनभोजन), काला व माघ शु॥ पंचमीदिवशीं जत्रा उत्सव असतो. नवरात्रांत मकरोत्सव व दसऱ्यास सीमोल्लंघन पालखी असते. वेलिंग येथील ग्रामदेव वेतालेश्वर, श्रीनरसिंह व श्रीशांतादुर्गा या तिन्ही देवतांच्या पालख्या लवाजम्यानिशीं तेथील आपट्याच्या पाराजवळ येतात. मध्यभागीं श्रीशांतादुर्गा, उजव्या बाजूनें नरसिंह व डावीकडे श्रीवेतालेश्वर अशा क्रमानें पालख्या ठेवण्यांत येतात व नंतर इतर कार्यक्रम होतो. काल्यादिवशीं रात्रौ दशावतारी खेळ व दुसऱ्या दिवशीं सकाळीं गोपाळकाला होतो. माघमधील जत्रोत्सव हा विशेष मजेचा असतो. त्या दिवशीं रात्रौ पालखीउत्सवानंतर नाटकप्रयोग होऊन पहांटेस श्रींची रथांतून मिरवणूक निघते व या मिरवणुकीनंतर इतर ठराविक कार्यक्रम होऊन उत्सवसमाप्ति होते.

येथें प्रसाद मूर्तीस लावतात व ते करबंलीच्या पानांच्या तुकड्यांचे असतात.

श्रीशांतादुर्गा देवीच्या महाजनांचे वत्स, काश्यप, भारद्वाज, कौशिक (कंश), अत्रि, कौंडिण्य, वसिष्ठ व शंखपिंगल अशा गोत्रांचे आठ गट आहेत.

१ वत्स — प्रभु देसाई, शेणवीं कडकडे, शेणवीं नाईक, कामत शंखवाळकर, मुर्डेश्वर, पडियार इ.

२ काश्यप — केणी.

३ भारद्वाज — प्रभु हालवेकर, प्रभु चुनेकर, शेणवीं शिर्दोनकर, हळदीपुरकर, पुराणिक इ.

४ कौशिक गोत्री, (५) अत्रि गोत्री, व (६) कौंडिण्य गोत्री महाजन विशेषतः गोव्याबाहेरच आहेत. (७) वसिष्ठ गोत्री गटाच्या महाजनांचीं उपनांवें उपलब्ध नाहींत.

८ शंखपिंगल — नायक शंखवाळकर, वळवटकर, सांखोळकर.

या सर्वांत वळवटकर व सांखोळकर हे स्मार्त सांप्रदायी असून इतर सर्व वैष्णव सांप्रदायी आहेत.

श्रीशांतादुर्गा (कुंकळ्यें)

मंगेशीं येथून कुंकळ्यें गांव जवळ आहे. फोपळींच्या बागांमुळें या गांवांस बरीच रम्यता आली आहे. श्रीशांतादुर्गा ही कुंकळ्यें गांवची ग्रामदेवी आहे. देवालयांत अग्रभागीं वारूळ असून जवळच पंचधातूची देवीची मूर्ति आहे.

दर चतुर्दशीस श्रीशांतादुर्गा देवीचा पालखी उत्सव असतो. मुख्य उत्सव म्हणजे कार्तिक व॥ चतुर्दशीदिवशीं रात्रौ होणारा दशावतारी काला.

उत्पन्न फार थोडें असल्यानें खर्च विशेषतः वर्गणींतूनच होतो.

शेणवीं कुंकळ्येंकर हेच श्रीशांतादुर्गेचे महाजन आहेत.

श्रीविठ्ठल (कुंकळ्यें)

श्रीगोकर्ण - पर्तगाळ संस्थानचा अंत्रूज महालांतील मठ कुंकळ्यें येथें असून त्याच मठांत स्थापन झालेली ही विठ्ठलमूर्ति आहे. उत्पन्न खर्च भागण्याइतकें असून पूजा, अर्चा इ. सर्व देवकृत्यें व इतर ठराविक उत्सव त्याच उत्पन्नांतून होतात. मूर्ति प्रेक्षणीय आहे.

श्रीशांतादुर्गा (खंडेपार)

खंडेपार येथें मोटर रस्त्यापासून साधारण पंधराएक मिनिटांच्या अंतरावर फोपळीच्या बागांजवळ हें लहानसें देऊळ आहे. देवळाजवळचें दृश्य रमणीय आहे. ही श्रीशांतादुर्गा म्हणजे खंडेपारची ग्रामदेवी आहे. येथें निरनिराळे जे कांहीं उत्सव होतात त्यांत मार्गशिर्ष वद्य चतुर्दशीदिवशीं होणारा उत्सव मुख्य असतो. तिलाच जत्रा म्हणतात. जत्रेंत पालखीसोबत 'दिवजें' धरण्याची पद्धत आहे. या उत्सवांत नाटकांचाहि कार्यक्रम असतो अर्थात् फेरीहि भरत असते. शेणवीं खंडेपारकर या देवीचे महाजन आहेत.

याशिवाय खंडेपार येथें श्रीगणनाथ, श्रीकेशव व श्रीदत्तात्रेय यांचींहि लहानशीं निरनिराळीं देवळें आहेत.

श्रीदत्तात्रेय (खंडेपार)

या देवळांत दर गुरुवारीं भजनाचा सुंदर कार्यक्रम असतो. दरसाल गोकुळ अष्टमीदिवशीं

सकाळीं ८ ते १२ पर्यंत छानदार उत्सव असतो. भाविक लोक या उत्सवादिवशीं येथें बरेच जमतात.

श्रीगणनाथ (खंडेपार)

हें सिमेंटचें छोटें देवालय पुलाजवळच आहे. या देवळांत शिवरात्रीचा उत्सव ठीक होतो. नाटकें इ. प्रेक्षणीय कार्यक्रमहि असतो. त्यामुळें मंडळीहि बरीच जमते.

श्रीविजयादुर्गा (केरी)

ज्या केरी गांवांत श्रीविजयादुर्गेचें देऊळ आहे तें गांव म्हाडदोळ येथून जवळ असून श्रीम्हासाळदेवस्थानासमोरून तेथें रस्ता गेलेला आहे. अंत्रूज महालांतील या केरी गांवच्या वैजारी वाडींत हें देऊळ आहे.

लोकांनां भयंकर रीतीनें जाचणाऱ्या ' कालांतक ' नांवाच्या राक्षसाचा निःपात करून विजयी होऊन आल्यावर श्रीदुर्गादेवीला ऋषिवर्गाकडून ' विजयादुर्गा ' असें नांव प्राचीन कालीं प्राप्त झालें, अशी पौराणिक माहिती मिळते.

श्रीविजयादुर्गेची मूर्ति पाषाणी असून ध्यान महिषासुरमर्दिनीचें आहे. या देवीची मूळ स्थापना सांकवाळ येथें करण्यांत आली होती. पुढें ख्रिस्तीकरणाच्या वेळीं तेथील देवतांचें स्थलांतर अंत्रूज महालांत झालें. त्यावेळी श्रीविजयादुर्गेची मूर्ति कांहीं महाजनांनीं कवळें गांवच्या आगापूर वाडींत श्रीमाधवदेवालयापुढील तळींत आणून ठेवली व स्थापनेसाठीं ते जागा शोधूं लागले. सुदैवानें केरी गाव त्यांच्या पसंतीस आलें व पुढें तेथें त्यांनीं ती मूर्ति स्थापन केली. या वेळीं त्यांनां कवळें येथील ग्रामस्थांनीं व केरीच्या ग्रामसंस्थेनें बरीच मदत दिली. देवतेच्या स्थापनेच्या वेळीं अनुष्ठानादि कार्यास ज्या पद्ये व कऱ्हाडे ब्राह्मणांकडून सहाय्य झालें त्यांनांहि त्या वेळच्या महाजनांनीं प्रेमपूर्वक आपल्या जमातींत घेऊन महाजनकीचे हक्क दिले.

देवालयांत गर्भागारांत उच्चासनावर श्रीविजयादुर्गेची पाषाणी सुंदर मूर्ति अधिष्ठित असून सभामंडपापुढें श्रीक्षेत्रपाल आहे. यालाच दंडपाणी किंवा 'वाघ्रा' असेंहि म्हणतात. वाघाचा उपद्रव होऊं नये म्हणून कित्येक भाविक त्याला नारळ ठेवतात.

प्रत्येक दशमीदिवशीं रात्रौ या देवळांत देवीचा पालखी उत्सव असतो. दशमी रात्रभागीं मिळणारीच स्वीकारतात.

श्रावणमासांत जाईची पूजा व संतर्पण, आश्विनांत नवरात्रोत्सव, दसरा, कोजागरी, लक्ष्मीपूजन, मार्गशिर्ष १ दा ते १० मी मकरोत्सव, मार्गशिर्ष शु॥ १० मी जत्रोत्सव, वनभोजन, माघांत महाशिवरात्र व फाल्गुनांत शिमगा असे निरनिराळे उत्सव या देवालयांत होत आहेत. या सगळ्यांत जत्रोत्सव विशेष चांगला असतो. जत्रोत्सवांत मार्गशिर्ष शु॥ १० मी दिवशीं रात्रीच्या नऊनंतर देवालयाजवळच्या तलावांत देवीचा नौकाविहार उत्सव असतो. नंतर जागर व दशावतारी काला सुरू होतो. दुसऱ्या दिवशीं गवळणकाल्याचा कार्यक्रम असतो.

माघ व॥ ११ शीपासून सुरू होणाऱ्या महाशिवरात्रीच्या ४ दिवसांच्या उत्सवांत दररोज स्वारीवादन व नंतर नाट्यप्रयोग होतात. महाशिवरात्रीच्या पहाटेस नाटक संपतांच रथोत्सवाचा कार्यक्रम असतो. या उत्सवास येथें बरीच मंडळी जमते.

या देवळांत देवीपाशीं प्रसाद घेतांनां श्रीच्या आसनास ते लावण्यांत येतात व ते पटकुळीच्या फुलांचे असतात.

श्री आर्यादुर्गेचे मूळ महाजन गोठण येथील श्रीशांतादुर्गा व बेलिंग येथील श्रीनृसिंह या देवांचे महाजन असून नंतर कवळें, केरी, खंडेपार इ. कडील काश्यप, कौशिक व भारद्वाज गोत्रांचे पद्ये व कऱ्हाडे ब्राह्मणांचाहि त्यांत समावेश झालेला आहे. सांवतवाडी, पुणें, मुंबई, कर्नाटक या भागांतहि या देवीचे महाजन आहेत. सदर कऱ्हाडे व पद्ये ब्राह्मणांत पुढील लोकांचा समावेश होतो :— वैद्य पानवेलकर, गांवकर देसाई, जाण, गांवकर, मणेरीकर (सांखळी), किर्लोस्कर, घोपेश्वरकर, मुंडले, लौकर्ये इ. सुप्रसिद्ध कारखानदार कै. लक्ष्मणराव किर्लोस्कर याच देवीच्या महाजनवर्गापैकीं होत.

केरी येथील वैद्य पानवेलकर घराण्याकडून या देवालयास बरेंच सहाय्य झालेलें आहे.

श्रीविजयादुर्गा देवीचें सुंदर देवालय आज ज्या ठिकाणीं आहे तें निसर्गरम्य स्थळ जवळपासच्या फोपळीच्या बागांमुळें व विस्तीर्ण शेतीमुळें पहाणाऱ्याला फारच आल्हादकारक वाटतें. अशा या नयनमनोहर ठिकाणीं श्रीविजयादुर्गा देवीचें देवालय पूर्वाभिमुख असून त्याच्यापुढें सभामंडप व सुंदर दीपस्तंभ आणि उजव्या बाजूस प्रशस्त अग्रशाला आहे.

या देवालयास जमिनी वगैरेचें उत्पन्न मर्यादितच असल्यानें उत्पन्नापेक्षां खर्चच विशेष होत असतो व तो आवश्यक असल्यानें महाजन वर्गातून वर्गणीच्या रूपानें तुटीची भरपाई करण्यांत येते.

संकटप्रसंगीं अत्यंत भावनेनें श्रीविजयादुर्गेची करुणा भाकल्यास तिच्या भक्तांनां संकटप्रसंगावर विजय मिळवितां येतो अशी तिच्या भक्तांची भावना आहे.

श्रीविठ्ठल (फोंडें)

फोंडें येथील जुन्या वसाहतीच्या भागांत हें देवालय पूर्वाभिमुख आहे. देऊळ छोटें, पण सुंदर आहे. दोनशें वर्षांपूर्वीं श्रीविठ्ठलाच्या फोंडें येथील एका वारकरी भक्तानें विठोबाची ही कृष्णपाषाणी सुंदर मूर्ति पंढपुराहून इथें आणली. या मूर्तीजवळच गाभाऱ्यांत शिवलिंगहि आहे.

येथें आषाढी व कार्तिकीच्या शु॥ १० मी व ११ शीस थाटाचा पालखीउत्सव होत असून आषाढ शु॥ १२ स गोपाळकाला व कार्तिक शु॥ १२ स दशावतारी काला होतो. मुख्य उत्सव शिमग्याचा. हा फाल्गुन व॥ ११ शी पासून पांच दिवस होतो. नित्य खारीवादन व ४ नाटकें होतात. हा उत्सव बराच प्राचीन असून त्यांतील वीरभद्राचा प्रवेश महत्वाचा मानला जातो. शिमगा श्रीमंत सौंदेकर यांच्या राजवटीच्या सुरवातीचा असावा. तो पूर्व काली खोतांतर्फे अन्य ठिकाणीं होई. हे खोत कोण हें आज कळत नाहीं.

भूमिपुरुष व कालभैरव अशीं या देवस्थानचीं अनुषंगिक दोन छोटीं देवळें आहेत.

कापडी, कैसरे, शिंक्रे, तळवडकर, सूर्यराव देसाई हे सारस्वत, नागवेकर, अंकलेकर हे दैवज्ञ आणि काणेकर, सराफ, वेरेंकर, कुडतरकर, सिरसाट, कोलवेंकर, शेटये, पारकर, पारोडकर, तिळवे, गुडेकर इ. वैश्य या देवाचे महाजन आहेत.

श्रीमारुती (फोंडें)

फोंडें-पणजी रस्त्याला लागूनच आल्मैद विद्यालयाच्या मागच्या बाजूनें थोड्याच अंतरावर हें मारुती मंदिर हल्लीच बांधण्यांत आलें आहे. मूर्तीचें ध्यान वीरमारुतीचें दिसतें. येथें चैत्रपौर्णिमेचा हनुमंत जयंति-उत्सव चांगला होतो.

श्रीनरसिंह

श्रीविष्णूच्या दशावतारांपैकीं चवथा अवतार जो श्रीनरसिंह तेंच हें दैवत आहे. प्राचीन कालीं सासष्टींतील शंखावली किंवा आजची सांकवाळ या गांवीं याची स्थापना झालेली होती. वसाहतकालीं ज्या देवता सासष्टीत ठिकठिकाणीं स्थापन करण्यांत आल्या त्यांच्या नंतर श्रीनरसिंहाची स्थापना सांकवाळ येथें झाली होती.

वसाहतकालानंतर बऱ्याच वर्षांनीं नायक या उपनांवाचा एक सारस्वत ब्राह्मण एकदां सांकवाळ येथें आला. तो श्रीनरसिंहाचा एकनिष्ठ उपासक होता. त्याच्या खासगी देव्हाऱ्यांत सोन्याची श्रीनृसिंह मूर्ति व नृसिंह शालिग्रामहि होता. त्यांची पूजा, अर्चा व नैवेद्य यथासांग झाल्यावांचून तो अन्नग्रहण करीत नसे. सांकवाळकर व कुडथाळकर यांच्यांतील गांवच्या हद्दीचा वाद यानेंच मिटविला. त्यांत सांकवाळकरांना जास्त जमीन कपटमिषानें दिल्याचा संशय येऊन कुडथाळकरांतील कांहीं तरुणांनीं एके दिवशी नायकाचा देव्हारा गुपचुप पाण्यांत फेंकून दिला व त्यामुळें दोन दिवस त्यांनां अन्नपाण्यावांचून रहावें लागलें. तिसऱ्या रात्रीं स्वप्नांत त्यांनां दृष्टांत झाला कीं "देव्हारा तळीत आहे". लगेच सकाळीं शोध चालविला व दृष्टांताप्रमाणें देव्हारा मिळतांच त्याला फार आनंद झाला. त्यानें सांकवाळकरांच्या सहाय्यानें तो वर काढला आणि यथासांग पूजा, नैवेद्य इ. होऊन तीर्थप्रसाद ग्रहण केला.

यानंतर लगेच सांकवाळकरांनीं नायक याला आपला जांवई करून आपल्या जमातींत घेतलें आणि त्याच्या श्रीनरसिंह देवाचें देवालय बांधून आपल्या कुलदैवताप्रमाणें ते त्याला मानूं लागले. हळुहळू पुढें श्रीनरसिंहाची प्रसिद्धी होत गेली. हा श्रीनरसिंहभक्त नायक कर्नाटकांतून गोमंतकांत आला असें कै वि. रं. शेळडेकर आपल्या पुस्तकांत लिहितात; पण कांहीं लोकांचें मत तो गोव्याच्याच कुठल्या तरी भागांतील असावा असें आहे.

क्रिस्तीकरणप्रसंगीं सांकवाळमधून श्रीसांतेर, ईश्वर, ग्रामपुरुष, विजयदुर्गा, नारायण, भगवती, परममेद व नरसिंह या देवांचें स्थलांतर झाल्याचा Tombo मध्यें उल्लेख मिळतो. त्यांतील श्रीनरसिंह तो हाच. याची पुनर्स्थापना त्या वेळीं वेलींग येथें करण्यांत आली.

वेलींग हें गांव म्हाडदोळ येथून मुख्य रस्त्यापासून पाऊण मैलाच्या अंतरावर असून तेथें डोंगराच्या पायथ्याशीं निसर्गरम्य क्षेत्रांत आजचें श्रीनरसिंह देवस्थान आहे. देवालय सुंदर व पूर्वाभिमुख असून त्याच्या पुढें सभामंडप व नंतर प्राकाराचा दरवाजा आहे. प्राकारबाहेर स्वच्छ पाण्याची सुंदर तळी आहे. तळींत उंचावरुन सतत पडणारा पाण्याचा प्रवाह मजेदार आहे. दक्षिण बाजूंस परिवार दैवतांचीं स्थानें असून उत्तरेकडे प्रशस्त अग्रशाळा आणि पूर्व बाजूला मारुती व भक्त प्रल्हादाची मूर्ति आहे. उत्तरेकडील लिंगाकृति प्रतिक सांकवाळींतील ईश्वराचें आहे.

गर्भागारांत उच्चासनीं श्रीनरसिंहाची मूर्ति असून आसनाखालींहि श्रीची मूर्ति आहे. हिच्या मागें लिंगाकृति प्रतिक असून तें स्तंभाचें असें सांगतात. दक्षिण बाजूस छोट्या देवळींत श्रीसाधनरसिंहाची प्रतिमा असून ती शंखवाळकरांच्या मूळ पुरुषाची होय.

दरमहा शुक्लपक्षांतील चतुर्दशीस प्रदोषकालीं

श्रीनरसिंहाची खास पूजा व रात्रीं पालखीउत्सव होतो. मिरवणुकींत नऊ पेणी असतात.

वार्षिक उत्सवः- - संवत्सर प्रतिपदा, रामनवमी, वसंतपूजा (चैत्र शु. ९मी), अक्षय तृतिया (वसंतपूजा, लालकी इ.) वैशाख शु. १४शी व. २या पर्यंत वसंतपूजा, शिबिकोत्सव, सुखासन, नाटकें इ.कार्यक्रम. श्रावणांत दर सोमवारी पूजा, १४शीस रंगपूजा व पालखी. अनंतव्रत, नवरात्र (मकरोत्सव), दसरा, काला-नौकाविहार व रथ (कार्तिक १५मा), दत्त जयंति इ. येथील बहुतेक सर्व उत्सवांनां संतर्पणाची जोड असते. बहुतेक संतर्पणांनां 'देवकारें' (देवकार्य) असें म्हणण्यांत येतें. येथें 'चंवरीचें देवकारें' हें संतर्पण करतात त्या वेळीं चौकावर खंडी तांदळांच्या भाताची रास वाढून त्यांत वरण, आमटी, भाज्या, पक्वान्नें हे पदार्थ निरनिराळे वाढतात. नंतर तें अन्न १०८ वळ्यांनीं झांकतात व नारळास छिद्र पाडून त्यांतील पाणी टाकून देऊन तूप भरतात व कापसाची मोठी वात त्यांत घालून ती पेटवून तो दीप त्या अन्नाच्या राशीवर मध्यभागीं ठेवतात. सर्व उत्सवांत वैशाख शु. १४ शी ते व. २या पर्यंतचा उत्सव विशेष बहारीचा होतो.

उत्पन्न व खर्च यांचा आंकडा जवळजवळच असून विशेष उत्पन्न व्याजाचें आहे.

या देवस्थानांत करंबलीच्या पानांचा प्रसाद लावण्याची येथें पद्धत आहे.

दरमहा शु॥ १४ शीस येथें पालखी असते.

नायक शंखवाळकर, नायक दलाल, भांडारी, सांकोळकर, शेणवीं वळवटकर इ. (कुत्स गोत्री) या देवस्थानचे महाजन असून गोठणच्या श्री शांतादुर्गेचे सप्तगोत्री महाजन याचे पालवी-महाजन लागतात.

या देवस्थानच्या मुख्य महाजनांची संख्या जरी अल्प असली, तरी त्यांतील बहुतेक महाजन संपन्न असून त्यांकडून देवस्थानच्या कार्यांत विशेष सहाय्य होत असतें.

श्रीवेताळेश्वर (वेलींग)

श्रीनरसिंह देवालयाच्या जवळच हें श्री वेताळेश्वर नांवाच्या शिवलिंगाचें स्थान आहे. देऊळ लहानसेंच, पण व्यवस्थित आहे. वेलिंगचा हा ग्रामदेव; अर्थांत श्री नरसिंह, श्री शांतादुर्गा यांच्या पूर्वींचें हें देवालय आहे. येथें निरनिराळे उत्सव होतात. त्या सर्वांत शिमग्याचा उत्सव नाटकें इ. मुळें मजेचा असतो. देवालयाचें वार्षिक उत्पन्न अगदीं बेताचें असून तितकाच खर्चहि आहे. वेलिंगकर सारस्वत व वैश्य या देवाचे महाजन आहेत.

श्री बेताळ (प्रियोळ)

प्रियोळ गांवचा हा ग्रामदेव. श्रीमंगेश, श्रीम्हाळसा या देवता प्रियोळ गांवांत येण्यापूर्वीं हेंच एक देवस्थान त्या गांवांत होतें. बेताळाची मूर्ति लांकडी असून ती पांच हात उंचीची आहे. स्वरूप उग्र दिसतें.

श्रीनागेश, श्रीकेशव, श्रीसांतेर, श्रीगणपति अशा या देवाच्या परिवार देवता आहेत. प्राचीन कालीं श्रीकेशव हीच येथील मुख्य देवता होती. पण पुढें बेताळाचें प्रस्थ विशेष वाढत जाऊन तोच प्रसिद्धीस आला. श्रीकेशवाची मूर्ति कृष्ण पाषाणी असून सुंदर आहे. कार्तिक शु. १०

मी दिवशीं श्रीकेशवाचा पालखी उत्सव असून मार्गशिर्ष महिन्यांत काला व गवळग काला होतो. श्रीकेशवाचें देऊळ जवळच आहे.

दरसाल श्रावणांत प्रतिसोमवारीं श्रीनागेशाची पालखी असते. हें देऊळ लहानसेंच असून जवळच आहे नागेश हें महादेवाचें दैवत अर्थात् शिवलिंग आहे. परिवार देवतांतील श्रीसांतेरीची मूर्ति पंचधातूची आहे. या देवीचा काला रथ सप्तमीदिवशीं होतो. रात्रीं पालखी उत्सवानंतर काल्यास सुरवात होते.

या परिवार देवतांतील श्रीगणपतीची मूर्ति मात्र जरा दूर म्हणजे मंगेशीं येथें मुख्य रस्त्यावरून देवस्थानांत जाण्याच्या वाटेवरच आहे.

या देवस्थानच्या महाजनांचे देसाई, गांवकर, प्रियोळकर असे तीन गट आहेत. पहिल्या दोन गटांचे महाजन पद्ये ब्राह्मण असून तिसऱ्या गटाचे सारस्वत ब्राह्मण आहेत.

म्हाडदोळपासून हें स्थान जवळच आहे.

श्रीकपिलेश्वर (कपिलेश्वरीं)

हें श्री महादेवाचें लिंग असून त्याला पूर्वकालीं 'श्रीकमलेश्वर' अशी संज्ञा असल्याचें कळतें. प्राचीनकालीं कपिल नांवाच्या राजानें याची स्थापना केल्यामुळें त्या वेळपासून त्याला 'कपिलेश्वर' असें नांव पडलें. लिंग पूर्वी एका तलावांत मध्यभागीं दगडी छोट्या देवळींत असून नेहमीं तें कमलपुष्पांनीं आच्छादित होई. तो तलाव नादुरुस्त होऊन आटत चालल्यानें व कपिल राजाला एका महापर्वाच्या वेळीं ईश्वराचें आलय बांधून ब्राह्मणास दान देण्याची इच्छा असल्यानें त्यानें त्याची योग्य जागीं पुनर्स्थापना केली व देवालय बांधून ब्राह्मणांनां दान दिलें आणि अशा रीतीनें हें कपिलेश्वर देवस्थान उदयाला आलें.

'कपिल ग्राम' असें ज्या गांवाला पूर्वकालीं नांव होतें तोच आजचा कवळें गांव होय. कपिलेश्वर हा या गांवचा ग्रामदेव आहे. आजला श्रीकपिलेश्वर देवस्थान असलेल्या भागालाच 'कपिलेश्वरीं' असें ह्मणतात.

आजचें श्रीकपिलेश्वराचें देवालय लहानसेंच पण व्यवस्थित असून प्राकार विस्तीर्ण आहे. डाव्या बाजूला अग्रशाला व प्राकारासमोर पुढील बाजूनें तळी आहे. उजवीकडील नारळी पोफळीच्या बागांमुळें वातावरण रम्य दिसतें.

देवस्थानांत निरनिराळे उत्सव होतात त्या सर्वांत मुख्य म्हणजे जत्रोत्सव कार्तिक वद्य १४ शी पासून मार्गशिर्ष शु. ३ ये पर्यंत असतो. जत्रेचा मुख्य दिवस अमावास्या. याच दिवशीं रथोत्सव असतो. जत्रोत्सवांत नाटकें, दिवजें इ. कार्यक्रम असतो. धवळकर, बखले, कुमारदेरकर, चिखले वगैरे पद्ये ब्राह्मण व कवळेकर हे सारस्वत ब्राह्मण येथील महाजन आहेत.

उत्पन्नापेक्षां खर्च कमी असल्यानें देवस्थानच्या तिजोरींत शिल्लक ठीक आहे. देवस्थानच्या सुधारणेसहि पुष्कळ वाव आहे.

हें देवस्थान फोंडें-दुर्भाट रस्त्याच्या अगदीं जवळ ह्मणजे रस्त्याला लागूनच आहे.

श्रीवेताळ (कवळें)

हा वेताळ मूळचा सासष्टींतील बेताळभाटी येथील आहे. ख्रिस्तीकरण प्रसंगीं त्याच्या उपास-

कांनीं त्याला कवळें येथें आणून श्रीकपिलेश्वराच्या महाजनांच्या संमतीनें त्याच्याच परिवार देवतांत त्याला स्थान दिलें. या देवळांत दसऱ्या दिवशीं ठीक उत्सव असतो. श्रीवेताळाच्या देवळाच्या दारांतच प्राणीहत्या करण्यांत येते !

श्रीमाधव (आगापूर)

श्री माधवाचें देवालय नदी किनाऱ्याजवळील आगापूर येथें आहे. श्री माधव देवाची मूळ स्थापना प्राचीन कालीं रासय येथें करण्यांत आली होती. ख्रिस्तीकरणप्रसंगीं रासई येथून त्रिविक्रम, नारायण, ईश्वर, अशा तीन देवांचें स्थलांतर झाल्याचा उल्लेख मिळतो. त्यांतील त्रिविक्रम हाच श्रीमाधव देव होय. आगापूरला मुख्य देव श्रीमाधव हा असून जवळच नारायण व रामेश्वर (ईश्वर) आहे. देवालय लहानसेंच, पण सुंदर आहे. नजीकच स्वच्छ पाण्याची तळीहि आहे.

दरसाल कार्तिक शु. १० मी दिवशीं रात्रीं श्रीमाधव देवाचा सांगड व काला होतो. हाच तेथील मुख्य उत्सव होय.

या देवस्थानचा समावेशहि श्रीकपिलेश्वराच्या परिवार देवतांत होतो.

श्रीगणपति (कवळें)

अगदीं अलीकडेच श्रीगणेश चतुर्थीच्या उत्सवांतून या देवालयाचा उदय झाला आहे. देऊळ लहानसेंच आहे. फळावळ पावणी व वर्गणी यांतील पैशांतूनच देवळाचा खर्च होतो. दरसाल गणेशचतुर्थीस पूजन करण्यांत येणारी गजाननाची मूर्ति येथें वर्षभर राहाते. प्रत्येक चतुर्थीस भजन व गणेशचतुर्थीच्या दिवसांत मुख्य उत्सव होतो. देऊळ दोन खांबांजवळ आहे.

श्रीकल्याण मारुती (कवळें)

कुठच्याहि भागांतून जनतेचें लक्ष सहज वेधून घेणारीं डोंगर-शिखरावरचीं ख्रिस्ती प्रार्थना मंदिरें गोव्यांत इतस्ततः दिसतात, अगदीं तशीच जागा श्रीकल्याण-मारुतीनें आपल्या भक्ताच्या अंतःकरणांत प्रेरणा करून आपणासाठीं निवडली आहे; किंबहुना ती त्यांच्यापेक्षांहि उंच, प्रशस्त रम्य आहे. मारुतीभक्त वे. स. वा. पेंडसे यांनी अत्यंत भक्तिभावानें चैत्र शु. १ दा शके १८५९ रोजीं डोंगरमाथ्यावर श्रीमारुतीदेवतेची स्थापना करून त्याला 'मारुतीगड', असें नांव दिलें. दर शनिवारीं संध्याकाळीं ३ ते ७ या मारुतीगडावर पूजा, पुराण, कीर्तन, भजन, आरती, इ. कार्यक्रम होतो. दरसाल हनुमंतजयंतीस पूजा, पुराण कीर्तन, भजन, आरती, फराळ अशी व्यवस्था असते. लोकजमावहि बराच होतो.

सदर डोंगराच्या पायथ्याशीं ज्येष्ठ शु. ५ मी शके १८७७ रोजीं वे. पेंडसे यांनीं औंध येथून मुद्दाम करवून आणलेल्या कृष्णपाषाणी कल्याणमारुतीच्या मूर्तीची आनंदाश्रमांत स्थापना केली आहे. या आनंश्रमाची रचना मोहक, प्रशस्त व व्यवस्थित असून स्वरूप प्राचीन कालीन ऋषींच्या आश्रमासारखें आहे. वातावरण शांत व प्रसन्न आहे. देवमंदिरांत अभिषेकादि कृत्यें, भजन, प्रार्थना इ. कार्यक्रम असतो. प्राचीन विद्याश्रमांप्रमाणें विद्यार्थ्यांच्या राहाण्याचीहि आश्रमांत सोय आहे.

श्रीवामनेश्वर (धवळी)

प्राचीन कालीं हें देवालय लोटली येथें श्रीरामनाथ देवालयाच्या जवळच होतें. श्रीरामनाथ पंचायतनाच्या स्थापनेनंतर बऱ्याच कालानें या देवतेची स्थापना झाली. त्याबद्दल पुढील माहिती प्रसिद्ध आहे —

श्रीरामनाथ देवाच्या महाजनांपैकीं शंभुशर्मा नांवाचा एक कौंडिण्यगोत्री महाजन श्रीकाशीक्षेत्रांत गेल्या वेळीं त्याला गंगानदींत स्नान करतांनां एक लहानसें लिंग सांपडलें. परत घरीं येतांनां त्यानें तें इकडे आणून लोटली येथें स्थापन केलें. लिंग महादेवाचेंच; पण तें लहानसेंच असल्यानें शंभुशर्मा यानें त्याला 'श्रीवामनेश्वर' असें नांव दिलें. याच नांवाचें पुढें 'वामनियों' असें प्रचारांत रूपांतर झालें.

ख्रिस्तीकरणप्रसंगीं लोटलींतील जीं देवळें मोडण्यांत आलीं व ज्यांची माहिती Tombo मध्यें आढळते त्यांत श्रीवामनेश्वराचें नांव 'वामनदेव' असें आहे. त्यावेळीं या वामनदेवाचें लिंग शंभुशर्म्याच्या वंशजांनीं तत्कालीन विजापुरकरांच्या अंमलांतील अंत्रूज महालांत आणून कवळें गांवकऱ्यांच्या प्रोत्साहनानें त्या गांवच्या धवळी वाडींत स्थापन केलें.

धवळी ही वाडी एका बाजूला व खेडवळ असली तरी नारळी, फोपळीच्या बागांमुळें रम्य अशी असल्यानें तेथील वातावरण शांत व प्रसन्न असें वाटतें. फोंडें-दुर्भाट रस्त्यापासून कपिलेश्वरी येथून जो रस्ता धवळीकडे गेला आहे तो याच देवळापर्यंत आहे.

देऊळ लहानसेंच, पण व्यवस्थित असून देवाच्या डाव्या बाजूस अग्रशाला आहे. हल्लींच्या कालांत सुटसुटीतपण अगदीं थोड्यांत आटोपण्याचे लग्नविधि येथें बरेच होतात.

गर्भागारांत श्रीवामनेश्वराचें लिंग असून गर्भखोलीच्या बाहेर उजवीकडे भिंतीच्या कोनाड्यांत देवालयाचा मूळ संस्थापक पुरुष शंभुशर्मा याचें प्रतिक आहे.

देवस्थानचें उत्पन्न अगदींच मर्यादित असलें तरी महाजनवर्ग आपसांत वर्गणी जमवून येथील खर्च व्यवस्थित भागवतात.

या देवालयांत चैत्र व. ४ थीं व ५ मी शिबिकोत्सव, वैशाखांत सोमवारीं वसंतपूजा, श्रावणांतील दर सोमवारीं पूजा, भाद्रपद शु. १२ शी रोजीं वामनद्वादशी, मार्गशिर्ष शु. १२ शी रोजीं रात्रौ काला व दुसऱ्या दिवशीं गवळण काला असे उत्सव होतात. हा शेवटचा उत्सव तेथील मुख्य उत्सव अर्थात् जत्राच होय. शिबिकोत्सवास पांच पेणीं होत असून पालखी शक्य तों महाजनवर्गानेंच वहाण्याची पद्धत आहे.

श्रीवामनेश्वरास पटकुळीच्या फुलांचे प्रसाद लावतात व ते देवाच्या पिंडीखालील तांब्याच्या पट्ट्याला लावतात.

सुकेरकर, सांकर, विर्जिनकर, भांगी, जुंवारकर, शेटये, मावजे, बोरकर, बेणे, तळावलीकर, अवदी, खरंगटे, आचार्य, कापडी, घोटिंग इ. कौंडिण्यगोत्री गौड सारस्वत ब्राह्मण या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीगणपति (खंडोळें)

हें देवस्थान फोंडें तालुक्यांतील माशेल जवळच्या खंडोळें गांवांत आहे. देवालय पूर्वाभिमुख असून टुमदार आहे. चौक, मंडप, दक्षिणोत्तर बाजूंच्या अग्रशाला, जवळची पुष्करणी इ. दृश्य सुंदर आहे.

गर्भागारांत अग्रभागीं श्रीगणपतीची कृष्णपाषाणी भव्य मूर्ति असून उजवीकडे श्रीशांतादुर्गा (पंचरसी कलश), जवळच्या भिंतीच्या कपाटांत श्रीलक्ष्मीनारायण, दुसऱ्या कपाटांत श्रीग्रामपुरुष, पूर्वाचारी, श्रीमहालक्ष्मी (श्रीशांतादुर्गा कलशाजवळ), चौकाच्या एका खांबाजवळ श्रीरवळनाथ (भावना) आणि देवमंदिरासमोर प्राकारांत छोट्या देवळींत निराकार अशी व्यवस्था आहे.

तिसवाडींतील येळ्ळा येथें श्रीगणपतीचें मूळ स्थान होतें. ख्रिस्तीकरणप्रसंगीं तेथें मोडण्यांत आलेल्या देवळांच्या यादींत 'तोंबु' मध्यें दुर्गादेवी, गणेश, रवळनाथ अशीं नांवें मिळतात. त्यांतील दुर्गादेवी हीच श्रीशांतादुर्गा व गणेश हा श्रीगणपति होय. गतकालीं येळ्ळा येथून नांवेलीला या देवस्थानचें स्थलांतर झालें. तिसवाडी महालांत दिवाडी गांवच्या नावेली येथें आज ज्या जागीं ख्रिस्ती प्रार्थनामंदिर आहे तेथेंच हें देवस्थान होतें असें कळतें. पुढें १५६० च्या सुमारास श्रीगणपतीची मूर्ति परिवार देवतांसह फोंडें महालांतील खंडेपार येथें नेण्यांत आली आणि त्यानंतर वाडकर सावंत यांच्या सत्तेंतील डिचोलीकडील नांवें येथील स्थल सोयीचें वाटून या देवतांचें स्थलांतर तेथें करण्यांत आलें.

ता. २७ ऑगस्ट सन १७८१ रोजीं पोर्तुगीजांनीं सावंतावर जोराची चढाई करून त्या युद्धांत वाडकरांचा पेडणें, डिचोली (बतग्राम) व सांखळी (सत्तर) हा प्रदेश घेतला. त्यांनीं त्याच दिवशीं व पुनः अठराव्या दिवशीं म्हणजे ता. १५ सप्टेंबर रोजीं जाहीरनामा काढून व दवंडी पिटून तेथील लोकांनां त्यांच्या चालीरीतींचें व धार्मिक संरक्षण दिल्याचें जाहीर केलें.

तथापि मागील अनुभवानें भयभीत होऊन नांवें येथून तत्कालीन महाजन पुढाऱ्यांनीं देवतांच्या मूर्ति खंडोळें येथें आणून स्थापन केल्या आणि तेव्हांपासून हें देवस्थान खंडोळें येथेंच प्रसिद्धीस आलें.

रामनवमी, वसंतपूजा, श्रीगणेशचतुर्थी, अनंतव्रत, नवरात्र, दसरा, कोजागरी, वनभोजन, काला, माघी चतुर्थी इ. अनेक उत्सव येथें होतात. त्या सर्वांत मुख्य उत्सव किंवा जत्रोत्सव म्हणजे माघ शु. चतुर्थीचा होय. माघ शु. १ देपासून गणेश नवरात्र-उत्सव सुरू होतो. चतुर्थीदिवशीं माध्यान्हीं श्रीगणेशजन्माचा सोहळा होऊन महारुद्रसंतर्पण होतें. रात्रीं पुराण, कीर्तन, खारीवादन, पालखी, मकर, नाट्यप्रयोग इ. कार्यक्रम असतो.

दरमहा शु. चतुर्थीस पालखीची मिरवणूक असते. या मिरवणुकीचीं पेणीं आठ ठरलेलीं आहेत.

येथें श्रीगणपतीच्या प्रसादमूर्तीस करंबलीच्या पानांचा प्रसाद लावण्याची पद्धत आहे.

या देवस्थानच्या महाजनांचे १ भारद्वाज, २ काश्यप, ३ कंश, ४ अत्रि अशा चार गोत्रांचे चार गट असून त्यांचीं उपनांवें पुढीलप्रमाणें आहेत :--

खंडेपारकर, वेलिंगकर, घोडे, नावेलकर, प्रभु, वेलिंग, गुणशेणवी, गुणाजी, वेलंगी, कामत, नाईक, शेणवी, महाले, कुडव, जोशी, महाजन, धुमटकर, वेलकर, सांबारे, येळ्ळेकर, लाटकर इ.

देवस्थानचें उत्पन्न व खर्च समसमान आहे.

श्रीभगवती (खंडोळें)

खंडोळें येथील दुसरें प्रेक्षणीय देवस्थान म्हणजे भगवतीचें होय. या देवतेचें मूळ स्थान बार्देश येथील हळदोणें हें आहे. हळदोणच्या ज्या उंचवट्यावर आज ख्रिस्ती प्रार्थनामंदिर आहे त्याच ठिकाणीं पूर्वी श्रीभगवतीचें देवालय होतें. सन १५७३ त फ्रांसिस्कान पाद्रींनीं बार्देशचीं जीं देवळें मोडलीं त्यांच्या तोंबुमधील यादींत हळदोणच्या आठ देवांचीं अशीं नांवें मिळतातः- भगवती, रवळनाथ, नारायण, सांतेरी, सिद्ध-नाथ, भूतनाथ, सटी, फुलनाथ.

ख्रिस्तीकरणाच्या वेळीं सदर देवांचें स्थलांतर वाडकर भोंसले यांच्या सत्तेंतील डिचोलीजव-ळच्या मयें या गांवांत करण्यांत आलें. त्या जागीं तेथें आजलाहि एक खांब उभा असून त्याला ' भगवती-खांब ' अशी संज्ञा आहे. पुढें मयें येथील स्थानहि सुरक्षितपणाचें न वाटून त्या दैवतांस स. १७४८ त अंत्रूज महालांतील खंडोळें येथें आजच्या जागीं नेलें. त्या स्थलास हळदोणवाडी असें संबोधण्यांत येतें. आरंभींचें देऊळ लहानसेंच होतें. पुढें त्याच्या जीर्णोद्धार-प्रसंगीं प्रस्तुतचें टुमदार देवालय व भोंवतालचा तट बांधण्यांत आला. हें बांधकाम करून घेण्याचें श्रेय विशेषतः इतिहासप्रसिद्ध सद्गृहस्थ बहुगुण सदाशीव कामत वाघ यांना आहे. जीर्णोद्धाराचें काम ३० मार्च स. १८१७ रोजीं पूर्ण झालें.

श्रीभगवतीचें देवालय उत्तराभिमुख असून प्रशस्त आहे. सुंदर चौक, व्यवस्थित सरवळ्या व मंदिरास योग्य असाच प्राकार आहे.

श्रीभगवती देवी गर्भागारांत अग्रभागीं अधि-ष्ठित असून तिचें ध्यान महिषासुरमर्दिनीचें व मूर्ति कृष्णपाषाणी आहे. तिच्या उजव्या बाजूनें भिंतीच्या कमानींत परिवार दैवतांपैकी श्रीशांता-दुर्गेचें कलशरूपी प्रतिक असून प्रदक्षणेंत उजवीकडे श्रीलक्ष्मीनारायण, समोरच्या देवळींत निराकार, पश्चिमेकडे दाड, पूर्व बाजूस रवळनाथ, उजवीकडे सिद्धनाथ व तरंगरूपानें भूतनाथ अशी रचना आहे.

संवत्सर प्रतिपदा, वसंतपूजा, श्रावण सोम-वार, नवरात्र, दसरा, काला, कलशोत्सव, माल्याची जत्रा असे येथें निरनिराळे उत्सव होतात. माल्याची जत्रा हा उत्सव इतर उत्सवां-पेक्षां विशेष महत्वाचा व गर्दीचा असतो. त्या उत्सवाच्या रात्रीं बारानंतर दशावतारी नाटक होऊन पहांटेस तें संपतांच वीरभद्राचें सोंग देवळाभोंवतीं नाचविण्यांत येतें.

दरमहा शु. द्वितीयेस श्रीभगवतीचा पालखी-उत्सव असतो. तिथीसंबंधीं घटकांत अंतर पडल्यास सहा घटका मिळणारी द्वितीयाच उत्सवास योग्य मानण्यांत येते.

श्रीभगवतीच्या मूर्तीस गर्भागारांतच प्रसाद लावण्याची पद्धत असून ते कांबलीच्या पानांचे असतात. श्रीरवळनाथ व दाड यांनाहि प्रसाद लावण्याची वहिवाट आहे

या देवस्थानचे मूळ संस्थापक वसिष्ठ व वत्स या गोत्रांचे वैष्णव सांप्रदायी गौड सारस्वत ब्राह्मण असून त्यांतील कामत, कामत वाघ, कामत हळदणकर, पंडित या वसिष्ठगोत्री महा-जनांस ' सर महाजन ' असें संबोधण्यांत येतें.

एकंदर महाजनांचे सात गट असून १ ला कामत, २ रा नायक कामत, ३ रा कामत वाघ व कामत हळदणकर, ४ था पंडित, ५ वा प्रभु व जोशी (क्रमवंत), ६ वा दैवज्ञ व च्यारी आणि ७ वा नाईक वर्गाचा आहे.

श्रीशांतादुर्गा (माशेल)

हें देवस्थान प्राचीनकालीं तिसवाडींतील तळावली या गांवांत होतें, म्हणूनच या देवीस श्रीशांतादुर्गा तळावलीकरीण असें म्हणण्यांत येतें. या तळावलीस फिरंग्यांच्या कारकिर्दीपासून 'सांतान' या नावानें ओळखण्यांत येतें.

ख्रिस्तीकरणप्रसंगीं सन १५४० सालीं तळावली येथें मोडण्यांत आलेल्या देवळांतील देवांच्या तोंबुमधील यादींत पुढील नांवें आहेतः- सांतेर, ईश्वर, नारायण, भवनाथ, रवळनाथ, ग्रामपुरुष. त्यांपैकीं सांतेर हीच श्रीशांतादुर्गा होय. ही सांतेर व रवळनाथ यांच्याशिवाय दुसरीं दैवतें कोठें नेण्यांत आलीं हें स्पष्ट कळत नाहीं

प्रस्तुत देवालय लहानसेंच असून तें पश्चिमाभिमुख आहे. उत्तर दिशेनें मंदिरास लागून एक अग्रशाला आहे. समोर प्राकाराबाहेर पुष्करणी आणि जवळच श्रीरवळनाथाची व उत्तर बाजूस श्रीहनुमंताची अशा देवळ्या आहेत. हा हनुमंत कुंभारजुवें येथील एक गतकालीन गृहस्थ कोल्हापुरकर याचें उपास्यदैवत असून तें श्रीशांतादुर्गेच्या परिवारांत मागाहून सामील झालें आहे.

ज्यावेळीं नव्यानेंच श्रीशांतादुर्गा माशेलांत आली त्यावेळीं तिचें मंदिर म्हणजे एक लहानसा आश्रम होता. पुढें बऱ्याच कालानंतर वरगांवच्या ग्रामसंस्थेकडून जागा मिळवून ज्येष्ठ शु. ५ मी शके १७२३ रोजीं देवालय बांधण्यांत आलें. हें देवालय बांधण्याचें विशेष श्रेय उपी कामत भौंसुले या महाजनांतील सद्गृहस्थास आहे असें कळतें.

गर्भागारांत पट्टासनावर श्रीशांतादुर्गा अधिष्ठित असून श्रीरवळनाथ, श्रीदत्त व श्रीहनुमंत या परिवार देवता जवळच निरनिराळ्या ठिकाणीं आहेत.

रंगपूजा (श्रावण), अनंतव्रत, नवरात्र, वनभोजन (कार्तिक), पंचमी-उत्सव (मार्गशिर्ष शु. ५ मी, स्मारकोत्सव (मार्गशिर्ष व. ५ मी) असे उत्सव देवस्थानांत होतात. देवस्थानचें उत्पन्न अत्यल्प असल्यानें कित्येक उत्सव महाजनांकडून त्यांच्या खर्चानें होतात.

कौंडिण्य, काश्यप व वसिष्ठ अशा तीन गोत्रांचे कामत उपनांवाचे वैष्णव सांप्रदायी गौड सारस्वत ब्राह्मण या देवस्थानचे महाजन असून कामत शिरोडकर, कामत चंदगडकर, कामत भौंसुले, कामत पुरोहित, कामत हर्डीकर, कामत कणकुंबीकर अशीं ते हल्लीं उपनांवें वापरतात.

मुख्यासनाच्या प्रभावळीस करंवलीच्या पानांचा प्रसाद लावण्याची येथें पद्धत आहे.

श्रावण, मार्गशिर्ष व माघ या तिन्ही महिन्यांच्या शु. ५ मी हे उत्सवाचे दिवस असून त्या दिवशीं श्रीशांतादुर्गेचे महाजन आपल्या घरीं ब्राह्मण-सुवासिनी संतर्पण करतात.

या श्रीशांतादुर्गा देवस्थानच्या परिवार दैवतांत समाविष्ट झालेल्या श्रीदत्तमहाराजांची माहिती 'श्रीदुर्गादत्तमंदिर' या स्वतंत्र प्रकरणांत यावयाची असल्यानें येथें दिली नाहीं.

श्रीदुर्गादत्त मंदिर (माशेल)

हें देवमंदिर श्रीशांतादुर्गा देवस्थानच्या परिवार दैवतांत समाविष्ट झालेलें असलें तरी त्याची स्थापना ह. भ. प. वै. विठ्ठल कृ. कामत यांकडून झालेली असून पूजा अर्चा इ. व्यवस्था त्यांच्याच गृहांतून होत असते. श्रीशांतादुर्गा देवीचीहि स्थापना होण्यापूर्वी आजच्या श्रीदत्तमंदिराच्या जागीं एक औदुंबर वृक्षाचा पार असून पारावर पादुका होत्या.

सन १९३८ सालीं वै. कामत भारतांत प्रवासांत असतां जयपूर येथें त्यांनीं तेथील एका उत्तम कारागिराकडून श्रीदत्तमहाराजांची मूर्ति तयार करुन घेतली. याच मूर्तीची श्रीदुर्गा-दत्तमदिरांत स्थापना झालेली आहे. ही मूर्ति एकमुखी, सहाहाती, पद्मासनस्थ व संगमरवरी असून मोहक व प्रसन्नवदनी आहे.

वै. विठ्ठल कृ. कामत व श्री. रामचंद्र कृष्ण कामत या ह. भ. प. बंधुद्वयांनीं श्रीदुर्गा-दत्त मंदिरांतून धार्मिक व भक्तिरसपूर्ण अनेक कार्यक्रम केले आणि भक्तिमार्गदर्शक ग्रंथ लिहून महत्वाची कामगिरी बजावलेली आहे.

या देवमंदिरांत गुरुप्रतिपदा, गुरुद्वादशी व दत्तजयंती असे उत्सव होत असून दत्तजयंतीचा उत्सव मुख्य असतो व तो पांच दिवसपर्यंत विविध कार्यक्रमानें चालतो.

श्रीशांतादुर्गा (माशेल)

कुंभारजुवें हें या देवीचें मूलस्थान होय. या गांवांत दक्षिण बाजूनें आज जेथें श्रीरामसीतेचें देऊळ आहे त्याच्याच जवळ श्रीशांतादुर्गेचें देऊळ होतें. आजला तेथें प्राचीन तळी दिसत आहे. खिस्तीकरणप्रसंगीं देवीच्या उपासकांनीं तिच्यासह जवळच्या माशेल या ठिकाणीं स्थलांतर केलें व तेथेंच पुढें देऊळ बांधून तिची तेथें स्थापना केली.

गर्भागारांत अग्रभागीं श्रीशांतादुर्गेची पंचधातूची मूर्ति असून पुढें तांब्याचा कलश व त्यावर देवीचा चांदीचा मुखवटा आहे.

अनुषंगिक दैवतांपैकीं श्रीरवळनाथ हेंच एक प्रसिद्ध असून त्याचें देऊळ श्रीशांतादुर्गा देवालयाच्या उजवीकडे आहे.

दरमहा प्रत्येक पंचमीस येथें पालखीउत्सव असतो. अक्षय ३या, वसंतपूजा, श्रावण सोमवार, नवरात्र, दसरा, बलिप्रतिपदा, काला (मार्गशिर्ष शु. ५मी), वैभव २या, मालनी १५मा, शिमगा इ. उत्सव येथें होत असतात.

अक्षय ३या व वसंतपूजा उत्सव ३येपासून पांच दिवसपर्यंत कुंभारजुवें येथें थाटांत होतो.

मालनी १५मे दिवशीं रात्रीं स्वारीवादन इ. नंतर नाटकाचा कार्यक्रम असतो.

शिबिका-उत्सव कुंभारजुवें येथील गांवठण वाडींत गांवच्या मूळच्या वसाहतीच्या जागीं होतो. हा उत्सव पांच दिवसांचा असून त्यावेळीं कुंभारजुवें येथील हिंदू वसतींतील प्रत्येक घरांतून पालखीचें अत्यंत भक्तिभावानें स्वागत होतें. पालखींतून आपली उपास्यदेवता आपल्या घरांत प्रवेशल्यावर भाविकांनां लाभणारा आनंद औरच होय. हाच येथें मुख्य उत्सव मानण्यांत येतो. उत्सवांत नाटकेंहि होत असतात. हा उत्सव हल्लीं संवत्सर प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत होतो.

वडिये, खाजनये, करंडे, नायक, दणाईत, कणी, कामत, धुमे, केंकरे, महाले, घांटकर (सुखटणकर), वागळे, सरदेसाई, संजगिरी,

खाडये, इ. या देवस्थानचे महाजन आहेत. या शिवाय, कुंभारजुवें येथील दैवज्ञ, वैश्य, ठवई, लोहार, शिंपी, नाईक, गावडे वगैरे लोक या देवीस ग्रामदेवी म्हणून भक्तिभावानें भजतात.

श्रीदेवकी-कृष्ण (माशेल)

परिवार देवतांसह हें देवस्थान माशेलांत विशेष प्रसिद्ध आहे. मूर्ति कृष्णपाषाणी मोहक असून गुजराथी पद्धतीची आहे. देवकीच्या कडेवर श्रीकृष्णाची बालमूर्ति आहे. देवालय अंतर्बाह्य प्रेक्षणीय आहे.

हें देवस्थान मूळचें तिसवाडी महालांतील 'चोडण' या गांवचें असून ख्रिस्तीकरणाच्या वेळीं मोडलेल्या तेथील देवालयांतील देवांच्या यादींत अशीं नांवें आहेतः-गणेश, रवळनाथ, बावकादेवी, मल्लनाथ, भगवती, देवकी, संतपुरुष, बाराजण, नारायण, कांतेश्वर, चंडेश्वर, दाडसांकळ.

नेहमींचे व प्रासंगिक मिळून येथें बरेच उत्सव होत असतात. गोवर्धन प्रतिपदा, बलि प्रतिपदा, लक्ष्मीपूजन, रथसप्तमी इत्यादि उत्सवांत मार्गशिर्ष महिन्यांतील दशमी व एकादशीचा उत्सव जास्त प्रेक्षणीय असतो. या उत्सवांत तेथें दोन सुंदर नाट्यप्रयोगहि होतात. जत्रेचा मुख्य दिवस मार्गशिर्ष शु॥ १३शी हा आहे.

शिंक्रे, लवंदे, मोये, गिंडे, पऱ्हीकर, वेर्लेकर, तांबा, नायक, केणी, कामत, धारवटकर, प्रभू चोडणकर, प्रभू देसाई, महाले, बरड, कोलवाळकर, जोशी वगैरे उपनांवांचे गौड सारस्वत ब्राम्हण या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीदेवकीकृष्ण देवस्थानच्या परिवार दैवतांत पुढील देवांचा समावेश आहेः - श्रीरवळनाथ (पिसो रवळू), श्रीमल्लीनाथ, श्रीभूमिका, श्रीलक्ष्मी-रवळनाथ, कात्यायनी, दाढशंकर, गजांतलक्ष्मी इ.

श्रीभूमिकादेवी – ही चोडणगांवची ग्रामदेवी असून हिचें स्वरूप महिषासुरमर्दिनीचें आहे. मूर्ति कृष्णपाषाणी व कारागिरीच्या दृष्टीनेंहि ठीक आहे. या देवीची जत्रा मार्गशिर्ष वद्य ९ मी दिवशीं असते.

श्रीमल्लीनाथ–ही मूर्ति कृष्णपाषाणी असून तिचें स्वरूप नाथसांप्रदायी मंदिरांतील मूर्तींसारखें आहे. मार्गशिर्ष व॥ १० मी व ११ शी दिवशीं येथील मुख्य उत्सव असतो.

त्या दोन्हीं रात्रीं मंदिराच्या सज्जांत श्रीदेवकी-कृष्ण देवता विराजमान होऊन नाट्यप्रयोगहि होतात.

कामत घाणेकर, कामत भाटकर, कामत (सांखळीकर) वगैरे श्री मल्लीनाथाचे महाजन आहेत.

श्रीरवळनाथ (पिसो रवळू) - माशेल येथील मालनी पौर्णिमेची प्रसिद्ध जत्रा ती याच देवाची होय. मालनी पौर्णिमेदिवशीं म्हणजे पौष्यपौर्णिमेला देवकी-कृष्णाचे बहुतेक महाजन हजर असतात.

श्रीलक्ष्मी-रवळनाथ--पौष्य शु॥ २ येपासून ४ थींपर्यंत ३ दिवस येथील जत्रोत्सव असतो. कामत, मळयेकर, सातोस्कर, पाडगांवकर, प्रभु देसाई, विड्ठे वगैरे याचे म.ाजन आहेत. त्याचप्रमाणें श्रीभूमिकादेवीची जत्रा मार्गशिर्ष वद्य ९ मी रोजीं, श्रीकात्यायनीचा मुख्य उत्सव मार्गशिर्ष वद्य ११ शी, दाढशंकराचा १२ शी व गजांतलक्ष्मीचा मार्गशिर्ष अमावास्या असा आहे.

श्रीशांतादुर्गा (माशेल)

मूळ बार्देश महालांतील वेर्ले गांवची ही देवी आहे. मार्गशिर्ष शु॥ ९ मी दिनीं या देवालयांतील मुख्य उत्सव असतो. वेर्लेकर, उपनांवाचे दैवज्ञ ब्रा. या देवीचे महाजन आहेत. ख्रिस्तीकरणाच्या वेळीं वेर्ले (बार्देश) येथें सांतेर नारायण, नागनाथ या देवांचीं देवळें मोडल्याचा उल्लेख मिळतो. सांतेर तीच ही शांतादुर्गा (वेर्लेकरीण) होय.

श्रीविठोबा (माशेल)

बऱ्याच कालापासून हें देऊळ माशेल येथें आहे. चातुर्मासाखेरीज दर दशमीस पालखी आषाढी-कार्तिकी उत्सव व चैत्रांत तीन दिवस शिमगा उत्सव होऊन १५ मेस धुळवड होते. खोलकर, तिंबले, हेगडे व कित्येक वैश्य गृहस्थ या देवळाचे महाजन आहेत.

श्रीशांतादुर्गा (वरगांव)

वरगांवची ही ग्रामदेवी असून तिची मूर्ति कृष्णपाषाणी आहे. मार्गशिर्ष व॥ ५ मीला या देवीचा मुख्य उत्सव किंवा जत्रा असते. तिच्या परिवार देवतांत श्रीरवळनाथचा समावेश होत असून जवळच त्याचें देऊळ आहे.

श्रीसांतेर (खंडोळें)

ही खंडोळें येथील ग्रामदेवी. मार्गशिर्ष व॥ १४ शीस या देवीचा काला होत असून फाल्गुन व॥ १४ शी ते चैत्र पाडवा पर्यंत शिमगा होतो.

श्रीराम-सीता — हें लहानसें मंदिर कुंभारजुवें येथें आहे. मंदिरांत भजनाचा इ. कार्यक्रम होत असतो.

श्रीदत्तमंदिर – (कुंभारजुवें) मूर्ति लांकडी पण सुंदर असून येथें गुरु १८।व गुरु १२शी हे उत्सव होतात. याच गर्भागारांत मारुतीची एक संगमरवरी मूर्ति असून हनुमान-जयंती दिवशीं तिचा उत्सव असतो. या मंदिरांतील खर्च कै. कृष्ण शेणवी धुमे यांच्या मुलांकडून होतो.

श्रीभगवती (माशेल)

'श्रीभगवती चिंबळकरीण' म्हणतात ती हीच देवी. ही मूर्ति कृष्णशिलेची असून स्वरूप महिषासूरमर्दिनीचें आहे. देवी गर्भागारांत चांदीच्या देव्हाऱ्यांत अधिष्ठित असून उजवीकडे श्रीलक्ष्मीनारायण व समोर श्रीनागेश-लिंग आहे. देवीच्या डाव्या बाजूस श्रीसत्पुरुष व उजव्या बाजूस श्रीगणपति व जवळच रामपुरुष आहे. देवालयाच्या पटांगणाखालीं जी देवळी आहे तींत श्रीनिराकार, ग्रामपुरुष, रवळनाथ, वनदेवी व पुर्वाचारी अशा देवता आहेत.

श्रीभगवतीचें मूलस्थान तिसवाडींतील चिंबल हें होय. ख्रिस्तीकरणाच्या वेळीं तेथें मोडण्यांत आलेल्या देवळांत या देवीच्या देवळाचा उल्लेख मिळतो. आज हिच्या परिवार देवतांत ज्या दुसऱ्या देवता दिसतात त्या मूळच्या मोरंबी वगैरे चिंबलजवळच्या गांवांतील आहेत.

चिंबल येथें प्राचीन कालीं हें देवालय बरेंच लोकप्रिय असून तें प्रशस्त व तटबंदी इ. केलेलें होतें. आज जेथें ख्रिस्ती प्रार्थनामंदिर आहे तेथेंच तें होतें. पुढें थोड्याच अंतरावर गौळी भाटांत तिची तळी आहे.

स. १५४० च्या सुमारास ख्रिस्तीकरणाच्या गडबडींत या मूर्तीचें स्थलांतर तत्कालीन वाडकर भोंसले यांच्या अंमलांतील 'मयें' येथें केलें व तेथें देऊळहि बांधलें. पण पुढें तो भाग पोर्तुगीजांकडे

आला व त्यामुळें श्रीभगवतीला त्यावेळीं माशेल येथें आणून स्थापन करण्यांत आली. आरंभीं लहानसेंच असलें तरी पुढें स. १८२१ त देवीचें देवालय व्यवस्थित असें बांधण्यांत आलें. आजचें देऊळ भव्य व दगडी कमानीचें आहे. श्री. विष्णु वासुदेव कामत तारकर यांनीं चौकाच्या फरशीचें काम स्वखर्चानें ठीक केलें आहे.

दरमहा शु॥ ९ मीला येथें पालखीउत्सव असतो. इतरहि अनेक उत्सव निरनिराळ्या वेळीं होतात; पण त्या सर्वांत जास्त गर्दीचा उत्सव मार्गशिर्ष शु॥ ९ मीस होणारा काल्याचा होय.

दरसाल चैत्र महिन्यांत चिंबल येथील शिमगा उत्सवाच्या वेळीं श्रीभगवतीची पालखी आपल्या मूलस्थानांत चिंबलला जात असते. सन १९२१ पासूनच ती तिकडे जाण्यास सुरवात झाली आहे. शिमग्याचा उत्सव (नाट्यप्रयोग इ.)संपेपर्यंत पालखी चिंबलला असते व नंतर ती परत माशेलला येते. हा पालखी उत्सव बराच मजेदार व सुंदर होत असून पानवेल, फोंडवें, रायबंदर वगैरे भागांतील भाविकांनां याचा छान फायदा मिळतो.

कौशिक गोत्री प्रभु चिमुलकर व चिमुलकर या उपनांवाचे वैष्णवसांप्रदायी गौडसारस्वत ब्राम्हण या देवीचे महाजन असून त्यांच्या इतकाच हक्क चिंबल गांवच्या सर्व भागांतील ग्रामस्थ गौड सारस्वत ब्राह्मणांनां आहे.

चिंबलचे सारस्वतेतर लोकहि या देवीचे उपासक आहेत.

श्रीभगवती (पंचवाडी)

पंचवाडी हें गांव कुडचडें (सांवर्डे) येथून जवळ असलें तरी त्याचा समावेश अंतरुज महालांतच होत आहे. आज जेथें हें देऊळ आहे त्या वाडीस 'विजर' असें म्हणतात. डोंगराळ असा हा भाग आहे.

श्रीभगवतीचें मूलस्थान मुर्गांव महालांतील वाडें असें कांहीं लोक सांगतात; पण तें योग्य दिसत नाहीं आणि ख्रिस्तीकरणाच्या वेळीं वाडें येथें मोडण्यांत आलेल्या देवळांच्या नामावलींत या देवीचा उल्लेख नाहीं. तोंबुमधील नांवावरून ही देवी सदर तालुक्यांतील 'दाबोली' या गांवची असल्याचें दिसतें. तेथून ही देवता पंचवाडी येथें आणण्यांत येऊन तेथील ग्रामदेवी श्रीसांतेर हिच्या देवळाजवळच तिची स्थापना करण्यांत आली.

श्रीभगवतीचें ध्यान महिषासुर-मर्दिनीचें असून मूर्ति कृष्णपाषाणी आहे. जवळच श्रीगणपति, श्रीलक्ष्मीनारायण व दोन शिवलिंगें अशीं परिवार दैवतें आहेत.

येथील उत्सवांत मार्गशिर्षमधील जत्रोत्सव विशेष मजेचा असतो. मार्गशिर्ष वद्य सप्तमीस सुरवात होऊन वद्य द्वादशीस तो पूर्ण होतो. या उत्सवांत जागर, नाटकें इ. कार्यक्रम असतो. पहिल्याच दिवशीं श्रीसांतेरीची पालखी व काला होतो. हाच दिवस मुख्य मानतात.

श्रीसांतेरी (पंचवाडी)

हीच पंचवाडीची ग्रामदेवी होय. श्रीभगवती तेथें आणल्यावर दोन्हीं देवतांचें मिळून एकच देवस्थान निर्माण करण्यांत आलें. मंदिरें मात्र निरनिराळीं आहेत. सांतेरीच्या गर्भागारांत वारूळ असून पुढें शिलामूर्ति आहे. उत्सवमूर्ति निराळी असून प्रसाद कलशास लावतात व ते पटकुळीच्या फुलांचे असतात.

कामत गांवकर या उपनांवांचे वत्सगोत्री वैष्णवसांप्रदायी गौड सारस्वत ब्राह्मण या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीकामाक्षी (शिरोडें)

शिरोड्याच्या बाजारांतून एक सरळ रस्ता या देवस्थानाकडे गेला असून बाजारापासून हें देवालय थोड्याच अंतरावर आहे. देवालय सुंदर व प्रेक्षणीय असून तेथील सृष्टिसौंदर्यहि आल्हादकारक आहे. सदर रस्त्यावरून श्रीकामाक्षी देवालयाजवळ जातांच एक कमानदार दरवाजा दिसतो. व त्यांतून आंत गेलें म्हणजे लगेच प्राकारदरवाजा लागतो. प्राकार विस्तीर्ण असून सभोंवतीं अग्रशाला आणि नोकरलोकांचीं निवासस्थानें आहेत.

श्रीकामाक्षीमंदिर टुमदार व पूर्वाभिमुख असून विस्तीर्ण सभामंडप, दीपस्तंभ, प्राकाराचा पूर्व दरवाजा व पुढें स्वच्छ पाण्याचा तलाव आहे.

श्रीकामाक्षीची मूर्ति सुंदर असून तिचें स्वरूप महिषासूरमर्दिनेचें आहें. सह्याद्रीखंडांत या देवीच्या नांवाचा कामाक्षिका असाहि उल्लेख आहे.

या देवीचें गोमंतकांतील मूळस्थान सासष्ट महालांतील राय हें असून आज जेथें खिस्ती प्रार्थनामंदिर आहे तेथेंच पूर्वकालीं हें देवालय होतें. राय येथें असतांनां या देवस्थानांत अग्रभागीं श्रीरायेश्वराचें लिंग होतें. गोमंतकाच्या वसाहतीच्या वेळीं कौशिक, वत्स व अत्रि या तीन गोत्रांच्या गौ. सा. ब्राम्हणांनां 'राय' गांव अग्रहार म्हणून मिळाला होता. तेथें देवस्थानची योजना करतांनां त्यांनीं प्रथम जें शिवलिंग स्थापन केलें त्यालाच श्रीरायेश्वर असें नांव पडलें. श्रीरायेश्वर, श्रीलक्ष्मीनारायण, श्रीशांतादुर्गा, श्री वेताळ व श्रीग्रामपुरुष हें मूळ पंचायतन असून श्रीकामाक्षी व कालभैरव या देवतांची जोड त्याला मागाहून मिळालेली आहे.

लोटली येथील श्रीरामनाथ देवाचा एक वत्सगोत्री उपासक गौ. सा. ब्राम्हण तीर्थयात्रेच्या प्रवासांत असतां आसाम भागांतील 'कामरूप' नगरींत आद्यपीठाधीष्ठित श्रीकामाक्षीचें दर्शन घेऊन तो मुक्कामावर झोंपला असतांनां त्याला स्वप्नांत दृष्टांत झाला आणि दुसऱ्या दिवशीं श्री कामाक्षीची व श्री भैरवाची अशा दोन प्रतिमा घेऊन तो परत निघाला. कांहीं कालानें गोव्यांत पोंचल्यावर राय येथें तो आपल्या जामाताकडे उतरला. हेतु लोटलीस नेऊन स्थापन करण्याचा असला, तरी त्या मूर्ति ठेवलेल्या जागींच स्थिर झाल्यानें त्यानें त्यांच्या नवीन प्रतिमा नेऊन लोटली येथील देवस्थानांत स्थापन केल्या, त्यामुळेंच शिरोडें व रामनाथीं येथील श्रीकामाक्षी देवी एकच असें मानण्यांत येतें.

खिस्तीकरण प्रसंगीं राय येथें रायेश्वर, कामाक्षा, भगवती, नारायण, वाटंबी अशा देवता असल्याचा ऐतिहासिक दप्तरांत उल्लेख मिळतो. त्यावेळीं श्रीरायेश्वर देवस्थानच्या देवता 'वार्जे' येथें नेण्यांत आल्या आणि नंतर त्या आजच्या जागीं नेऊन स्थापन केल्या.

श्रीकामाक्षी देवस्थानांतील कामाक्षी मंदिरांत गर्भागारांत अग्रभागीं श्रीकामाक्षी देवीची मूर्ति असून उजवीकडे कोनाड्यांत प्रसादमूर्ति व उत्तरेकडील भिंतीच्या कपाटांत श्रीशांतादुर्गा व श्रीकामाक्षी यांच्या छोट्या मूर्ति आहेत. मंदिराचें महाद्वार व सभामंडप यांमध्यें श्रीवेताळ आणि महाद्वाराच्या दुसऱ्या बाजूस श्रीकालभैरवाची मूर्ति आहे.

श्रीरायेश्वर मंदिरांत मधल्या गर्भागारांत श्री रायेश्वर (लिंग), दक्षिण गर्भागारांत श्रीलक्ष्मीनारायण, उत्तरभागीं श्रीशांतादुर्गा व चौकावर दक्षिणभागीं ग्रामपुरुष आहे. याशिवाय

ठिकठिकाणीं उभय मंदिरांच्या जवळपास उपासकांचे निरनिराळे पुरुष आहेत.

दरमहा १४शीस श्रीरायेश्वराची, चातुर्मासाखेरीज दर अमावास्येस श्रीलक्ष्मीनारायणाची, नवरात्राखेरीज दर ५ मीस श्रीशांतादुर्गेची आणि प्रत्येक अमावास्येस श्रीकामाक्षिची असा पालख्यांचा उत्सव असतो.

वसंतपूजा (वैशाख शु॥ १ दा), श्रावण सोमवार, श्रावण अमावास्या, नवरात्र, दसरा, आश्विन १५ मा, वनभोजन (मार्गशिर्ष १५ मा), महाशिवरात्र, शिमगा इ. विविध प्रेक्षणीय उत्सव येथें होतात; त्या सर्वांत जत्रेचा उत्सव विशेष बहारीचा असतो. या उत्सवास महाशिवरात्रीपासून सुरवात होऊन फाल्गुन शु॥ १०मीस तो पूर्ण होतो. या महोत्सवांत शिबिकोत्सव, दोलोत्सव, लालकीउत्सव, रथोत्सव, नाट्यप्रयोग अशा अनेक उत्सवांची व लोकांचीहि गर्दी असते.

हल्लीं श्री. विष्णु गणेश कामत, श्री. सोमनाथ वैकुंठ पै धुंगट वगैरेंच्या नवीन उत्सवांचीहि सदर अनेक उत्सवांत नवीन भर पडली आहे.

केणी, नायक रायकर, पै फोंडेकर, पै रायकर, कामत, हळदुगे, पै धुंगट, पै बीर, इ. कौशिक गोत्री; कामत हे अत्रि गोत्री व आचार्य, बाळगी इ वत्सगोत्री या देवस्थानचे महाजन आहेत.

रायकर उपनामक दैवज्ञ ब्राम्हणहि श्री कामाक्षीचे एकनिष्ट उपासक आहेत.

उत्पन्न ठीक असून तेवढाच खर्चहि आहे.

श्री शिवनाथ (शिरोडें)

श्री शिवनाथ हा शिरोडेंचा ग्रामदेव आहे. या दैवताच्या स्थापनेपूर्वी बऱ्याच प्राचीन कालीं 'वाजें' येथें श्री मंडलेश्वर देवाचें देवालय असून तेंच मुख्य ग्रामदैवत मानलें जाई. मूळची वस्तीहि तेथेंच होती. त्यानंतर हा भाग गोमंतकच्या भोजवंशीय राजानें ब्राम्हणांनां दान दिला. पुढें एका सिद्धानें श्री महादेवाच्या लिंगाची स्थापना करून त्याला 'श्रीशिवनाथ' असें नांव दिलें आणी तेव्हांपासून त्या भागास शिवपूर अशी संज्ञा मिळाली. त्या सिद्धाच्या पादुका तो गुप्त झाला त्या ठिकाणीं शिवनाथ किंवा सिद्धनाथ डोंगरावर आहेत. याच शिवनाथ डोंगरावर चंद्रवर्मा राजाच्या शासनामध्यें उल्लेख आलेला एक महाविहार असून त्याला त्या राजानें एक शेत जमीन दान दिल्याचा ताम्रपट सन १९४१ सालीं डॉ. मो. गं दीक्षित यांनीं प्रसिद्ध केला आहे. हा ताम्रपट त्याच्या अक्षरवळणावरून पांचव्या शतकांतील असावा असें इतिहास संशोधक डॉ. पां. स. पिसुर्लेकर यांचें मत आहे.

श्रीशिवनाथांचें लिंग व मंदिरहि सुंदर आहे. शिरोडें येथील आजचें मुख्य ग्रामदैवत म्हणजे श्रीशिवनाथ, श्रीमंडलेश्वर, रवळनाथ, भूतनाथ, वेताळ, वीरभद्र, क्षेत्रपाल, ब्रम्हादुर्गा, माधव, महामाया, केळबाई, ग्रामपुरुष इ. या देवालयाच्या परिवार देवता असून त्यांच्या देवळ्या कांहीं जवळच व कांहीं थोड्या अंतरावर आहेत.

दर सोमवारीं या देवस्थानांत श्रीशिवनाथाचा पालखी उत्सव असतो. चैत्रापासून फाल्गुनपर्यंत इतरहि निरनिराळे उत्सव येथें होतात; पण त्या सर्वांत मार्गशिर्ष पौर्णिमेपासून वद्य पंचमीपर्यंत होणारा जत्रोत्सव विशेष मजेचा असतो. लालकी-उत्सव, नौकाविहार, नाट्यप्रयोग, रथोत्सव हे कार्यक्रम तर प्रेक्षणीय होतात. या जत्रेंत हरिजनांनां विशिष्ट मान असतो

व तो म्हणजे रथावरील पहिली मेणबत्ती त्यांकडून पेटविण्यांत येते.

देवस्थानचें उत्पन्न बेताचेंच असून त्या मानानें खर्चहि तितकाच आहे.

श्रीशिवनाथ देवालय शिरोडेच्या बाजारापासून जवळच आहे.

देसाई, गांवकर, गुडे, हेदे इ. या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीनवदुर्गा (बोरी)

मोटर रस्त्यापासून हें देवस्थान जवळ असून देवस्थानापर्यंत सरळ रस्ता गेला आहे. देवीचें मंदिर मध्यभागीं व्यवथित असून सभोंवतीं तीन बाजूंनीं अग्रशाला व पूर्व बाजूस परिवार देवतांतील श्रीकमलेश्वर मंदिर व श्रीदत्तमंदिर अशीं आहेत.

श्रीनवदुर्गा देवीची मूर्ति कृष्ण पाषाणी व स्वरूप महिषासूरमर्दिनीचें आहे. देवी चतुर्भुज असून उजव्या एका हातांत चक्र व डाव्या हातांत शंख आहे. पूर्वी कर्न्हाड येथून या देवीची प्रतिमा इकडे आणण्यांत आली. ही देवता बोरी येथील ग्रामदेवी आहे. बोरी गांवास पूर्वकाळीं 'बदरीग्राम' अशी संज्ञा होती.

या देवस्थानांत निरनिराळे अनेक उत्सव होतात त्यांत कार्तिक पौर्णिमेचा जत्रोत्सव मुख्य असतो. १४ शी व १५ मा असे दोन दिवस मिरवणूक, दिवजें, इ. कार्यक्रम होतो. चैत्र १ देपासून १० मी पर्यंत होणारा वसंतोत्सवहि छान असतो. या उत्सवांतील नाट्य प्रयोग प्रेक्षणीय होतात. आषाढी एकादशीस होणारा २४ तासांचा भजनी सप्ताह भाविकांनां समाधान देणारा असाच असतो.

या सप्ताहाचा मूळ प्रवर्तक ह. जगन्नाथबुवा बोरकर हा होय. गोमंतकांत इतरहि कांहीं देवस्थानांत त्यांनीं ही सप्ताह पद्धत रूढ केली. श्री नवदुर्गेचें नवीन देवालय बांधण्याच्या कार्यांतील यांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. देवी मंदिराच्या उजव्या बाजूनें यांची समाधी आहे. बुवाजी फार योग्यतेचे होते.

श्री कमलेश्वर (शिवलिंग), श्री लक्ष्मीनारायण, श्रीसिद्धेश्वर, श्रीगणपति वगैरे येथें परिवार देवता आहेत. श्रीकमलेश्वर, देवीच्या सन्मुख प्राकारांत; श्रीलक्ष्मीनारायण दीडेक मैलाच्या अंतरावर आणि सिध्देश्वर देवळासमोरच्या उंच डोंगरावर आहे. हा सिध्दनाथ डोंगर प्रसिध्द असून गोमंतकांतोल प्रमुख डोंगरांपैकीं एक होय. या सिध्दनाथ डोंगरावर श्रीसिध्देश्वराच लिंग असून जवळच श्रीगणपतीची मूर्ति आहे. पर्वतावरील या देवतांजवळ शुध्द व स्वच्छ तीर्थकुंडांत स्नान करून श्रीसिध्दनाथ व गणपतीचें दर्शन घेण्यांत भाविकांनां फार समाधान वाटतें. या श्रीसिध्देश्वराचा व श्रीसिध्दिनाथाचा (श्रीगणपतीचा) आणि श्रीरामनाथ देवस्थानच्या श्रीसिध्दिनाथाचा कांहीं तरी संबंध असावा असें वाटतें.

श्रीदत्तमंदिर- याच देवस्थानांत श्रीनवदुर्गामंदिराच्या समोर व श्रीकमलेश्वराच्या मागच्या बाजूनें हल्लीच बांधण्यांत आलेलें **श्रीदत्तमंदिर** आहे. या मंदिराची स्थापना श्रीनवदुर्गेचे पुजारी वे. देवारी यांकडून हल्लीच झालेली आहे. मंदिरांतील श्रीदत्तमूर्ति तीनमुखी व सहाहाती असून संगमरवरी आहे. गुरु १दा, गुरु १२ शी, दत्तजयंति असे उत्सव या ठिकाणीं होतात. त्यांत दत्तजयंतीचा उत्सव विशेष कार्यक्रमांचा असतो.

प्रभु देसाई, प्रभु सावकर, प्रभु बोरकर, प्रभु शिरोडकर, प्रभु, देवारी, भट, उपाध्ये असे पंचद्रविडांतील आणि शेणवीं बोरकर व कामत हे स्मार्त व वैष्णव सांप्रदायी गौड सारस्वत असे या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीविठ्ठल (कवळें)

गौडसारस्वत स्मार्त सांप्रदायी मठसंस्थानच्या कवळें येथील मुख्य मठांत मध्यभागीं हें श्रीविठ्ठलमंदिर आहे. मंदिराचें आवार व्यवस्थित असून मंदिर लहानसेंच पण सुंदर आहे. गर्भागारांतील श्रीविठ्ठलरखुमाईची मूर्ति कृष्णपाषाणी असून स्वरूप सुंदर नि मोहक आहे. या मंदिरांत निरनिराळे उत्सव होत असतात. कार्तिक व॥ ४ थीस दशावतारी काला व ५ मीस गवळण-काल्याचाहि उत्सव येथें होतो. ठराविक उत्सवांत पालखीची मिरवणूकहि असते. श्रीविठ्ठलाची उत्सवमूर्ति सुवर्णाची असून मोहक आहे.

या विठ्ठल मंदिरांतील एकंदर खर्च श्रीमठ-संस्थानतर्फेच होत असतो.

श्रीवेताळ देवता

आतांपर्यंत अंत्रुज महालांतील बहुतेक सर्व देवालयांची माहिती आली आहे. त्यांत ग्रामदेव असे अवघेच असून सासष्टींतील देव विशेष आहेत. हीं आणि गोव्यांतील इतर देवस्थानें पाहिलीं तर बहुतेक ठिकाणीं परिवार देवतांत तरी वेताळ किंवा रवळनाथ या देवता दिसतात. विशेषेंकरून मोठ्या प्रमाणांत वेताळ देवताच अधिक दिसून येते. ही देवता येथील प्राचीन रहिवाशांची अधिक आवडती असल्याचेहि कांहीं उल्लेख मिळतात.

गोमंतकाबाहेरच्या प्रदेशांतहि हिंदु देवतांत श्रीवेताळाचें प्रस्थ फार मोठें असून उत्तर हिंदुस्थानांत तर प्राचीन विक्रमराजाच्या कारकिर्दींतील वेताळाच्या अनेक कथा प्रचलित आहेत.

श्रीवेताळाचीं खंडेराय, खंडोबा, मल्लारी, मार्तंड अशींहि नांवें महाराष्ट्रांत आढळतात. गोमंतकांत, कोंकणांत, कर्नाटकांत वेताळाच्या देवळांत गुडगुडी भरून ठेवण्याची प्रथा आहे. कर्नाटकांत तर वेताळ किंवा खंडेरायाच्या पालखीच्या मिरवणुकींत पालखीसोबतहि गुडगुडी नेण्याची वहिवाट आहे.

वेताळाच्या हातांत खड्ग असतें म्हणूनच त्याला खड्गेश्वर-खंडेश्वर-खंडोबा-खंडेराय असें नांव पडलें असावें. महाराष्ट्रांत जेजुरी येथें खंडेरायाचें देऊळ आहे. एका शतकापूर्वी 'वीर' नांवाच्या त्याच्या उपासकांचे वंशज होते. ते वर्षांतून एकदां ठराविक दिवशीं आपल्या मांडीस तलवारीनें जखम करून घेऊन तिज-मधील रक्ताचा टिळा देवास लावीत. कांहीं कालानें शस्त्राऐवजीं एखाद्या कांटेरी फांदीनें ओरबाडून रक्ताचा थेंब काढीत. त्यानंतर बकऱ्याच्या रक्ताचा टिळा करीत. पुढें पशुहत्या बंद झाल्यापासून ही रक्ताची चाल बंद होऊन फक्त लाल रंगाचा टिळा करण्यांत येतो.

कर्नाटकांत कांही ठिकाणीं नवस म्हणून पूर्वीं पाठींत किंवा मानेंत गळ टोंचून वेताळा-समोरच्या बगाडास टांगून घेत. हे सारे प्रकार मूळचे अनार्यांचे असून या देवताहि मूळच्या त्यांच्याच आहेत. आर्यांचें इकडे आगमन झाल्यावर अनार्यांशीं त्यांनीं मिळतें घेतलें व त्यांच्या इतर देवतांप्रमाणेंच श्रीरवळनाथ, श्रीवेताळ या देवता आपल्या देवतांत सामील करुन घेतल्या. बाकी श्रीवेताळ देवता ही जागरूक देवता असल्याची अनेकांची भावना आहे.

श्रीकलनाथ (पंचवाडी)

हें देवालय लहानसेंच असून लिंग श्रीमहादेवाचें आहे. विर्ञा, म्हाप, मुडाय, अमळाय, व दिगस या पांचवाड्या मिळून 'पंचवाडी' बनलेल्या गांवचें हें ग्रामदैवत आहे. कांहीं किरकोळ उत्सव येथें होत असले तरी मार्गशीर्ष शु॥ ४ थीस होणारा काल्याचा उत्सव ठळक असतो. श्रीलक्ष्मेश्वर, श्रीवेताळ इ. या देवाच्या परिवार देवता जवळच आहेत. कामत गांवकर, कंटक, सिंसाणी, मराठे गांवकर इ. या देवाचे महाजन आहेत.

श्रीशांतादुर्गा (तिव्रें)

माशेलजवळच्या तिव्रें गांवांत हें देवालय आहे. राम ९ मी, वसंतपूजा, आषाढी सप्ताह इ. लहानसहान कांहीं उत्सव येथें होतात. त्यांत कार्तिकांतील दिवजांची जत्रा, मार्गशीर्षमधील काला व माघांतील स्थापनाउत्सव हे विशेष जमावाचे असतात. या देवालयाचे महाजन-— गांवकर हे असून त्यांचे पांच गट आहेत.

श्रीअनन्त (सावई-वेरें)

ही देवता अंत्रूज महालच्या व[illegible]हतीच्या वेळची असावी असें वाटतें. श्रीअनन्ताची मूर्ति सुन्दर असून दक्षिणेंतील अनन्तशयन येथील मूर्तीसारखी आहे. आपल्या राजवटींत कदंबराजांनीं ज्या कांहीं द्रविड ब्राह्मणांनां गोव्यांत आणलें त्यावेळीं त्यांनीं ही येथें आणणें शक्य आहे. श्रीअनंताचें देवालय सुंदर असून जवळची तळी स्वच्छ व प्रेक्षणीय आहे. तळीचें पाणी प्रदक्षिणेच्या खिडकींतूनहि गर्भागारांत घेतां येतें. पाण्याच्या दृष्टीनें देवालयाची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे.

या देवालयांत चैत्रपासून फाल्गुनपर्यंत निरनिराळे लहानमोठे उत्सव होत असतात. पण त्यांत काल्याचा उत्सव विशेष लोकजमावाचा असून तो मार्गशीर्ष शु॥ ३ येस होतो. या उत्सवांत नाट्यप्रयोगहि होतात.

या देवालयाच्या महाजनवर्गांत चांफाडकर, सावईकर, सिलकर, खेडेकर हे पंचद्रविडांतील, सिंगबाळ हे सारस्वत आणि वेरेंकर हे वैश्य आहेत.

या देवालयाच्या परिवार दैवतांत श्रीनारायणदेव, श्रीसांतेर, श्रीखांवीणदेवी इ. देवता आहेत. या श्रीसांतेरीचा काला मार्गशीर्ष व॥ ५ मीस होतो. खांवीणदेवीचें देऊळ अगदीं छोटें असून तिचा जागर मार्गशीर्ष शु॥ १ देस होत असतो.

श्रीशांतादुर्गा (वागुर्वे)

सदरील वेरें येथून वागुर्वे अगदीं जवळ आहे. तेथील श्रीशांतादुर्गेचें हें देवालय लहानसेंच असून वेताळ इ. परिवार देवताहि जवळच आहेत. वागुर्वेचा काला मार्गशीर्ष महिन्यांतच होत असतो.

श्रीनारायणदेव (सावई)

ही देवता वेरें येथील श्रीअनंताच्या परिवारांतीलच असून ती सावई येथें लहानशा देवळींत आहे.

श्रीदत्तात्रेय - (सावई)

ही श्रीदत्तमहाराजांची मूर्ति सुंदर असून देवालय हल्लींच बांधलेलें आहे. या मंदिरांत गुरु १२शी, श्रीदत्तजयंति वगैरे उत्सव होत असतात.

श्रीकेळंबिकादेवी (वळवई)

ही देवता पार्वती असावी असें वाटतें. देऊळ अगदीं छोटेंसेंच आहे. काला, शिमगा इ. उत्सव येथें होतात त्यांत कार्तिक अमावास्येची दिवजांची जत्रा जमावाची असून शिमगाहि गर्दीचा असतो. हा फाल्गुनमधील शेवटच्या शुक्रवारीं सुरू होतो. शिमग्यांत स्वारी, नाट्यप्रयोग इ. कार्यक्रम होतो. वळवईकर या देवीचे महाजन आहेत.

श्रीसांतेरी (वळवई)

श्रीसांतेरीचें देऊळ लहानसेंच आहे. या देवालयांत कांहीं लहान सहान उत्सव होतात, पण त्या सर्वांत शिमग्याचा उत्सव चांगला जमावाचा असतो. नाट्यप्रयोगहि प्रेक्षणीय होतात. वैश्य वर्गातील व नाईक समाजांतील कांहीं गृहस्थ या देवीचे महाजन आहेत.

श्रीमंदोदरी (वेतकी)

माशेल येथून पाऊण कोसावर असलेल्या वेतकी गांवांत हें देवालय आहे. देवी मंदोदरीची मूर्ति चतुर्भुज व कृष्णशिलेची असून स्वरूप पार्वतीचें आहे. ही ग्रामदेवी असल्यानें देवालयांतील बहुतेक सर्व उत्सवांचा खर्च ग्रामसंस्थेंतून होतो. खास देवालयाचें उत्पन्न म्हणजे अंदाजें दोनशें रुपये व तें पूजेअर्चेसाठींच खर्च होऊन जातें. येथील मुख्य जत्रा म्हणजे काला. हा उत्सव मार्गशीर्ष व॥ ४ थीस (संकष्टीरोजीं) होतो. काल्याचा उत्सव वास्तविक परिवार दैवतांतील श्रीनारायणदेवाचा; पण त्याची पालखी मंदोदरीच्या देवळांत येऊन तेथें श्रीनारायणदेवासमोर काल्यास सुरवात होते. देवालयाकडून दिसणाऱ्या डोंगरीवर स्वच्छ पाण्याची एक लहानशी तळी असून तिथेंच प्राचीनकालीं श्रीमंदोदरीचें मूलस्थान होतें असें सांगतात. देवालय ठीक आहे.

वेतकी गांवांत दरसाल एकदां शेतकापणीच्या वेळीं दीड दिवसपर्यंत गांवचे सर्व लोक अन्नाशिवाय फक्त फराळावर राहतात. हा कापणीचा दिवस श्रीमंदोदरीचा कौल घेऊन ठरविण्यांत येतो.

सिंगबाळ हे सारस्वत व गांवकर, फट्टे इ. मराठे असे वेतकी ग्रामसंस्थेचे वर्गी या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीआदिनाथ (उसगांव)

हें श्रीमहादेवाचें लिंग असून त्याची स्थापना या भागांत नाथसंप्रदायाचा प्रवेश झाला त्यावेळीं झाली असावी असें दिसतें. श्रीआदिनाथ हाच उसगांवचा ग्रामदेव आहे. देऊळ लहानसेंच, पण त्याची रचना बरी आहे. या देवालयांतील मोठा उत्सव म्हटला म्हणजे काल्याचा व तो मार्गशीर्ष वद्य सप्तमीस होतो.

श्रीमहादेव, श्रीकेलंबिका, श्रीवेताळ इ. श्रीआदिनाथाच्या परिवार देवता असून त्या त्याच्याजवळच आहेत.

उसगांवकर हे सारस्वत आणि गांवकर इ. मराठे या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीमोरजाय (मोरजी)

मोरजी हें गांव पेडणें महालांत असून शिवोलीच्या नदीपलीकडे आहे. गांवच्या मध्यभागीं श्रीमोरजाय देवीचें देवालय आहे. देवालय ठीक असून सभामंडप विस्तीर्ण आहे. या देवीचें स्वरूप महिषासूर मर्दिनीचें असून ती अष्टभूजा आहे.

कांहीं वर्षांपूर्वी कायसुवच्या नदींत महासागराजवळ मच्छिमारी लोकांनां त्यांच्या जाळ्यांत ही मूर्ति सांपडली. तेथून त्यांनीं ती गांवांत आणली आणि गांवकऱ्यांच्या स्वाधीन केली. लगेच गांवाजवळच्या उंचवट्यावर एक छोटेंसें देऊळ बांधून तेथें मूर्तीची स्थापना करण्यांत आली. पुढें कांहीं कालानें आजचें देऊळ बांधण्यांत आलें आणि त्यांत मोठ्या थाटानें तिची पुनर्स्थापना झाली.

राम ९ मी, आषाढी सप्ताह, नवरात्र-दसरा, काला, शिमगा वगैरे अनेक उत्सव या देवालयांत होतात, पण त्यांत मार्गशीर्ष शु॥ १३ शीचा जत्रोत्सव विशेष जमावाचा असतो. शिमग्याच्या उत्सवांत पालखी, स्वारीवादन, नाट्यप्रयोग असा कार्यक्रम असतो. दर तीन वर्षांनीं व तशीच अडचण आल्यास पांच वर्षांनींतरी कलश-उत्सव होतो. या उत्सवाच्या समाप्तीच्या प्रसंगीं पेरनी जातीचा एक ठराविक इसम महिषासुराचें सोंग घेतो व श्रीमोरजायदेवी त्याला मारण्यात पुढें जाते. त्या महिषासुराला ठार केल्यावर कलश फिरतो.

देवालयाचें उत्पन्न ठीक असून त्या मानानें खर्चहि आहे.

गांवकर (मराठे), संजगिरी (सारस्वत), जोशी (द्रविड) इ. श्रीमोरजायदेवीचे महाजन आहेत.

श्रीसांतेरी, ब्राह्मणपुरुष, सत्पुरुष, भैरव इ. देवता श्रीमोरजायदेवीच्या परिवारांत आहेत. श्रीसांतेरी हीच मोरजी येथील मूळची व ग्रामदेवी आहे.

श्रीभूमिका (मोरजी)

ही शिवोली येथील ग्रामदेवी असून तिला पूर्वी श्रीसांतेर असें नांव होतें. सन १५७३ सालीं बार्देसच्या ख्रिस्तीकरणप्रसंगीं तिचें स्थलांतर मोरजी येथें झालें. देवालय लहानसेंच आहे. मार्गशीर्ष वद्य ४ थीस या देवीचा जत्रोत्सव होतो. नाईक, थळी, मोये असे शिवोलीचे गृहस्थ व मराठे गांवकर वगैरे या देवीचे महाजन आहेत.

श्रीवेताळ (चोपडें)

ही श्रीवेताळमूर्ति बरीच मोठी व उंच असून मूळची बार्देसची आहे. शिवोली जवळ असल्यानें ती तेथीलच असावी असें दिसत असलें, तर मूळच्या शिवोलींतील देवळांमध्यें वेताळाचें नांव नाहीं. ख्रिस्तीकरणप्रसंगीं शिवोलींत सांतेर, गणेश, रवळनाथ, देवी हींच देवळें असल्याचा उल्लेख मिळतो. त्यावरून शिवोलीजवळच्या दुसऱ्या कोणत्या तरी गांवांतील ही मूर्ति असावी असें वाटतें.

हें देऊळ चोपडें येथें तारीजवळ असून मोरजीला लागूनच चोपडें गांव आहे. मार्गशीर्ष महिन्यांत श्रीवेताळाची जत्रा होते. गांवकर, गावीत इ. श्रीवेताळाचे महाजन होत.

श्रीभगवती (मांद्रें)

मोरजी येथून जवळच असलेल्या मांद्रें गांवची ही ग्रामदेवी आहे. देऊळ सुंदर व अगदीं रस्त्यावरच आहे.

चैत्रापासून फाल्गुनपर्यंत येथें लहानमोठे निरनिराळे उत्सव होतात. आषाढी व कार्तिकी सप्ताहांत भजनाचा कार्यक्रम ठीक होतो. नवरात्र, दसरा हेहि उत्सव प्रेक्षणीय होतात, पण विशेष गर्दीचा उत्सव म्हटला म्हणजे जत्राच व ती मार्गशीर्ष शु॥ ९ मीस होते.

श्रीसप्तेश्वर, श्रीरवळनाथ इ. श्रीभगवतीच्या परिवार देवता आहेत. देन, देसाई, प्रभु वगैरे या देवीचे महाजन आहेत.

श्रीभूमिका (मांद्रें)

ख्रिस्तीकरणाच्यावेळीं सन १५७३ सालीं

बार्देसच्या आसगांवहून ज्या देवता मांद्रें येथें आणण्यांत आल्या व त्या जेथें स्थापन केल्या त्या स्थलास 'आसगांववाडा' असें नांव प्राप्त झालें. श्रीभूमिकेचें दैवत वारुळाच्या स्वरूपांत असून जवळच श्रीमहादेवाचें लिंग आहे. हल्लीं श्रीभूमिका-देवीची संगमरवरी सुंदर मूर्ति बनवलेली आहे.

पूर्वीचा रवळनाथ– हेंहि देऊळ जवळच असून ही मूर्ति देवीसोबतच येथें आणली.

रवळनाथ— ही मूर्ति नंतर स्थापन झालेली आहे. पण याच देवाची तेथें विशेष प्रसिद्धी आहे.

भगवती— देवीची मूर्ति पाषाणी आहे. **सती, भूतनाथ, सत्पुरुष, म्हाळेपुरुष** इ. परिवार देवतांच्या देवळ्या जवळ जवळ आहेत.

नवरात्र, दसरा, तुलसीविवाह इ. येथें होणाऱ्या उत्सवांत प्रमुख उत्सव म्हणजे जत्रेचा. ही जत्रा मार्गशीर्ष शु॥ ७ मीस होते. त्यांत शिविका उत्सव, दशावतारी काला इ. कार्यक्रम असतो. ८ मी दिवशीं सकाळीं गोपाळकाला होऊन रात्रीं गोंधळ होतो. हा गोंधळी मालवणच्या सिंधुदुर्ग किल्ल्यांतील असून भगवतीच्या देवळासमोर उफाच्या साथींत त्याचा गोंधळाचा कार्यक्रम होतो.

या देवस्थानांत प्रसाद विशेषत: नवीन (चव्हाट्यावरील) रवळनाथास लावतात व ते सालईच्या पानाच्या तुकड्यांचे असतात.

प्रभु, प्रभु दलाल, प्रभु सातकर, मुदर्थ किंवा मुद्रस, शेटये, तोरणे, शेणै, शेणई भोंसुले इ. या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीभूमिका (मांद्रें)

ही देवी प्राचीनकालीं बार्देशच्या हणजूण येथें होती. ख्रिस्तीकरणापूर्वी येथें वेताळ, सांतेरी व भगवती या देवता असल्याचा उल्लेख मिळतो. त्यांतील सांतेर हीच ही भूमिकादेवी आहे. हणजूणच्या या देवतांमुळें या देवस्थानच्या भागास 'हणजूणवाडा' हें नांव मिळालें आहे. देऊळ लहानसेंच असून निरनिराळे उत्सव येथें होतात. त्यांत जत्रोत्सव विशेष जमावाचा व तो मार्गशीर्ष कृ. ६ ष्टी रोजीं होतो.

श्रीवेताळ, रवळनाथ इ. देव श्रीभूमिकेच्या परिवार दैवतांत आहेत.

श्रीभूमिका (मांद्रें)

या देवीचा जत्रा–उत्सव मार्गशिर्ष कृ. १ दा रोजीं होतो. मराठे सावंत या देवीचे महाजन आहेत. या स्थानास 'सावंतवाडा' म्हणतात.

श्रीभूमिका - (आशें)

मांद्रें येथील आशें वाड्यांत हें देवस्थान आहे. मार्गशिर्ष कृ. १ दा रोजीं या देवीची जत्रा असते. मराठे सावंत या देवीचे महाजन आहेत.

श्रीरवळनाथ (हरंबल)

मांद्रेंहून 'हरंबल' जवळ आहे. श्रीरवळनाथाची मूर्ति मूळची सावंतवाडीची असें म्हणतात. येथील उत्सवांत मार्गशिर्ष शु॥ ५ मीचा जत्रोत्सव विशेष जमावाचा असतो. सांतेरी, वेताळ, नितकारी, गिरोबा असे परिवार देवहि जवळच आहेत. केरकर, संजगिरी इ. या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीशांतादुर्गा (पालयें)

'हरंबलाल' लागूनच 'पालयें' आहे. हें देऊळ लहानसेंच असून गर्भागारांत वारूळ आहे. मार्गशीर्ष शु॥ १३ शीस देवीची जत्रा होते. भगवती, वेताळ, रवळनाथ या तिच्या परिवार देवता असून परब, तिळवे इ. मराठा वर्गांतील लोक महाजन आहेत.

श्रीखळनाथ (केरी)

केरी (पेडणें) हें इतिहासप्रसिद्ध बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर यांचें जन्मगांव असून त्यांच्या वंशजांच्या वाड्याजवळच हें खळनाथ-देवालय आहे. मंदिर लहानसेंच असलें, तरी सभामंडप विस्तीर्ण आहे. कार्तिक महिन्यांत खळनाथाची जत्रा असते. केरकर या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीमारुती (केरी)– एका लहानशा देवळांत या मारुतीची मूर्ति आहे.

श्रीदत्तात्रेय (केरी)– ग्रामोपाध्ये जोशी यांच्या घरासमोरच हें छोटें मंदिर आहे.

श्रीकमलेश्वर (कोरगांव)

हें शिवलिंग असून तें उंच व सुंदर आहे. देवळाची रचना बरी आहे. येथील रामनवमीचा उत्सव नाट्यप्रयोग इ.मुळें प्रेक्षणीय असतो. आषाढांत भजनीसप्ताह, कार्तिक पौर्णिमेला रथोत्सव, शिवरात्र, शिमगा (नाट्यप्रयोग) इ. उत्सव येथें होतात. कार्तिक वद्य ५मीचा दशावतारी काल्याचा उत्सव येथें मुख्य जत्रेचा असतो. भूमिका, नारायण, साळेश्वर, प्रयाग-माधव, क्षेत्रपाल वगैरे येथील परिवार देवता आहेत. पेडण्यापासून कोरगांवला सरळ रस्ता आहे.

श्रीभगवती (पार्से)

या देवतेचें ध्यान पार्वतीचें असून मूर्ति कृष्णशिलेची आहे. देवालय व त्याचा प्राकार विस्तीर्ण आहे. या देवालयांत निरनिराळे उत्सव होतात. त्या सर्वांत कार्तिक अमावास्येचा दशावतारी काला प्रसिद्ध आहे. हाच येथील जत्रोत्सव होय. शिमग्याचा उत्सवहि नाट्यप्रयोग वगैरेमुळें प्रेक्षणीय असतो. ब्रह्मदेव, विष्णु, महेश, खळनाथ, भूमिका, हरिहरेश्वर इ. येथें परिवार देवता आहेत.

श्रीहरिहरेश्वर मंदिरांत रा. हरी जिवाजी पार्सेकर देसाई यांच्याकडून महाशिवरात्रोत्सव होत असतो.

पुष्करणींत मध्यभागीं श्री. सौ. सगुणादेवी देशप्रभु यांच्यातर्फे स्थापन झालेलें बाणलिंगस्थान सुंदर आहे.

पार्सेकर देसाई, प्रभु, लाड, पडियार देसाई, नाईक देसाई इ. या देवस्थानचे महाजन आहेत.

या देवस्थानच्या प्राकाराच्या महाद्वारासमोरील सृष्टिसौंदर्य फार सुंदर आहे.

श्रीभगवती (तुयें)

पार्सेजवळच्या तुयें येथील झळोलें वाडींत हें देवस्थान आहे. देऊळ लहानसेंच आहे. या देवस्थानचा मुख्य उत्सव म्हटला म्हणजे फाल्गुन वद्य ८मी ते अमावास्येपर्यंत होणारा शिमग्याचा उत्सव होय. श्रीवेताळ इ. कित्येक परिवार देवताहि येथें आहेत.

श्रीभगवती (पेडणें)

भगवतीचें हें देवस्थान पेडणें बाजारच्या मध्यभागीं आहे. देवालय प्रशस्त असून सभामंडपहि विस्तीर्ण व सुंदर आहे. मूर्ति कृष्णशिलेची व तिचें ध्यान पार्वतीचें आहे. चैत्रापासून फाल्गुनपर्यंत येथें विविध उत्सव होत असतात.

त्या सर्वांत दसऱ्याचा व फाल्गुन वद्य १देपासून ५मी पर्यंतचा शिमग्याचा हे उत्सव जमावाचे असतात. दसरा-उत्सव म्हणजे तर येथील जत्राच होय. या उत्सवास आश्विन शु॥ १०मीला सुरवात होऊन तो १५मेपर्यंत चालतो. आसपासचे पुष्कळच लोक या उत्सवास येथें जमतात. पेडणें येथील दसरा गोव्यांत फार प्रसिद्ध आहे.

श्रीरवळनाथ — ही पेडणेची मुख्याधिकारी ग्रामदेवता असून दसरोत्सवाचा तरंग, अवसर इ. दैविक कार्यारंभ येथेंच होतो. रवळनाथाचें देवालयहि चांगलें विस्तीर्ण आहे. या देवालयाची रचना हेमाडपंती थाटाची आहे.

नारायण, महादेव, सांतेरी, माउली इ. या देवस्थानच्या परिवार देवता आहेत.

श्रीमूळवीर (मालपें) पेडणें येथून हें स्थान अगदीं जवळच आहे. श्रीभगवती देवालयांतून शिमग्याच्या उत्सवांत येथें 'स्वारी' जाते. दरसाल गुढीपाडव्याला येथें लोकजमाव होतो. लोलयें येथील गौ. सा. देसाई यांचें मूळ स्थान हेंच असें म्हणतात. देशप्रभु, शेणवी देसाई इ. या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीदत्तमंदिर (पेडणें)

श्रीमंत रावराजे देशप्रभु यांच्या वाड्याला लागूनच हें त्यांचें दत्तमंदिर आहे. मंदिराची रचना सुंदर आहे. हें दत्तस्थान बऱ्याच कालापूर्वीचें असून गर्भागारांत श्रीदत्तमहाराजांच्या पादुकांची स्थापना करण्यांत आलेली आहे. उत्सवमूर्ति चांदीची मोहक आहे. आश्विन महिन्यांत गुरुद्वादशीचा आणि मार्गशीर्षांत दत्तजयंतीचा असे या मंदिरांत प्रेक्षणीय उत्सव होतात. दत्तजयंति-उत्सव विशेष थाटांत होतो. जयंतिउत्सवास दहा दिवसपर्यंत कीर्तनाचा कार्यक्रम असून दहाव्या दिवशीं दत्तजन्म व नंतर चांदीच्या पालखींतून श्रीदत्तमहाराजांची मिरवणूक असते. जयंतीच्या दुसऱ्या दिवशीं रावराजे यांच्या वाड्यांत त्या उत्सवाबद्दलचें मोठें संतर्पण असतें.

श्रीदत्तमंदिर (आरोबा)

पेडणेचे इतिहासप्रसिद्ध देसाई, केशव नाईक यांचे हल्लींचे वारस आरोबेकर देसाई यांच्या वाड्यासमोरच हें छोटें दत्तमंदिर आहे. येथें दत्तजयंतिउत्सव थाटांत होतो.

श्रीमाउली (धारगळ)

पेडणें महालांतील धारगळ येथें हें स्थान असून या देवीच्या देवालयाजवळच धारेश्वर, रवळनाथ, सांतेरी या देवतांचींहि मंदिरें आहेत. धारेश्वर हें शिवलींग आहे. माउलीच्या देवळांत लहानसहान कित्येक उत्सव होतात. पण जत्रेचा मुख्य उत्सव म्हटला म्हणजे मार्गशीर्षमधील पंचमीस होणारा

उत्सव होय. या उत्सवास चांगला लोकजमाव असतो.

श्रीकालभैरव (धारगळ)

सदरील देवालयांच्या जवळपासच हेंहि देवालय असून यांतहि निरनिराळे उत्सव होत असतात. श्रीकालभैरव देवस्थानचे प्रमुख महाजन म्हटले म्हणजे महात्मे हे होत.

श्रीमहालक्ष्मी (धारगळ)

श्रीकालभैरव देवालयाच्या जवळच श्रीमहालक्ष्मी देवीचेंहि एक मंदिर आहे. ही महालक्ष्मी मूळ बार्देसच्या सिरसई येथील आहे.

श्रीशांतादुर्गा (धारगळ)

या देवतेची स्थापना बऱ्याच कालापूर्वी म्हापशें येथें झाली होती. तिची कृष्णशिलेची मूळ मूर्ति संकेश्वर येथील एका कारागिराकडून करून आणली होती. आज म्हापशें येथें ज्या जागीं मोठें ख्रिस्ती प्रार्थनामंदिर आहे त्याच जागीं त्यावेळीं शांतादुर्गेचें देऊळ होतें. प्राकार मोठा असून देवीची पुष्करणी कोचकरवाडींत होती. सन १५६७ सालीं ख्रिस्तीकरणप्रसंगीं श्रीशांतादुर्गेची मूर्ति धारगळ येथें नेण्यांत आली आणि धारगळच्या देसाई यांच्याकडून मिळालेल्या जागेंत देऊळ बांधून तेथें तिची स्थापना केली. पुढें खलप घराण्याकडून या देवस्थानची बरीच सुधारणा झाली.

देवस्थानची रचना सुन्दर असून, मुख्य मंदिरालगतच्या अग्रशाला त्या टुमदार मंदिरास साजेशा, सुंदर व सोयीस्कर अशा आहेत. भोंवतालचें वातावरणहि रम्य आहे. अर्धचन्द्राकृति नदीचा येथून दिसणारा देखावा मनोहर आहे. म्हापशेंची ही ग्रामदेवी असल्यानें म्हापशें येथील सगळ्याच रहिवाशांची देवीवर फार भक्ति आहे. याच देवीची एक प्रतिमा म्हापशें येथें खलपवाड्यांतहि आहे.

वैश्य परिषदेचें गोव्यांतील प्रसिद्ध अधिवेशन कांहीं वर्षांपूर्वी याच देवस्थानांत धारगळ येथें भरलें होतें.

श्रावण-सोमवार, काला, शिमगा वगैरे येथें बरेच प्रेक्षणीय उत्सव होतात. उत्सवमूर्ति मोहक असून रौप्यशिबिकेंतून निघालेली तिची मिरवणूक पाहण्यास प्रेक्षकांनां फार समाधान वाटतें. सदरील उत्सवांनां संतर्पणाचीहि जोड असते. सर्व उत्सवांत विशेष गर्दीचा उत्सव म्हणजे शिमगा हा असून तो फाल्गुन व॥ ११शीपासून अमावास्यापर्यंत चालतो.

या देवस्थानच्या महाजनवर्गात आरंभीं ठराविकच वैश्य गृहस्थांचीं नांवें होतीं. मागाहून त्यांचा क्रमांक २१ झाला आणि आतां म्हापशें ग्रामस्थ मंडळींतील वैश्य, सारस्वत वगैरे गृहस्थांनां महाजनवर्गात नोंद करून घेण्याची सुधारणा करण्यांत आली आहे.

धारगळचें हें श्रीशांतादुर्गा देवस्थान कोलवाळच्या तारीपलीकडच्या माखजनहून पेडण्याकडे गेलेल्या रस्त्यापासून जवळच आहे. देवस्थानापर्यंतहि एक छोटा रस्ता सदर मुख्य रस्त्यापासून गेला आहे.

श्रीराममंदिर (माखजन)

माखजनपासून पेडण्यास जाण्याच्या रस्त्यावरच हें देऊळ आहे. रचना साधीच असून आंतील मूर्ति प्रेक्षणीय आहे. या मंदिरांत रामनवमीचा उत्सव विशेष जमावाचा असतो.

श्रीराममंदिर (कोलवाळ)

प्राचीनकालीं कोलवाळ येथें भैरव, रवळनाथ, रामनाथ, गौतम व दाड या देवांचीं देवालयें होतीं. पण ख्रिस्तीकरणप्रसंगीं त्या देवता बेपत्ता झाल्या. श्रीराममंदिर हें अगदीं अलीकडचेंच देऊळ आहे. देऊळ लहानसेंच पण सभामंडप विस्तीर्ण आहे. याच सभामंडपाचा मराठी शाळेस उपयोग होत आहे.

गर्भागारांतील राममूर्ति सुंदर आहे. या देवळांत रामनवमीचा उत्सव विशेष जमावाचा होतो. चैत्र शु॥ १देपासून ९मीपर्यंत नऊ दिवस कीर्तन व नवमीला रामजन्म सोहळा होतो. या उत्सवास दोन नाट्यप्रयोगांचीहि जोड असते.

श्रीसांतेरी (विरनोडें)

विरनोडें येथें या दवीचें लहानसेंच देवालय आहे. येथें लहानसहान जे उत्सव होतात त्यांत काल्याचा उत्सव विशेष जमावाचा असतो.

श्रीलक्ष्मीनारायण (शिवोली)

शिवोली येथील या लक्ष्मीनारायणाच्या मूर्तीच्या स्थापनेला ३० वर्षें झालीं. प्राचीन कालीं या गांवांत सांतेरी, गणेश, रवळनाथ, देवी वगैरे देवतांचीं देवळें होतीं; पण ख्रिस्तीकरणप्रसंगीं त्यांचें स्थलांतर करावें लागल्यानें बराच कालपर्यंत येथें देवालय नव्हतें. ती उणीव श्रीलक्ष्मीनारायण-देवतेनें भरून निघाली आहे. श्रीलक्ष्मी-नारायणाची मूर्ति संगमरवरी व मनोहर आहे.

या देवालयांत नवरात्र, कार्तिक-पौर्णिमा, राम ९मी, अक्षयतृतिया इ. उत्सव होतात. सगळ्यांत रामनवमीचा उत्सव विशेष जमावाचा होतो.

मोये, नायक, थळी, कामत रेडकर, तारकर वगैरे गौड सारस्वत ब्राह्मण या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीशांतादुर्गा (पिलर्ण), **माउली** (मेण-कुरें), **माउली** (मोपा) हीं अगदीं छोटीं देवळें आहेत.

श्रीमारुती (म्हापशें)

आज जेथें मारुतीचें देऊळ आहे तेथें शंभर सव्वाशें वर्षांपूर्वीं दर शनिवारीं मारुतीची तसबीर ठेवून कांहीं इसम भजन करीत. पुढें कांहीं वर्षांनीं म्हापशें येथें आलेल्या सखारामबुवा नांवाच्या दासपंथी साधूनें त्यांना लालचंदनाची मारुतीची मूर्ति दिली. तिचेंच पुढें भजन-पूजन सुरू झालें. सांप्रत मारुतीच्या देवळांत तीच मूर्ति असून तिला धातूचें कवच चढविलें आहे. ही मूर्ति मिळाल्यानंतर मधलेवाडकर वैश्यसमाजानें वर्गणी जमवून प्रस्तुतचें लहानसेंच पण व्यवस्थित देऊळ बांधलें. या देवळांत रोज रामदासीसंप्रदायी भजनाचा कार्यक्रम चालतो. देवस्थानांत त्रिकाल झडणारा चौघडा कै. स. स. नाटेकर यांच्या कायम निधीच्या व्याजांतून चालतो. श्रावणमधील शनिवार, गुरुद्वादशी, विजयादशमी इ. जे उत्सव या देवालयांत होतात त्या सर्वांत हनुमान-जयंतीचा उत्सव विविध कार्यक्रमांमुळें विशेष प्रेक्षणीय होतो. मधलेवाडकर वैश्य या देवालयाचा महाजनवर्ग होय.

श्रीलक्ष्मी-नारायण (म्हापसें)

हें सुंदर देवालय शहरांत मध्यभागींच आहे. इतिहासकालांत म्हापसें येथें सांतेरी व गणेश या देवांचीं दोन मंदिरें असल्याचा उल्लेख मिळतो. ख्रिस्तीकरणाच्या वेळीं त्यांचें स्थलांतर झालें. ही सांतेरी म्हणजेच आजची धारगळ येथील श्रीशांतादुर्गा होय. श्रीमारुतीप्रमाणेंच म्हापसेंची श्रीलक्ष्मीनारायण देवताहि अलीकडील आहे. लक्ष्मीनारायणाची मूर्ति संगमरवरी व सुंदर असून ती वै. पुंडलीक अनंत केणी यांनीं मुंबई येथून आणून देवालयास आदरपूर्वक अर्पण केली. स. १९२९ सालीं फाल्गुन शु॥ ७ मीस मूर्तीची स्थापना झाली.

कांहीं कालापूर्वी नवरात्र-उत्सवाच्या दिवसांत लक्ष्मीनारायणाची मातीची मूर्ति बनवून तिचें पूजन व उत्सव साजरा करीत आणि कोजागरीच्या दिवशीं ती विसर्जन करीत. हा उत्सव पुरोहित यांच्या माडीवर होई. त्यानंतर श्रीलक्ष्मीनारायणाचें स्वतंत्र देऊळ बांधावें अशी इच्छा होऊन त्या दिशेनें लोकांकडून प्रयत्न सुरू झाले व प्रस्तुतचें टुमदार देवालय अस्तित्वांत आलें. देवालयाची रचना आधुनिक पद्धतीची आहे.

या देवालयांत जे कित्येक उत्सव होतात त्यांत लक्ष्मीपूजनाचा उत्सव विशेष सुंदर असतो. या उत्सवाच्या ५व्या दिवशीं पालखीची प्रेक्षणीय मिरवणूक असते.

देवालयांतील सर्व कृत्यें विशेषत: वर्गणीवरच चालतात.

म्हापसें येथील सर्व गौड सारस्वत रहिवासी या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीदत्तात्रेय

म्हापसें शहराच्या उंचवट्यावर हें श्रीदत्तमंदिर आहे. गर्भागारांत श्रींच्या पादुका आणि सफेत सुंदर मूर्ति आहे. मंदिर लहानसेंच पण व्यवस्थित असून सर्व खर्च वर्गणीनेंच चालतो. गुरु १ दा, गुरु १२ शी व जयंति असे तीन उत्सव येथें होतात. त्यांत दत्तजयंतीचा उत्सव विशेष जमावाचा असतो. श्री. सिरसाट, श्री. कवळेकर, श्री. नाटेकर इ. या मंदिराचे चालक आहेत.

श्रीसांतेरी

म्हापसें येथील खोर्ली वाडींत हें देऊळ आहे. इतिहासकालांत येथें सांतेरी व अजनाथ अशीं दोन देवळें असल्याचा उल्लेख मिळतो; तथापि ख्रिस्तीकरणाच्या वेळीं त्यांचें स्थलांतर झालें. आजचें सांतेरीचें देऊळ हल्लीचें आहे. या देवालयांत होणाऱ्या उत्सवांत काल्याचा उत्सव मुख्य असून तो कार्तिक महिन्यांत होतो. वैश्य, कांसार वगैरे या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीबोडगेश्वर

म्हापसेंच्या मोटरस्टँडजवळ शेतांत ही देवळी आहे. देवळीच्या सभोंवती हल्लीं कटडा घातलेला आहे. याला ग्रामरक्षक असें मानण्यांत येऊन नवस वगैरेचें बरेंच प्रस्थ आहे. अलीकडे बोडगेश्वराची बरीच प्रसिद्धि झालेली असल्यानें जत्रेस मोठा जमाव होतो. ही जत्रा पौष शु॥ १४ शीस होते.

श्रीशांतादुर्गा (कांदोळी)

बार्देस महालांतील कांदोळी गांवांत हें देवालय

नवीनच बांधलेलें असून तें आधुनिक पद्धतीचें व व्यवस्थित आहे. येथील प्राचीन कालीन श्रीशांतादुर्गेची मूर्ति ख्रिस्तीकरणाच्यावेळीं भतग्रामच्या नांदोडें येथें नेण्यांत आली होती. आजहि तेथें तिचें देवालय आहे. कांदोळी येथील ग्रामस्थांच्या मनांत पुनः देवीची गांवांत आणून स्थापना करावी असें आलें आणि त्यांनीं अत्यंत भावनेनें तिची प्रतिमा येथें आणली. नवीन देवालयाची इमारत श्री. श्रीधर शेणवी भोबे काकुले यांनीं स्वखर्चानें बांधून देवस्थानास अर्पण केली आहे.

या देवालयांतील मुख्य उत्सव म्हणजे काल्याचा व तो मार्गशीर्ष वद्य द्वितीयेस होतो.

कांदोळी येथील सर्व हिंदु ग्रामस्थांचा या देवालयाच्या महाजनवर्गात समावेश आहे.

श्रीशांतादुर्गा (नेरूल)

कांदोळीच्या अलीकडे असलेल्या नेरूल येथें हें देवालय आहे. नेरूल येथें ख्रिस्तीकरणापूर्वी सांतेरी, क्षेत्रपाल, रवळनाथ हे देव असल्याचा उल्लेख मिळतो. स. १५७३सालीं त्यांचें स्थलांतर पेडणें महालांतील मांद्रें येथें करण्यांत आलें होतें. सदर सांतेरी हीच शांतादुर्गा होय. शांतादुर्गेच्या मूळच्या देवालयाच्या जागीं आज नेरूलला ख्रिस्ती प्रार्थनामंदिर आहे. सन १९१० सालीं नेरूलच्या हिंदु रहिवाशांच्या मनांत देवीला पुनः गांवांत आणण्याची फार इच्छा झाली व त्याप्रमाणें श्रीशांतादुर्गेची मूर्ति मांद्रें येथून पुनः इकडे आणण्यांत आली. हें नवीन देवालय लहानसेंच पण व्यवस्थित आहे.

नवीन पद्धतीनें स्वखर्चानें बांधून देवालयास अर्पण केलेली वै. वासुदेव रामकृष्ण ऊर्फ बाळा पै धुंगट यांची अग्रशाला सुंदर व व्यवस्थित आहे. विवाहादि समारंभांसाठीं तर तिचा फार चांगला उपयोग होत आहे.

या देवालयाचा मुख्य उत्सव म्हणजे काला व तो मार्गशीर्ष वद्य पंचमीस होतो.

नेरूल आणि वेरें येथील ब्राह्मणवर्गातील लोक या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीविठ्ठलमंदिर (वेर्तीं)

या मंदिरांत भजन सप्ताह इ. कार्यक्रम होत असतात.

श्रीमारुतीमंदिर (विठ्ठोण)

वेर्तीं येथून जवळच विठ्ठोण गांवच्या विर्लोसवाडींत हें मंदिर आहे. मंदिरांत हनुमानजयंति-उत्सव विशेष जमावाचा होतो.

श्रीशांतादुर्गा (नांदोडें)

अस्नोडें येथून साधारण तीन मैलांतर असलेल्या नांदोडें गांवांत **श्रीशांतादुर्गा कळंगुटकरीण व श्रीशांतादुर्गा कांदोळकरीण** अशीं देवीचीं दोन देवळें आहेत. एकीचें मूलस्थान कळंगूट व दुसरीचें कांदोळी हें होय. कांदोळीच्या नवीन देवालयांतील देवीची प्रतिमा याच कांदोळकरीण देवीची आहे.

कांदोळकरीण देवीचे महाजन कांदोळीचे मूळचे रहिवासी; तसेच कळंगुटकरणीचे कळंगूटचे मूळचे ग्रामस्थ होत. दोन्हीं देवालयें जवळ जवळच आहेत.

या देवालयांतून निरनिराळे अनेक उत्सव होतात. त्यांत मार्गशीर्षांतील काल्याचा उत्सव

मोठा असतो. कांदोळकरणीचा काला मार्गशीर्ष वद्य द्वितीयेस होतो.

श्रीव्यंकटेश (नांदोडें)

नांदोडें येथील व्यंकटेशाचें देवालयहि सदरील दोन्हीं देवळांच्या जवळच असून त्याच्या महाजन-वर्गांत द्रविड ब्राह्मण आहेत. श्रीव्यंकटेश मंदिरांत निरनिराळे कित्येक उत्सव होत असतात.

श्रीकालिकादेवी (कांसारपाल)

अस्नोडें येथून साधारण तीन मैलांच्या अंतरावर कांसारपालचें हें श्रीमहामाया कालिकादेवीचें स्थान आहे. मुख्य रस्त्यावरून दोन खांबांमधून देव-स्थानकडे जाण्याचा रस्ता गेला आहे. या देवीचें मूलस्थान कोठें होतें हें निश्चित कळत नाहीं. देवीची मूर्ति कृष्णपाषाणी, चतुर्भुज व हातांत त्रिशूल, कमल इ. आहे. मूर्तीच्या पायांशीं सिंह कोरलेला आहे. गर्भागार व्यवस्थित असून चौक विस्तीर्ण व देवालय टुमदार आहे. आंत प्रवेश-ल्यावर गर्भागारापर्यंत तीन दरवाजे चांदीनें मढवलेले दिसतात. गर्भागारांतील देवमंडप चांदीचा असून त्यावरील नक्षीकाम सुंदर आहे.

देवीची उत्सवमूर्ति सोन्याची असून तिचें स्वरूप मोहक आहे. निरनिराळ्या प्रकारचे तिचे सुंदर दागिने असून त्यांची किंमत पन्नास हजारां-वर होईल असें वाटतें. आकर्षक सजावटीचा देवीचा रत्नजडित मुकुट आहे. त्याचें मूल्य अंदाजें दहा हजारांवर होईल.

देवालयाच्या आंतील रचनेप्रमाणेंच बाह्य रचनाहि ठीक आहे. डाव्या व उजव्या दोन्हीं बाजूंनीं प्रशस्त अग्रशाला आहेत. देवळासमोरचें श्री. घनःश्याम शं. वेर्लेकर यांचें कठडेकामहि चांगलें आहे. विस्तीर्ण सभामंडप व वरच्या बाजूनें नगारखाना आहे. प्राकारांत महाद्वारा-लगतच देवस्थान-व्यवस्थापक-मंडळाचें कार्यालय आहे.

देवालयाचें वार्षिक उत्पन्न अंदाजें तेरा हजार रुपये असून त्यांत कचऱ्याचें सात हजार रुपये आहे. (सोन्याचांदीच्या कारागिरीच्या वेळीं जो कचरा पडतो तो प्रत्येक कारागीर एकत्र करून ठेवतो व या देवस्थानतर्फे तो घेण्याचा मक्ता जो इसम स्वीकारतो त्यालाच देण्यांत येतो. त्याच कचऱ्याचें सदर सात हजारांचें उत्पन्न होय.)

दसरा, वनभोजन, काला इ. येथें जे उत्सव होतात त्यांत विशेष महत्वाचा व जमावाचा असा मोठा उत्सव म्हणजे शिमग्याचा. फाल्गुन वद्य १०मी पासून गुढी-पाडव्यापर्यंत त्या उत्सवाचे कार्यक्रम असतात. १३शी ते १६ पर्यंत चार दिवस नाट्यप्रयोगहि होतात. पालखी, लालखी, मयूरासन, रथ अशा मिरवणुकी असतात. जेवणाचीहि व्यवस्था ठीक असते.

श्रीभूमिका, रवळनाथ, पालनाथ इ. परिवार देवतांच्या देवळ्या जवळपास आहेत.

गोव्यांतील सर्व दैवज्ञ ब्राह्मण या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीशर्वाणी (अडवलपाल)

अस्नोडें-डिचोलीच्या मुख्य रस्त्यालगतच अडवलपाल येथें हें देऊळ आहे. देवळांतील उत्सवमूर्तीचें स्वरूप शांतादुर्गेचेंच असून गर्भा-गारांत वारूळ आहे. हीच येथें प्रमुख देवी मानली जाते. देऊळ लहानसेंच पण टाकटीक आहे. ही देवी मूळची बार्देसच्या साळगांवची असून खिरस्तीकरणप्रसंगीं तिचें स्थलांतर येथें झालें.

श्रीशांतादुर्गा (मुळगांव)

डिचोलीकडे गेलेल्या मुख्य रस्त्यालगतच हें देवालय आहे. देवीचें स्वरूप लढाईनंतरचें, शांत असें आहे.

श्रीवनदेवता — मुळगांवलाच **थोरली वनदेवता** व **धाकटी वनदेवता** अशा दोन देवता निराळ्या आहेत. या देवळांची रचना साधी पण व्यवस्थित आहे.

श्रीवेताळमहारुद्र — मूर्ति भव्य व देऊळ ठीक आहे.

रवळनाथ, नारायणदेव, मारुती, केळंबिका, दत्तात्रेय इ. अनेक परिवार देवताहि येथें आहेत.

हीं देवळें मूळचीं बार्देसच्या सिरूल गांवचीं असल्याचा उल्लेख मिळतो. ख्रिस्तीकरणापूर्वी तेथें निरनिराळे १९ देव होते.

या देवस्थानांचे जे अनेक विविध उत्सव होतात त्या सर्वांत विशेष जमावाचा म्हणजे जत्रेचा व तो कार्तिकी अमावास्येला होत असतो. या उत्सवांत पालखीची मिरवणूक, जागर, नाट्यप्रयोग इ. कार्यक्रम असतो.

पडवळ, देसाई, प्रभु, कापडी, कामत, भांगले, धोंड, राय, म्हांबरे, काळोखे, शेटये, डांगी, खोत वगैरे आणि कांसार, पडोळकर हेहि येथील देवस्थानचे महाजन होत.

श्रीशांतादुर्गा (बडें-डिचोली)

म्हापसें-डिचोलीच्या रस्त्यावरूनच हें देवालय दिसतें. ही देवी मूळची बार्देसकडील सांगोलडें येथील असून तिलाच सांतेरी असेंहि म्हणतात.

श्रीमहामाया — हें देऊळहि शांतादुर्गेच्या जवळच आहे.

मार्गशीर्ष व॥ ९मीस होणारा काला म्हणजेच येथील मुख्य उत्सव होय.

श्रीलक्ष्मी-नारायण मंदिर (बडें-डिचोली)

श्रीगोकर्ण-पर्तगाळ-मठ संस्थानच्या डिचोलीच्या मठांत हें मंदिर आहे. हवा व उजेड या दृष्टीनें मठाची इमारत छान आहे. मठाच्या मध्यभागीं श्रीलक्ष्मीनारायणाचें हें सुंदर मंदिर आहे. मंदिरांतील मूर्ति शुभ्र संगमरवरी असून स्वरूप मोहक व प्रसन्न आहे, येथें कित्येक उत्सव होतात. मंदिराच्या मागच्या बाजूनें गोकर्ण-पर्तगाळी मठाचे एक गतकालीन स्वामी श्रीअणुजीवोत्तमतीर्थ यांची समाधि आहे. याच मठांत श्रीगोकर्ण-पर्तगाळ-मठ संस्थानची 'श्रीमदिंदिराकान्ततीर्थ' संस्कृत पाठशाळा असून विद्यार्थ्यांचें वसति-गृहहि तेथेंच आहे. विद्यार्थ्यांची शिक्षणाची, भोजनाची व राहण्याची सोय संस्थानतर्फे मोफत होत असते. त्यादृष्टीनें या मठास फार महत्व आहे. पाठशाळेला जोडून विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं ग्रंथालयहि उघडण्यांत आलें आहे.

श्रीलक्ष्मी-नारायण (डिचोली)

हें देवालय डिचोली शहरांत आहे. रामनवमीचा उत्सव येथें प्रेक्षणीय होतो. उत्सवांत नाटकाचाहि कार्यक्रम असतो. महादेव इ. परिवार देवता जवळच आहेत.

श्रीशांतादुर्गा (डिचोली)

डिचोलीची ही ग्रामदेवी आहे. मूर्तीची मुद्रा शांत आहे. येथें होणाऱ्या उत्सवांत मार्गशीर्ष व॥ १ ला होणारा काल्याचा उत्सव मुख्य असतो. रवळनाथ भूतनाथ इ. येथें परिवार देवता आहेत.

श्रीवेताळ (अडवलपाल)

या वेताळाला देवीचा मुख्य कारभारी मानतात व त्याचेंच प्रस्थ देवस्थानांत जास्त आहे. वेताळमंदिरहि व्यवस्थित आहे. ही वेताळ देवता मूळची बार्देसच्या मात्र गांवची आहे.

श्रीसांतेर, रवळनाथ, महादेव वगैरे परिवार देवताहि प्राकारांतच आहेत.

या देवस्थानचा प्रवेशदरवाजा मोठा असून दरवाजावरील माडीवर नगारखाना आहे. सभोंवतीं अग्रशाला व महाजनांचीं निवासस्थानें आहेत.

मार्गशीर्ष शुद्ध तृतियेला होणारा दशावतारी काला म्हणजेच येथील मुख्य उत्सव होय. याशिवाय इतरहि लाहानसहान अनेक उत्सव होतात.

प्रभु, नायक, शेणवी (खटखटे इ.), धोंड असे या देवस्थानच्या महाजनांचे पहिले चार गट असून पांचवा पेटकर यांचा आहे.

श्रीशांतादुर्गा (केरी-फोंडें)

ही ग्रामदेवी असून तिला 'सांतेर' अशी संज्ञा आहे. आसनस्थ मूर्ति कृष्णपाषाणी व चतुर्भूज आहे. मार्गशीर्ष शु॥ ५ मीचा उत्सव येथें विशेष जमावाचा असतो. नारायणदेव इ. परिवार देवताहि जवळच आहेत.

श्रीरवळनाथ (तळावली)

देवालय लहानसेंच असून मूर्ति कोलवें येथील आहे.

श्रीविठ्ठलमंदिर (म्हापसें)

हें अन्साभाटवाडींत असून याला विठ्ठल-रखुमाईमंदिर म्हणतात. कार्तिकी एकादशीस येथें पालखीउत्सव व नाट्यप्रयोग असतो.

दत्तवाडी (म्हापसें)

मागें 'दत्तात्रेय' या मथळ्याखालीं वर्णन आलेलें स्थान याच दत्तवाडीचें होय. मंदिराचे चौथे चालक श्री. गंवडळकर हे असून सर्व खर्च चौघेहि चालक स्वतः उत्साहानें करतात. तिन्हीं दत्तोत्सवांखेरीज इतरहि कांहीं उत्सव येथें होतात.

श्रीमाउली व भूतनाथ (नादोडें)

बार्देसमधील नादोडें येथें या देवतांचीं मंदिरें आहेत. गांवस, देसाई वगैरे या देवस्थानचे महाजन होत.

श्रीवेताळ (रेवाडें)

कोलवाळ येथून रेवाडें जवळ आहे. मंदिर लहानच पण ठाकठीक आहे.

सांतेर (आगरवाडा), **सांतेर वेताळ रवळनाथ** (हळर्ण), **सांतेर** (कांसारवर्णें), **सांतेर** (चांदेल), **भूमिका व कालिका** (चोपडें), **सांतेर** (इब्रामपूर), **रवळनाथ** (तोर्सें), **माउली** (वारखंड) अशीं हीं पेडणें तालुक्यांतील छोटीं देवळें आहेत.

श्रीलइरायदेवी (शिरगांव)

म्हापसें - डिचोली रस्त्यापासूनच शिरगांवला जाण्याचा रस्ता निघाला आहे. गोमंतकांत ज्या

कित्येक जागरूक देवता मानल्या जातात त्यांतच या देवतेचाहि समावेश होतो. देऊळ प्रशस्त व सभामंडपहि विस्तीर्ण आहे. वैशाख शु॥ ५मी हा देवीच्या महाजत्रेचा मुख्य दिवस होय. त्या दिवशीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत गर्भागारांत अनेक देवकृत्यें सुरू असतात. रात्रीं बारानंतर हवनावरून जाण्याचा कार्यक्रम असतो. जवळ वडाच्या झाडाखालीं लांकडांचा प्रचंड ढिगारा मांडून तें हवन पेटविण्यांत येतें व निखारे प्रज्वलित झाल्यानंतर स्नान करून आलेले 'धोंड' त्यावरून चालत जातात. देवीच्या उपासकांनां 'धोंड' अशी संज्ञा असून त्यांत सर्व जातींच्या इसमांचा समावेश असतो. हे धोंड त्या दिवशीं अत्यंत पवित्रतेनें राहातात. निखाऱ्यांवरून जाण्याचा कार्यक्रम मोठ्या गंभीर स्वरूपाचा असून प्रेक्षकांचेंहि अंत:करण त्यावेळीं हेलकावल्यावांचून राहात नाहीं. तथापि कोणासहि धोका नसतो. धोंडांचा जमाव बराच मोठा असतो. नाटकें इ. जत्रेचा इतर कार्यक्रम पांच दिवस चालतो. या जत्रेस निरनिराळ्या भागांतून आलेल्या हजारों लोकांची गर्दी असते. निरनिराळीं दुकानेंहि बरींच असतात.

शिरगांवकरादि ब्राह्मण, तसेंच गांवकर इ. मराठा वर्गांतील या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीमहामाया (मयें)

डिचोली येथून मयें गांव जवळ आहे. **महामाया** व **सांतेर** अशा दोन देवता येथील मूळच्या असून **केळंबिका** (केळबाय) ही त्यानंतरची आहे. **लइराय, मोरजाय, तुळजाय, अदिती, शितला** व **महामाया** या केळंबिकेच्या धाकट्या बहिणी असून खेतला हा भाऊ मानतात. पैकीं हा भाऊ व थोरली बहीण या दोन देवता मयें येथें स्थायिक झाल्या. या सातहि भांवडांचें मूळस्थान 'गिरोडें' येथें होतें. महामाया देवस्थानचें उत्पन्न गतकालीं चांगलें होतें; पण सध्या तें समाधानकारक नसल्यानें चालकांनां खर्चाची तोंडमिळवणी करीपर्यंत कठीण जातें. माल्याची छोटी जत्रा झाल्यानंतर पंधरवड्यानें मोठ्या जत्रेस आरंभ होतो. चैत्र वद्य ५मी हा मोठ्या जत्रेचा मुख्य दिवस होय. त्या दिवशीं लोकांची विशेष गर्दी असते.

श्रीराम

पिळगांवजवळच्या गिमोणें येथें हें राममंदिर आहे. इतिहासकालांत सन १६८४ सालीं डिचोलीवर मोंगलांची स्वारी झाली त्यावेळीं त्यांनीं हें देवालय उध्वस्त केलें. पुढें तें भतग्रामचे तत्कालीन देसाई रामाजी शेणवी सूर्यराव यांच्या सहाय्यानें पुन: बांधण्यांत आलें. येथें जे कांहीं उत्सव होतात त्यांत रामनवमीचा मोठ्या जमावाचा असतो.

श्रीमहादेव व **श्रीशांतादुर्गा** हीं दोन्हीं देवळें पिळगांव धक्क्यापासून जवळच आहेत.

श्रीलक्ष्मी-नारायण

पिळगांवजवळ नावें गांवच्या सुरवातीसच हें मंदिर आहे. पौषांतील काल्याचा उत्सव येथें मुख्य आहे.

श्रीचामुंडेश्वरी

पिळगांवजवळ वरगांव येथें हें देवालय आहे.

देवीची मूर्ति कृष्णशीलेची असून स्वरूप उग्र आहे. थोरलें गोवें येथून ख्रिस्तीकरणप्रसंगीं ही मूर्ति इकडे आणण्यांत आली. अजून तेथील लोक हिला ग्रामदेवी म्हणून फार मानतात. देवस्थानचीं उत्सव वगैरे कृत्यें व्यवस्थित होतात. सर्व उत्सवांत पौष पौर्णिमेचा उत्सव मुख्य असून त्याला पालखीउत्सव, नौकाविहार, नाट्यप्रयोग इ. अनेक कार्यक्रमांची जोड असते. गोवेकर, आमोणकर, टोपले, कांगणे वगैरे या देवीचे महाजन आहेत.

श्रीकणकेश्वरी, श्रीरवळनाथ, हीं लहानशीं दोन्हीं देवळें नार्वें येथें असून त्यांतून कांहीं उत्सव होत असतात.

श्रीसप्तकोटेश्वर (नार्वें)

हें बरेंच इतिहासप्रसिद्ध देवालय आहे. या देवतेचें मूळ स्थान तीसवाडींतील दीपवती ऊर्फ दिवाडी हें गांव होय. सह्याद्रीखंडांत "गंगेच्या मध्यभागीं दीपवती नामक क्षेत्र असून तेथें परशुरामस्थापित श्रीसप्तकोटेश्वराचें लिंग आहे" असा उल्लेख आहे. "दीपवती बेटांत सप्तकोटेश्वरदेव असून तेथील पंचगंगा तीर्थावर दरसाल कृष्णजन्माष्टमीची जत्रा भरते" असें कोंकणाख्यानांत लिहिलें आहे.

कदंबकालांत सप्तकोटेश्वर देवस्थानची फार मोठी भरभराट झाली. ते या देवाचे निस्सीम भक्त होते. त्यांच्या नाण्यांत व ताम्रपटांत सप्तकोटेश्वराचा उल्लेख मिळतो. पुढें मुसलमानी हल्ल्यांत या देवालयाची फार नासधूस झाली. तथापि विजयनगर अमदानीच्या सुरवातीस माधवमंत्री यांनीं हें देवालय नवीन पद्धतीनें बांधून नंदादीप वगैरे खर्चासाठीं तराणें होनांची नेमणूक करून दिली. ख्रिस्तीकरणप्रसंगीं त्याच्यावर पुनः हल्ला होऊन देवतेचें स्थलांतर नदीपलीकडे भतग्रामच्या हद्दींत करावें लागलें. यावेळीं छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांनीं नवीन देऊळ बांधून देऊन इतरहि बरीच मदत केली.

सप्तकोटेश्वराचें लिंग सप्तधातूंचें असून या देवास सप्तनाथ अशीहि संज्ञा आहे. कोंकण प्रांतांतील महादेवाच्या दहा पुण्यक्षेत्रांत सहा मुख्य असून त्यांतच या स्थानाचाहि समावेश होतो. लिंगाचा परीघ सोळा इंच असून उंची दोन फूट आहे. उत्सवमूर्तीहि चांगली रुबाबदार आहे.

या देवस्थानाजवळच्या पंचगंगा तीर्थाचें गोकुळ अष्टमी दिवशीं स्नान करणें फार पुण्यप्रद म्हणून या ठिकाणीं दरसाल कृष्टजन्माष्टमीदिवशीं मोठी जत्रा भरते. भजनी दिंड्याहि अनेक येतात.

येथें जे कित्येक उत्सव होतात त्यांत महाशिवरात्र म्हणजेच या देवस्थानची जत्रा होय.

आज हें देवस्थान जेथें आहे त्या डिचोली तालुक्यांतील गांवांस 'नार्वें' असें नांव असून तें पिळगांवपासून जवळच आहे.

सूर्यराव देसाई, विश्वासराव देसाई, दिवाडकर, कामत, नार्वेकर इ. या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीशांतादुर्गा (आमोणें)

देवालय सुंदर असून निरनिराळे कांहीं उत्सव येथें होतात.

श्रीवेताळ (आमोणें)

याला मुख्य ग्रामदेव मानतात व देवस्थानांत

याचीच प्रख्याती विशेष आहे. मूर्ति भव्य, देऊळ प्रशस्त व वातावरण रम्य आहे. जवळच इतिहास-प्रसिद्ध वाडकरांच्या किल्ल्याच्या पडक्या तटाचे अवशेष दिसतात. हा आमोणें किल्ला वाडकर सावंतांनीं स. १७०० सालीं बांधला व स. १७०३ मध्यें फिरंग्यांनीं तो ताब्यांत घेऊन नष्ट केला. वेताळाचें तीर्थ विषारी रोगांवर फार गुणकारी असल्यानें तसले अनेक रोगी येथें येऊन राहातात. कार्तिक पौर्णिमेला येथें दीपोत्सव जत्रा असून मार्गशीर्ष शु. प्रतिपदेपासून दसरा - उत्सवास सुरवात होते. हा उत्सव या भागांत बराच प्रसिद्ध असून जत्रा मोठी भरते. माशेलच्या नदीपलीकडेच हें स्थान आहे. माशेल येथून किंवा डिचोलीहून येथें जाणें सोयीचें असतें.

महादेव, दत्तात्रेय, रवळनाथ इ. परिवार देवताहि जवळपास आहेत. विश्वासराव देसाई, सूर्यराव देसाई, गांवठणकर देसाई, आमोणकर वगैरे या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीदत्तात्रेय (सांखळी)

सांखळीची श्रीदत्तवाडी हें गोमंतकांतील सुप्रसिद्ध दत्तस्थान आहे. अकस्मात् झालेल्या साक्षात्कारामुळेंच या देवालयाची उभारणी झाली. विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे देवालय बांधण्यासाठीं पाया खणतांनां पायांतच श्रीगुरूच्या रौप्य-पादुकांचा लाभ झाला. याच पादुकांची गर्भागारांत आरंभीं स्थापना करण्यांत आली. आणि नंतर स्फटिकाची नयनमनोहर मूर्ति स्थापन केली. देवालय फारच सुंदर असून तेथील वातावरणहि शांत व पवित्र वाटतें. दत्तवाडीची सारीच रचना मोहक व प्रसन्न असून व्यवस्थाहि छान आहे. अनेक भाविक लोकांचें येथें सेवेसाठीं वास्तव्य असतें.

चातुर्मासाखेरीज दर गुरुवारीं येथें पालखी-उत्सव असतो. येथें जे कित्येक उत्सव होतात त्यांत गुरुप्रतिपदा, गुरुद्वादशी व दत्तजयंती हे उत्सव जास्त लोकजमावाचे असतात. सर्वांत दत्तजयंतीचा उत्सव विशेष गर्दीचा असून त्यालाच देवस्थानची जत्रा म्हणतां येईल. केव्हांहि मोठा कार्यक्रम असला तरी रात्रीं बारावाजेपर्यंत उत्सव संपलाच पाहिजे असा येथील व्यवस्थेचा कटाक्ष जास्त कौतुकास्पद आहे. इतर देवस्थानांप्रमाणेंच रात्र वाढत जाते तसे कार्यक्रमहि वाढू देऊन वेळ उधळण्याची येथें प्रथा नाहीं.

गोमंतकांतील सर्व गौड सारस्वत ब्राह्मण या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीविठ्ठल (सांखळी)

येथील विठ्ठलरखुमाई यांच्या मूर्ति प्राचीन-कालीन पंढरपूर येथील उत्सवमूर्ति होत असें सांगतात. सत्तरमहालांतील राणेकुलांतील एक गृहस्थ पंढरीचा वारकरी होता. त्यानें ह्या मूर्ति आणल्या. पहिलें देवालय अगदीं छोटेंसें होतें. तें शके १४११त मोठें बांधलें आणि सध्याचें नमुनेदार देवालय अलीकडेच सांखळीच्या राण्यांची कन्या आणि ग्वाल्हेरची राणी यांनीं स्वखर्चानें बांधलें आहे. देवालय भव्य व सुंदर आणि शिल्पकलेच्या दृष्टीनेंहि प्रेक्षणीय आहे.

विठ्ठलवाडींतील या देवालयांत जे उत्सव होतात त्यांत विशेष महत्वाचा व जास्त लोकजमावाचा म्हटला म्हणजे जत्रोत्सव होय. हा चैत्र शु. १० मी पासून १५ मेपर्यंत सहा दिवसांचा असतो.

श्रीभगवती

विठ्ठलवाडींत श्रीविठ्ठलमंदिराजवळ डाव्या बाजूनें हें देवालय आहे. त्या ठिकाणचें हेंच प्राचीन देवालय होय.

श्रीभूमिका

दत्तवाडींतील श्रीदत्तात्रेय देवस्थानाजवळून जो रस्ता पुढें गेला आहे त्याच बाजूनें पुढें थोड्याच अंतरावर परियें येथें श्रीभूमिका देवालय आहे. हीच या भागांतील ग्रामदेवी आहे. सांखळी व आसपासचे लोक ग्रामदेवी म्हणून या देवीला फार मानतात. कणकुंबीच्या मलप्रभा नदीच्या उगमाजवळील श्रीमाउली देवीचा व हिचा पूर्वापार कांहीं तरी संबंध असल्याचें प्रार्थनेच्या वहिवाटीवरून दिसून येतें.

श्रीदत्तवाडी

मागें श्रीदत्तात्रेय मंदिराच्या माहितींत, देवालयाचा पाया खोदतांनां ज्या रौप्यपादुकांचा लाभ झाला त्यांची स्थापना केल्याचा उल्लेख आहे; पण स्थापनेच्या पादुका त्या नसून पालखींतील उत्सवमूर्तीजवळ ठेवण्यांत येणाऱ्या त्या रौप्यपादुका आहेत. तसेंच पालखीचा सोहळा दर गुरुवारीं नसून दर पौर्णिमेस असतो.

श्रीमारुती—सांखळीच्या बाजारांतच हें लहानसें देऊळ असून तेथें हनुमंतजयंतीचा उत्सव विशेष जमावाचा असतो.

श्रीराधाकृष्ण मुरलीधर

सांखळींतील गोकुळवाडींत हें देवालय आहे. या मंदिराची पद्धतशीर स्थापना सन १९०५ सालीं झाली. चैत्र शु॥ ५ मी शके १८२७ हा स्थापनेचा दिवस म्हणून नमूद आहे. मुरलीधराची मूर्ति संगमरवरी असून सुंदर आहे. ती भक्तिभावानें गुर्जर गृहस्थ शेठ गोकुळदासजी यांनीं स्वखर्चानें आणली आणि तिची थाटांत स्थापना करण्यांत आली. अवघ्याच व्याजाच्या रकमेवांचून मंदिरास निराळें कांहीं उत्पन्न नाहीं; तथापि स्थापना-उत्सव, नृसिंहजयंती, कृष्णजयंती, आश्विनांतील भजनी सप्ताह इ. कित्येक उत्सव येथें होतात. माघ शु॥ ११ शीला होणारा काल्याचा उत्सव हाच या देवालयाचा मुख्य उत्सव होय.

श्रीलक्ष्मी - नारायण

सांखळीपासून जवळच असलेल्या नावेली गांवांत हें देऊळ आहे. मुख्य देवळाजवळ सांतेर, रवळनाथ, वेताळ इ. परिवार देवता आहेत. पौष शु॥ १० मीस होणारा काला हीच येथील जत्रा. नावेली ग्रामसंस्थेचे वर्गीय येथील महाजन आहेत.

श्रीरुद्रेश्वर (हरवळें)

हरवळें गांव तेथील धबधब्यामुळें फार प्रसिद्ध आहे. तेथील विहारहि प्रेक्षणीय असून त्यांतील ब्राम्ही लिपीचा शिलालेख महत्वाचा आहे. रुद्रेश्वर हें महादेवाचें स्थान आहे. जवळच्या नैसर्गिक सुंदर दृश्यामुळें देवालयाचें आवार रम्य वाटतें. महाशिवरात्रीला येथें मोठी जत्रा भरते. उत्सव प्रेक्षणीय असतो. याशिवाय इतरहि कांहीं उत्सव येथें होतात. सांखळीपासून हरवळें थोड्याच अंतरावर आहे. नाईक वगैरे लोक या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीकुडणेश्वर

सांखळीपासून चारेक मैलांवरील कुडणें येथें हें देऊळ आहे. सांखळीच्या वसाहतीपूर्वी कुडणें हेंच त्या भागांतील मुख्य गांव होतें. इतिहास-कालांत कुडणें फार प्रसिद्ध होतें. हरवळेंच्या शिलालेखांत कुडणें गांवाचा उल्लेख 'सचिपूर' असा असून चालुक्य सम्राट मंगलीश याच्या स. ५७८ च्या एका ताम्रपटांत या गांवाचा निर्देश 'कुंडिवाटक' असा केला आहे (श्री. ना. भा. नायक-कृत गोमंतक-इतिहास-दिग्दर्शन पृ. २).

कुडणेश्वराचें लिंग महादेवाचें असून देऊळ लहानसेंच आहे. चैत्र वद्य पंचमीचा उत्सव म्हणजेच या देवालयाची जत्रा होय.

श्रीमहादेव (कोटंबी-भतग्राम)

मुख्य देवालय महादेवाचें, पण कोटंबी गांव एकाच देवळांतील दोन वेताळांबद्दल विशेष प्रसिद्ध आहे. कांहीं कालापूर्वी एकाच लांकडापासून वेताळाच्या दोन मूर्ति कारागिरानें बनवल्या; पैकीं एक कोटंबी येथें स्थापन केली व दुसरी अंत्रूज महालांतील वागुर्वे येथें नेण्यांत आली. तथापि तेथील मूर्तीस तें गांव न आवडल्यानें व तसा पुजाऱ्यास दृष्टांत झाल्यानें ती परत कोटंबीस आणण्यांत आली अशी दंतकथा आहे. महादेवाच्या देवळाजवळच वेताळांचेंहि देऊळ आहे. देवस्थानची जत्रा पौष महिन्यांत होते.

श्रीसिद्धेश्वर (सूर्ल)

भतग्रामच्या सूर्ल गांवांत हें महादेवाचें देऊळ आहे. चैत्रपासून फाल्गुनपर्यंतच्या कालांत जे कांहीं उत्सव येथें होतात त्यांत मार्गशीर्ष शु. १३ शीचा उत्सव विशेष जमावाचा होतो. मल्लिकार्जुन वगैरे परिवार देवताहि देवळाच्या जवळच आहेत.

श्रीमहादेव (वेळगें)

सूर्ल येथून जवळच असलेल्या वेळगें येथें हें लहानसें देऊळ आहे. येथील मुख्य उत्सव मार्गशीर्ष व. १३ शीचा आहे.

श्रीनवदुर्गा (पाळी)

देऊळ लहानसें पण सुरेख आहे. पौष पौर्णिमेचा काला हाच येथील मुख्य उत्सव. दळवी, गांवस वगैरे या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीवडदेव

सांखळी-वाळपै रस्त्याच्या जवळ होंडा येथें हें छोटें देऊळ आहे. पौष शु. १० मीचा दशावतारी काला हाच येथील मुख्य उत्सव आहे.

श्रीमहालक्ष्मी

सांखळी येथून तीनेक मैलांवर कोपर्डें (सत्तरी) येथें हें देऊळ आहे. विषबाधेवर या देवीचें तीर्थ फार गुणावह असें मानतात. फाल्गुन व. ५ मीस येथें मुख्य उत्सव होतो.

श्रीमहादेव

सत्तरी तालुक्यांतील पिसुर्लें येथें हें देऊळ आहे. पौष महिन्यांत होणारा येथील काला म्हणजेच मुख्य उत्सव होय.

श्रीब्रह्मदेव

सदर तालुक्यांतील करमळी या गांवांत हें देवालय आहे. कांहीं भागांत परिवार देवता म्हणून असल्या, तरी गोव्यांत ब्रह्मदेवाचें मुख्य स्थान हेंच असें दिसतें. मूर्ति ५ फूट उंचीची व चारमुखी असून दिसण्यांतहि ठीक आहे. पौष महिन्यांतील दशावतारी काला हाच येथील मुख्य उत्सव होय.

श्रीहनुमान

वाळपै येथें अगदीं बाजारालगत हें देऊळ आहे. देऊळ नवीन पद्धतीचें, व्यवस्थित व सुंदर आहे. गर्भागारांतील हनुमंताची मूर्ति कृष्णपाषाणी व ऐटदार आहे. वैशाख शु. १०मी शके१८६२ अशी देवस्थानच्या स्थापनेची तिथि नमूद आहे. प्रत्येक शनिवारीं पूजा, स्थापनेचा दिवस, हनुमान-जयंती, श्रावण-शनिवार, नवरात्र वगैरे येथें कांहीं उत्सव होतात. सगळ्यांत तीन दिवस कार्यक्रमाचा राम ९ मीचा उत्सव येथें मोठा होतो. या उत्सवाला नाटकांचीहि जोड असते.

काणेकर, काटे, कर्पे, कुरतरकर, दांतिये, घाटे, मणेरकर, नार्वेकर, पेडणेकर, परब, पोकळे, शिरोडकर, सोलापुरकर, तेली, वाडकर, वेलिंगकर इ. या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीखळोबा (वेळूज-सत्तरी)

वाळपैपासून अर्धा पाऊण मैलाच्या अंतरावर हें देवालय आहे. मूर्ति कृष्णपाषाणी व रुबाबदार स्वरूपाची आहे. आषाढी १२ शी, श्रावण १५ मा, माघी ५ मी, शिमगा वगैरे उत्सव येथें होतात. माघ शु. १५ मेचा दशावतारी काल्याचा उत्सव मुख्य होय. येथील शिमग्याच्या उत्सवांतील घोड्यांचा नाच वैशिष्ट्यपूर्ण असतो.

श्रीसांतेर (करंजाळें-सत्तरी)

वाळपैच्या पूर्व बाजूस अडीचएक कोस अंतरावर हें देऊळ आहे. देवळाची रचना जुनी आहे. येथें जे कांहीं उत्सव होतात त्यांत पौष अमावास्येचा दशावतारी काला व फाल्गुन पौर्णिमेस सुरू होणारा शिमगा हे उत्सव विशेष जमावाचे असतात. शिमगा-उत्सवांत तेथें एक विशिष्ट कार्यक्रम असतो. आठ इसमांनां जमिनींत पुरण्यांत येतें; चौघांनां गळ्यापर्यंत व चौघांचे पाय वर व डोकें खालीं पोकळींत. त्याशिवाय तीन इसम जवळ उभे करतात. त्यांतील एकाला ठार करण्याचा आव आणतात. आणखी दोघांनां फळीला बांधतात. अवसर आल्यानंतर त्याकडे कांहीं ठराविक प्रश्नोत्तरें होऊन देवीकडे सार्वजनिक प्रार्थना झाल्यावर त्यांची सोडवणूक होते. चोरांस पकडून शिक्षा दिल्यासारखा हा प्रकार पूर्वापार इथें चालत आला आहे. त्याचें विशेष स्पष्टीकरण कोणी देऊं शकत नाहीं. याच देवळांत एक शिला असून गतकालीं राणेलोक तिलाच फुलें लावून कौल घेत. देवीच्या या देवळासमोरच ब्राम्हण पुरुषाचें एक लहानसें देऊळ आहे.

श्रीमहादेव

सांगें तालुक्यांतील सांकोडें येथें हें महादेवाचें देवालय आहे. पिंडी व लिंग व्यवस्थित असून देवाल्याची रचना जुन्या पद्धतीची आहे. येथें काल्याचा उत्सव विशेष जमावाचा असतो.

श्रीरामनाथ

कुळें येथून जवळ असणाऱ्या सांगें तालुक्यांतील सिगोणें गांवांत हें छोटें शिवमंदिर आहे. पिंडीचा आकार मोठा व त्याच मानानें लिंगहि मोठें व उंच आहे. काल्याचा उत्सव येथें जमावाचा असतो; पण तो सवडीप्रमाणें होतो.

श्रीकलनाथ

कालें येथें रेलवे स्टेशनापासून जवळच हें कलनाथाचें देवालय आहे. लिंग महादेवाचें असून देवालय लहानसेंच आहे. जवळपास इतरहि कांहीं परिवार देवता आहेत. येथें काल्याचा उत्सव मुख्य मानतात.

श्रीसोमनाथ-बलभीम

सांगें तालुक्यांतील दाभाळ येथें हें देवालय असून सांवडें स्टेशनापासून अंदाजें ९ मैलांच्या अंतरावर आहे. हें शिवलिंग असून त्याच देवळांत दुसऱ्या बाजूनें मारुतीची मूर्ति स्थापन केलेली आहे. ही मूर्ति संगमरवरी व तेजस्वी स्वरूपाची आहे. श्री. शि. कृ. संजगिरीप्रभृति सद्गृहस्थांच्या प्रयत्नानें आधुनिक स्वरूपाची देवालयाची नवीन इमारत स. १९३३ त तयार झाली. या देवालयांतील उत्सवांत महाशिवरात्रीचा उत्सव मोठा असतो. या उत्सवाला नाट्यप्रयोगांचीहि जोड असते.

सांनर्डेकर, संजगिरी, लाड, राव, सामंत, पाटील, वेळगेंकर, पाऊसकर इ. या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीसोमनाथ

दाभाळच्या अलीकडे कामारखंड येथें हें लहानसें शिवालय आहे. लिंग व देऊळहि जुन्यापैकींच आहे. देसाई, वेळीप, गांवकर इ. या मंदिराचे महाजन आहेत.

श्रीवेताळ

सांवर्डे स्टेशनापासून जवळच असलेल्या 'धडा' या नांवाच्या वाडींत हें देऊळ आहे. सांवर्डें गांवचा हा ग्रामदेव. देऊळ बऱ्याच कालापासूनचें व जुन्या पद्धतीचें आहे. माघ शु. ९ मीस होणारा काला येथील मुख्य उत्सव आहे.

श्रीदत्तमंदिर (सांवर्डें)

पूर्वीं या मंदिरांत श्रीदत्तमहाराजांच्या पादुकाच होत्या. मूर्ति अलीकडची आहे. मूर्तीचें स्वरूप सुंदर आहे. स. १९५० सालीं नूतन मंदिराचा जीर्णोद्धार झाला. येथें श्रीदत्तजयंती, गुरु १२ शी इ. उत्सव होतात.

श्रीमल्लिकार्जुन (काणकोण)

गोमंतकांतील मोठ्या उत्पन्नाच्या देवालयांत या देवालयाचा चौथा क्रमांक आहे. काणकोण-सारख्या एका बाजूच्या भागांत असल्यानें इतर देवालयांसारखा या देवस्थानचा विशेष परिचय सर्वसाधारण लोकांनां नसला, तरी सूज्ञांस याची जाणीव आहेच. काणकोण येथून जो रस्ता पर्तगाळ-पैंगीणवरून पोळें सरहद्दीवर गेला आहे त्याच रस्त्यापासून निघालेला काणकोणच्या चावडीवरून साधारणतः मैलाच्या अंतरावर डाव्याबाजूनें एक रस्ता दिसतो तो सरळ या देवस्थानाकडे गेलेला आहे. सदर मुख्य रस्त्या-पासून देवालय पंचवीस मिनिटांच्या अंतरावर आहे.

देवस्थानचें आवार विस्तीर्ण आणि हवाशीर आहे. देवालयाची इमारत फार मोठी नसली तरी व्यवस्थित व सुंदर आहे. पूर्व बाजूचें माडी-वरील नवीन काम, देवस्थानचें कार्यालय व ग्रंथालय ठीक आहे. या माडीवरून सभोंवतालची वनश्री छान दिसते.

हें महादेवाचें लिंग असून सुप्रसिद्ध द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं दुसरें आहे.

"सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम्। उज्जयिन्यां महाकालमोंकारममलेश्वरम् ॥ १ ॥ परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरम्। सेतु-बंधे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥ २ ॥ वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे। हिमालये तु केदारं घृसृणेशं शिवालये ॥ ३ ॥ एतानि ज्योतिर्लिंगानि सायं प्रातः पठेन्नरः। सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ॥ ४ ॥"

या श्लोकावरून या देवतेचें केवढें महत्व आमच्या धर्मग्रंथांत मानण्यांत आलें आहे हें सहज दिसून येतें.

गोमंतकाच्या वसाहतकालांत जे आर्य लोक बाहेरून येथें आले त्यांपैकीं जे कांहीं मल्लिकार्जुन देवतेचे उपासक होते त्यांनीं आपल्याबरोबर हें आपलें पूज्य दैवत येथें आणलें. मल्लिकार्जुनाचें हें लिंग एक फूट उंचीचें असून व्यवस्थित आहे. मंदिराची आंतील रचनाहि ठीक आहे. देवालया-च्या उजव्या बाजूनें एक व मागच्या बाजूनें एक अशा दोन अग्रशाला आहेत.

जवळपास लहानमोठे साठ एक परिवार देव आहेत. त्यांत 'भागीर पाईक' हा प्रमुख मान-तात. याच्या पराक्रमाच्या कित्येक आख्याइकाहि सांगतात. डावीकडे निराकाराचें छोटें देऊळ असून त्यांत फक्त एक त्रिशूलच आहे. जवळच्या डोंगरपायथ्याशीं पार्वतीचें छोटें देऊळ असून तिला पर्वतादेवी असें म्हणतात.

मुख्य देवमंदिराच्या डाव्या बाजूनें देवस्थानची सुरेख तळी आहे.

मंदिरांतील चौकावरील एका खांबास प्रसाद-फुलांची व्यवस्था असते. हीं फुलें १८ असतात. एकदम आठदहा लोकांनां प्रसादफुलें मागतां येतात.

चैत्रपासून फाल्गुनपर्यंत देवालयांत जे कित्येक उत्सव होतात त्यांत रथ ७ मी ते ९ मीपर्यंतचा उत्सव मोठा असतो. हाच जत्रोत्सव होय. ९ मी-ला मोठ्या रथाचा कार्यक्रम असतो. महाशिवरा-त्रीच्या उत्सवांत अंबारींतून मिरवणूक निघते. सदरील दोन्हीं उत्सवांनां नाट्यप्रयोगांचीहि जोड असते.

देवस्थानचें उत्पन्न अंदाजें २२ हजारांचें असून खर्च सुमारें १५ हजार आहे. सैंतु प्रोमोतोर या शिक्षणसंस्थेस या देवस्थानांतून सालीना सहाशें रुपयांचें सहाय्य होत आहे. हें सहाय्य सुविचारी महाजन हजारापर्यंत वाढविणार आहेत हें योग्यच आहे. तथापि आज इतर देवस्थानांच्या मानानें पाहतां चालू असलेली ही रक्कम देखील कौतुकास्पद असून त्याबद्दल महाजनवर्गाचें अभिनंदनच केलें पाहिजे. देवस्थानें या लोकोपयोगीच संस्था असल्यानें विद्यालयें, वाचनालयें, रुग्णालयें अशा लोकहितकारक सार्वजनिक संस्थांनां त्यांकडून सहाय्य होणें इष्टच आहे या गोष्टीकडे इतर सधन देवस्थानांचेंहि लक्ष जास्त वेधलें पाहिजे.

या देवस्थानतर्फे गरीब विद्यार्थ्यांसाठीं वार्षिक १०० रु. व देवस्थानच्या आवारांतील मराठी शाळेस ५० अशी मदत होते. या दोन्हीं मदतींच्या रकमेंतहि योग्य वाढ करण्याचा महाजनवर्गाचा विचार आहे. देवस्थानच्या ग्रंथसंग्रहांत बऱ्याच धार्मिक पुस्तकांचा समावेश आहे.

ज्येष्ठपासून फाल्गुन व॥ ३ ये पर्यंत या देवाची पूजा पद्ये ब्राह्मणाकडून होते आणि फाल्गुन व॥ ४ थींपासून वैशाखपर्यंत ती वेळीप, गांवकर इ. ब्राम्हणेतर पुजाऱ्याकडून करण्यांत येते.

श्रीमल्लिकार्जुनाचें मूळचें मंदिर अगदीं लहानच होतें तें जीर्ण स्थितीस आल्यानें हल्लीची नवीन इमारत बांधण्यांत आली. हा जीर्णोद्धार शके १७०३ सालीं झाला.

देसाई, गांवकर हे क्षत्रिय मराठावर्गांतील आणि नाडकर्णी, नगर्सेकर, राजाध्यक्ष हे ब्राह्मणवर्गांतील गृहस्थ या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीमल्लिकार्जुन (गांवडोंगरें)

पर्तगाळपासून गांवडोंगरें खेडें जवळ आहे. तेथेंच हें शिवमंदिर आहे. उत्पन्न साधारणपैकींच असून कित्येक उत्सव त्याच उत्पन्नांतून होतात. पौष पौर्णिमेचा उत्सव येथें मोठ्या जमावाचा व विशेष थाटांत होतो. तीच येथें जत्रा मानण्यांत येते.

फळ देसाई, नाईक देसाई, गांवकर, वेळीप इ. या देवालयाचे महाजन आहेत.

सप्तकोटेश्वर, भामासा, पाकासा, काळासा, सिंहपुरुष, पंचपुरुष इ. येथें परिवार देवताहि आहेत.

श्रीमल्लिकार्जुन (अयें)

गांवडोंगरें येथून पांचएक मैलांवर अयें हें रानटी खेडें आहे. तेथें हें शिवमंदिर आहे. फाल्गुन व॥ ४ थीला येथें मुख्य उत्सव असतो.

अयें येथून एक कोसावरील कुसकें गांवांत व अलीकडच्या बाजूच्या कोतिगांवांत या दोन्हीं ठिकाणींहि श्रीमल्लिकार्जुनांचीं लहान लहान दोन मंदिरें आहेत.

श्रीपरशुराम (पैंगीण)

काणकोण महालांत लोलयें व पैंगीण असे जे दोन प्रमुख गांव आहेत त्या पैंगीण गांवांत हें देवालय आहे. या देवाची मूर्ति वगैरे कांहीं नाहीं. गर्भागाराच्या मागच्या बाजूनें एक तुलसीवृंदावन असून त्याची अर्धी बाजू गर्भागारांत आहे व त्याच्यांतच एक चक्राकार कृष्णशिला आहे. हीच देवता मानण्यांत येते. इतर देवालयांप्रमाणें

येथें पालखीची मिरवणूक किंवा रथोत्सव वगैरे नाहीं. सोमवार हाच देवाचा विशिष्ट दिवस मानतात व त्या दिवशीं भेटीसाठीं भाविकांचा मेळावा जमतो. येथें जे कित्येक नवस करण्यांत येतात त्यांत केळ्यांच्या घडांनां विशेष महत्व आहे. परशुराम देव हा श्रीविष्णूचाच अवतार अशा दृष्टीनेंच येथेंहि त्याची स्थापना झालेली आहे. अर्थात त्याला अनुसरून येथील सर्वकांहीं व्यवस्था आहे. पैंगीण गांवच्या वसाहतीच्या वेळीं असो किंवा त्यानंतरच्या कालांत असो पण ही देवता पेडणेहून येथें आणण्यांत आली. पुरुषोत्तम प्रभु या पेडणेंजवळच्या मालपें येथील पुरुषानें परशुराम देवता येथें आणली असें सांगतात. याचें मंदिर श्रीपरशुरामापुढेंच आहे.

श्रीलक्ष्मी-नारायण, दुर्गादेवी, भगवती, मोहिनी, वेताळ वगैरे परिवार देवताहि जवळपास कमी अधिक अंतरावर आहेत.

येथें निरनिराळे अनेक उत्सव होतात. परशुरामजयंति-वसंतपूजा, नवरात्र, दसरा, माघमासांतील संतर्पण वगैरे. त्या सर्वांत फाल्गुन वद्य व्दितीयेस होणारा उत्सव विशेष महत्वाचा मानण्यांत येतो. मुख्य जत्रा हीच. दुसऱ्या दिवशीं केळें व देवासमोर फोडलेल्या नारळाचा भाग नैवेद्य म्हणून वांटण्यांत येतो.

वसिष्ठगोत्री देसाई व गांवकर या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीदुर्गादेवी (पैंगीण)

या मंदिरांत नवरात्र, दसरा, अक्षयतृतीया असे उत्सव होतात.

श्रीभगवती --या देवीचें मंदिर खावटा येथें आहे.

श्रीलक्ष्मीनारायण (पैंगीण)

या देवाचा परशुरामाच्या परिवारांत समावेश असला तरी तो मूळचा ग्रामदेव मानतात. लक्ष्मीनारायणाचें देऊळ लहानसेंच असून मूर्ति कृष्णशिलेची आहे. कार्तिक पौर्णिमेला येथें वनभोजन, पालखी, रथोत्सव, काला इ. कार्यक्रम असतो. हाच या मंदिराचा मुख्य उत्सव. चैत्र वद्य ६ ष्ठी ते १० मी अशा पांच दिवस कार्यक्रमाचा उत्सवहि जमावाचा असतो. त्या उत्सवास नाट्यप्रयोगांचीहि जोड असते.

श्रीवेताळ

श्रीलक्ष्मीनारायण मंदिरापासून जवळच पैंगीणचें प्रसिद्ध वेताळमंदिर आहे. वेताळाची मूर्ति भव्य, ५ फूट उंचीची, कृष्णशिलेची व नग्न स्वरूपांत आहे. येथील महत्वाचा उत्सव म्हणजे दसरा. दुर्गादेवीमंदिराकडून तरंगें इकडे आणण्यांत येतात आणि येथेंच मग कौल-प्रसादाचा कार्यक्रम होतो. दर तीन वर्षांनीं एकदा येथें 'गड्यांची जत्रा' होते. या जत्रेचा कार्यक्रम कुंडईच्या नवदुर्गा देवालयाच्या प्राचीन पद्धतीप्रमाणें होत असतो. त्याच पद्धतीनें येथें एक रहाट जोडण्यांत येतें. या रहाटाला प्राचीनकालीं माणसें बांधण्यांत येत असें सांगतात. तथापि हल्ली कोंबडे बांधतात व ते शेवटच्या फेऱ्यांत खालीं चक्रशिलेवर पडून मृत्यु पावतात. गर्भाच्या नवसाऐवजीं हल्ली पोफळीचें भिंगारें आणि दशपायी मृगाऐवजीं खेकडा वेताळास अर्पण करतात. ही गड्यांची जत्रा पूर्वीं मोठ्या गंभीर स्वरूपाची होई आणि तिला प्रेक्षकगणहि मोठा जमे. या जत्रेच्या मुळाशीं कांहीं तरी इतिहास

असावा असें वाटतें, पण तो समजण्यासारखीं साधनें उपलब्ध नाहींत.

श्रीदुर्गादेवी (खडगाळ)—ही मूर्ति कृष्ण-शिलेची असून कार्तिक वद्य ७ मीस या देवीचा वनभोजन व काल्याचा उत्सव असतो.

श्रीव्यंकटेश — ही कृष्णपाषाणी मूर्ति फणसकोंडें मठांत आहे. या मंदिराचा काल्याचा उत्सव कार्तिक वद्य ५ मीस होतो.

श्रीमोहिनी (सादळें)

श्रीपरशुराम देवाच्या परिवार देवतांतच या देवीचाहि समावेश होतो. तथापि अंतर्गत व्यवस्थेसाठीं हिचें निराळें मंडळ आहे. गर्भागारांत मूर्ति अशी नाहीं; पण एक कृष्णशिला आहे. मंदिर लहानसेंच, उत्सवहि अगदीं कमी. या देवीचा मुख्य उत्सव म्हणजे शिमग्याचा व तो फाल्गुन शु॥ ११ शीपासून १५ मेपर्यंत चालतो. नाट्यप्रयोगांचीहि त्याला जोड असते. अखेरच्या दिवशीं रात्रौ येथें अंबाबाईचा गोंधळ घालण्याची प्रथा आहे.

श्रीकेशव (लोलयें)

हा लोलयें गांवचा ग्रामदेव आहे. मूर्ति कृष्णशिलेची असून देऊळ लहानसेंच पण सुंदर आणि आवारहि रमणीय आहे. उत्सव साधारणच असलें तरी येथें निरनिराळे अनेक उत्सव होतात. कार्तिकांत वनभोजन व दशावतारी काला होतो. अक्षयतृतियेचा उत्सव नाट्यप्रयोगादि विविध कार्यक्रमांमुळें विशेष जमावाचा असतो. हीच तेथील जत्रा म्हणतां येईल. चातुर्मासाखेरीज प्रत्येक दशमीस या देवालयाचा पालखीचा सोहळा असतो.

श्रीविष्णु, आर्यादुर्गा, भगवती, दाढ (पोळें येथें सरहद्दीवर) वगैरे या देवाच्या परिवार देवता आहेत.

प्र. देसाई व प्र. गांवकर या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीदामोदर (लोलयें)

केशव देवालयाजवळच हें मंदिर आहे. मंदिराची रचना ठीक आहे. गर्भागारांत लिंगाची स्थापना झालेली असून उत्सवमूर्ति पंचधातूची श्रीकृष्णाची आहे. येथें ठराविक दिवशीं पालखीचा सोहळा असतो.

या देवालयांत चैत्रपासून फाल्गुनपर्यंत कित्येक उत्सव होतात. वैकुंठ १४ शी, गुढीपाडवा हे उत्सव जमावाचे असतात. पण त्या सर्वांत चैत्र पौर्णिमेला विशेष गर्दी असते. या उत्सवांत दिवजांचा व रथोत्सवाचा विशिष्ट कार्यक्रम असतो. हीच येथील जत्रा म्हणतां येईल. प्र. देसाई या देवाचे महाजन आहेत.

श्रीनिराकार (मार्शे-लोलयें)

गर्भागारांत फक्त लांकडी स्तंभ आहे. देवळाची रचना चांगली असून सभामंडप विस्तीर्ण आहे. याचा गतकालीं प्रवाशांनां फार उपयोग होई. येथें जे कित्येक उत्सव होतात त्यांत चैत्र १५ मेचा उत्सव विशेष थाटाचा असून त्याला नाटकांचीहि जोड असते. सती इ. कांहीं परिवार देवताहि जवळपास आहेत. प्र. गांवकर इ. गृहस्थ या देवळाचे महाजन आहेत.

श्रीरामदेव (पर्तगाळ)

गौड सारस्वत वैष्णव सांप्रदायी श्रीगोकर्ण-पर्तगाळी मठांत मध्यभागीं श्रीरामदेवाचें हें सुंदर मंदिर आहे. मंदिर लहानसेंच, पण त्याची रचना व्यवस्थित व मोहक आहे. मठाच्या भव्य व शिल्पकलासुंदर अंतररचनेच्या आकर्षणांत या मंदिराची ठीक भर पडलेली आहे. मंदिरांतील मूर्ति कृष्णपाषाणी व मोहक असून मध्यभागीं कोदंडधारी राम, डावीकडे सीतामाई व उजव्या बाजूनें लक्ष्मण आहे. तिन्हीं मूर्तींचे चेहरे तेजस्वी आहेत.

या मठपरंपरेचे सहावे मठाधीश गुरुवर्य श्रीरामचंद्रतीर्थ स्वामी पर्तगाळ-मठ अस्तित्वांत येण्यापूर्वी अर्थात् श्रीगोकर्ण मठांत असतांनां एका रामनवमीच्या रात्रीं भगवान श्रीराम स्वप्नांत येऊन त्यांनां म्हणाले—"राम, लक्ष्मण, सीता, मारुती अशा चार शिलामूर्ति मठाच्या मागच्या बाजूनें शिलागर्भांत आहेत; त्या काढून घेऊन त्यांची लवकर स्थापना करावी."

दुसऱ्या दिवशीं त्या जागीं खोदकाम सुरू झालें व दृष्टांताप्रमाणेंच मूर्तीहि सांपडल्या. त्यांची स्थापना कोठें व कशी करावी या विचारांत असतांनां त्याच रात्रीं त्यांनां त्याबद्दलचें मार्गदर्शन होणारें दुसरें स्वप्न पडलें. त्याप्रमाणें श्रीस्वामी महाराज, मूर्ति व कांहीं मंडळी यांच्यासह श्रीगोकर्ण-मठांतून उत्तरेकडे यावयास निघाले. ती मंडळी पैंगीण गावांस पोंचली त्यावेळीं राम, लक्ष्मण व सीता या तीन मूर्ति स्वप्नांतील सूचनेप्रमाणें जड झाल्या आणि पद्धतशीरपणें त्यांची स्थापना लवकरच तेथें योग्य अशा जागीं करण्यांत आली. हीच जागा पुढें मठासाठीं पसंत करून सभोंवतीं मठाची इमारत उभारण्यांत आली. शिल्लक राहिलेली मारुतीची मूर्ति दृष्टांताप्रमाणें रिवण येथें स्थापन करण्यांत आली. तिची माहिती पुढें येईलच.

श्रीरामदेव मंदिरांत चैत्रपासून फाल्गुनपर्यंत अनेक उत्सव होत असतात; त्या सर्वांत रामनवमीचा उत्सव सर्व दृष्टींनें विशेष महत्वाचा असतो. या उत्सवाला निरनिराळ्या भागांतून हजारों लोक येतात आणि उत्सव-खर्चहि फार होतो. गुढीपाडव्यापासून उत्सवाचा आरंभ असला, तरी पंचमीपासून नवमीपर्यंतचे कार्यक्रम वाढत्या सौंदर्याचे असल्यानें त्या दिवसापासून लोकजमाव वाढूं लागतो. नवमीस तर मोठी गर्दी होते. सप्तमीचा रौप्यशिबिका उत्सव, अष्टमीचा रथ व नवमीचा महारथोत्सव हे विशेष प्रेक्षणीय असतात. हवनादि वैदिक कृत्यें आणि मंदिरांतील इतर विविध देवकृत्यांचा कार्यक्रम सारखा चालू असतो. तशीच संतर्पणाचीहि ठीक व्यवस्था असते. पूर्वीं पंचमीपासून द्वादशीपर्यंत येथें येणाऱ्या लोकांनां भरपूर शिधासामुग्री मिळे. त्यांत चहाकॉफी फराळापासून भोजनाच्या सर्व जिनसांचा तसेंच भांडीं-कुंडीं, दिवा-बत्ती, चटया, सर्पण वगैरेंचा समावेश होई. राहण्यासाठीं स्वतंत्र खोल्यांची तर व्यवस्था असतेच.

शिधादानाच्या पद्धतींत कोणतीच काटेकसर नसल्यानें लोक तिचा भरपूर फायदा घेत. जमणाऱ्या लोकांत निरनिराळ्या धर्मांचे, पंथांचे तसेच विविध आचारविचारांचेहि मनुष्य असायचेच. त्यांतील कांहीं अविचारी शिध्याचे जिन्नस बेसुमार घेऊन त्यांची विक्रीहि करूं लागले, हें पाहून आणि उत्सवासाठीं आलेल्या स्त्रियांनां घरच्याप्रमाणेंच इथेंहि स्वयंपाकाच्या कटकटींत गुंतून सुंदर कार्यक्रमांनां मुकावें लागतें वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन नूतन व्यवस्थापक मंडळानें हल्ली शिध्याची प्रथा तेवढी बंद केली आहे; तथापि

त्याबद्दलची जी नवीन पद्धत अंमलांत आणली ती संस्थानच्या व लोकांच्या दृष्टीनेंहि फार छान आहे. ती म्हणजे चहा-कॉफी, फराळ व जेवण योग्य वेळीं संस्थानतर्फेच तयार करण्याची व्यवस्था होय.

श्रीरामदेवाची उत्सवमूर्ति मोहक व सुंदर आहे. शिबिकेंत किंवा रथारोहणांत तर ती फारच खुलून दिसते.

श्रीवीरविठ्ठल

श्रीवीरविठ्ठलाचें मंदिर श्रीरामदेव मंदिराच्या उजव्या बाजूनें अगदीं लागूनच मठांत आहे. श्रीवीरविठ्ठल हें श्रीमठाधीश स्वामीमहाराजांचें उपास्यदैवत असून तें नेहमीं त्यांचा मुक्काम जेथें असतो तेथेंच त्यांच्याबरोबर असतें. श्रीवीर-विठ्ठलाची मूर्ति पंचधातूची असून अभयवरद स्वरूपाची, एका हातीं शंख व दुसऱ्या हातीं चक्र अशी आहे. मूर्तीच्या पायांत पादुका असून चेहरा तेजस्वी आहे. श्रीगोकर्णमठपरंपरेचे तिसरे मठाधीश श्रीजीवोत्तमतीर्थ यांनां उत्तरेकडील तीर्थयात्रापर्यटनांत ती मूर्ति शीला नदींत मिळाली. ते स्नानासाठीं शीला नदींत उतरतांच तेथें त्यांनां पंचधातूच्या तीन मूर्ति मिळाल्या. पहिली गोकर्ण येथील मठांत स्थापन करण्यांत आलेली श्रीभूविजयविठ्ठलाची, दुसरी भटकळ मठांत स्थापन केलेली श्रीदिग्विजयविठ्ठलाची व तिसरी ही श्रीवीरविठ्ठलाची होय. सदर गुरुवर्यांनीं ती आपले शिष्य श्रीपुरुषोत्तमतीर्थ यांच्या स्वाधीन केली व तेव्हांपासून ती श्रीमठाधीश स्वामीमहाराजांच्या खास देव्हाऱ्यांत असून तीच त्यांची उपास्यदेवता मानण्यांत येत आहे.

वीर मारुती

मठाच्या इमारतीच्या बाहेर वरच्या बाजूनें रथपटांगणाजवळ श्रीरामभक्त वीर मारुतीचें हें लहानसेंच पण ऊंच मंदिर आहे. यांतील शिला-मूर्ति महान् तेजस्वी असून नवसास पावणारी आहे अशी भाविकांची भावना आहे. या मूर्तीची स्थापना गुरुवर्य श्रीरामचंद्रतीर्थ स्वामी यांच्याच कारकीर्दींत झाली. याच मारुतीच्या पायांखालीं नारायणभूताचा बंदोबस्त करण्यांत आला आहे.

श्रीरामचंद्रतीर्थ स्वामींचे शिष्य श्रीदिग्विजय रामचंद्रतीर्थ यांच्या कारकीर्दींत त्यांच्या इच्छेनें सांप्रदायिक लोकांनीं रामनवमीच्या उत्सवासाठीं फार उत्तम असा महारथ तयार केला. गुरुमहा-राज त्यावेळीं रिवण मठाजवळील खास गुहेंत योगसाधनांत मग्न होते. तेथून ते या नूतन रथोत्सवासाठीं पर्तगाळीस आले. शिष्यस्वामी श्रीरघुचंद्रतीर्थ यांच्या नेतृत्वाखालीं सर्व वैदिक विधि व रथपूजादि कार्यक्रम झाल्यानंतर श्रीराम-देवाची सुंदर सुशोभित उत्सवमूर्ति महारथांत बसविण्यांत आली आणि वाद्यघोषादि थाटांत जमलेल्या शेंकडों भाविकांनीं रथ ओढण्याचा प्रयत्न केला; तथापि त्याच्या एकाहि चक्राला गतीच मिळेना. या आकस्मिक संकटाचें कारण योगसामर्थ्यानें श्रीगुरुस्वामींच्या लक्षांत आलें आणि त्यांनीं श्रीफल हातांत घेऊन रथाजवळ येऊन कांहीं मंत्रोच्चार केले आणि तें फल रथपटां-

गणांतील या वीर मारुतीच्या पायांखालीं पुरून टाकण्याची व्यवस्था केली. त्यावेळीं तेथें भयंकर गर्जना झाली. ती ऐकून काय प्रकार आहे हें समजून घेण्याची लोकांत उत्सुकता उद्भवली. तथापि गुरुवर्यांनीं ती हकीकत दुसऱ्या दिवशीं सांगण्याचें ठरवून त्या दिवशींचा महारथाचा एकंदर कार्यक्रम सुंदर रीतीनें पार पडला.

सदरील हकीकत अशी असल्याचा उल्लेख मिळतो :—

"पर्तगाळच्या महारथोत्सवाची बातमी ऐकून उडपी येथील सौदीमठप्रवर्तक तौलव स्वामीनें उत्सवांत विघ्न आणण्यासाठीं मंत्रसामर्थ्यानें एक प्रबल शक्ति पर्तगाळीस पाठविली आणि तिचाच बंदोबस्त मारुतीच्या पायाखालीं करण्यांत आला. या शक्तीचें नांव 'नारायणभूत.' या मारुतीच्या उजव्या बाजूनें खालीं जो आज भव्य मुखवटा दिसतो तो याच भूताचा होय. दरसाल महारथाच्या दिवशीं ठराविक विधि व नवें वस्त्र जाळून याचा मान केला जातो."

श्रीरामदेव मंदिरांत अनेक भाविकांनीं अनेक उत्सव होण्याची कायमनिधि वगैरेच्या रूपानें ठीक व्यवस्था केली आहे. श्रीराम मंदिर मठांतर्गतच असल्यानें त्याचें स्वतंत्र असें निराळें उत्पन्न नाहीं. सर्व खर्च मठातर्फेच होतो. मठाचें आजचें उत्पन्न अंदाजें ५० हजार रुपये असून त्यांतच गोव्याबाहेरच्या उत्पन्नाचाहि समावेश होतो. खर्चहि तसाच ४६ हजारांवर आहे. एका डिचोलीच्याच पाठशाळेचा वार्षिक खर्च ७५०० रुपयांवर असून मठांतहि वैदिक शिक्षणाची व्यवस्था व एक स्वतंत्र मराठी शाळा आहे. डिचोलीच्या पाठशाळेला, गोमंतकीय वैष्णव सांप्रदायिक देवस्थानांतून देवकृत्याची पावती देतांनां रुपयामागें एक आणा प्रमाणें लोकांकडून वसूल होणाऱ्या पैशांची एकूण रकम अंदाजें २५०० रु. धरली तर केवळ पाठशाळेसाठींच मठाचे दरसाल ५ हजारांवर रुपये खर्च होतात. शिक्षणदानाच्या कार्यांत, देवालयें इ. कोणत्याहि इतर संस्थानांपेक्षां पर्तगाळमठसंस्थानचे पैसे अधिक खर्च होतात याचें फार कौतुक वाटतें.

विद्यमान मठाधीश गुरुवर्य श्रीमत् द्वारकानाथतीर्थ स्वामीमहाराज हे स्वत: पंडित असून विद्वानांचें कौतुक करणारे, त्यांनां अनेक बाजूंनीं प्रोत्साहन देणारे आणि विद्यादानासाठीं सढळपणें खर्च करणारे असे योग्यतापूर्ण पीठाधीश आहेत. शिक्षणदानासंबंधींच्या यांच्या भावी योजना फार महत्वाच्या आणि लोकहिताच्या दृष्टीनें फार उपकारक आहेत. त्या मूर्त स्वरूपांत आणण्याचे स्वामीमहाराजांचे प्रयत्नहि चालू आहेत.

श्रीलक्ष्मीनारायण (खोल)

काणकोण तालुक्यांतील खोल येथें हें देवालय आहे. देवळाची रचना जुन्या पद्धतीची असून मजबूत आहे. श्रीलक्ष्मीनारायणाची मूर्ति कृष्ण-

पाषाणी असून तिची मूळ स्थापना गांवच्या वसाहतीच्या सुरवातीस झाली असावी असें दिसतें. त्याचप्रमाणें कित्येक चिन्हांवरून गांवची मूळ वसाहत द्रविडांकडून झालेली असावी व कांहीं कारणानें पुढें ते गांव सोडून गेलेले असावे असें वाटतें.

देवालयांत दोन गर्भागार असून डाव्या बाजूनें ग्रामदेव व उजव्या बाजूच्या गर्भागारांत लक्ष्मीनारायणाची मूर्ति आहे. देऊळ उत्तराभिमुख असून वरच्या बाजूनें डोंगरी व खालच्या बाजूनें रमणीय कुळागर आहे. पुढच्या बाजूची तळीहि ठीक आहे.

या देवालयाचे परिवार देवहि बरेच आहेत. त्यांपैकीं देवळांत डावीकडे सांतेर व उजवीकडे गणपति असून सोलयें वाडींत ईश्वर व महेश्वर यांच्या दोन पाषाणी मूर्ति आहेत. याशिवाय वेताळ, कपिलेश्वर, सिद्धनाथ, आदिनाथ इ. देव जवळपास आहेत.

देवस्थानचें उत्पन्न अंदाजें चारेक हजार रुपये असून त्यांतून निरनिराळे अनेक उत्सव होत असतात. माघ वद्य ५ मीस ग्रामदेवाचा उत्सव असतो. चातुर्मासाखेरीज प्रत्येक १० मीस लक्ष्मीनारायणाचा पालखीउत्सव होतो. माघ वद्य १ ला ते ५ मी हे दिवस मुख्य उत्सवाचे असून त्यांना नाट्यप्रयोगांचीहि जोड असते. कार्तिक वद्य ५ मीचा काला व फाल्गुन शु. १० मी ते १५ मेचा शिमगोत्सवहि प्रेक्षणीय असतो. पौर्णिमेस वेताळाची जत्रा होते. आजच्या काळांतहि वेताळाजवळ शेंकडों कोंबडे कापले जातात.

देसाई, कोंकार, शेणै असे या देवालयाचे महाजन असून देसाई यांचे ७ गट, ८ वा कोंकार व ९ वा शेणै असे एकूण ९ गट आहेत. पैकीं देसाई हे मूळचे करंवलीचे व कोंकार लोटली येथील आहेत.

काणकोण-कुंकळ्ळी रस्त्याच्या पिसोणें येथून जी पायवाट गेली आहे तिचें खोलपर्यंतचें अंतर अंदाजें चारेक मैलांचें आहे.

श्रीमोहिनीदेवी

मागें दिलेल्या सादळसें येथील या देवालयाच्या शिमगोत्सवांतील प्रेक्षणीय कार्यक्रम देवीच्या उत्साही महाजनवर्गाकडून होतो. कीर, नाईक, बाळे, पै खोत, कामत, पै भाटीकर इ.या देवीचे महाजन आहेत.

श्रीवेताळ (वार्से)

कुंकळ्ळी-काणकोण रस्त्यापासून जवळच असलेल्या वार्से नांवाच्या रानटी खेड्यांत हें लहानसें देऊळ आहे. वेताळाची मूर्ति कृष्णपाषाणी व भव्य आहे. येथें होणारा काला म्हणजेच या देवळाची जत्रा होय.

श्रीलकणेश्वर (मुडकूड)

काणकोण तालुक्यांतील मुडकूड नांवाच्या एका रानटी खेडेगांवांत हें जुन्या पद्धतीचें छोटें देऊळ आहे. गर्भागारांत लिंग असून तें महादेवाचें आहे. येथें होणारा वार्षिक दशावतारी काला हीच या देवालयाची जत्रा. चैत्रांतहि या देवळांत एक उत्सव होत असतो.

श्रीमहादेव (बार्से)

मडगांव-काणकोण रस्त्यावरील 'पिसोणें' येथून तीनेक मैलांवर हें देऊळ आहे. शेती व एका बाजूनें डोंगर अशा ठिकाणीं हें स्थान असून देवळाची रचना जुन्या पद्धतीची आहे. गर्भागारांत लिंग असून अभिषेकानंतर त्याला मुखवटा लावण्यांत येतो. या देवाचा मुख्य उत्सव म्हणजे फाल्गुनी पौर्णिमेची दिवजांची जत्रा होय.

श्रीशांतादुर्गा (फातर्पें)

कुंकळ्ळी जवळच्या बाळ्ळी येथून फातर्पें थोड्याच अंतरावर असून तेथून सरळ रस्ता गेला आहे. सबंध गोमंतकांत फातर्पेंची देवता म्हणून प्रसिद्ध असलेली ही देवी मूळची कुंकळ्ळीची असल्यानें तिला ' शांतादुर्गा कुंकळ्ळीकरीण ' असें म्हणतात. फातर्पें येथील मूळची शांतादुर्गा जवळच असून तिला ' शांतादुर्गा फातर्पेकरीण ' म्हणतात. श्रीशांतादुर्गा कुकळ्ळीकरीण या देवीचें आजचें देऊळ प्रशस्त असून सभामंडपहि विस्तीर्ण आहे.

गर्भागारांत शांतादुर्गेच्या उजव्या बाजूला खंडेरायाची कृष्णशिलेची मूर्ति आहे. कुंकळ्ळी येथून पूर्वी आणलेली जुनी मूर्ति नव्या मूर्तीच्या जवळच खालीं आहे. देवळाच्या मागच्या बाजूनें महादेवाचें लहान मंदिर आहे. शांतादुर्गा फातर्पेकरीण हिचें लहानसें देऊळहि जवळच आहे.

श्रीशांतादुर्गा कुंकळ्ळीकरीण हिची मूळची मूर्ति पंचधातूची चतुर्भुज होती. हल्लीची नवीन मूर्ति चांदीची व सोन्याच्या जाड मुलाम्याची असून, सुंदर आहे.

महादेव, शांतादुर्गा फातर्पेकरीण, खंडेराय, भूमिपुरुष व इतर बारा गटांचे बारा पुरुष येथील परिवार देवतांत आहेत.

दर रविवारीं श्रीशांतादुर्गा देवालयांत भजनाचा सुंदर कार्यक्रम व पालखीचा प्रेक्षणीय सोहळा असतो. या उत्सवास रविवारचा येथें बराच जमाव होतो. येथें अनेक उत्सव होतात. त्या सर्वांत पौषांतील शुक्ल पंचमीपासून दशमीपर्यंत निरनिराळ्या कार्यक्रमानें साजरा होणारा जत्रोत्सव विशेष महत्वाचा व जास्त जमावाचा असतो. या उत्सवांतील नवमीच्या रथास विशेष गर्दी असते. निरनिराळ्या वस्तूंचीं दुकानें तर बरींच येतात. नाट्यप्रयोगहि चांगले होतात.

फाल्गुन वद्य पंचमीला छत्र्यांसह पालखीची मोठी मिरवणूक निघते, व ती कुंकळ्ळी येथें मूळच्या तळीच्या स्थानापर्यंत जाते. महाजन व कुंकळ्ळींतील सारे ग्रामस्थ या पालखीच्या मिरवणुकींत मोठ्या आदरानें भाग घेतात आणि हा दिवस पक्वान्न इ. करून सणाप्रमाणें साजरा करतात.

देवालयांतील कोणत्याहि उत्सवाच्या आरंभीं हुद्याच्या देवळांत तरवार इ. आणून तेथें ठराविक पद्धतीनें प्रथम मान करतात व मग पालखी इ. उत्सवास सुरवात होते. या छोट्या देवळांत एक लहानसें आसन असून त्याला ' आकार-उद्योगी-आसन ' किंवा हुद्यासन असें म्हणतात.

नाईक, देसाई इत्यादि क्षत्रिय मराठे या देवस्थानचे महाजन आहेत.

४ एप्रिल १५६७ रोजीं कुंकळ्ळी येथें हें देवालय जाळण्यांत आलें असें रायतुरचा कॅप्टन दियोग फेर्नांदिस् यानें पोर्तुगालला पाठविलेल्या

आपल्या ६ एप्रिल १५६७ च्या एका पत्रांत लिहिलें आहे. (डॉ. पिसुर्लेकर, भा. मि. व. २६ अं. ६)

ख्रिस्तीकरणापूर्वी श्रीशांतादुर्गादेवीचें देऊळ कुंकळ्ळी येथें आजच्या ख्रिस्ती प्रार्थनामंदिरच्या जागीं होतें. त्या वेळीं तेथें शांतादुर्गा किंवा सांतेरी, महामाया, महादेव, सप्तपुरुष, सिद्ध, सिद्धपुरुष, रामावतार, पाईक, नारायणदेव, रामनाथ, नवदुर्गा, महालपूर्व इ. देव असल्याचा उल्लेख मिळतो. मुख्य देवी श्रीशांतादुर्गा व इतर परिवार देव या सगळ्यांचा खर्च त्या वेळीं कुंकळ्ळीच्या ग्रामसंस्थेतून होई. महादेवाचें देऊळ भिंवसावाडींत होतें.

आजच्या हिंदु भक्तांप्रमाणेंच धर्मांतर केलेले इतर भक्तहि या देवास फार मानतात.

निरनिराळ्या वस्तु, वस्त्रें वगैरे देवीस इच्छा होईल त्या जिन्नसाची ती आपल्या भक्तांकडे मागणी करते व त्याप्रमाणेंच ते लोक ती ती वस्तु देवालयांत आणून भक्तिभावानें देवीस अर्पण करतात. अशा वस्तूंचा दरसाल जत्रेच्या अखेरच्या दिवशीं लिलांव करण्यांत येऊन रक्कम खजिन्यांत जमा केली जाते. देवस्थानच्या बागायतीच्या किंवा व्याजाच्या मुख्य उत्पन्नापेक्षां हें लिलांवापासून येणारेंच उत्पन्न अधिक असतें.

श्रीवेताळ

हें वेताळाचें देऊळ सदरील देवळापासून थोड्याशा अंतरावर स्वतंत्र स्थळीं आहे. गर्भागारांत लिंग आहे. त्यावरून याचें नांव पूर्वी वेताळेश्वर असावें असें दिसतें; कारण बहुतेक सर्व ठिकाणीं वेताळाच्या मूर्तीच असून लिंग सहसा दिसत नाहीं.

या वेताळाचें मूळ ठिकाण असोळणें हें असून असोळणें येथील तो ग्रामदेव आहे. ख्रिस्तीकरणापूर्वी असोळणें येथें सांतेर, वेताळ, पुरुष अशा देवता असल्याचा उल्लेख मिळतो.

हल्ली या वेताळ देवस्थानांत वेताळाशिवाय देवी वेळ्ळीकरीण व देवी आंबिलकरीण अशा दोन देवी आणि ग्रामपुरुष अशा परिवार देवता आहेत, श्रावणसोमवारादि येथें जे उत्सव होतात त्यांत कार्तिकमधील काल्याचा उत्सव विशेष जमावाचा होतो व तोच मुख्य असें मानतात. हा उत्सव कार्तिक वद्य ७ मीस होतो. वेताळाचा शिमगोत्सव खुद्द असोळणें येथेंच मजेंत होतो.

असोळणें येथील ग्रामस्थ या देवाचे महाजन आहेत.

देवी महामाया

या देवीचें मूळ स्थान बार्देस येथें होतें असें म्हणतात. तिचें स्थलांतर या भागांत कधीं झालें हें कळत नसलें तरी ख्रिस्तीकरणाच्या वेळींच होणें शक्य आहे. ‘ कामत महामाय ’ हेच या देवस्थानचे महाजन आहेत. या देवीमुळेंच सदर कामत आपल्या उपनावांपुढें ‘ महामाय ’ असें लावतात.

फातर्पेंपासून जवळच पण अलिकडच्या बाजूनें असलेल्या होर्ण येथें हल्ली हें देवस्थान आहे. देवालय लहानसेंच पण ठीक असून निरनिराळे जे

उत्सव येथें होतात ते कामत महामाय यांच्या ठराविक बागांच्या उत्पन्नांतून केले जातात.

सर्व उत्सवांत कार्तिक वद्य ९ मीचें वनभोजन व काला हे मुख्य आहेत.

श्रीपांडुरंग

हें विठ्ठलमंदिर बाळ्ळी येथें मठांत मध्यभागीं आहे. मूर्ति ठीक असून मंदिर लहानसेंच आहे. मठाच्या पुढील बाजूनें बांधलेलें जवळच एक लहानसें मारुतिमंदिरहि आहे. येथें कार्तिकांत वनभोजनाचा उत्सव होतो. इतरहि किरकोळ उत्सव होतात.

श्रीशांतादुर्गा (बाळ्ळी)

केपें-बाळ्ळी रस्त्यावरच हें देवालय आहे. बाळ्ळी गांवची ही ग्रामदेवी असें मानतात. हिची स्थापना बाळ्ळी गांवच्या वसाहतीच्या आरंभीं झाली असें दिसतें. मूर्ति जुन्या पद्धतीचीच असून देऊळ लहानसेंच पण मजबूत आहे. जवळपास कांहीं परिवार देवहि आहेत.

या शांतादुर्गा देवालयांत जे कांहीं विविध उत्सव होतात त्या सर्वांत फाल्गुन वद्य षष्ठी ते नवमी असा चार दिवस मजेंत साजरा होणारा शिड्यांचा जत्रोत्सव मोठा असतो. कुंडई किंवा पैंगीणच्या पद्धतीप्रमाणें येथें राहाटाचीहि प्रथा असून त्या राहाटाला पूर्वी माणसें बांधण्यांत येत. तथापि हल्लीं ती पद्धत बंद असल्याचें दिसतें. शिड्यांच्या या जत्रोत्सवाला नाट्यप्रयोगांचीहि जोड असते; त्यामुळें सहज लोकांची गर्दी जमते. देसाई, नाडकर्णी इ. या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीशांतादुर्गा (वेर्डें)

ख्रिस्तीकरणापूर्वी वेर्डें येथें दुर्गादेवी, महादेव, कालभैरव असे तीन देव असल्याचा उल्लेख मिळतो. ख्रिस्तीकरणप्रसंगीं दुर्गादेवी व महादेव या मूर्ति होर्ण येथें नेल्या आणि कालभैरवाची मूर्ति मोठी व नेण्यास कठिण वाटल्यानें तत्कालीन भक्तांनीं निरुपायानें ती तेथेंच एका जमिनींत पुरून टाकली. ती दुर्गादेवी म्हणजेच श्रीशांतादुर्गा होय. सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर सदरील दोन्ही मूर्ति होर्ण येथून पुन: वेर्डें येथें आणण्यांत आल्या व निरनिराळीं दोन देवालयें बांधून त्यांत त्यांची स्थापना करण्यांत आली.

वेर्डें हें गांव कुंकळ्ळीपासून दोनेक मैलांच्या अंतरावर आहे.

श्रीशांतादुर्गा देवालयांत श्रावणसोमवार, नवरात्र इ. उत्सव होतात. त्यांत मार्गशीर्ष शु. ८ मीचा काल्याचा उत्सव मुख्य असून त्याच उत्सवाला विशेष लोकजमाव असतो.

देवालयाचें उत्पन्न बेताचेंच असल्यानें खर्चहि मर्यादितच असतो.

या देवस्थानचे महाजन देसाई, गांवकर वगैरे आहेत.

श्रीरामनाथ (तळवडें)

श्रीशांतादुर्गा देवालयापासून श्रीरामनाथ हें देवस्थान पंधरावीस मिनिटांच्या अंतरावर आहे. हीं देवालयें लहानमोठीं मिळून सात आहेत. त्यांची रचना ठीक, पण प्रस्तुतची त्यांची स्थिति समाधानकारक दिसत नाहीं. शांतादुर्गा देवालया-पेक्षां या देवस्थानचें उत्पन्न त्यांतल्या त्यांत जरा जास्त आहे. येथील परिवार देवांत सांतेर, नारा-यणदेव वगैरे सहा देव असून त्याशिवाय पुरुष इ. आहेत.

येथील मुख्य उत्सव म्हणजे काल्याचा व तो मार्गशीर्ष शु. ५ मीस होतो.

गांवकर वगैरे या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीमल्लिकार्जुन (कांवरें)

केपें महालांतील कांवरें येथें हें श्रीशंकराचें देवालय आहे. गर्भागारांत लिंग असून अभिषेका-नंतर त्याला मुखवटा लावतात. देऊळ लहानसेंच आणि उत्पन्नहि अगदीं बेताचें आहे. या देवाल-यांत कित्येक लहान लहान उत्सव होतात. सग-ळ्यांत महत्वाचा व विशेष जमावाचा उत्सव म्हणजे फाल्गुन पौर्णिमेस होणारी दिवजांची जत्रा. पौर्णिमेच्या व दुसऱ्या अशा दोन्हीं दिवशीं नाट्य-प्रयोगहि होतात. देसाई, गांवकर इ. या देवाल-याचे महाजन आहेत.

श्रीपाईक (माइण)

कांवरें येथून जवळच असलेल्या माइण गांवांत हें देऊळ आहे. या देवालयाचा मुख्य उत्सव म्हणजे कार्तिक महिन्यांतील जागर होय.

श्रीवेताळ (सुळकर्ण)

माइण येथून सुळकर्ण गांव जवळचें आहे. वेताळाचें हें देऊळ लहानसेंच पण मजबूत आहे. येथेंहि जागर म्हणजेच मुख्य उत्सव होय.

श्रीवेताळ (गोकळडें)

माइण-सुळकर्णच्या तर्फेतच गोकळडें गांव असून तेथें हें वेताळाचें देऊळ आहे. या देवळांत देखील जागराचा उत्सवच जमावाचा होतो.

श्रीमहादेव (काजर)

सुळकर्ण येथून बऱ्याच अंतरावर पुढें काजर गांव आहे. वसती तुरळक असून देऊळ छोटें पण मजबूत आहे. त्या भागांत काजरचा काला बराच प्रसिद्ध असून कार्तिकमधील त्या काल्यास आसपासच्या गांवांतून बरेच लोक येत असतात. मिर्ची, अळमाड्या, कणगर वगैरे अनेक जिन्नस या काल्यास विकायला येतात.

श्रीसोमनाथ (अर्णे)

केपें-बाळ्ळी या रस्त्यावरच अर्णे गांव आहे. आणि रस्त्यालगतच हें लहानसें शिवालय आहे. मार्गशीर्ष शु. ३ येस होणारा काला या देवालयाची जत्रा होय. या काल्याचें एक कोंकणी काव्य कांहींकांच्या तोंडीं आहे.

श्रीमुदेश्वर

कुसमण येथील 'कोंड' नांवांच्या वाडींत हें लहानसें देऊळ आहे. येथें ठराविक दिवसांत भजनी सप्ताह इ. होतो.

श्रीचंद्रेश्वर (कटा)

कुसमणजवळच्या 'कटा' या वाडींत हें छोटें स्थान असून तेथें श्रीचंद्रेश्वराचें प्रतीक आहे. येथें दरसालचा फाल्गुनांतील शिमग्याचा उत्सव विशेष जमावाचा असतो. कांहीं वर्षांपूर्वी येथील भजनी सप्ताह मोठ्या थाटांत होई.

श्रीचामुंडेश्वरी

केपें तालुक्यांतील शिर्वे गांवच्या देऊळमळ या ठिकाणीं हें देवालय आहे. देऊळ जुन्या पद्धतीचें असून गर्भागारांतील देवीची मूर्ति कृष्णशिलेची चतुर्भूज आहे. या देवळासमोर वारूळ असलेली एक देवळीहि आहे.

नारायणदेव, भूमिपुरुष, पाईकदेव इ. या देवालयाचे परिवार देव आहेत.

मार्गशीर्ष वद्य तृतियेस होणारा काल्याचा उत्सव म्हणजेच येथील जत्रा-उत्सव होय.

सभोंवतीं विस्तीर्ण शेत-जमीन व उघडें वातावरण असल्यानें स्थान बाहेरून रम्य वाटतें.

श्रीपाईकदेव

शिर्वें गांवांतच सदर चामुंडेश्वरीच्या देवालयापासून अंदाजें मैलाच्या अंतरावर जांबावलीच्या बाजूनें नदीकिनारीं हें पाईकदेवाचें छोटें देऊळ आहे. मूर्ति पितळी आहे. हा देव चामुंडेश्वरीच्या परिवार देवतांतीलच आहे. दरसाल फाल्गुन कृ. ३ या रोजीं सदरील देवीच्या देवळांतून पांच छत्र्या मिरवणुकीनें पाईकदेवाच्या देवळापर्यंत जातात व परत येतात. मुख्य छत्रीवर पाईकदेवाची छोटी मूर्ति असते. हा छत्र्यांचा उत्सव पाईकदेवाचा असें मानण्यांत येतें.

या देवळांत हल्लीं कित्येक वर्षांपासून दरसाल आश्विनांत लक्ष्मीपूजनाचा उत्सव होत असतो.

श्रीमल्लिकार्जुन (मळकर्णे)

सदरील पाईकदेवाच्या देवळापासून सुमारें दोन अडीच मैलांच्या अंतरावर मळकर्णे येथें हें शिवमंदिर आहे. या देवालयाची स्थापना बऱ्याच कालापूर्वीची आहे. गर्भागारांतील लिंग व्यवस्थित आहे. जुनें देऊळ जीर्ण स्थितीस आल्यानें हल्लीं तें आधुनिक पद्धतीनें नवीन बांधलेलें आहे. देवालयाचें उत्पन्न व खर्च बेताचाच आहे. सर्व उत्सवांत काल्याचा उत्सव विशेष जमावाचा असून तो कार्तिक कृ. १४ शीस होतो. श्रीमल्लिकार्जुन हा ग्रामदेव असून त्याची स्थापना गांवच्या वसाहतकालीन असावी असें वाटतें.

मळकर्णेकर, गांवकर इ. या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीमहादेव (काकोडें)

सांवर्डे स्टेशनापासून हें देवस्थान अंदाजें एक मैल अंतरावर काकोडें येथें आहे. लहानसें गर्भागार, व्यवस्थित चौक व विस्तीर्ण सभामंडप अशी या देवळाची रचना आहे. देऊळ गांवच्या आर्य वसाहतीच्या आरंभकालीन असावें असें वाटतें. इमारतीची बांधणी जुन्या पद्धतीची असली तरी मजबूत आहे.

दर सोमवारच्या पालखींतील उत्सवमूर्ति पंचधातूची छोटी असून काला, शिवरात्र, शिमगा वगैरे उत्सवांत वामभागीं पार्वती असलेल्या व नंदीवर स्वार झालेल्या मोठ्या मूर्तीची मिरवणूक काढतात.

काला, महाशिवरात्र, शिमगा इ. उत्सवांत काला व शिमगा हे उत्सव विशेष गर्दीचे असतात. दशावतारी काल्याच्या दुसऱ्या दिवशीं येथें पूर्वीं गवळणकाल्याचा सुंदर उत्सव होई. हा काकोडेचा गवळणकाला अखिल गोव्यांत फार प्रसिद्ध असे. त्यावेळीं त्यांत भाग घेणाऱ्या कुशल कलावंत व गायनप्रवीण महिलांचीं अत्यंत प्रेक्षणीय कामें पाहण्यास सर्व भागांतील लोकांची फार गर्दी जमे.

या देवालयाचा दशावतारी काला कार्तिक कृ. ७ मीस आणि शिमग्याचा उत्सव फाल्गुन कृ. २ या ते ५ मींपर्यंतच्या चार दिवसांच्या कार्यक्रमांचा होतो. शिमग्यांतील नाट्यप्रयोग प्रेक्षणीय असतात.

कांहीं वर्षांपूर्वीं येथील श्रावण महिन्यांतील भजनी सप्ताहाचा कार्यक्रमहि फार प्रेक्षणीय होई. या सप्ताहाची सुरवात ब्र. जगन्नाथबुवा बोरीकर यांकडून झाली. अजून त्यांच्या स्मरणार्थ सप्ताहाच्या सातहि दिवसांत सभामंडपांत एका बाजूनें धुमी पेटविली जाते. श्रावणमधील अखेरच्या सोमवारीं सप्ताहाची समाप्ति होते. त्याच्या अलीकडच्या शुक्रवारीं बुवांचें छायाचित्र पालखींत ठेवून मिरवणूक काढण्यांत येते. या सप्ताहाच्या कार्यक्रमांतहि कलावंतींची दिंडी पूर्वीं फार प्रेक्षणीय व प्रसिद्ध असे.

वेताळ, सांतेरी, भूमिका, भवानी, धानुघाडी इ. येथें कित्येक परिवार देवता आहेत.

वेताळ — हा येथील प्राचीन अनार्यांचा देव असावा असें वाटतें. हें देऊळ महादेव देवालयाच्या मागें आहे. वेताळाची मूर्ति नग्न, भव्य व ऊंच, काळ्या पाषाणाची असून नवरात्रमधील ९ मी दिवशीं त्याला लष्करी पोषाख चढवतात. चौकाच्या पुढच्या बाजूनें बकरे, कोंबडे कापण्याची जागा आहे. पूर्वीं तेथें रेडेदेखील कापीत.

सांतेरी — वेताळाच्याच देवळांत समोरच्या दुसऱ्या गर्भागारांत सांतेरीची कृष्णशिलेची मूर्ति आहे. ही ग्रामदेवी असें समजतात.

भूमिका — उधड्यावरच या देवीचें प्रतीक आहे.

भवानी — लहानशी देवळी असून मूर्ति

पितळी आहे.

धानुघाडी — हें छोटें देऊळ जवळच्या घाड्यांच्या वाड्यावर आहे. गर्भागारांत छोटें शिवलिंग आहे व त्यालाच 'धानुघाडी' असें नांव आहे. अर्चेनंतर त्याला पितळी मुखवटा लावतात. पटकुळीच्या कळ्यांचा येथें प्रसाद लावतात. अर्चक वंशपरंपरेनें घाडीच आहेत; या देवाचे मूळचे उपासक घाडीच असावेत असें दिसतें. त्यांचीं तेथें आज तीन घराणीं आहेत. त्यांच्या नांवावरूनच देवालाहि 'घाडी' नांव पडलें असावें.

श्रीमहादेवाच्या देवळासमोर पीराचें एक इस्लामी मंदिर असून त्याच्या खर्चासाठीं या देवस्थानमधून ठराविक शेत-जमीन दिलेली आहे. त्यावरून देवस्थानच्या जागेशीं त्यांचा मूळचा कांहीं संबंध असावा असें वाटतें.

देवालयापासून मैलाच्या अंतरावर सोलयेच्या बाजूस डोंगरीवर एक सिद्धाची देवळी व खालीं पायथ्याशीं एक छोटी तळी आहे. महाशिवरात्रीच्या दिवशीं तेथें सालीना एकदां पूजा होते.

देवस्थानचें उत्पन्न ठीक असून नवीन सुधारणांस बराच वाव आहे.

प्रभु देसाई, सावंत देसाई, कुलकर्णी असे या देवस्थानचे महाजन असून त्यांचे चार गट आहेत.

श्रीमारुती (मारुतीगड)

सांवर्डें स्टेशनसमोर तेथून थोड्याच अंतरावर जी टेकडी दिसते तोच मारुतीगड आहे. गडावरील मारुती मंदिर लहानसेंच असलें तरी सभामंडपामुळें त्याला विशिष्ट शोभा आली आहे. कै. पुरुषोत्तम स. शे. नागवेकर हे या मंदिराचे मूळ संस्थापक. मारुतीरायाच्या प्रेरणेनें त्यांनीं सुरवातीला या जागीं दर शनिवारीं भजनाचा कार्यक्रम आरंभला. पुढें मंडळी जमूं लागली. चार पांच वर्षांनंतर म्हणजे १९१४ त लहानसें गर्भागार बांधून त्यांत एका तात्पुरत्या मारुतीच्या मूर्तीची स्थापना करण्यांत आली. १९२० सालीं मुंबई येथून संगमरवरी वरदहस्त मूर्ति आणण्यांत आली; तथापि तिची रीतसर स्थापना १९३८ सालीं झाली. १९४४ त चौक, सभामंडप यांची जोड मिळून मंदिरास योग्य शोभा आली. कै. अंता व्यं. रायकर यांकडून गडावर जाण्याचा व्यवस्थित रस्ता झाल्यापासून लोकांची या मंदिराकडे जाण्याची चांगली सोय झाली आहे.

या मंदिरांत जे निरनिराळे उत्सव साजरे होतात त्या सर्वांत हनुमान जयंतीचा उत्सव प्रेक्षणीय व विशेष जमावाचा असतो. या उत्सवास नाट्यप्रयोगांचीहि जोड असते.

मारुतीरायांच्या स्वप्नांतील सूचनेनुरूप पुजारी खेडकर भट यांनां गडाच्या पायथ्याशीं असलेल्या शेतजमिनींत एक विशिष्ट स्वरूपाची पाणथळ जागा आढळली असून तेथें मारुतीरायाची तळी बांधतां येणें शक्य असल्याचें कळतें.

मंदिराच्या सभामंडपाखालीं उतरणीवर मंदिराचे मूळ संस्थापक नागवेकर यांचा स्मारकस्तंभ आहे.

नागवेकर, नागझरकर, रायकर, वेर्लेकर, कारैकर, हळदणकर, बांदोडकर, शिरोडकर, मडकईकर, लोटलीकर व वेर्णेकर असे दैवज्ञ ब्राह्मण या देवालयाचे महाजन असून त्यांचे अकरा गट आहेत.

श्रीमहादेव (कुडचडें)

चंद्रनाथ पर्वतावरील श्रीचंद्रेश्वराचें प्रतीक म्हणून आरंभीं या देवाची येथें स्थापना झाली. चंद्रेश्वराच्या एका नि:सीम भक्ताला म्हातारपणीं तिकडे पोंचणें अशक्य झाल्यानें व त्याची दर सोमवारची नियमीत वारी चुकण्याचा प्रसंग आल्यानें तो फार दु:खी झाला व त्याच रात्रीं त्याला स्वप्नांत मिळालेल्या सूचनेप्रमाणें दुसऱ्या दिवशीं ठराविक शेतजमिनींत लिंग दिसून आलें असें कळतें. महादेवाचें लिंग लहानसेंच असून गर्भागारहि छोटेंच आहे; तथापि नवीन बांधण्यांत आलेला सभामंडप विस्तीर्ण आहे. याच मंडपांत मराठी विद्यालयाचे वर्ग चालू असतात. हें देऊळ सांवर्डें स्टेशनापासून जवळच आहे.

येथें साजरे होणाऱ्या उत्सवांत महाशिवरात्रीचा उत्सव मोठा मानला जातो. जमावहि ठीक असतो. या उत्सवांत २४ तासांचा भजनी सप्ताह आणि इतरहि प्रेक्षणीय कार्यक्रम असतात. नाट्यप्रयोगांचीहि चांगली जोड असते.

देवस्थानचें वार्षिक उत्पन्न अगदीं बेताचेंच असून तेवढाच खर्चहि आहे.

कुडचडकर, संजगिरी व कंटक असे या देवालयाचे महाजन आहेत.

धानूगडी, राखणदेव इ. परिवार देवताहि जवळच आहेत.

श्रीसांतेरी (शेळडें)

केपें येथून जवळ असलेल्या त्याच तालुक्यांतील शेळडें गांवांत हें देऊळ आहे. तेथील ही ग्रामदेवी. देवालय लहानसेंच आहे. येथील जत्रा वार्षिक ठराविकच दिवशीं अशी नसून कांहीं दैविक घटना घडून आल्यानंतरच ती होत असते. गांवस देसाई, शेळडेंकर हे या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीसांतेरी (असोळडें)

केपें तालुक्यांतील असोळडें येथील ही ग्रामदेवी आहे. हिची स्थापना या गांवच्या वसाहतीच्या वेळची आहे. सांतेरीच्या गर्भागारांत देवतेच्या मुख्य जागीं वारूळ असून त्याच्या पुढें मूळची लांकडी व नंतरची पंचधातूची अशा मूर्ति आहेत. या उभय मूर्तींची पूजा करण्यांत येते. देऊळ लहानसेंच आहे.

नवरात्र इ. दिवसांत येथें कांहीं किरकोळ उत्सव होतात; पण जत्रा माघ महिन्यांत होते. माघ शु. ६ ष्ठी व ७ मी हे दोन दिवस त्या जत्रेचे आहेत.

ईश्वर व पाईक अशा परिवार देवता असून ईश्वराची मूर्ति मूळची चांदर येथील आहे.

राऊत देसाई व असोळडेकर या देवालयाचे महाजन आहेत. राऊत हे मूळचे वेर्णें येथील असून ख्रिस्तीकरणप्रसंगीं येथें आलेले आहेत.

श्रीमहादेव (कोटंबी)

या देवालयाची स्थापना कोटंबी गांवच्या वसाहतकालीं झाली असावी. गर्भागारांतील शिवलिंग कृष्णपाषाणी आहे. देऊळ लहानसेंच व उत्पन्नहि बेताचेंच आहे. या देवस्थानचा मुख्य उत्सव म्हणजे काल्याचा व तो मार्गशीर्ष शु. ४ थीला साजरा होतो. देसाई व रेगे या देवालयाचे महाजन आहेत.

पारोडें येथील नदीपलीकडील अवेडें या गांवांपासून कोटंबी मैल सव्वा मैल अंतरावर आहे.

श्रीशांतादुर्गा (घुडा)

केपें तालुक्यांत पारोडेच्या नदीपलीकडे हें देवीचें स्थान आहे.

ही देवी मूळची कुरतरी येथील असून ख्रिस्तीकरणप्रसंगीं तिचें स्थलांतर येथें झालेलें आहे. त्यावेळीं कुरतरी येथें सांतेर, नारायण, चंद्रेश्वरी, क्षेत्रपाल, रवळनाथ, चंद्रनाथ, दुर्गादेवी इ. देवता असल्याचा उल्लेख मिळतो. त्यांतील सांतेर हीच हल्लीची शांतादुर्गा, तत्कालीन चंद्रेश्वरी हीच परिवार देवतांतील आजची चामुंडेश्वरी, नारायण हा लक्ष्मीनारायण व चंद्रनाथ हाच आजचा महादेव आहे.

देऊळ लहानसेंच व जुन्या पद्धतीचें आहे. विहीर इ. हल्ली किंचित् नवीन कामें दिसतात; पण अजून अनेक सुधारणांची येथें जरूरी भासत आहे. देवालयाचें उत्पन्न बेताचेंच आहे.

येथें निरनिराळे उत्सव होतात. सगळ्यांत विशेष गर्दीचा उत्सव म्हणजे जत्रा. हा जत्रोत्सव पौष शु. १३ शीपासून १५ मा असा तीन दिवस चालतो.

श्रीचामुंडेश्वरी, लक्ष्मीनारायण, महादेव, रवळनाथ, ग्रामपुरुष इ. येथें परिवार देवता आहेत.

भट, कामत, पाटणेकर, नाईक, कुरतरकर वगैरे येथील महाजन आहेत.

दर्शन

पारोडें येथें हें छोटें मंदिर असून त्याच्या गर्भागारांत एक लहानशी शिला आहे. हें श्रीचंद्रेश्वराचें प्रतीक मानतात. या मंदिरासमोरच शिमगा-उत्सव होतो.

श्रीसांतेर

देवीची मूर्ति कृष्णपाषाणी असून बरीच प्राचीन असावी असें वाटतें.

पारोडें येथील हें देवस्थान भोंवतालच्या शेतीमुळें रम्य वाटतें. येथील जमावाचा उत्सव म्हणजे काला आणि याच देवालयातर्फे होणारा शिमगा. हा शिमगा-उत्सव गुढीपाडव्यापासून तीन दिवस चालतो. फळ देसाई आणि सुकेरकर, कामत, खरंगटे, नाईक, हेगडे, पडियार, प्रभु, केणी इ. पारोडेचे रहिवासी या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीमहादेव (मुळें)

सदर देवळाच्या मागच्या बाजूनें अंदाजें दीडेक मैलाच्या अंतरावर हें शिवालय आहे. लिंग कृष्णपाषाणी व देऊळ छोटेंसें आहे. काला हाच येथील जमावाचा उत्सव.

श्रीचंद्रेश्वर (चंद्रनाथ पर्वत)

ज्या चंद्रनाथ पर्वताच्या शिखरावर हें देवस्थान आहे तो पर्वत गोमंतकांतील महत्वाच्या पर्वतांपैकीं एक आहे. याची उंची समुद्रसपाटीपासून ३४८ मिटर आहे. पर्वतावरील सृष्टिसौंदर्य मनोहर असून त्याच्या शिखरावरून सबंध गोमंतकाचें विहंगम दृश्य दिसतें. हवा छान असल्यानें उन्हाळ्यांत शिखरावर मोठी मजा वाटते. प्रवाशांच्या स्वागतार्थ गार वारा नेहमींच सज्ज असतो. मडगांव-केपें रस्यावरील पारोडें गांवापासून हा चंद्रनाथ पर्वत अगदीं जवळ आहे.

पर्वतावर ठिकठिकाणीं कित्येक झरे असून त्यांनां 'गणेशतीर्थ,' 'कपिलतीर्थ' अशीं नांवें आहेत. पायथ्याशीं शंखभैरवाचें छोटें देऊळ आहे. वर जाणारे लोक प्रथम याचें दर्शन घेऊन मग डोंगर चढूं लागतात. पायथ्यापासून दीडेक मैलांवर देवस्थानचें स्थल लागतें. येथें अग्रशालेलगतच्या लहानशा मंदिरांत चंद्रेश्वराची प्रतिमा आहे आणि जवळच देवाची तळी आहे. सेवेकरी लोकांचींहि घरें येथेंच आहेत. श्रीसिद्धभैरव व कालभैरव हीं दोन छोटीं मंदिरें व सिद्धकुंडतीर्थ याच ठिकाणीं आहे. येथून पर्वतशिखरावर जाण्याच्या घाटास सुरवात होते. पंधराएक मिनिटें उंचवटा चढून शिखरावर जातांच तेथील शुद्ध व स्वैर वाऱ्यानें श्रम दूर होत जाऊन समाधान वाटतें. शिखरावरील सुंदर सपाटीवर श्रीचंद्रेश्वराचें मोहक मंदिर असून त्याच्या डावीकडे भूतनाथाचें छोटें देऊळ आहे.

श्रीचंद्रेश्वर ही देवता फार प्राचीन असून तिची स्थापना कधीं व कोणाकडून झाली हें निश्चित कळत नाहीं; तथापि या देवाच्या भक्तवर्गांत कित्येक राजे लोकांचा समावेश होता असें दिसून येतें.

सहाव्या शतकांत गोव्यांत 'भोज' राजघराण्याची राजवट सुरू असल्याचें बांदिवडें येथें मिळालेल्या संस्कृत भाषेंतील एका ताम्रपटावरून कळून येतें. याच वंशांतील चंद्रवर्मा नामक राजानें शिवपूर येथील महाविहारास एक शेतजमीन दान दिल्याचा ताम्रपट स. १९४१ त डॉ. दीक्षित यांनीं प्रसिद्ध केलें. त्यांच्या वाचनांतील कांहीं चुका सुधारून डॉ. दीनेश सरकार यांनीं तो पुन: छापला. हा ताम्रपट त्याच्या अक्षरवळणावरून पांचव्या शतकांतील असावा असा इ. सं. डॉ. पिसुर्लेकर यांचा कयास आहे. चंद्रपूर देश व शिवपूर विषय तसेंच चंद्रपूर व शिवपूर हीं नांवें गोव्यांत सांपडलेल्या उत्तरकालीन ताम्रपटांत आलीं आहेत. चंद्रपूर देश म्हणजे सांप्रतची चंद्रवाडी व चंद्रपूर म्हणजे आजचें चांदर हें निश्चित आहे. शिवपूर हें शिरोडेचें प्राचीन नांव असलें, तरी शिवपूर हा गांव परटहार (पारोडें) गांवच्या पर्वताजवळहि असल्याचें 'भोज' राजवंशांतील ६ व्या शतकांतील कांहीं ताम्रपटांवरून दिसून येतें.

सदरील चंद्रवर्मा राजानें उघड्या स्थितींत असलेल्या पर्वतावरील या नमुनेदार शिवलिंगाला ५ व्या शतकांत मंदिर बांधून त्याला 'चंद्रेश्वर' असें नांव दिलें असणें संभवनीय आहे.

सहाव्या शतकांत तर पर्वतावरील श्रीचंद्रेश्वर देवालय प्रसिद्ध असल्याचा व भोज वंशांतील पृथ्विमल्लवर्म्म या राजानें त्याचा जीर्णोद्धार करून तें ग्रहणपर्वकालीं ब्राह्मणांनां दान दिल्याचा उल्लेख मिळतो.

त्यानंतरच्या राजांकडूनहि या देवस्थानास देणग्या इ. मिळाल्या आहेत. राजे सौंदेकर

यांकडूनहि देवालयास जमीन इनाम मिळाली आहे असें कळतें. सौंदेकरांचा तत्कालीन प्रधान सांतू शेणवी डांगी हा तर सन १७३८ ते १७४० पर्यंत श्रीचंद्रेश्वर देवालयाचा पारपतगार होता.

चंद्रेश्वराचें लिंग छोटें, सुंदर व स्वयंभू आहे. गर्भागाराची पश्चिम बाजूची भिंत चंद्रशिलेची असून त्याच शिलेच्या खालील टोंकास हें लिंग आहे. झरोक्यांतून ज्या वेळीं पूर्ण चंद्राचे प्रकाश-किरण त्या शिलेवर पडतात त्यावेळीं शिलेंतून द्रव निघतो असें सांगतात.

या देवालयास उत्पन्न चांगलें असून उत्सवहि अनेक होतात; तथापि त्या सर्वांत चैत्र पौर्णिमेचा उत्सव जत्रेचा अर्थात् विशेष जमावाचा असतो. ११ शी ते १५ मापर्यंत नाट्यप्रयोगहि असतात.

गणपति, महालक्ष्मी, दुर्गादेवी, भूतनाथ, शंख-भैरव, सिद्धभैरव, कालभैरव इ. कित्येक परिवार देवता असून तीर्थेंहि अनेक आहेत. पैकीं श्रीभूत-नाथाचें प्रस्थ मोठें आहे. मुख्य मंदिराजवळ छोट्याशा देवळांत दृष्टि चंद्रेश्वराकडे लावून भूत-नाथ कलता उभा आहे. या निसर्गरम्य पर्वतानें गवई, वादनकार, नट अशा अनेक कलाकारांनां जन्म दिला आहे.

प्रभु देसाई, फळ देसाई, गांवस देसाई, राऊत देसाई, शेळडेंकर, असोळडेंकर, शिवेंकर, मळकर्णे-कर, रेगे, तळवडकर, होडकर, नाईक इ. या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीमहालक्ष्मी (नेतर्ली)

सांगें तालुक्यांतील नेतर्ली या गांवास पूर्वी नेत्रावती किंवा नेत्रावळी म्हणत. तेथील नेत्रावती या नदीच्या नांवावरून हें नांव गांवास मिळालेंसें दिसतें. याच गांवांत सदर नदीलगत हें देऊळ आहे. तेथील प्रभु देसाई यांचें महालक्ष्मी हें कुल-दैवत आहे. प्रभु देसाई यांचें मूळचें उपनांव आठवले हें असून गांव कोल्हापूर आहे. कोल्हा-पूरची महालक्ष्मी त्यांचें कुलदैवत आणि तिचीच ही प्रतिमा आहे. गोमंतकाचे एक प्राचीन राज-कर्ते शिलाहार यांची मूळ राजधानी कोल्हापूर व तेथील महालक्ष्मी त्यांची कुलदेवी. त्यांची दुसरी शाखा गोव्यांत स्थापन झाली. त्यांच्या वेळीं किंवा मागून आठवले गोव्यांत आले असावे. पुढें त्यांनीं पाळी येथें देशमुखीचा हक्क मिळवून ते देसाई झाले. नंतर कांहीं कारणानें तो गांव सोडून ते नेतर्लीस आले आणि नेतर्लीच्या मूळच्या प्रभु घराण्याचा हक्क मिळाल्यावर ते प्रभु देसाई असें उपनांव वापरूं लागले. मूळच्या मराठे प्रभु घराण्याचें ' नास ' नांवांचें क्षत्रिय दैवत अजून प्रभु देसाई यांच्या दरवाजांत आहे आणि अजून त्याला ठराविक दिवशीं कोंबड्यांचें बली-दान करावें लागतें. द्रविडांतर्गत असूनहि त्यांनां शिकार करावी लागते व शिकारींतील सावज आणून पहिला मान दरवाजांतील त्या क्षत्रिय दैवतास करावा लागतो.

महालक्ष्मीची मूर्ति कृष्णपाषाणी असून सुंदर आहे. या मंदिरांत भजनी सप्ताह, नवरात्रोत्सव, महाशिवरात्र इ. उत्सव होतात. महाशिवरात्रीचा

उत्सव जास्त जमावाचा व नाट्यप्रयोग इ. मुळें प्रेक्षणीय असतो. मंदिर लहानसेंच असलें तरी चांगलें आहे.

बन्धनपुरुष

याची मूर्ति काळ्या पाषाणाची असून देऊळ लहानसें आहे. सदर देसाई घराण्याचा हा मूळ पुरुष आहे.

श्रीदत्तात्रेय (नेतर्ली)

औदुंबराच्या पारालगत दगडांत कोरलेल्या देवळींत या दत्तमहाराजांची स्थापना केलेली आहे. गुरुप्रतिपदा, द्वादशी, जयंती इ. उत्सव येथें होतात. हल्ली या देवस्थानची बरीच सुधारणा करण्यांत आली आहे.

श्रीगोपीनाथ (नेतर्ली)

देऊळ लहानसेंच, मूर्ति कृष्णपाषाणी गोपालकृष्णाची, मोहक आणि अगदीं जवळ तळी असल्यानें स्थान प्रेक्षणीय वाटतें. या तळीला 'बुडबुडतळी' अशी संज्ञा असून तिला तीर्थ असें मानण्यांत येतें. त्यामुळें सारे तीर्थविधि किंवा क्षेत्रविधि येथें होतात. महाशिवरात्रीचा उत्सव येथें जत्रेसारखा जमावाचा असतो. त्या दिवशीं तळींतील पाण्यांतून वरचेवर बुडबुडे येत राहतात. बऱ्याच कालापूर्वींपासून या ठिकाणीं क्षेत्रविधि होतात.

वेताळ

नेतर्लीच्या बांदावाडा येथें हें देऊळ आहे. हें बरेंच प्राचीन असून अनार्यांचें असावें असें दिसतें. मूर्ति काळ्यापाषाणाची व भव्य आहे.

दुर्गादेवी

सदर गांवांत 'वर्गणी' या वाडींत हें छोटें देऊळ आहे. वसंतऋतूंत येथें वनभोजनाचा उत्सव होतो.

महामाया

नेतर्लीजवळच्या तुंदें या गांवांत हें छोटें देऊळ आहे. येथील जमावाचा उत्सव म्हणजे काल्याचा होय. देंऊळ लहानसेंच असून त्याची मोठी प्रसिद्धि नसली, तरी तेथील गांवकरी लोक महामाया देवीला फार मानतात.

चंद्रेश्वर (विचुन्द्रें)

कुर्डी-नेतर्ली रस्त्यावरच हें छोटें देऊळ आहे. येथील जत्रा म्हणजे मार्गशीर्ष व. १२शीस होणारा दशावतारी काला.

भूतनाथ इत्यादि परिवार देवताहि जवळच आहेत.

चन्द्रेश्वराची मूळ स्थापना पूर्वकालीं एका गांवकऱ्याकडून झाली. तो पर्वतावरील चंद्रेश्वराचा भक्त होता. वृद्धापकालीं दूर जाणें व पर्वतावरील चढण चढणें त्याला अशक्य झाल्यानें त्यानें गांवांतच आपल्या इष्टदेवतेची स्थापना केली.

श्रीकुर्पेश्वर (कुंर्पे)

सांगें तालुक्यांतील कुंर्पे गांवचा हा ग्रामदेव आहे. याची स्थापना बरीच प्राचीन असावी असें दिसतें. या देवालयांतील महाशिवरात्रीचा उत्सव जास्त जमावाचा असतो.

श्रीमाधवनाथ (कुंर्पे)

सांगें-नेतर्ली रस्त्यालगतच कुंर्पे येथें हें मंदिर आहे. आटोपशीर व व्यवस्थित रचनेमुळें देऊळ लहान असूनहि सुंदर दिसतें. हें नाथसंप्रदायाच्या कालांतील आहे. भाटीच्या सिद्धनाथ पर्वतावरील सिद्धनाथाचा माधवनाथ हा शिष्य आहे असें सांगण्यांत येतें. जत्रेच्या वेळीं सिद्धनाथाचा त्रिशूळ माधवनाथाजवळ आणल्यावांचून उत्सवास आरंभच होत नाहीं, यावरून त्या म्हणण्यांत तथ्य असावें असें वाटतें. गर्भागारांत छोटें लिंग असून जवळच माधवनाथाच्या पादुका आहेत. येथें प्राचीनकालीं माधवनाथाचा मठ होता व मठांतीलच हें मंदिर आहे. अजून या भागास 'मठा-मळ' अशी संज्ञा असून येथील त्रिशूळ घेऊन शंख फुंकीत दारोदार जाणाऱ्या मठकरी लोकांची जवळपास वसती आहे.

बाराव्या शतकांत सबंध महाराष्ट्रांत नाथ-संप्रदायानें धर्मजागृतीची फार मोठी कामगिरी बजावली आहे. त्यावेळीं नाथसंप्रदायी कित्येक साधु गोव्यांत आल्याचा उल्लेख मिळतो. सिद्ध-नाथ, माधवनाथ हेहि त्याच कालांतील असावेत असें वाटतें.

आदिनाथ (श्रीशंकर) हरनाथ, रघुनाथ, मच्छींद्रनाथ, जालंदरनाथ, गोरक्षनाथ, चर्पटीनाथ, कानीफनाथ, गहिनीनाथ, गैबीनाथ, निवृत्तिनाथ, ज्ञाननाथ, (श्रीज्ञानेश्वर) इ. या पंथांतील अनेक साधु प्रसिद्ध आहेत. नवनाथ भक्तिसारांत नवनाथसिद्धांची माहिती मिळते, तर हटयोग प्रदीपिकेंत चौदा नाथांची आणि अन्य वाङ्मयांतून चौऱ्यांयशीं नाथांचा उल्लेख हिल्तो. मेखला, शृंगी, पुंगी, कंथा, कर्णमुद्रा, कौपीन, व्याघ्रांबर, पादुका, झोळी अशीं या पंथाचीं बाह्य निशाणें असून ते कानास भोंकें पाडतात व त्यांत वाटोळीं लांकडी कुंडलें घालतात; यास्तव त्यांनां कान-फाटेहि म्हणतात.

श्रीज्ञानेश्वरांप्रमाणेंच आपले सोहिरोबानाथ आंबियेहि नाथपंथीच साधु होते.

माधवनाथ मंदिरांतील मुख्य उत्सव म्हणजे पौष वद्य ५ मीस होणाऱ्या दशावतारी काल्याचा होय. हा जत्रोत्सव चार दिवस कार्यक्रमाचा व मोठ्या गर्दीचा असतो. अष्टग्रहार ग्रामसंस्थेचे वर्गीय व गांवकरी इ. येथील महाजन आहेत.

श्रीसोमेश्वर (कुर्डी)

या शिवलिंगाची स्थापना वसाहतकालीन असावी असें दिसतें. मूळचें देवालय संगमाजवळ होतें. मुसलमानी अंमदानींत तेथें त्या लोकांची बरीच चलती असल्यानें देवळाजवळ गोहत्यादि प्रसंग होऊं लागले आणि अशा एका प्रसंगीं अर्चकाच्या स्वप्नांतील सूचनेप्रमाणें तेथून ही देवता आजच्या जागीं आणण्यांत आली. आजचें देऊळ नदीजवळच व पूर्वाभिमुख आहे. देवळांत उजवीकडे गणपति व डावीकडे विष्णुमूर्ति असून जवळच्याच श्रीरामनाथ देवस्थानच्या शेतजमि-नींत श्रीभगवतीची देवळी आहे. याच श्रीसोमे-श्वराच्या परिवार देवता आहेत. या देवस्थानचा

मुख्य उत्सव म्हणजे चैत्र १५ मेचा होय. नाट्यप्रयोगादि कार्यक्रमानें हा दोन तीन दिवस चालतो.

अष्टग्रहार ग्रामसंस्थेचे वर्गीय लोक या देवालयाचे महाजन आहेत.

हें देवस्थान एके काळीं नृत्यकुशल व गायनवादनप्रवीण व्यक्तींबद्दल प्रसिद्ध होतें.

श्रीराम-लक्ष्मण-मंदिर

कुर्डी येथेंच श्रीरामनाथ देवस्थानच्या धरणाजवळ हें मंदिर आहे. मंदिर लहानसेंच; पण त्याची बाह्य रचना मोहक असून बांधणी दक्षिणेकडील देवालयांच्या पद्धतीची आहे. हें फार जुनें अतएव द्रविडकालीन असावें असें दिसतें. या भागांत द्राविडी वसाहतीचीं दुसरींहि कांहीं चिन्हें दिसतात. १९३४ च्या डिसेंबरांत मंदिरांत राम, लक्ष्मण व सीता अशा तिन्ही मूर्ति दिसत होत्या. लक्ष्मणाची मूर्ति डावा हात तुटलेली अशी होती. पुढें मंदिराच्या दारावर वृक्षवेलींनी गर्दी केल्यानें आंतला भाग मुळींच दिसेनासा झाला. सर्प, वाघादि क्रूर प्राण्यांच्या भीतीमुळें सध्या आंत जाणेंहि धोक्याचेंच होऊन बसलें आहे.

श्रीमल्लिकार्जुन (भाटी)

कुर्डीपासून भाटी थोड्याच अंतरावर आहे. देऊळ लहानसें व जुन्या पद्धतीचें असून गर्भागारांत शिवलिंग आहे. हा तेथील ग्रामदेव आहे. मार्गशीर्ष शु. ८ मीचा काला म्हणजेच या देवालयाची जत्रा होय. भाटीकर, मोरजकर, गांवकर, वेळीप इ. या देवळाचे महाजन आहेत.

श्रीसिद्धनाथ (भाटी)

सिद्धनाथ पर्वतावर हें छोटें मंदिर आहे. गर्भागारांत शिवलिंग, पादुका व त्रिशूळ आहे. हा सिद्धनाथ नाथपंथी असून कुंपैच्या माधवनाथाचा गुरु असें समजण्यांत येतें. फाल्गुन शु. १ देस श्रीसिद्धाची जत्रा असते. सिद्ध, सांतेर, पाईक इ. मल्लिकार्जुनाच्या परिवार देवता आहेत.

श्रीसिद्ध (विळियेण)

भाटीजवळच्या विळियेण गांवांतहि एक सिद्धाची देवळी असून पौष व. २ येस तेथें काल्याचा उत्सव होतो.

श्रीमल्लिकार्जुन (कुमारी)

छोटें, जुन्या पद्धतीचें मंदिर आणि त्यांत लहानसें लिंग आहे. पौष वद्यांत या देवाचा काला होतो.

श्रीनागनाथ (नायकिणी)

घाटमाथ्यावरील व्यापार ज्यावेळीं या वाटेनें सांगें बाजारांत येई त्यावेळीं नायकिणीच्या नागनाथमंदिराजवळ लमाण लोकांचा तळ पडे. हें छोटें शिवमंदिर असून मार्गशीर्ष शु. १० मीस तेथें काल्याचा उत्सव होतो.

श्रीकलनाथ (तळावली)

भाटीजवळच्या तळावली येथें हें छोटें देऊळ असून मार्गशीर्षांत तेथें जागराच्या उत्सवाला आसपासचे लोक जमतात.

श्रीसिद्धेश्वर (उगें)

सांगें येथून अडीच एक मैलांच्या अंतरावरील उगें गांवांत हें शंकराचें स्थान आहे. गांवचा मुख्य देव असल्यानें पहिला मान जरी याचा असला, तरी बहुतेक सर्व उत्सव वगैरे कार्यक्रम जवळच्या हेमाडदेवमंदिराकडेच होतात.

श्रीहेमाडदेव (उगें)

उगेंचें आजचें प्रसिद्ध देवालय हेंच आहे. मूर्तीचा पेहराव दरबारी थाटाचा असून बहुतेक सर्व उत्सव याच मंदिरांत होतात. हे हेमाडदेव म्हणजे देवगिरीच्या यादवांचे मंत्री हेमाडपंत असू शकतील. देवगिरीच्या यादवांनीं कदंबांवर स्वारी करून त्यांनां आपले मांडलीक बनवल्यानें यादवांची साम्राज्यसत्ता गोमंतकावर चालू झाली होती. १२४७ ते १३०९ या ६२ वर्षांत कृष्ण-देव, महादेव व रामदेव या यादव राजांच्या राजवटी झाल्या. पहिल्या दोघांच्या कारकीर्दीत मंत्री या नात्यानें हेमाडपंतांनीं ४० वर्षे राज्य-कारभार चालविला. ते शूर, कुशल राजकरणी, विद्वान, धर्मशास्त्रज्ञ, ग्रंथकार व कलाभिज्ञ होते. ते वत्सगोत्री ब्राह्मण असून त्यांची कुलस्वामिनी श्रीमहालसा होती.

ओवळें येथील रामदेवरायाच्या ताम्रपटांत समस्त करणाधिप मंत्रिचूडामणि हेमाद्रीपंडित-हेमाडपंत असा उल्लेख असून त्यांच्या कोंकणां-तील जहागिरीचाहि ओझरता निर्देश आहे. ही त्यांची कोंकणांतील जहागिरी म्हणजे आजच्या सांगें महालांतील हेमाड आणि हे हेमाडदेव म्हणजे हेमाडपंत असावेत असें वाटतें. उगें हें हेमाड परगण्यांतच आहे. सर्व दृष्टीनें लोकादरास पात्र झालेल्या या महाशक्तिमान अधिकाऱ्याची पुढें त्याच्या जहागिरींत मूर्ति घडवून मंदिर बांधणें अशक्य दिसत नाहीं.

हेमाडदेवाचा काला हाच या देवालयाचा मुख्य उत्सव असून तो पौष वद्य द्वादशीस होतो.

हेमाडबार्से ग्रामसंस्थेचे वर्गीय लोक या देव-स्थानचे महाजन आहेत.

श्रीपाईकदेव (कोठारली)

सांगें येथून दीड एक मैलाच्या अंतरावर हें देवस्थान आहे. वास्तविक सांगें शहरचा अंतर्भाव देखील या कोठारली गांवांतच होतो इतकें हें विस्तीर्ण गांव आहे. पाईकदेवाचें मूळचें देऊळ अगदीं जुन्या पद्धतीचें होतें. त्याचा जीर्णोद्धार होऊन आजचें देऊळ नवीन पद्धतीचें व सुरेख असें बांधण्यांत आलें आहे.

या देवालयांत लहान लहान कित्येक उत्सव होतात. सर्व उत्सवांपैकीं प्रेक्षणीय व विशेष कार्यक्रमांचा हल्लीच सुरू झालेला स्मारकोत्सव होय. नवप्रतिष्ठा-स्मारक म्हणून हा उत्सव माघ वद्य तृतीया ते षष्ठी असा चार दिवस साजरा होतो. याला नाट्यप्रयोगांचीहि जोड असते.

गतकालचे भाविक लोक पाईकदेवाच्या जागरूकतेच्या अनेक गोष्टी सांगत असत.

सांगें येथील शिगमा हा जुन्या कालापासून चाललेला पाईक देवाचाच प्रसिद्ध उत्सव आहे. हा फाल्गुन वद्य ११ शीपासून अमावास्येपर्यंत चालतो. नाट्यप्रयोगहि ठीक होतात. अखेरच्या रात्रीं सुरवातीस होणारा वीरभद्राचा कार्यक्रम महत्वाचा असतो. तो झाल्यावांचून शिमग्याच्या उत्सवाची पूर्तता होतच नाहीं. या कार्यक्रमाची सुरवात राजे सौंदेकर यांच्या राजवटीच्या आरंभापासून झाली असावी असें वाटतें. त्यांतील बहुतेक शब्द कानडी भाषेंतूनच उच्चारले जातात.

ज्या ठिकाणीं हा शिमगा-उत्सव करण्यांत येतो तेथें जवळच रंगभूमीच्या डाव्या बाजूस पाईक-देवाचें स्थान व प्रतीक आहे. तेथून पुढें चार रस्त्यांवरील एका पारावर राधा देवीचें मंदिर आहे. या छोट्या मंदिरांतील मूर्ति सुंदर आहे. **श्रीरामनाथ** व **श्रीसांतेर** या देवताहि कोठारली येथेंच आहेत.

श्रीसंगमेश्वर (सांगें)

सांगें येथेंच उत्तरेकडील बाजूनें नदीसंगमावर संगमेश्वराची देवळी आहे. हें स्थान पाण्यांत मध्यमार्गी असल्यानें रमणीय वाटतें. लिंग छोटें असून जुनी देवळीहि अगदींच छोटी होती. हल्लीं ती नवीन बांधण्यांत आलेली आहे. महाशिवरात्रीच्या दिवशीं येथें अभिषेकादि अनेक देवकृत्यें होतात. अर्थात् मंडळीहि जमते.

श्रीपांडुरंग (सांगें)

सांगें गांवच्या पूर्वेकडील नदीकिनारीं रम्य ठिकाणीं हें विठ्ठलमंदिर आहे. देवळाची रचना जुन्या पद्धतीची साधीच असली, तरी व्यवस्थित आहे. पुढील पटांगणहि ठीक असून पायऱ्या उतरून खालीं नदीतीरावर गेल्यावर तेथील वाळवंटाची रचना देखील प्रेक्षणीय आणि प्रसन्न दिसते.

गर्भागारांतील मूर्ति कृष्णपाषाणी असून तिची मूळ स्थापना वारकरी विठ्ठलभक्ताकडून झाली. मंदिरासाठीं जागा निवडण्यांत आणि पंढरपूरच्या रचनेशीं जुळती अशी नदीपर्यंतची टाकठीक रचना करण्यांत संस्थापकांची बरीच कुशलता दिसून येते.

आषाढी, कार्तिकी, नवरात्र वगैरे जे उत्सव या देवालयांत होतात त्या सगळ्यांत जास्त जमावाचा व नाट्यप्रयोगादि कार्यक्रमामुळें विशेष प्रेक्षणीय असा उत्सव म्हणजे काल्याचा होय. हा कार्तिक शु. १२ शीस होतो आणि व. १ देस सकाळीं रथाची मिरवणूक निघते.

श्रीदत्तात्रेय (सांगें)

सांगेंच्या पश्चिमेकडील बाजूनें नदीजवळ हें दत्तमंदिर आहे. दत्तभक्त पुरुषोत्तमभट सप्रे यांनां गाणगापूरला श्रीदत्तमहाराजांच्या या पादुकांचा लाभ झाला. औदुंबराच्या पारावर छोट्या देवळींत त्या पादुकांची आरंभीं स्थापना करण्यांत आली. कांहीं दिवसांनंतर लहानसें मंदिर बांधण्यांत आलें आणि पुढें कांहीं कालानें त्याला सभामंडपाची जोड लाभली. मंदिर सार्वजनिक स्वरूपाचें असल्यानें सांगें येथील सर्वच लोकांचा त्याच्या कार्यास पूर्ण पाठिंबा असून त्यामुळें गुरु १२ शी व दत्तजयंती हे उत्सव थाटांत साजरे होतात. मंदिरांतील संगमरवरी मूर्ति फार मोहक व प्रसन्नवदन आहे.

श्रीविमलेश्वर देवालय

सांगें तालुक्यांतील रिवण या गांवांत हें शिवालय आहे. भोंवतालचीं शेतें, नारळीच्या बागा, जिकडून तिकडून संथपणें वाहणारे पाण्याचे छोटे मोठे प्रवाह आणि अल्प अंतरावरील कुशावती नदी अशा रमणीय दृश्यामुळें हें देवालय पहावयास जाणाऱ्याला एक निराळाच आनंद नि समाधान वाटल्यावांचून राहात नाहीं.

देवालयाची आधुनिक इमारत मजबूत नि सुंदर असून पुढें प्रशस्त सभामंडप आणि दक्षिण व पश्चिम बाजूंनीं दोन अग्रशाला आहेत. उत्तरेकडील अग्रशाला अजून अपुरी आहे. आंतील चौक व गर्भागारहि व्यवस्थित आहे.

श्रीविमलेश्वराचें लिंग आकारानें मध्यम व भाविकांनां आंतरिक समाधान वाटण्यासारखेंच सुरेख असून स्वयंभु आहे. देवालयाची स्थापना कधीं झाली हें निश्चित समजण्यास मार्ग नाहीं; तथापि ती बरीच प्राचीनकालीन असावी असें वाटतें.

प्राचीन कालीं एक शेतकरी जमीन नांगरतांनां त्याच्या नांगराचा फाळ एका कठीण दगडास लागल्यासारखें त्याला वाटलें, म्हणून त्यानें तेथील माती उकरून काढली, तोंच तेथें त्याला लिंग दिसून आलें अशी माहिती गतकालीन लोकांकडून ऐकण्यांत येई. लिंगाचा उदय झाला तेथेंच पिंडी इ. बसवून मंदिर बांधण्यांत आलें. प्राचीन दोन मंदिरें जीर्ण होऊन हल्ली हें नवीन पद्धतीचें तिसरें बांधलेलें आहे.

चैत्रपासून फाल्गुनपर्यंत या देवस्थानांत निरनिराळे अनेक उत्सव होतात. त्यांत भाविकांच्या दृष्टीनें नवरात्र-दसरा आणि इतर सर्वसाधारण लोकांच्या व जत्रेच्या दृष्टीनें शिमगा हे उत्सव महत्वाचे व विशेष जमावाचे असतात.

नवरात्रमधील नवमीच्या उत्तर रात्रीं देवाचें 'तरंग' कोणत्याहि आधारावांचून पाटावर उभे राहिल्याशिवाय या उत्सवाची पूर्तताच होऊं शकत नाहीं. हें दृश्य पहाण्यास अनेक भाविकांची येथें फार गर्दी होते. यावेळीं येथें केलेली मागणी पुरी झाल्यावांचून राहात नाहीं असा अनेकांचा अनुभव आहे. शिमग्याच्या उत्सवांत येथें शिविका-मिरवणूक व चार रात्रीं नाट्यप्रयोग होतात. शिविकेंतील उत्सवमूर्ति लहानशीच व शांत स्वरूपाची आहे. रिवणकरांची या देवस्थानांतील नाट्यसेवा बऱ्याच कालापासूनची असून सुधारलेल्या पद्धतीचे संगीत नाट्यप्रयोग गोव्यांत प्रथम येथेंच झालेले आहेत.

देवाल्यासमोर देवाची जी तळी आहे त्या तळींत येणारा पाण्याचा प्रवाह कृष्णपाषाणी सवत्स गाईच्या मुखांतून प्रवेशून मूत्रमार्गानें गोमूत्रासारखा तळींत येतो. येथील एक नवलाची व भाविकांच्या विशेष भाविकतेची गोष्ट म्हणजे या गाईची पाठ जेव्हां पहाल तेव्हां नुकतेंच तिजवर शस्त्र परजल्यासारखी दिसते. भाविक म्हणतात कीं, "देवाचा सरदार श्रीरवळनाथ प्रत्येक रात्रीं संचारास निघतांनां तिजवर आपली तरवार परजून घेतो. कित्येक सुधारक म्हणतात, पाषाणांतच तसा कांहीं तरी गुण असावा. पण अजून त्यासंबंधीं निश्चित असें कांहींच समजलेलें नाहीं आणि दिवसेंदिवस गाईच्या पाठीवरील ती जागा नेहमींच शस्त्र घांसल्यानें खोलगट होत चालल्यासारखी वाटते. येथेंच वरच्या बाजूनें एका कोपऱ्यांत एक सुंदर कलाकृतीची प्राचीनकालीन पाषाणी नागीण आहे. सूर्यास्ताच्या वेळीं कोमल किरण तिजवर पडतांच जवळचें पाणी जर थोडें थोडें तिजवर शिंपडलें

तर ती जिवंत असल्याचा क्षणिक भास होतो. असा त्या सुरेख पाषाणी शिल्पकामाचा गुण आहे.

श्रीरवळनाथ, महालक्ष्मी, कमलेश्वर इ. या देवालयाच्या परिवारदेवता आहेत. रवळनाथ मंदिर मुख्य देवालयासमोर अगदीं रस्त्याजवळ असून त्यालाच लागून महालक्ष्मीमंदिर आहे. या मंदिरांत दरसाल आश्विन वद्यांत लक्ष्मी-उत्सव होत असतो. रवळनाथाचें जुनें मंदिर जीर्ण झाल्यानें तें हल्लीच नवीन बांधलेलें आहे व कमलेश्वराचें जुन्या पद्धतीचें छोटें देऊळ नदीच्या पलीकडे आहे.

देवालयाचें उत्पन्न व खर्च समान आहे.

प्रभु देसाई, रिवणकर (दैवज्ञ), भट इ. या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीमारुति (रिवण)

गोकर्ण-पर्तगाळी-मठसंस्थानच्या रिवण येथील मठांत हें मारुतिमंदिर आहे. सदरील मठपरंपरेचे सहावे मठाधीश गुरुवर्य श्रीरामचंद्रतीर्थ स्वामी यांनां गोकर्ण येथें शिलागर्भात लाभलेल्या चार मूर्तींपैकीं पर्तगाळ येथें स्थापन झालेल्या तीन मूर्ति राम, लक्ष्मण व सीता या असून त्यांतलीच चौथी ही मारुतीची आहे. स्वामींना झालेल्या दृष्टांताप्रमाणें हिची स्थापना येथें करण्यांत आली आणि सभोंवतीं मठाची इमारत उभारण्यांत आली. हा रिवण-मठ पर्तगाळमठाइतकाच जुना आहे.

मारुतीची मूर्ति शिलेची व प्रसन्नवदन आहे. श्रीरामचंद्रतीर्थ स्वामीजींची या मुख्यप्राण मारुतीवर फार भक्ति होती. त्यांनींच या मूर्तीची येथें स्थापना केली. ते फार कालपर्यंत येथेंच राहिले आणि अखेर त्यांनीं समाधीहि येथेंच घेतली. त्यांची समाधि मारुतिमंदिराच्या सभामंडपांत मारुतिसन्मुख आहे. स्वामींनीं योगसाधनेसाठीं पोखरून तयार करविलेली गुहा या मंदिराच्या खालच्या बाजूनें जवळच आहे. स्थान शांत असून जवळच एक स्वच्छ पाण्याचा झराहि वहात आहे.

मारुतिमंदिरांत अनंत १४शी व वैकुंठ १४शी असे उत्सव होतात. मठांत वैशाख कृ. ३ ये दिवशीं श्रीरामचंद्रतीर्थ स्वामींची पुण्यतिथीहि साजरी होते.

हा मठ श्रीविमलेश्वर देवालयापासून थोड्याच अंतरावर असून मुख्य रस्त्याच्या जवळच आहे.

मठाची स्थापना करण्याच्या वेळीं श्रीस्वामीजींच्या इच्छेप्रमाणें गांवकरी लोकांनीं मठासाठीं आदरपूर्वक जागा देऊन मठांतील मारुतीची पूजा-अर्चा, नंदादीप, नैवेद्य इ. साठीं नारळी-पोफळीची बागहि बहाल केली. त्याच उत्पन्नानें सदर खर्च आजहि चालत आहे.

श्रीशांतादुर्गा (कोळंब)

विमलेश्वर देवालयापासून दोन अडीच मैलांच्या अंतरावर कोळंब येथें हें श्रीशांतादुर्गा देवालय आहे. देऊळ रस्त्याला लागूनच असून बांधणी जुन्या पद्धतीची दगडी आहे. विमलेश्वरमंदिराचा या देवळाशीं कांहीं जुना संबंध असून दसऱ्याच्या दिवशीं दरसाल देवीची पालखी विमलेश्वर

देवस्थानांत येत असते. विमलेश्वर हा महादेव आणि शांतादुर्गा ही पार्वती असल्यानें पतिपत्नीचें त्यांचें नातेंहि असूं शकेल. दरसाल शिमग्याच्या अखेरच्या दिवशीं विमलेश्वर देवस्थानांतून स्वारी-वादनाची मिरवणूकहि श्रीशांतादुर्गा मंदिरांत जाते.

शांतादुर्गेची आसनस्थ मूर्ति कृष्णशिलेची व उत्सवमूर्ति पंचधातूची आहे. या देवळांतील मुख्य उत्सव रामनवमीचा असून त्याला नाट्य-प्रयोगांचीहि जोड असते.

श्रीरामनाथ, दक्षिणादेवी इ. या देवालयाच्या परिवारदेवता आहेत.

देवस्थानचें उत्पन्न साधारणपैकींच असून खर्चहि तेवढाच आहे.

प्रभु देसाई, प्रभु गांवकर इ. या देवालयाचे महाजन आहेत.

श्रीदामोदर (जांबावली)

श्रीदामोदर हें दैवत मूळचें मडगांवचें आहे. प्राचीनकालीं मडगांव येथें श्रीलक्ष्मीनारायण, श्रीरामनाथ, श्रीमहाकाली व श्रीचामुंडेश्वरी अशीं चार देवालयें प्रसिद्ध होतीं. त्यांच्या नंतर श्रीदामोदर देवालयाची स्थापना झाली. ख्रिस्ती-करणापूर्वी दामोदराचें देवालय मडगांवच्या म्हाड्डवाडींत, लक्ष्मीनारायणाचें फातर्डेवाडींत, महाकाली व चामुंडेश्वरीचें कोंबवाडींत आणि रामनाथाचें वडें येथें आजच्या ख्रिस्ती प्रार्थनामंदिराच्या जागीं होतें. "हें देवालय फार मोठें व मजबूत बांधणीचें होतें" असें गास्पार कुन्है यानें आपल्या लेंदस् वि. ३ पृ. ६४६ मध्यें लिहिलें आहे. दामोदराच्या देवालयाच्या जागीं म्हाड्ड येथें आज तुटलेलें लिंग व पुढें तळी दिसत आहे. 'तोंबु' मध्यें इं. सं. डॉ. पिसुर्लेकर यांनीं दिलेल्या मोडलेल्या देवालयांच्या मडगांवच्या यादींत दामोदर, चंद्रनाथ, नारायण, चामुंडेश्वरी, सांतेर, मकाजी, मूळवीर, भगवती, गोवेश्वर, महालक्ष्मी, भूतनाथ, ईश्वर, ग्रामपुरुष अशीं नांवें आहेत. जांबावलीस आलेल्या दैवतांशिवाय जे इतर देव या यादींत दिसतात त्यांची कुठें स्थापना झाली किंवा काय झालें हें समजत नाहीं. पो. इ. सं. प्रो. पाद्रि सिल्व्ह रेगु यानें 'दुकुमेंतासांव पर अ इस्तोरिअ दश् मिसोंइश् दु पाद्रोआदु पुर्तुगेज दु ओरियेंति' या आपल्या पुस्तकाच्या १० व्या भागांत साष्टींतील देवळें कशीं मोडलीं याबद्दलचा समकालीन पोर्तुगीज पत्रव्यवहार दिला आहे; त्यांत या देवालयाचीहि बरीच माहिती मिळते.

आणीबाणीच्या प्रसंगीं उपासकांनीं दामोदराचें लिंग हलविण्याचा प्रयत्न केला; पण तो त्यांनां साधला नाहीं. आणि साधला असता तरी तें लिंग उपटून नेणें त्यांनां शक्य झालें असतें कीं काय याचीहि शंका आल्यानें, त्या लिंगाचा वरचाच भाग ते घेऊन गेले. आज जांबावलीस दामोदराच्या गर्भागारांत त्याचीच स्थापना झालेली दिसत आहे. आणि खालचा भाग मडगांवच्या म्हाड्डांत आजहि जशाचा तसाच आहे. पिंडी मात्र नाहीं.

अशा रीतीनें सदर दैवतांचीं नेण्यास शक्य असलेलीं प्रतिकें घेऊन मंडळी जांबावली येथें आली. कुशावती नदीजवळील तो भाग त्या लोकांनां

सोयिस्कर वाटला. ती जमीन रिवण गांवच्या ग्रामसंस्थेच्या मालकीची होती. गांवकरी एकत्र जमून त्यांनीं विचारविनिमय केला व त्या लोकांच्या मागणीप्रमाणें त्यांनां ती जागा देण्याचा एकमतानें निर्णय घेऊन, ती मोठ्या संतोषानें बहाल केली; नांवापुरता अल्प धारा ठरविण्यांत आला आणि दुसऱ्या बाजूनें त्याच्या रकमेइतकेंच वतन श्रीदामोदराच्या नांवें कायम करून दिलें. कठिण प्रसंगीं सुलभ रीतीनें मिळालेल्या या सहाय्याच्या स्मरणार्थ श्रीदामोदर देवस्थानांत रिवण-ग्रामसंस्थेचे वर्गीय यांनां ठराविक मान आहे.

आरंभीं चुडतांचें छपर असलेल्या देवालयांत देवांची स्थापना झाली. नंतर लहानसें मंदिर बांधण्यांत आलें आणि त्यानंतरच्या कालांत क्रमाक्रमानें देवालयाची चांगली सुधारणा होत जाऊन सन १९०८ सालीं ताम्रपट्ट बसविण्यांत आला. नंतर परिवारदेवता-मंदिरेंहि बांधलीं गेलीं.१९१३ सालीं पिंडिकाजीर्णोद्धार झाला. १९३८त अग्रशाळेची भव्य अशी दर्शनी इमारत उभारण्यांत आली. पुढें १९४६ त श्रीरामनाथ व महाकाली, चामुंडेश्वरी या देवालयांचा जीर्णोध्दार झाला. अशा रीतीनें हें देवस्थान आज प्रगतिपथावर आहे.

मुख्य देवालयांत उजव्या बाजूनें श्रीलक्ष्मीनारायण व डाव्या बाजूनें श्रीदामोदर अशी स्थापना करण्यांत आली असून या देवालयाच्या डाव्या बाजूनें श्रीरामनाथमंदिर आणि उजव्या बाजूनें देवीमंदिर आहे. इतर परिवारदेवताहि जवळपासच आहेत.

श्रीदामोदराची उत्सवमूर्ति फार सुंदर असून सकृत्दर्शनीच अंत:करणांत भक्तिभाव उत्पन्न करणारी अशी आहे.

चैत्रपासून फाल्गुनपर्यंत येथें निरनिराळे अनेक उत्सव होतात आणि मधून मधून खासगी उत्सवांचीहि त्यांत भर पडते. बहुतेक उत्सवांनां अन्नसंतर्पणाची जोड असते. किंबहुना अन्नसंतर्पण हें येथील उत्सवांचें वैशिष्ट्यच म्हणतां येईल. गतकालांत जेव्हां तांदूळ मिळणें कठीण झालें होतें तशा प्रसंगीं देखील श्रीदामोदराला कधींच तांदळांची कमतरता भासली नाहीं. कठीण प्रसंगांत सांपडलेल्या कित्येकांनां या संतर्पणाचा अन्नछत्रासारखाहि उपयोग झालेला आहे. आणि त्याबद्दल श्रीदामोदराचा महाजनवर्ग आणि संतर्पण घालणारे ग्रामस्थादि इतर उपासक यांनां धन्यवाद द्यावे तितके थोडेच आहेत.

आश्विन १५ मा हा उत्सव भाविकांच्या दृष्टीनें आणि शिमगा व चैत्रांतील पिंडिका हे उत्सव सर्वसाधारण लोकांच्या दृष्टीनें विशेष महत्वाचे मानण्यांत येतात. पहिल्यांत अवसरानें हातानें वडे काढण्याचा विशिष्ट कार्यक्रम असतो व इतर दोन्हीं उत्सवांत सुंदर नाट्यप्रयोगांची जोड असते.

विद्यालय, वाचनालय किंवा रुग्णालय या कार्यांत जरी या देवस्थानचा पैसा खर्च होत नसला तरी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें अन्नदानाच्या बाबतींत मात्र तो अंत:करणपूर्वक खर्च होत असतो. देवस्थानें स्थापन करण्याच्या आर्यांच्या मूळच्या हेतूंत हीहि एक महत्वाची बाब मानली गेली आहे व म्हणून अन्नदानाच्या बाबतींत सबंध गोमंतकीय देवालयांत प्रमुखत्व पटकावलेल्या या श्रीदामोदर देवस्थानचें कोणीहि मन:पूर्वक अभिनंदन करील.

देवस्थानचें उत्पन्न ठीक असून त्याच मानानें खर्चहि आहे.

प्रभु, हेगडे, शेणवी, दुकळे असे या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीदामोदरमंदिर (मडगांव)

मडगांवच्या उत्तर भागांत श्री. न. दा. नायक यांच्या घरांत दक्षिण बाजूस हें मंदिर आहे. सन १८८४ साली भयानक सांथीच्या प्रसंगीं, जांबावलीच्या देवालयांतून ग्रामरक्षणार्थ ग्रामस्थांनीं आणण्यांत आलेलें प्रसादरूपी श्रीफल, चांदीच्या कलशांत ठेवून त्याचीच या मंदिरांत आरंभीं प्रार्थना व सेवा चाले. एका तपानंतर स. १८९६ त हा कलश जांबावलीस परत नेण्यांत आला व देवाच्या निरोपाप्रमाणें तो दुसऱ्या दिवशीं पुन: मडगांवला आणून या मंदिरांत ठेवण्यांत आला. तत्कालीन लोकप्रिय पुढारी भि. सुब्राय लक्ष्मण नायक यांनी १९१० च्या ऑक्टोबरांत चांदीचा देव्हारा तयार करून त्यांत श्रीदामोदराची सुंदर प्रतिमा बसविण्याचें काम थाटानें केलें. तीच प्रतिमा आज मंदिरांत आहे. प्रत्येक सोमवारीं या मंदिरांत भजनाचा कार्यक्रम चालतो. श्रावणांतील सोमवारीं विशेष जमाव असून त्या महिन्यांतील भजनी सप्ताह प्रेक्षणीय असतो.

श्रीहरिमंदिर

हें मंदिर मडगांवच्या नवीन बाजाराच्या जवळ आहे. मंदिरांत अग्रभागीं ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरीची पोथी व संतगाथा असून त्याच श्रेष्ठ साहित्यदेवतेची प्रार्थना व सेवा चालते. हल्लींच लालखीच्या मिरवणुकीसाठीं तयार केलेली चांदीची श्रीविठ्ठलरखुमाईची मूर्ति पोथीच्या वरच्या बाजूनें ठेवतात. हें मंदिर अस्तित्वांत येऊन अंदाजें ४९ वर्षें झालीं. याचे संस्थापक वै. नागेशराव सडेकर व प्रोत्साहक वै. कृ. शा. नाबर हे होते. मडगांवच्या नव्या बाजारांतील बहुतेक सर्व हिंदु व्यापारी व व्यवहारी लोकांच या मंदिराच्या कार्यास पाठिंबा आहे. सोमवार गुरुवार व एकादशी या दिवशीं रात्रीं ९ ते ११ पर्यंत येथें भजनाचा सुंदर कार्यक्रम चालतो गतकालांत भजनप्रेमी दत्तोबा सडेकर प्रभृति मंडळीच्या भक्तिरसपूर्ण भजनाच्या गोड कार्यक्रमानें मंदिर व तेथील वातावरण भक्तिरसानें भरून जाई. या मंदिराचा कार्तिक शु. १३ शीच दिंडी - उत्सव फार महत्वाचा असून गोमंतकाच्या सर्व भागांतील लोक या उत्सवाल उत्साहानें जमतात. गतकालांत शहापूर, सांगली मिरज, पुणें इ. भागांतील सुप्रसिद्ध भजनी मंडळ या दिंडींत भाग घेई.

श्रीविठ्ठलमंदिर

कांहीं वर्षांपूर्वीं मडगांवला श्री. केसरक यांच्या घरांत दरसाल कार्तिकांत एकादशी उत्स होई. या उत्सवासाठीं पुढें श्रीविठ्ठलाच्या मूर्तीच योजना झाली आणि होतां होतां त्याच उत्सवांतू या मंदिराची कल्पना निघून तें लवकरच मूर्त स्वरूपांतहि आलें. विठ्ठलमंदिराच्या बांधणी जवळ जवळ ४० वर्षें झालीं. मंदिराची रचन सुंदर असून गर्भागारांतील श्रीविठ्ठलरखुमाईच्य आसनस्थ मूर्ति कृष्णपाषाणी व घवघवीत आहेत श्री. केसरकर यांच्या घरांतील मूळची मू आजची उत्सवमूर्ति असून ती शेजघरांत आहे कार्तिक शु. १३ शीचा मंदिरांतील उत्सव मुख व विशेष गर्दीचा असतो. हरिमंदिरांतून निघलेली दिंडी याच उत्सवास येथें येते. या मंदिराच्या कार्यास मठग्रामस्थ वैश्यसमाजाचा पाठिंबा आहे.

पिंपळपार

मडगांवच्या मार्केटजवळच्या पिंपळपारावरहि श्रीदामोदराचें अस्तित्व मानतात. हल्लीं पारावर कठडा घालण्यांत आला असून एक छोटा देव्हाराहि बांधण्यांत आला आहे. या पारावर सार्वजनिक सत्यनारायण उत्सव प्रेक्षणीय होतो.

श्रीकृष्णमंदिर

हरिमंदिरापासून जवळच मडगांवच्या पाजीफोंडी या भागांत हें मंदिर हरिजनसमाजाकडून बांधण्यांत आलें आहे. मंदिराच्या बांधणीस १२ वर्षें झालीं. आंतील श्रीकृष्णाची मूर्ति अजून मातीचीच आहे. संगमरवरी सुंदर मूर्ति मुंबई येथें तयार करण्यांत येत असून ती लवकरच आणण्यांत येणार आहे. श्रीकृष्णजयंती हा मंदिराचा मुख्य उत्सव आहे.

श्रीकमलावती

तिसवाडी तालुक्यांत करंबळी येथें हें मंदिर नवीनच बांधण्यांत आलें आहे. ख्रिस्तीकरणापूर्वीं येथें गणेश, वनदेवता, शांतेरी, सिद्धनाथ, वेताळ, क्षेत्रपाल इ. देवता होत्या. त्यांचें स्थलांतर झाल्याचा पत्ता लागत नाहीं; अर्थात् त्या आसपास कुठें तरी गडप झाल्या असणें शक्य आहे.

श्रीसीताराम

सदर तालुक्यांत डोंगरी येथें गतकालीन सुप्रसिद्ध संतकवि श्रीकृष्ण जगन्नाथ भट बांदकर यांकडून या मंदिराची स्थापना झाली. डोंगरी-मंड्डर या भागांत ख्रिस्तीकरणापूर्वीं नारायण, दुर्गादेवी, रवळनाथ या देवता असल्याचा उल्लेख मिळतो. तथापि त्यानंतर तेथें कोणतेंच देवालय नव्हतें. ती उणीव या मंदिरानें भरून निघाली.

बांदकरांचे गुरु श्रीविष्णुबुवा यांच्या उपदेशानुरूप त्यांनीं श्रीसीतारामाची मूर्ति स्थापन करण्याचें ठरवून बोरीच्या एका कारागिराला ती लांकडाची तयार करण्यास सांगितली; तथापि ईशेच्छेनें त्यानें कृष्णपाषाणी सुंदर मूर्ति बनवून आणली आणि आरंभीं बांदकर यांनीं आपल्या घराच्या एका दालनांत शके १७९३ सालीं तिची स्थापना केली. पुढें शके १८०६ त ज्येष्ठ शु. ९ मी रोजीं घराला लागूनच नवीन बांधलेल्या सुंदर मंदिरांत तिचें स्थलांतर करण्यांत आलें. आजला ती मूर्ति याच मंदिरांत आहे. मंदिरास सार्वजनिक स्वरूप दिल्यानें तेथील रहिवाशांच्या सहाय्यानें पुढें त्याची विशेष प्रगति होत गेली. पूर्वीं श्रीकृष्णभट व नंतर त्यांचे चिरंजीव श्रीमुकुंदराज यांच्या भजन व कीर्तनाच्या सुंदर सेवेमुळें मंदिराची फार प्रसिद्धि झाली.

मंदिरांत आज अनेक उत्सव होतात. त्यांत रामनवमीचा विशेष महत्वाचा व जमावाचा असतो.

गर्भगृहाबाहेरच्या उजव्या बाजूस मारुतीची कृष्णपाषाणी मूर्ति आहे. ही मूर्ति सांगें येथून आणण्यांत आली व शके १८०७ सालीं तिची स्थापना झाली.

श्रीगोमंतेश्वर

हें देवालय नाभिक समाजाच्या मालकीचें असून तें जुनें गोंवें येथें इतिहासप्रसिद्ध ब्रह्मपुरी क्षेत्रांत आहे. गोमंतेश्वर हें शिवदैवत आहे. या लिंगाची स्थापना वैशाख शु. १२ शी शके १८६९ रोजीं झाली. देवालयास पुढच्या बाजूनें सभामंडप असून त्याच्या पश्चिमेकडील पायऱ्यांपासून जवळच इतिहासप्रसिद्ध 'माधवतीर्थ' आहे.

बहामनी सत्तेत उध्वस्त केलेल्या या क्षेत्राची शुद्धि व पुनर्रचना करून विजयनगर साम्राज्याचे शौर्यशाली सेनापति माधव मंत्री यांनी ब्रह्मपुरीची स्थापना व तीर्थाची नूतन बांधणी केली. त्यावरून या तीर्थास 'माधवतीर्थ' असें नांव पडलें. श्रावणांतील सोमवारीं ब्रह्मपुरींत यात्रा भरते आणि यात्रेकरू लोक अत्यंत भावनेनें याच 'माधवतीर्थांत' स्नान करतात.

या देवालयांतील उत्सवांत महाशिवरात्रीचा उत्सव विशेष महत्वाचा असतो.

श्रीशांतादुर्गा

हें देवालय कालापूर येथें आहे. ख्रिस्तीकरणापूर्वी या गांवांत सांतेर, केळंबादेवी, माया, रामनाथ, वेताळ, खळनाथ, पंचदेवता, ग्रामपुरुष अशा देवता असल्याचा उल्लेख मिळतो. त्यांतील सांतेरीची येथें नव्यानें स्थापना करण्यांत येऊन तिलाच श्रीशांतादुर्गा असें नांव मिळालें आहे. हें नवीन देऊळ लहानसेंच पण व्यवस्थित आहे. येथें जे कांहीं उत्सव होतात त्यांत कार्तिक पौर्णिमेचा सप्ताह व वैशाखमधील जत्रा हे विशेष जमावाचे असतात.

श्रीमारुति

पणजी येथें मळयांतील झऱ्याच्या वरच्या बाजूनें डोंगरावर हें छोटें पण सुंदर मारुतिमंदिर आहे. येथील हनुमानजयंतीचा उत्सव विशेष जमावाचा असतो.

श्रीमहालक्ष्मी

हें देवालय पणजी येथें डोंगर-पायथ्याशीं आहे. मंदिर व्यवस्थित व सुंदर असून बाहेरील सभामंडप प्रशस्त आहे. या मंडपाचा उपयोग दिवसा मुष्टिफंड विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठीं व रात्रीं गरीब पांथस्थांसाठींहि होत असतो. प्राकारहि ठीक आहे.

ख्रिस्तीकरणापूर्वी या भागांत रामनाथ, सांतेर, वेताळ, खळनाथ अशा देवता असल्याचा उल्लेख मिळतो; पण नंतरच्या त्यांच्या स्थितीचा पत्ता लागत नाहीं. प्रस्तुतची महालक्ष्मीची मूर्ति मयें गांवांजवळच्या भागांत होती. तेथून ती वै. नारायण कामत महामाई यांनी पणजीस आणविली. आरंभीं वै. राया कामत घाणेकर यांच्या घरीं ज्या खोलींत ती ठेवली त्या खोलीस अजून 'सोमवारची खोली' म्हणतात आणि चैत्रपौर्णिमा व रथसप्तमी या उत्सवांपूर्वीच्या सोमवारीं दुपारीं महालक्ष्मीस पक्वान-नैवेद्य करून रात्रीं या पूर्वजागीं नाटकाची तालीम घेतात. पुढें वर्गणी जमवून देऊळ बांधण्यांत आलें आणि आषाढ शु. ७ मी शके १७३९ रोजीं मोठ्या थाटानें त्यांत देवीची स्थापना करण्यांत आली. श्रीमहालक्ष्मीची मूर्ति कृष्णशिलेची चतुर्भुज आहे.

जवळच्या दुसऱ्या मंदिरांत महादेव, खळनाथ, ग्रामपुरुष अशा परिवार-देवता असून मारुतीची मूर्तीहि जवळच आहे.

या मंदिरांत चैत्रपासून फाल्गुनपर्यंत जे कित्येक उत्सव होतात त्या सर्वांत चैत्र पौर्णिमा व रथसप्तमी हे उत्सव विशेष प्रेक्षणीय व जास्त जमावाचे असतात.

गौड सारस्वत, दैवज्ञ, वैश्य, गुर्जर, भंडारी, नाभिक, गांवकर वगैरे हिंदुसमाजांतील लोक या देवस्थानचे महाजन आहेत.

श्रीचौरंगनाथ

बार्देशच्या अडफडें येथें हें मंदिर हल्लीच बांधलेलें असून तें लहानसेंच पण व्यवस्थित आहे.

गोमंतकीय देवालयांचा कारभार

पूर्वकालीं देवालयांचा कारभार सधन व प्रतिष्ठित महाजनांकडून चाले. पुढें महाजन - मंडळीनें निवडलेल्या पंचांकडून तो चालविण्यांत येई. यानंतर दि. ३० ऑक्टोबर सन १८८६ च्या ५८४ नंबरच्या फर्मानान्वयें देवालयांचा कायदा अस्तित्वांत आला आणि तेव्हांपासून देवालयाच्या महाजनांनीं पद्धतशीर रीतीनें निवडलेल्या व्यवस्थापक मंडळाकडून हा कारभार चालविण्यांत येई. त्या वेळीं अध्यक्ष, खजिनदार, अखत्यार व चिटणीस आणि त्यांचे दुय्यम हे निवडणुकींतूनच निवडून येत.

सन १९३३ सालीं हा कायदा रद्द करण्यांत येऊन ६४५ नंबरच्या ३० मार्चच्या फर्मानानें ४३७ कलमांचा नवीन कायदा मंजूर होऊन अस्तित्वांत आला. या कायद्यान्वयें व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची नेमणूक सरकारकडून होत असून खजिनदार, अखत्यार व चिटणीस आणि त्यांचे दुय्यम यांचीच निवड करण्याचें कार्य महाजनांच्या हातीं राहिलें. ही निवडणूक दर तीन वर्षांनीं नोव्हेंबर महिन्यांत होते आणि जानेवारीपासून या नवीन व्यवस्थापक मंडळानें अधिकार हातांत घ्यावयाचा असतो. निवडणुकीची माहिती सरकारी साप्ताहिकांतून जाहिरातीच्या द्वारें देण्यांत येते.

निवडणुकींत भाग घेणाऱ्या महाजनांची एक यादी तयार करण्यांत आलेली असते. ही यादी सरकारांत मंजूर करून घेतलेल्या देवालयाच्या अंतर्गत नियमावलीच्या यादीन्वयें तयार झालेली असते. मूळ महाजनाच्या २१ वर्षांवरील पुरुष संततीस व्यवस्थापक मंडळाकडून या यादींत आपला सहज समावेश करून घेतां येतो.

व्यवस्थापक मंडळांत निवडून आलेल्या महाजनानें अधिकार हातांत घेतलाच पाहिजे. फक्त त्यानें पूर्वी काम केलेलें असल्यास, प्रकृति ठीक नसल्यास किंवा तसेंच कोणतें तरी सबल कारण पुराव्यानें दाखवितां येण्यासारखें असल्यास त्याला अधिकारन्यासाची सवलत मिळते. अधिकारावर आलेल्या मंडळानें सरकारी कायद्यास आणि देवालयाच्या अंतर्गत नियमावलीस धरून कारभार चालविला पाहिजे. जमाखर्चाचें अंदाजपत्रक तयार करून कारभाराच्या पूर्व सालीं डिसेंबरपर्यंत तरी सरकारांतून तें मंजूर करून घ्यावें लागतें.

देवालयांत व त्याच्या आवारांत शांतता व सुव्यवस्था राखण्याचे सर्व अधिकार कायद्यानेंच व्यवस्थापक मंडळास आहेत. अर्थात् एखाद्याकडून या क्षेत्रांत गैरशिस्त वर्तन झाल्यास त्याला योग्य दिशा दाखविण्याचे अधिकार व्यवस्थापक मंडळाला आहेत.

एखाद्या व्यवस्थापक मंडळानें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून देवालयाचें व पर्यायानें महाजनांचें कोणत्याहि बाबतींत नुकसान केल्यास त्याला अधिकारच्युत करण्याची मागणी महाजनांना सरकारकडे करतां येते.

वर्षांतून कायद्यानें दोनदां, व अंतर्गत नियमावलींत नमूद झालेल्या अशा महाजनांच्या बैठकी भरविण्यांत येतात व त्यांत अंदाजपत्रकावर आणि वार्षिक हिशेबावर मत देण्याचे किंवा देवालयीन हिताचे अन्य महत्वाचे ठराव घेण्यांत येतात.

— समाप्त —

GOMANTAKIYA DEVALA

(Separata de Bharatmitra)

Editor:
Dr. S. R. Quenim, Médico
RIBANDAR

प्र.— ना. भा. नायक
रिवण (गोवा)

Composto e Impresso na
TIP. MITRA
Margão

Visado pela Censura.